कथा भारती

हिंदी लघुकथा

आंतरभारतीय पुस्तकमाला

कथा भारती
हिंदी लघुकथा

संपादक
डॉ. नामवरसिंह

अनुवादक
डॉ. प्रभाकर माचवे

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती : 1971 (शके 1893)
तिसरी आवृत्ती : 1990 (शके 1911)
मूळ © लेखकांकडे, 1973
मराठी आवृत्तीचे हक्क नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया कडे
Original Title : KATHA BHARATHI : HINDI KAHANIYA (Hindi)
Marathi Translation : Katha Bharathi : Hindi Laghukatha
रु. 13.00
निदेशक : नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क,
नवी दिल्ली-110 016 द्वारा प्रकाशित

भूमिका

1915च्या 'सरस्वती'मध्ये चन्द्रधर शर्मा गुलेरी यांची 'उसने कहा था' (तिनं सांगितलं होतं) ही कथा प्रसिद्ध झाली त्यावेळी ती पुढे हिंदी कथासृष्टीत गोगोलच्या 'ओव्हरकोट'ची पदवी प्राप्त करील असं कुणालाही वाटलं नव्हतं. 'उसने कहा था' ही काही हिंदीतील पहिली कथा नव्हे. पहिली कथा बहुधा किशोरीलाल गोस्वामी यांची 'इंदुमती' (1900) आहे किंवा त्याच लेखकाची 'प्रणयिनी परिणय' (1887) अथवा या काळातील अन्यही कुठली कथा असू शकेल. आणि हेही खरं आहे की 'उसने कहा था'च्या आधी हिंदीमध्ये बंगमहिला यांची 'दुलाईवाली' (1907), वृंदावनलाल वर्मांची 'राखबिंद भाई' (1909), जयशंकर प्रसादांची 'ग्राम' (1911), राजा राधिका-रमणप्रसाद सिंह यांची 'कानों में कंगना' (1913), विश्वंभरनाथ शर्मा कौशिक यांची 'रक्षाबंधन' (1913) आदी अनेक मौलिक कथा प्रकाशित झालेल्या होत्या. पण सुरवातीच्या या तमाम कथा फक्त ऐतिहासिक वस्तू बनून राहिलेल्या आहेत. 'उसने कहा था' मात्र हिंदी जगताच्या स्मृतीत आजही अमर आहे आणि तिच्याबरोबर तिचे लेखक चंद्रधर शर्मा गुलेरीही – तेही फक्त एवढ्याच एका कथेमुळे. या कथेची रचनाही त्यांच्या बाबतीत अपवादभूतच होती. कारण वस्तुतः ते संस्कृत पंडित होते आणि भाषाशास्त्र तसंच पुरातत्त्व हे त्यांचे खरे आवडीचे विषय होते. त्यांनी आणखी दोन कथा लिहिल्या होत्या : 'बुद्ध का कांटा' (1911) आणि 'सुखमय जीवन' (1911 व 1915च्या दरम्यान). परंतु कथालेखन हे त्यांनी चुकूनमाकून केलेलं लेखन असावं असंच वाटतं. त्यांचा मृत्यूही 1920मध्ये सदतीस वर्षांच्या अल्पायुष्यात झाला. या सर्व गोष्टी लक्षात घेता 'उसने कहा था' हा हिंदी कथेच्या इतिहासातील एक सुखद योगायोग आहे, यापेक्षा अधिक काय म्हणता येईल ?

असं असूनही 'उसने कहा था' अजिबात अनपेक्षितपणे घडलेली गोष्ट म्हणता येणार नाही. तिचा विषय त्या युगाच्या धर्माला अनुसरून प्रेमातील बलिदानाचा आदर्श आहे. आधी बहुधा या आदर्शवादामुळेच तिची प्रशंसा झाली. पण त्याबरोबरच कलेतील अंगभूत संयम आणि वास्तवदर्शी चित्रणाचे कौशल्य यांनीही लक्ष वेधून घेतले. युग-समीक्षक रामचंद्र शुक्ल यांचे विधान ही गोष्ट स्पष्ट करणारे आहे. ते म्हणतात : "पक्का वास्तववाद आणि अभिरुचीच्या उच्च मर्यादा संभाळून (या कथेत) भावुकतेचा परमोत्कर्ष अत्यंत कौशल्याने साधलेला आहे. घटना अशा घडतात की जशा प्रत्यक्षात घडाव्या, पण त्यातून प्रेमाचं एक स्वर्गीय स्वरूप डोकावतं – फक्त डोकावतंच, निर्लज्जपणे आरडाओरडा करीत

नाही की रडतमेकत नाही. सर्व कथेत कुठेही प्रेमाचे उघडे वा नागडे प्रलाप किंवा वेदनेचं यीभत्स प्रदर्शन नाही. अभिरुचीच्या नाजुकातील नाजूक स्वरूपावर कुठेही आघात नाही होत. कथेतील घटनाच बोलतात, पात्रांना बोलावं लागत नाही." यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की आदर्शवादापेक्षा अधिक महत्त्वाची असलेली गोष्ट म्हणजे या आदर्शाच्या अभिव्यक्तीमधील लेखकाचा कलासंयम. त्या काळच्या इतर कथांकडे पाहता असा कलासंयम ही एक नवीनच घटना होती. या कलासंयमाचा आधार आहे भक्कम वास्तववाद. वास्तव जीवनातील महत्त्वाच्या घटनांची निवड आणि त्यांचे जिवंत चित्रण यांतून हा वास्तववाद उमटतो. नंतरच्या काळात हिंदी कथेचे अंगभूत वैशिष्ट्य बनलेले स्थानीय प्रादेशिक ('आंचलिक') चित्रण 'उसने कहा था' या कथेपासूनच सुरू झाले. मग ही आंचलिकता अमृतसरच्या बाजारामधील गडबड-गोंधळाची असो किंवा जर्मन मोर्च्यावरील शीख जवानांच्या लोकगीत म्हणण्याची अथवा मरणोन्मुख लहनासिंगाच्या बरळण्यामध्ये येणाऱ्या घराच्या आठवणींची असो. एवढेच नव्हे तर या कथेने हिंदी कथेला चमत्कृति-जन्य घटनांच्या कथानकांतून बाहेर काढून प्रत्यक्ष जीवनामधील वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगांच्या रोखाने वळविले. पण सर्वात मोठे काम 'उसने कहा था'ने केले ते कथेसाठी वापरण्यात येणाऱ्या भाषेच्या क्षेत्रात. या कथेने हिंदी कथेला प्रथमच जणू स्वतःची अशी जिवंत भाषा मिळवून दिली. या भाषेच्या अभावामुळे इतके दिवस हिंदी कथेची प्रगती खुंटलेली होती. याशिवाय पंचवीस वर्षांचा दीर्घ काळ कथानकाची घडण व फ्लॅशबॅक यांच्या साहाय्याने जोडण्यातील लेखकाचे कौशल्य त्याच्या कलासिद्धीची साक्ष देणारे आहे. जाता जाता हेही सांगायला हरकत नाही की पहिले महायुद्ध 1914 साली सुरू झाले व ही कथा 1915 साली लिहिली गेली; परंतु युद्धआघाडीवर कथानक घडताना दाखवून वर्तमान परिस्थितीच्या आकलनाचा गुलेरीजींनी दाखवून दिलेला पुरावा कदाचित भारतीय कथेच्या इतिहासातही अजोडच ठरेल. हिंदी कथेची पहिली उभारी अशा भव्य आरंभातून झाली हे तिचे भाग्यच होय.

याहून अधिक भाग्याची गोष्ट म्हणजे विकासाच्या या सूत्राचे संचालन करण्यासाठी लगेच प्रेमचंदांसारखा (1880-1936) समर्थ लेखक पुढे आला. 1915च्या 'सरस्वती'मध्ये 'उसने कहा था'चे प्रकाशन झाले तर 1916च्या 'सरस्वती'त प्रेमचंदांची 'पंचपरमेश्वर' ही कथा प्रसिद्ध झाली. या कथेने 'उसने कहा था'च्या आंचलिकतेला एक पाऊल पुढे नेऊन सरळ ग्रामीण प्रदेशातील गोष्टीला भिडविले. परंपरागत लोककथेचे हे साहित्यिक रूपांतर इतके सहज आणि सजीव झाले की यूरोपची 'शॉर्ट स्टोरी' आणि बंगालची 'गल्प' यांच्याशी हिंदी कथेचे नाते जोडणाऱ्यांच्या कल्पनेचे उड्डाण एकदम ओसरून गेले. या परंपरेत खेड्यापाड्यातील कहाण्यांची रसवत्ता व शैली आत्मसात करणाऱ्या अनेक

कथा प्रेमचंदांनी लिहिल्या. त्यांच्या कितीतरी कथा अगदी साधेसरळपणे अशा ढंगात सुरू होतात : "कुण्या एका गावात शंकर नावाचा एक कुटुंबवत्सल शेतकरी राहात असे. साधासुधा गरीब माणूस होता. आपल्या कामाशी काम, ना कुणाच्या अध्यात ना मध्यात...एके दिवशी संध्याकाळी एका साधुबुवाने त्याच्या दाराशी आपला तळ ठोकला." ('सवा सेर गेहूं'). हिंदुस्थानातील हरेक खेड्यात गोष्टी सांगणारा व ऐकणारा माणूस या सरळ ढंगाशी परिचित आहे हे सांगण्याची गरज नाही. ही शैली वापरून प्रेमचंदांनी कथा हा केवळ वाचण्याचाच नव्हे तर सांगण्याचाही प्रकार बनवून टाकला.

पण आपल्या कथांमध्ये प्रेमचंद नेहमी याच नियमाशी जखडून राहिले नाहीत. त्यांनी स्वतःच कुठेतरी म्हटले आहे की कथा ही हृदयाशी बांधलेली असते, नियमांशी नव्हे. नियम आपल्या सोयीसाठी असतात. अंतःकरणाच्या प्रकटीकरणासाठी जेव्हा ते निरुपयोगी ठरतात तेव्हा त्यांना बेशक उल्लंघनीय मानले पाहिजे. याप्रमाणे त्यांनी गरजेप्रमाणे दुसऱ्या शैलीचाही वापर केला. विषय आणि शैली या दोन्ही दृष्टींनी त्यांच्या कथांतून एका महान कलाकाराचे दर्शन घडते. 'शतरंज के खिलाडी'मधील मिर्झा व मीर यांच्यापासून तो 'बैलोंकी कथा'पर्यंत त्यांच्या पात्रांमध्ये इतके नमुने आहेत की त्यांच्या जीवन-अनुभवातील व्यापकतेचा अचंबा वाटतो. प्रेमचंदांनी जवळ जवळ सव्वातीनशे कथा लिहिल्या व वीस वर्षांच्या अवधीत आदर्शोन्मुख वास्तववादापासून तो आलोचनात्मक वास्तववादापर्यंतचा दीर्घ प्रवास केला. या प्रवासात आपोआपच कथेच्या कलेचाही विकास झाला. कथा-कलेच्या प्रौढतेच्या दृष्टीने त्यांच्या शेवटच्या दिवसांतील 'पूस की रात' (1930), 'कफन' (1936) यांसारख्या कथा विशेष उल्लेखनीय आहेत. त्या काळात प्रेमचंदांनी आपल्या नोटबुकात एके ठिकाणी लिहिले आहे : गम की कहानी मजा ले-लेकर. हे टिपण जणू 'पूस की रात' आणि 'कफन' यांची मार्गदर्शिका आहे. या कथांत थोडा थोडा चेकॉव्हचा भास आहे. अशा प्रकारे प्रेमचंदांनी हिंदी कथेला स्वतःचे वैशिष्ट्य प्राप्त करून देत असताना प्रौढावस्थेलाही आणून ठेवले.

जयशंकर प्रसाद (1889–1937) यांनी हिंदी कथाक्षेत्रात साधारणपणे प्रेमचंदांबरोबरच प्रवेश केला आणि आपल्या काव्यात्म व नाट्यपूर्ण प्रतिभेने हिंदी कथेत एक वेगळीच भर टाकली. प्रसादांची जीवनदृष्टी रोमँटिक आणि कलाभिरुची प्रगीतात्मक होती. यामुळे त्यांच्या कथाही रोमँटिक साच्यात ओतल्या गेल्या. त्यांनी बहुशः रोमँटिक प्रेमालाच कथेचा विषय बनविले आणि कथेत रोमँटिक वातावरणाच्या निर्मितीकडेच विशेष लक्ष दिले. यामुळे त्यांच्या कथांत कुठे निसर्गाच्या सुरम्य चित्रांचे काव्यमय वर्णन तर कुठे भूतकालाच्या मोहक चित्रांचे रंगतदार रेखाटन आहे. त्यांची पात्रेही रोमांचक कर्तृत्वाने विभूषित अशी मध्ययुगीन शौर्याची प्रतीके आहेत. या पात्रांच्या तोंडची भाषाही नाटकी

संस्कृतप्रचुर तसेच काव्योचित भावुकतेने भरलेली अशी असते. कथा ही वास्तवापेक्षा कल्पनेचीच निर्मिती अधिक आहे असे प्रसादांनी मानले आणि आपल्या कथांतून एक सौंदर्यपूर्ण असे अद्भुतरम्य विश्व निर्माण केले. त्यांच्या कथासंग्रहांची नावेही–'छाया', 'इंद्रजाल', 'आकाशदीप' वगैरे–एक प्रकारे त्यांच्या कथाप्रकाराची सूचना देणारीच आहेत. असे असले तरी स्थलवर्णनाचे असे एक क्षेत्र आहे की ज्याचे रंग प्रसादांच्या कल्पनारम्य कथांतही कुठे-ना-कुठे उमटलेले आढळतात. त्या दृष्टीने 'गुंडा' ही बनारसी प्रसादांची प्रातिनिधिक कथा आहे.

प्रेमचंद आणि प्रसाद हे दोघेही एकाच बनारस शहराचे रहिवासी होते ही गोष्ट इथे उल्लेख करण्यासारखी आहे. तथापि एकमेकांपासून इतके भिन्न असे दोन समकालीन लेखक क्वचितच सापडतील. हा फरक लक्षात घेऊन एके काळी हिंदी कथेचे दोन पंथ मानण्यात येत होते: प्रेमचंद स्कूल आणि प्रसाद स्कूल. आणि या पंथांप्रमाणे त्या वेळच्या कथाकारांचेही दोन वर्ग पडले होते. संपूर्ण हिंदी कथा ही या दोन भिन्न परंपरांतून विकास पावली आहे असे म्हणणारे काही लोक आजही आढळतात. परंतु अशा प्रकारच्या बाळबोध विधानांना कसलाही सबळ शास्त्रीय पुरावा नाही. जास्तीत जास्त इतकेच म्हणता येईल की हिंदी कथेच्या दुसऱ्या पर्वात प्रेमचंदांनी तिला वास्तववादी बनविण्याचा प्रयत्न केला तर प्रसादांनी तिला संवेदनाशीलतेचे संस्कार घडविले. तसे त्या काळात सुदर्शन, विश्वंभरनाथ शर्मा कौशिक, पाण्डेय बेचन शर्मा 'उग्र', चतुरसेन शास्त्री, भगवतीप्रसाद वाजपेयी, वगैरे काही अन्य कथाकारही असे होते की ज्यांच्याजवळ कथनाचा स्वतःचा असा एक ढंग होता आणि चांगली प्रतिभाही होती.

प्रेमचंदांच्या छायेत कथेची एक वेगळीच प्रतिभा असलेल्या जैनेंद्रकुमार (1905 यांचा उदय झाला. प्रेमचंदांच्या जवळ असूनही ते त्यांच्याहून इतके वेगळे आहेत की दोघांच्या संबंधाची कल्पनाही करणे कठीण जाते. कथनाची साधी सरळ शैली जैनेंद्रांनी प्रेमचंदांकडून उचलली असली तरी तिच्या लोकसुलभ साधेपणाला कासूनन त्यांनी 'कलेचे' रूप दिले. हे परिष्करण इतके आहे की त्याच्याकडे पाहता हिंदी कथेला कलेचा दर्जा प्रथम जैनेंद्रांच्या हातूनच लाभला असे म्हणावे लागते. जैनेंद्रांसारखा कथा निवेदनाचा अनायास सुखद सहजपणा अन्यत्र दुर्लभ आहे. असं वाटतं की या लेखकाच्या हाती कोणतीही घटना किंवा स्थिती कथा बनू शकते. जीवनाच्या मोठमोठ्या समस्यांच्या भोवऱ्यातून सोडवून जैनेंद्रांनी कथेला रोजच्या जीवनातील साध्या साध्या गोष्टींचा उलगडा करण्याच्या कामी लावले. यामुळे हिंदीत ते 'मानसशास्त्रज्ञ' किंवा 'मनोविश्लेषणवादी' कथाकार म्हणून प्रसिद्ध झाले. पण त्यांच्या बाबतीत नक्कीच हा अतिरेक झाला आहे. त्यांनी कथेला बाह्य-चित्रणापासून किंवा घटनाप्रचुर कथानकापासून सोडवून मानवी अंतर्मनाच्या चित्रणाकडे वळविले हे

खरे; मनात उठणाऱ्या छोट्या छोट्या ऊर्मींचे चित्रण करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला; पण केवळ एवढ्यामुळेच काही कुणी मनोविश्लेषणवादी बनू शकत नाही. जैनेंद्रांच्या बहुतांश कथा एका अंतर्मुख चिंतकाच्या सत्यान्वेषणाचे आलेख आहेत. गांधीवादी गद्याची पारदर्शक सच्चाई, सहजता आणि साधेपणा यांत त्यांची शक्ती सामावलेली आहे. जी कथा प्रेमचंदांच्या हाती सामाजिक संघर्षाचे हत्यार बनली होती ती जैनेंद्रांच्या हाती नैतिक ऊहापोहाचे सूक्ष्म साधन बनली. जैनेंद्रांनी सुमारे शंभर एक कथा लिहिल्या असतील. त्यांत डझनभर तरी अशा आहेत की ज्या कलेच्या बारकाव्यामुळे अचूक आठवल्या जातील.

जैनेंद्रांनंतर थोड्याच काळात कथाक्षेत्रामध्ये दोन नवीन लेखक आले : यशपाल (1903) आणि अज्ञेय (1911). ही जोडी पुन्हा एकदा जणू प्रेमचंद-प्रसाद या जोडीची आठवण करून देते. यशपाल आणि अज्ञेय यांनी लेखनाला सुरुवात केली तो चौथ्या दशकातील (1931–40) असा एक संक्रमणकाल होता की जेव्हा भारतीय मन मूल्यविवेकाच्या चक्रात सापडले होते. गांधीवादी आदर्शाबाबत असंतुष्ट बनलेली नवी पिढी तेव्हा मार्क्स-फ्रॉइड यांच्या विचारांमध्ये सत्याचा शोध घेत होती. विचारधारातील या संघर्षाचा परिणाम कथेवरही झाला. जीवनातील विषमतेच्या मुळाशी यशपालांना आर्थिक कारणपरंपरा दिसली तर अज्ञेयांना या विषमतेचे स्रोत मानवी मनाच्या दबलेल्या वासनांत आणि ग्रंथींत असल्याचे आढळले. मार्ग भिन्न असले तरी दोन्ही लेखक पूर्वसूरींच्या आदर्शवाद व रोमांचवादापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत होते व अशा रीतीने दोघांचीही नजर आलोचनात्मक वास्तववादाकडे होती. यशपाल यांचा पहिला कथासंग्रह 'पिंजरे का उड़ान' (1938) तसेच अज्ञेयांचा पहिला कथासंग्रह 'विपथगा' (1939) जवळजवळ एकाच सुमारास प्रसिद्ध झाले व या प्रथम संग्रहांतून दोघांच्याही दृष्टीतील अंतर स्पष्ट होते. अज्ञेय आरंभी अधिक भावुक होते व त्यांची भाषाही काव्यात्मक प्रयोगांनी भारावलेली होती. परंतु हळूहळू हा वेगळेपणा नाहीसा झाला तशी 'रोज'सारखी कथा निर्माण झाली. हीच कथा पुढे 'गँग्रीन' या शीर्षकाने पुन्हा प्रकाशित झाली. 'रोज' व 'गँग्रीन'मधील पहिले वाक्य असे आहे : "दुपारच्या त्या सुन्या अंगणात पाऊल ठेवताच मला वाटलं जणू त्याच्यावर एखाद्या शापाची छाया भिरभिरत असावी, असं काहीतरी तिथल्या वातावरणात न सांगता येण्यासारखं, हाती न लागणारं आणि तरीही कंप असलेलं, सघन असं फैलावलेलं होतं...हिंदी कथासृष्टीत वातावरणाचे चित्रण करणारी ही भाषाच केवळ नवीन होती असे नव्हे तर त्या भाषेतून प्रकट होणारं वातावरणही नवीन होतं. अशा रीतीनं अज्ञेयां-बरोबर एक नवी संवेदनाशीलता हिंदी कथेत आली.

दुसऱ्या बाजूला यशपालांची 'दुःख का अधिकार' ही कथा जर उदाहरणादाखल घेतली तर तिच्यातील तिरमिरी आणणारा उपरोध हिंदी कथेमध्ये एका नव्या सामाजिक

जाणिवेचा उदय झाल्याची साक्ष देतो. एका बाजूला एक गरीब खाटीक स्त्री–जिला आपल्या तरुण मुलाच्या मृत्यूसाठीही रडण्याचा हक्क नाही, आणि दुसऱ्या बाजूला एक श्रीमंत स्त्री – जिच्या लोकांच्या मागे लागण्याची साऱ्या शहरात चर्चा सुरू आहे. यश-पालांनी अत्यंत बारकाईने एका सत्याचे दर्शन घडविले आहे : हक्क फक्त सुखाचाच असतो असं नाही तर दुःखाचाही असू शकतो आणि जे गरीब असतात त्यांना शोक करण्याचाही अधिकार पोचत नाही. बहुशः असल्या लहानलहान दृष्टांतांद्वारे यशपालांनी उपरोधाचा आघात करणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. आधी एक विचार, नंतर एक स्पष्ट लक्ष्य, मग त्याला अनुरूप असं एक बांधीव कथानक – जे थोडा वेळ वाचकाला इकडच्या तिकडच्या गोष्टींत रमवून शेवटी अचानक एक प्रहार करतं. यशपाल हे अशा रीतीने प्रेमचंदांसारखेच हेतुप्रधान कथा लिहिणारे लेखक आहेत. त्यांची प्रत्येक कथा शेवटी एकाच मुद्द्यावर वार करते आणि तो म्हणजे वर्गविषमता. वर्गीय समाजव्यवस्थेतील ढोंगाचा बुरखा फाडण्या-साठी यशपालांनी कथा शस्त्रासारखी वापरली. याचं एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे 'फूलों का कुर्ता'. अज्ञेयांच्या द्वारे हिंदी कथा संश्लिष्ट संवेदनांची चित्रशाळा बनली तर यशपालांच्यामुळे तिला वास्तवतेच्या अधिकाधिक दर्शनाची क्षमता प्राप्त झाली.

याच काळात उपेंद्रनाथ अश्क आणि भगवतीचरण वर्मा यांनीही कथा लिहिल्या. अश्क हे प्रेमचंदांच्या वास्तववादी परंपरेचे वाहक मानले जातात आणि भगवतीचरण वर्मा आपल्या फटकळ शैलीमुळे 'फसान ए-आजाद'चे लेखक सराशर यांची आठवण करून देतात. 'दो बांके' या त्यांच्या प्रसिद्ध कथेत याचे उत्तम प्रत्यंतर येते. येथे छोट्या चुटकेवजा कथा लिहिणारे राधाकृष्ण यांचाही उल्लेख करायला हवा. निरालांचा उल्लेख तर आवश्यकच आहे. त्यांच्या निराळ्या प्रतिभेने कथेच्या क्षेत्रात आपला असा वेगळा ठसा ठेवलेला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहाव्या दशकाच्या (1951–60) आरंभी अनेक वर्षांच्या गतानुगतिकतेनंतर हिंदी कथेत एक नवा उन्मेष आला व त्याने स्वतःचे वैशिष्ट्य व्यक्त करण्यासाठी 'नव-कविते'च्या चालीवर 'नव-कथे'ची घोषणा केली. स्वातंत्र्याबरोबर एक नवा सर्जनात्मक उन्मेष साहजिकच होता. त्याची अनिवार्य परिणती म्हणून 'नव-कथे'सारखी एखादी संपूर्णपणे नवी गोष्ट घडणे साहजिक असेल किंवा नसेल, परंतु हे मात्र खरे की या काळात कथालेखकांची एक नवी पिढी फार मोठ्या संख्येने कथालेखनाकडे वळली. रांगेय राघव, फणीश्वरनाथ रेणु, द्विजेंद्रनाथ मिश्र 'निर्गुण', भीष्म साहनी, कृष्णा सोबती, कृष्ण बलदेव वैद, रामकुमार, कमल जोशी, लक्ष्मी-नारायण लाल, हरिशंकर परसाई, मोहन राकेश, अमरकान्त, उषा प्रियंवदा, मन्नू भंडारी, निर्मल वर्मा, मार्कंडेय, राजेंद्र यादव, कमलेश्वर, शेखर जोशी, शिवप्रसाद सिंह, धर्मवीर भारती, रघुवीर सहाय, मनोहर श्याम जोशी, शैलेश मटियानी वगैरेंची नावे

याबाबतीत उल्लेखनीय आहेत. इतक्या प्रतिभावान लेखकांची दृष्टी एकाच वेळी कथा या प्रकाराकडे वळणे ही हिंदी साहित्यसृष्टीत एक महत्त्वपूर्ण घटना होती. भैरवप्रसाद गुप्त यांच्या संपादकत्वाखाली निघणारे मासिक 'कहानी' आणि नंतर 'नई कहानियां' यांनी या लेखकांना एक व्यापक व्यासपीठ मिळवून दिले. या पिढीतील काही लेखकांनी आंचलिक (प्रादेशिक) जीवनाच्या काही दुर्मिळ चित्रांनी आणि व्यक्तिरेखांनी हिंदी कथा-संसाराला समृद्ध केले, काहींनी नागर मध्यमवर्गीयांच्या जीवनातील रस्सीखेच चित्रित करून कथाकलेला आणखी उजळण्याचे काम केले. या दशकातील कथेला एका संघटित आंदोलनात सीमाबद्ध करण्याच्या प्रयासांपेक्षा तिच्यातील विविधता आणि एका नव्या उन्मेषाचे दर्शन हीच विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. भीष्म साहनींची अकृत्रिम सरलता, रामकुमारांची गहरी मानवता, निर्मल वर्मांच्या भाषेतील संवेदनाशीलता, अमरकांतांचा मर्मस्पर्शी उपरोध, रघुवीर सहाय यांची आत्मवत्ता, राजेन्द्र यादव यांची रेखीव कारागिरी, रेणूंची गप्पिष्ट प्रादेशिकता, मार्कण्डेयांची ग्रामसुलभ सहजता, परसाईंची प्रखर सामाजिक जाणीव, अशा अनेक वैशिष्ट्यांनी या काळातील कथासंसार नटलेला आहे. निश्चितपणे या काळातील अधिकांश कथालेखकांनी कथेकडे एक कला-माध्यम म्हणून गंभीरपणे लक्ष पुरवले आणि रूढ चाकोरी सोडून त्यांनी जीवनाचा सरळ साक्षात्कार घडविण्याचे व्रत घेतले. पुस्तकी जीवनदृष्टी सोडून देऊन 'प्रामाणिक अनुभूती' तसेच 'स्वानुभूत वास्तव' यांवर जोर देण्यात आला. सर्वसाधारण सिद्धांतरूपाने ही गोष्ट नवीन नसली तरी या ऐतिहासिक संदर्भात ती खूपच क्रांतिकारक आणि सर्जनात्मक ठरली. या काळातील निदान दीडदोन डझन तरी कथा अशा निघतील की ज्यांना कठोरातील कठोर मानदंड लावूनही पहिल्या श्रेणीतील स्थान द्यावे लागेल.

सातव्या दशकात (1969–70) आलेल्या हिंदी कथाकारांच्या नव्या पिढीला या आधीच्या लेखकांचा 'स्वानुभूत वास्तव' ही एक खोटी गोष्ट आणि त्यांची दृष्टी स्वप्नरंजनात्मक (रोमानी) वाटायला लागली. योगायोगही असा की सहाव्या दशकात उदयास आलेले कथाकार बदलल्या परिस्थितीशी जुळवून घेऊ न शकल्याकारणाने एक तर लिहायचे तरी थांबले किंवा निर्मितीचा एखादा नवा प्रकार शोधण्याऐवजी आपल्या पूर्वपरिचित जगात तोंड लपवण्याचा प्रयत्न करू लागले. सातव्या दशकातील कथाकारांनी कथापरंपरेतून आलेल्या वास्तवाच्या धारणेचा त्याग करून जनसामान्याच्या सर्वसाधारण जिण्यात दडलेलं अनोळखीपण, हरवलेपण, अमानवीपण, आणि वैताग यांच्या तळ नसलेल्या गहिराईत डोकावण्याचा प्रयत्न केला. आजवर या गोष्टींकडे डोळेझाक होत आली होती. या पिढीतील कथाकारांना मुक्तिबोधांच्या 'क्लाड इथरती' आणि 'विपात्र' या कथा आपल्या जवळच्या वाटल्या आणि त्यांनी समकालीन जगातील

भयावहता आणि फँटसी यांचं दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीने पाहता सातव्या दशकातील कथाकारांमध्ये जी नावे उल्लेखनीय आहेत त्यांत श्रीकांत वर्मा, महेंद्र भल्ला, ज्ञानरंजन, काशीनाथ सिंह, दूधनाथ सिंह, रवींद्र कालिया, कामतानाथ, सुधा अरोडा, रमेश बक्षी, प्रबोध कुमार, विजय चौहान वगैरेंचा समावेश होतो. यांतील बहुतेकांचा फक्त एकेकच कथासंग्रह प्रकाशित झालेला आहे. आणि त्याबरोबरच हेही दिसून येते की बरेचसे तरुण कथाकार इतक्यातच स्वतःची पुनरावृत्ती करू लागले आहेत. मात्र या परिवर्तनाद्वारे हिंदी कथेत एका नव्या सर्जतात्मक प्रतिभेचा मार्ग खुला झाला आहे यात शंका नाही.

अशा रीतीने गेल्या सत्तर वर्षांत हिंदी कथेने विकासाचे जे टप्पे वेगाने ओलांडले आहेत त्यासाठी इतर भाषांतील कथेला दीडदोन पट तरी काळ लागला होता. कथेचा उदय हिंदीमध्ये काहीसा उशिराच झाला यात संदेश नाही. तसेच हिंदीची बौद्धिक ओढ कथेपेक्षा कविता व कादंबरीच्या क्षेत्राकडे अधिक होती. असे असले तरी या अवधीत हिंदी कथेने आपले असे एक निश्चित व्यक्तिमत्त्व घडविण्यात यश मिळविलेले असून त्याद्वारे तिला भारतीय साहित्यातच नव्हे तर वैश्विक कथासाहित्यातही स्वतःची विशिष्ट अस्मिता (आयडेंटिटी) असल्याचा दावा करता येईल. या अस्मितेची थोडीतरी कल्पना प्रस्तुत संकलनाद्वारे येऊ शकेल अशी आशा आहे.

शेवटी या संकलनासंबंधी दोन शब्द. संपूर्ण हिंदी कथेचे हे प्रातिनिधिक संकलन नव्हे. यात काही प्रसिद्ध लेखकांचा समावेश होऊ शकलेला नाही; तंत्राच्या प्रयोगांतील विविधताही यात प्रतिबिंबित झालेली नाही, तसेच काही कथा-प्रवृत्तीही बहुधा सुटल्या असतील. याचे एक कारण म्हणजे संग्रहाच्या आकाराची मर्यादा आणि दुसरे कारण म्हणजे संपादकाचा निवडीतील स्वतःचा दृष्टिकोण! सामान्यतः अशा दृष्टीला 'सामाजिक वास्तव' ही संज्ञा देणे शक्य आहे पण तिची खरी कल्पना संगृहीत कथांच्या अवलोकनानेच येणार आहे. माझ्या समजाप्रमाणे या संकलनाद्वारे हिंदी कथेची मुख्य परंपरा उमटून दिसावी असा प्रयत्न मी केलेला असला तरी हेही प्रत्येक संकलनाप्रमाणे विशिष्ट मर्यादेपर्यंत वैयक्तिकच आहे हे मान्य करण्यात मला मुळीच संकोच वाटत नाही. अज्ञेय यांची 'गॅंग्रीन' ही कथा लेखकाची अनुमती न मिळाल्यामुळे समाविष्ट करता आली नाही याचा खेद वाटतो. सर्व गोष्टी लक्षात घेता हे संकलन जे काही बनले आहे त्याचे श्रेय आपल्या सहकार्याने ही योजना यशस्वी करणाऱ्या कथाकारांना आहे.

दि० ६-१०-१९७०
नवी दिल्ली

—नामवरसिंह

लेखक - परिचय

चंद्रधर शर्मा गुलेरी

(1883–1920) जन्म गुलेर (पंजाब) येथे. प्रथम अजमेरच्या मेयो कॉलेजात शिक्षक आणि नंतर काशी हिंदू विद्यापीठाच्या संस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्य. पुरातत्त्ववेत्ता आणि भाषाकोविद. 'कछुवा धर्म' व 'मारेसि मोंहि कुठाउं' यांसारखे काही ललित निबंध आणि फक्त तीन कथा लिहिल्या. 'उसने कहा था' 1915 साली 'सरस्वती'त प्रकाशित झाली.

प्रेमचन्द

(1880–1936) जन्म लमही, बनारस (उ. प्र.) येथे. लेखन आधी उर्दूत आणि नंतर हिंदीत. 'जागरण' साप्ताहिक आणि 'हंस' मासिक यांचे संपादक. एक डझन कादंबऱ्या आणि सुमारे सव्वादोनशे कथा लिहिल्या. 'सेवासदन', 'प्रेमाश्रम', 'रंगभूमि', 'कर्मभूमि', 'गबन' आणि 'गोदान' या प्रमुख कादंबऱ्या. बहुतेक कथा 'मान-सरोवर' या नावाने आठ खंडांत प्रसिद्ध. 'कफन' ही कथा 1936 सालची.

जयशंकर प्रसाद

(1886–1937) बनारस (उ. प्र.) येथे जन्म. मुख्यतः कवी व नाटककार म्हणून प्रसिद्ध. कादंबऱ्या व कथाही लिहिल्या. प्रमुख काव्यग्रंथ 'कामायनी'. नाटकात 'स्कंदगुप्त' व 'चंद्रगुप्त' प्रमुख. 'तितली' आणि 'और कंगाल' या प्रमुख कादंबऱ्या. 'छाया', 'प्रतिध्वनि', 'इंद्रजाल', 'आंधी' आणि 'आकाशदीप' हे कथासंग्रह.

जैनेन्द्र कुमार

जन्म 1905 कोडियागंज, अलिगढ जिल्हा, उत्तर प्रदेश. वास्तव्य दिल्ली. कादंबरीकार, कथालेखक आणि विचारवंत. गाजलेल्या कादंबऱ्या : 'परख', 'सुनीता', 'त्यागपत्र', 'जयवर्धन'. बहुतेक सगळ्या कथा 'जैनेन्द्र की कहानियाँ' या नावाच्या ग्रंथमालेत दहा खंडांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

यशपाल

जन्म 1903 फिरोजपूर छावणी (पंजाब). पूर्वज कांगडाचे. वास्तव्य लखनौ. बरीच वर्षे क्रांतिकारी चळवळींत काम आणि तुरुंगवास. 1938 पासून लेखनाला प्रारंभ.

कादंबरीकार, कथाकार आणि विचारप्रवर्तक लेखक. मुख्य कादंबऱ्या : 'दादा कॉम्रेड', 'पार्टी कॉम्रेड', 'देशद्रोही', 'मनुष्य के रूप', 'दिव्या', आणि 'झूठा सच'. प्रमुख कथासंग्रह : 'पिंजरे की उडान', 'ज्ञानदान', 'वो दुनिया', 'धर्मयुद्ध', 'तुमने क्यों कहा था', 'चित्र का शीर्षक', 'मैं सुन्दर हूं', इत्यादी.

रांगेय राघव

(1923–1962) दाक्षिणात्य, आई कन्नडभाषी आणि वडील तामिळभाषी. बहुशः, आग्रा आणि भरतपूरला राहिले. कादंबरीकार आणि विचारप्रवर्तक लेखनाबद्दल प्रसिद्ध. कविताही लिहिल्या आहेत. प्रमुख कादंबऱ्या : 'घरौंदे', 'मुर्दोंका टीला', 'विषाद मठ', 'कबतक पुकारूं ?', इत्यादी. कथासंग्रह : 'मेरी प्रिय कहानियां'.

फणीश्वरनाथ रेणु

जन्म 1921 पूर्णिया (बिहार). कादंबरीकार व कथालेखक. मुख्य कादंबऱ्या 'मैला आंचल', 'परती परिकथा', 'दीर्घतया' वगैरे. कथासंग्रह 'ठुमरी' आणि 'आदिम रात्रि की गंध'.

निर्मल वर्मा

जन्म 1929 सिमला (हिमाचल प्रदेश), वास्तव्य दिल्ली. गेली काही वर्षे युरोपचा प्रवास, मुख्यतः कथाकार. 'वे दिन' नावाची एक कादंबरीही प्रकाशित. कथासंग्रह : 'परिंदे', 'जलती झाडी' आणि 'पिछली गर्मियों में'.

अमरकांत

जन्म 1924 बलिया (उ. प्र.). वास्तव्य अलाहाबाद. मुख्यतः कथालेखक पण कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. प्रमुख कथासंग्रह : 'जिंदगी और जोंक'.

मोहन राकेश

जन्म 1925 अमृतसर (पंजाब). सध्या वास्तव्य दिल्लीत. नाटककार, कादंबरीकार, कथालेखक. 'आषाढ का एक दिन', 'लहरों के राजहंस' व 'आधे-अधूरे' ही नाटके, 'अंधेरे बंद कमरे' ही कादंबरी आणि 'नये बादल', 'जानवर और जानवर', 'एक और जिंदगी', तसंच 'फौलाद का आकाश' हे कथासंग्रह प्रकाशित.

राजेन्द्र यादव

जन्म 1929 आग्रा (उ. प्र.). सध्या दिल्लीत वास्तव्य. कादंबरीकार व कथालेखक. एक कवितासंग्रहही प्रकाशित. कादंबऱ्या : 'सारा आकाश', 'उखड़े हुये लोग', 'शह और मात', 'कुलटा' आणि 'यंत्रविद्ध'. कथासंग्रह : 'खेल-खिलौने', 'जहां लक्ष्मी कैद है', 'छोटे छोटे ताजमहल', 'किनारे से किनारे तक', 'प्रतीक्षा', 'टूटना' इत्यादी.

कमलेश्वर

जन्म 1932 मैनपुर (उ. प्र.). काही काळ अलाहाबाद व दिल्लीत वास्तव्य आणि सध्या मुंबई येथे. कथाकार व कादंबरीकार. कथासंग्रह : 'राजा निरबंसिया', 'कस्बे का आदमी', 'खोई हुई दिशाएं' आणि 'मांस का दरिया'. कादंबऱ्या : 'एक सड़क सत्तावन गलियां', डाक बंगला आणि 'तीसरा आदमी'.

श्रीकांत वर्मा

जन्म 1 १, विलासपुर (मध्य प्रदेश). सध्या वास्तव्य दिल्लीत. मुख्यतः कवी पण कथा व कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. कवितासंग्रह : 'भटका मेघ', 'माया दर्पण' आणि दिनारंभ. 'दूसरी बार' ही कादंबरी व 'झाडी' आणि 'संवाद' हे कथासंग्रह प्रकाशित.

ज्ञानरंजन

जन्म 1936 अलाहाबाद (उ. प्र.). मुख्यतः कथाकार. प्रकाशित कथासंग्रह : 'फेंस के इधर और उधर'.

काशीनाथ सिंह

जन्म 1937 बनारस (उ. प्र.). मुख्यतः कथाकार. प्रकाशित कथासंग्रह : 'लोग बिस्तरों पर'.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

तिनं सांगितलं होतं

चंद्रधर शर्मा गुलेरी

मोठमोठ्या शहरांतल्या एक्के-गाडीवाल्यांच्या जिभांच्या फटकाऱ्यांनी ज्यांची पाठ सोलून निघाली आहे आणि कान किटले आहेत त्यांना आमची एक विनंती आहे. त्यांनी अमृतसरच्या बांबू-कार्टवाल्यांच्या बोलीचा मलम वापरावा. मोठाल्या शहरांतल्या रुंद रस्त्यांवरून एक्के हाकताना गाडीवाले जेव्हा घोड्याची पाठ चाबकानं फोडून काढीत त्याच्या आजीशी आपला निकट संबंध जोडतात, किंवा मार्गातल्या पादचाऱ्यांना डोळे नसल्याबद्दल संतापतात, आणि कधी त्यांच्या पायांची बोटं चिरून स्वतःच संत्रस्त झाल्यासारखे जगभरच्या मरगळीचे, निराशेचे व क्षोभाचे अवतार बनून सरळ नाकासमोर निघून जातात, तेव्हा अमृतसरमधले त्यांचे भाईबंद अरुंद चक्करदार बोळातून वाटेतल्या प्रत्येक बैलगाडीवाल्यासाठी थांबतात; शांतीचा समुद्र बनून, 'बचो खालसाजी', 'हटो भाईजी', 'जरा दमानं भाऊ', 'येऊ द्या लालजी', 'हटो बाच्छा' वगैरे उद्गारांसह सफेत फेटे, खेचरं, बदकं, मोळीवाले, खोमचेवाले वगैरेच्या जंगलातून वाटा काढीत जातात. काय बिशाद आहे की 'जी' किंवा 'साहेब' अशा संबोधनाशिवाय कुणाला बाजूला व्हावं लागेल. याचा अर्थ असा नाही की त्यांची जीभ चालत नाही. जरूर चालते. पण मिठास सुरीसारखे मऊ वार करीत चालते. पुन्हा पुन्हा आवाज देऊनही एखादी म्हातारी वाटेतून दूर झाली नाही तर अशा वेळची त्यांची ही वचनावली पाहा : हट जा जीणे जोगिये, हट जा करमा वालिये, हट जा पुत्तां प्यारिये, बच जा, लम्बी उमर वालिये. सामान्य जनांच्या भाषेत याचा अर्थ असा की, अगे तू जगायला योग्य अशी आहेस, मोठी भाग्यवंत आहेस, आपल्या मुलांना प्यार आहेस, अजून खूप जगू शकशील, का उगीच माझ्या चाकाखाली यायला बघते आहेस! दूर हो, जिवंत राहा.

अशा बांबू-कार्टवाल्यांच्या मधून येऊन एक मुलगा व मुलगी चौकातल्या दुकानावर भेटली. त्याचे केस आणि तिचा ढिला पायजमा यांच्यावरून ती दोघंही शीख असल्याचं कळत होतं. मामाला केस धुण्यासाठी दही हवं होतं म्हणून तो आला होता आणि ती स्वयंपाकासाठी 'बड्या' (सांडगे) घ्यायला आली होती. दुकानदार एका परदेश्याला पापड विकण्यात गुंतला होता आणि हे गिऱ्हाईक शेरभर ओल्या पापडांच्या चळतीतला प्रत्येक पापड मोजून घेतल्याशिवाय निघणार नव्हतं.

"घर कुठंय तुझं?"

"मगऱ्यात. आणि तुझं ?"

"मांझ्यात. तिथं कुठं राहातेस ?"

"अतरसिंगाच्या बैठकीत. ते माझे मामा लागतात."

"मीसुद्धा मामाकडेच आलोय. त्यांचं घर इथं गुरुबाजारात आहे."

इतक्यात दुकानदार मोकळा झाला आणि त्यांना हवा असलेला माल द्यायला लागला. वस्तू घेऊन दोघंही बरोबरच चालायला लागली. थोडं चालल्यानंतर मुलानं हसत विचारलं "तुझी कुडमाई (सोयरीक) झाली ?" यावर मुलीनं भुवया चढवून 'धत्' म्हटलं आणि पळाली. मुलगा बघतच राहिला.

दोनतीन दिवसांआड त्यांची भाजीवाल्यापाशी नाहीतर दूधवाल्याकडे गाठ पडायची. महिनाभर असं चाललं. दोनतीनदा मुलानं पुन्हा विचारलं होतं, "तुझी कुडमाई झाली ?" आणि त्याला 'धत्' असं उत्तर मिळालं होतं. एक दिवस असंच चिडवण्यासाठी मुलानं जेव्हा तो प्रश्न विचारला तेव्हा त्याच्या अपेक्षेविरुद्ध उत्तर मिळालं, "हां. झाली."

"कधी ?"

"काल. रेशमाच्या कढाईचा हा सालू नाही का बघितलास ?"

मुलगी पळून गेली. मुलगा घराच्या रोखानं चालायला लागला. वाटेत त्यानं एका मुलाला गटारात ढकलून दिलं, एका पाटीवाल्याची दिवसभराची कमाई धुळीला मिळवली, एका कुत्र्याला दगड मारला आणि गवळ्याच्या ठेल्यातलं दूध लवंडून टाकलं; स्नान करून समोरून सोवळ्यात येणाऱ्या कुणा वैष्णवीला शिवून डोळे फुटल्याची उपाधी कमावली आणि मगच कुठं तो घरी पोचला.

* * *

"राम राम, ही काय लढाई म्हणायची ! रातदिवस खंदकात बसून हाडं आखडली. लुधियान्याच्या दसपट थंडी-पाऊस आणि वरून बर्फ. पोटऱ्यांपर्यंत चिखलात रुतलोय, गनीम कुठं दिसत नाही.—तासा-दोन-तासांनी कानाचे पडदे फाडणाऱ्या धडाक्यानं सगळा खंदक हादरतो आणि शंभर शंभर गज माती वर उसळते. असल्या नजरेआडच्या गोळ्यांतून जगलो वाचलो तर लढाई करणार. नगरकोटचा बलबला ऐकला होता पण इथं दिवसातून असले पंचवीस बलबले होताहेत. खंदकातून बरा कुठं साफा नाहीतर कोपर बाहेर आलं तर चटाकृकन् गोळी लागते. कोण जाणे बदमाष मातीत घुसलेले असतात की गवतात लपून बसतात."

"लहनासिंग, आणखी तीन दिवस उरलेत, चार तर खंदकातच काढले. परवा 'रिलीफ' येईल आणि मग सात दिवस सुट्टी. आपल्या हातानं 'झटका' करून पोटभर

खाऊ आणि झोप काढू. त्या फिरंगी मेमच्या बागेत मखमलीसारखी हिरवळ आहे. दूध आणि फळांची खैरात करते. सगळे सांगतात, पैसे नाही घेत. म्हणते, तुम्ही राजे आहात, माझ्या देशाचं रक्षण करायला आला आहात."

"चार दिवस डोळ्याला डोळा नाही. बिन फिरवल्यानं घोडा आणि लढाईवाचून शिपाई निकामी होतात. मला तर संगीन चढवून मार्चचा हुकूम होईल ना तर सात जर्मनांना मारून परत येईन. नाहीतर दरबारसाहेबाच्या उंबऱ्यावर माथं नाही टेकणार. पाजी कुठले, कळीचे घोडे—संगीत बघताच तोंड पसरतात आणि पाय धरायला लागतात. आणि असे अंधारात मात्र तीस तीस मणांचे गोळे फेकतात. त्या दिवशी हल्ला केला तर चार मैलांत एक जर्मन नाही बाकी ठेवला. नंतर जनरलसाहेबांनी मागं परतण्याचा हुकूम दिला म्हणून, नाहीतर…"

"नाहीतर सरळ बर्लिनला पोचलो असतो, नाही!" सुभेदार हजारासिंगानं हसत हसत म्हटलं. "लढाईचा मामला जमादार आणि नायब यांच्या हातात नसतो. बडे इपीसर दूरवरचा विचार करतात. तीनशे मैलांची आघाडी आहे. एका बाजूनं पुढं सरकून काय उपयोग?"

"सुभेदारजी, खरं आहे तुमचं." लहानासिंग म्हणाला. "पण करावं कसं? हाडांत तर थंडी घुसून बसलीय. सूर्य तोंड बाहेर काढीत नाही. खंदकाच्या दोन्ही बाजूंनी चम्बाच्या बावड्यांसारखे झरे सुटले आहेत. एक हल्ला करायला मिळाला तर ऊब तरी येईल जराशी."

"उदमी, ऊठ. शेगडीत कोळसे टाक. वजीरा, तुम्ही चौघेजण बालद्या घ्या आणि खंदकांतलं पाणी बाहेर फेका. लहानासिंग, सांजावलंय, खंदकाच्या तोंडावरचा पहारा बदल." असे हुकूम सोडीत सुभेदारसाहेबांनी सगळ्या खंदकाची चक्कर सुरू केली. वजीरासिंग म्हणजे पलटणीचा विदूषक. खंदकातलं गढूळ पाणी बाहेर फेकीत म्हणाला, "मी भट बनलोय. जर्मनीच्या बादशाहाचं तर्पण करतो." यावर सगळे खळखळून हसले आणि उदासपणाचे ढग पांगले.

लहानासिंगानं दुसरी बालदी भरून त्याच्या हातात देत म्हटलं, "आपल्या शेतातल्या खरबुजांना पाणी दे. असलं खताचं पाणी सगळ्या पंजाबात नाही मिळायचं."

"हां, काय मुलुख आहे! स्वर्ग आहे स्वर्ग. मी तर लढाई संपली की सरकारकडे इथे दहा गुंठे जमीन मागेन आणि फळझाडं लावीन."

"लाडीबहिनीलाही इथं आणणार आहेस की तीच आपली दूध पाजणारी फिरंगी मेम…"

"चूप बस. इथल्या लोकांना लाज नाही."

"देशादेशाची चाल असते. शीख लोक तंबाखू ओढीत नाहीत हे काही अद्याप मी तिला पटवू शकलेला नाही. मी सिगरेट ओढावी म्हणून तिचा हट्ट असतो. ती सिगरेट ओठांना लावायला येते आणि मी मागं हटतो. मग तिला वाटतं राजा रागावला, आता आपल्या देशासाठी लढणार नाही."

"अच्छा, आता बोधासिंग कसा आहे?"

"ठीक आहे."

"जसं काही मला माहीतच नाही. रात्रभर आपली दोन्ही कांबळी त्याला पांघरतोस आणि स्वतः शेगडीची ऊब घेत निभावतोस. त्याचा पहाराही स्वतः करतोस. आपल्या कोरड्या लाकडाच्या तख्तावर त्याला निजवतोस आणि स्वतः चिखलात पडून राहतोस. तू स्वतःच आडवा झाला नाहीस म्हणजे मिळवलं. थंडी अशी आहे की मरणाचीच पडलीय जणू. आणि निमोनियानं मरणारांची काळजी घ्यायला कुणी नाही."

"माझी नको चिंता करू. बुलेलच्या चराशेजारी मरेन मी. भाई कीरतसिंगाच्या मांडीवर डोकं ठेवून. आपल्या हातांनी लावलेल्या आंब्याच्या झाडांच्या छायेत."

वजीरासिंगानं डोळे मोठे करून दटावलं, "ए कसली मरण्याचिरण्याची भाषा काढली आहेत? मरण येवो त्या जर्मन आणि तुर्कांना."

हां भाईयो, कसं—

दिल्ली शहर तें पिशौर नुं जांदिए
कर लेणा लौंगांदा बपार मड़िए
कर लेणा नाड़े दा सौदा अड़िए
ओय लाणा चटांका कदुए नुं।
कद्दू बणाया वे मज़ेदार गोरिए
हुण लाणा चटाका कदुए नुं॥

घरसंसारवाले, दाढीधारी शीख असलं तमासगिरांचं गाणं म्हणतील असं कधी कुणाला वाटलं असेल? पण सगळा खंदक या गाण्यानं गजबजला आणि सगळे शिपाई पुन्हा ताजेतवाने झाले, जणू चार दिवस झोप काढून उठले होते.

दोन प्रहर रात्र उलटली आहे. अंधार आहे. सन्नाटा पसरलाय. बिस्किटांच्या तीन रिकाम्या खोक्यांवर आपली दोन कांबळी अंथरून आणि लहानासिंगाची दोन कांबळी आणि दोन बरानकोट पांघरून बोधासिंग पडला आहे. लहानासिंगाच्या अशक्त शरीराचा आधार घेऊन मध्येच कण्हतो आहे.

"बोधाभाई, काय रे!"

"पाणी दे."

लहानासिंगानं भांडं त्याच्या तोंडाला लावीत विचारलं, "कसं वाटतंय आता?" पाणी पिऊन बोधा म्हणाला, "कापरं भरलंय. सगळ्या अंगातून तार खेचतेय. दात कडकडताहेत."

"बरं तर, घे माझी जर्सी घाल."

"आणि तू?"

"माझ्याजवळ शेगडी आहे, उकडतंय मला. घाम सुटलाय."

"नको. मी नाही घालणार जर्सी. चार दिवसांपासून तू माझ्यासाठी..."

"अरे हो, आठवलं. माझ्याजवळ आणखी एक आहे ना जर्सी. आज सकाळीच आलीय. विलायतहून मेमा विणून विणून पाठवताहेत. गुरू त्यांचं भलं करो." असं म्हणत लहानानं आपला कोट काढला आणि जर्सी उतरायला लागला.

"खरं सांगतोस?"

"नाहीतर काय खोटं?" असं म्हणून नकार देणाऱ्या बोधाला त्यानं जबरदस्तीनं जर्सी चढवली आणि आपला खाकी कोट आणि जीनचा कुर्ता घालून तो पहाऱ्यावर जाऊन उभा राहिला. मेमच्या जर्सीची गोष्ट म्हणजे थापच होती.

अर्धा तास होऊन गेला. इतक्यात खंदकाच्या तोंडावरून हाक आली, "सुभेदार हजारासिंग."

"कोण? लफ्टन साहब? हुकूम हुजूर." असं म्हणत सुभेदार ताठ उभा राहिला आणि त्यानं फौजी सलाम ठोकला.

"हे बघ, आता ताबडतोब हल्ला चढवायचा आहे. एक मैल अंतरावर पूर्वेकडच्या कोपऱ्यावर जर्मनांचा खंदक आहे. पन्नासापेक्षा जास्त लोक नाहीत तिथं. या झाडांच्या बाजूबाजूनं दोन शेतांमधून रस्ता जातो. तीनचार वळणं आहेत. पहिल्या वळणावर पंधरा जवान ठेवून आलो आहे. इथं दहा लोक ठेव आणि बाकीच्यांना बरोबर घेऊन त्यांना जाऊन मीळ. खंदकावर कब्जा करून पुढला हुकूम मिळेपर्यंत तिथंच थांबा सगळे. मी इथंच राहतो."

"जी हुकुम."

सगळे गुपचूप तयार झाले. बोधासुद्धा कांबळं बाजूला टाकून उठायला लागला. लहानासिंगनं त्याला अडवलं. लहानासिंग पुढं झाला तशी बोधाच्या सुभेदार बापानं बोधाच्या दिशेनं इशारा केला. लहाना उमजून गप्प राहिला. मागं दहा लोक कोण राहायचे याच्यावर खूपच हुज्जत झाली. कुणालाच मागं राहायचं नव्हतं. लोकांची कशीबशी समजूत घालून सुभेदारानं मार्चचा हुकूम दिला. लपटनसाहेब लहानाच्या शेगडीजवळ तोंड एका

बाजूला वळवून उभे राहिले. खिशातून सिगरेट काढून पेटवायला लागले. दहा मिनिटां-नंतर लहानाच्या दिशेनं हात पुढं करून म्हणाले,

"घे. तूही ओढ."

डोळ्याचं पातं लवायच्या आत ल्हाना काय ते समजला. चेहऱ्यावर काही न दाखवता म्हणाला, "द्या साहेब." हात पुढं करताना त्यानं शेगडीच्या उजेडात साहेबाचं तोंड आणि केस न्याहाळले. हे काय, लपटनसाहेबाचे जटा झालेले केस जाऊन त्याच्या जागी कैद्याप्रमाणं आखूड केलेले केस कसे आले?

बहुधा साहेब दारू पिऊन आला असेल आणि त्याला आज केस कापायला वेळ मिळाला असेल. अधिक चाचपणी केलेली बरी. लपटनसाहेब त्याच्या रेजिमेंटमध्ये पाच वर्षे होते.

"काय साहेब, आम्ही हिंदुस्थानला कधी परतणार?"

"लढाई संपल्यावर. का, हा देश आवडला नाही?"

"नाही साहेब, शिकारीची ती मजा इथं कुठली! आठवतंय लढाईची रंगीत तालीम झाल्यानंतर आपण जगाधारी जिल्ह्यात शिकारीला गेलो होतो? हां-हां, तुम्ही बसला होतात खोत्यावर (गाढवावर) आणि तुमचा खानसामा अब्दुल्ला वाटेतल्या देवळात पूजेसाठी थांबला होता...?"

"बेशक, पाजी कुठला."

"आणि समोरून एक नीलगाय निघाली. एवढी मोठी नीलगाय बघितली नव्हती कधी. तुमची एक गोळी तिच्या खांद्यात घुसली आणि पुठ्ठ्यातून बाहेर पडली. असल्या हपसराबरोबर शिकारीचा खरा मजा! साहेब शिमल्याला त्या नीलगायीचं डोकं मढवायला दिलं होतं नाही? तुम्ही ते मेसमध्ये लावणार होतात रेजिमेंटच्या."

"हो, पण मग ते विलायतेला पाठवलं मी."

"किती मोठी शिंगं हो! दोन-दोन-फुटी तरी असतील नाही?"

"हां, ल्हानासिंग, दोन फूट चार इंच भरली. अरे तू सिगरेट नाही पेटवलीस?"

"पेटवतो साहेब. जरा आगपेटी आणतो आतून..." असं म्हणून लहानासिंग खंदकात घुसला. आता त्याला शंकाच उरली नव्हती आणि काय करायचं तेही त्यानं निश्चित केलं होतं.

वाटेत झोपलेल्या कुणाच्यातरी अंगावर तो अंधारात ठेचकळला.

"कोण, वजीरासिंग?"

"हो, काय रे लहाना? कसली जगबूड आलीय? जरा कुठं डोळा लागत होता."

"डोळे उघड आधी. जगबूड आलीय आणि लपटनसाहेबाची वर्दी (गणवेष) घालून आलीय."

"काय ?"

"लपटनसाहेब बहुधा मारले गेले आहेत नाहीतर कैद तरी झाले आहेत. त्यांचे कपडे घालवून कुणीतरी जर्मन आला आहे. सुभेदारानं त्याचा चेहरा पाहिला नाही. मी पाहिला आणि गप्पासुद्धा मारल्या. बेटा उर्दू साफ बोलतो पण पुस्तकी. आणि मला सिगरेट दिली ओढायला."

"मग आता ?"

"आता मेलो ठार. धोका आहे. सुभेदार तिकडे चिखल तुडवीत फिरेल आणि आपल्या खंदकावर इकडे हल्ला होईल. तिकडे उघाड्यावर गाठतील सुभेदाराला. ऊठ एक काम कर. पलटण कुठं गेलीय तिचा माग काढीत धाव. अजून जवळच असतील. सुभेदाराला म्हणावं तावडतोब मागं फिरा. जर्मनांच्या खंदकाची बात म्हणजे थाप आहे. चल नीघ लवकर. खंदकाच्या मागच्या बाजूनं जा. बघ, पानाचाही आवाज होता नये. उशीर नको लावू."

"पण हुकूम तर आहे की..."

"हुकमाची ऐशी तैशी. माझा हुकूम आहे. जमादार लहानासिंगाचा. आता इथला सगळ्यात मोठा हपीसर मी आहे – माझा हुकूम. चल. मी लपटनसाहेबाची हजेरी घेतो."

"पण इथं तर तुम्ही आठच जण आहात."

"आठ नाही. दहा लाख. एक एक अकाली शीख सव्वा लाखाच्या बरोबर असतो. चल जा लवकर."

परत येऊन लहाना खंदकाच्या तोंडाजवळच्या भिंतीला चिकटून उभा राहिला. लपटनसाहेबानं खिशातून बोरांएवढे तीन गोळे काढले व थोड्या थोड्या अंतरावर खंदकाच्या भिंतीत पुरून एका तारेने जोडले. तारेच्या टोकाला सुतळीची गुंडी होती व ती शेगडीजवळ ठेवलेली होती. एक काडी पेटवून गुंडीवर ठेवायला...

दोन्ही हातांनी उलटी धरलेली बंदूक विजेसारखी साहेबाच्या कोपरावर जोरात येऊन बसली. तडाख्याबरोबर साहेबाच्या हातून काडी गळून पडली. लहानासिंगानं आणखी एक तडाखा साहेबाच्या मानेवर हाणला आणि साहेब देवाचं नाव घेऊन चीत झाला. लहानासिंगानं खंदकाच्या भिंतीतले तीन्ही गोळे काढून बाहेर फेकून दिले. साहेबाला ओढून शेगडीजवळ निजवला. त्याचे खिसे तपासले. तीनचार पाकिटं आणि एक डायरी काढून त्यानं आपल्या खिशात ठेवली.

साहेब शुद्धीवर आला. लहानासिंग हसत म्हणाला, "काय लपटनसाहेब ? कसं वाटतंय ? आज खूप गोष्टी शिकलो मी. एक म्हणजे शीख सिगरेट ओढतात. दुसरं म्हणजे जगाधारी जिल्ह्यात नीलगायी सापडतात आणि त्यांची शिंगं दोन फूट चार इंच भरतात.

हेही कळलं की मुसलमान ख़ानसामा देवळात पूजेला जातो आणि लपटनसाहेब खोत्यावर (गाढवावर) बसतात. पण काय हो, इतकी सफाईदार उर्दू कुठं शिकलात बोलायला ? आमचे लपटनसाहेब तर 'डॅम'शिवाय चार शब्द नाही बोलू शकत लागोपाठ."

लहानानं साहेबांच्या पाटलोणीचे खिसे तपासले नव्हते. थंडीमुळं जणू साहेबानं खिशात हात घातले.

लहानासिंग बोलतच होता—"खूप चलाख आहात साहेब, पण माझ्यातला हा लहाना इतकी वर्षं लपटनसाहेबाबरोबर राहिलेला आहे. त्याला चकवायला चार डोळे हवेत. तीन महिने झाले. एक तुर्की मौलवी आमच्या गावात आला होता. मूल होण्यासाठी तावीज द्यायचा बायकांना आणि पोरांची औषधं वाटायचा. चौधरीच्या वडाखाली खाट टाकून हुक्का पीत बसायचा आणि जर्मन लोक मोठे पंडित आहेत म्हणून सांगायचा. म्हणायचा वेदांचा अभ्यास करून ते बिमानाची विद्या शिकले. गाय मारीत नाहीत. हिंदुस्थानात आले तर गोहत्या बंद करतील. मंडीतल्या दुकानदारांना सांगायचा पोस्टातले पैसे काढून घ्या कारण आता सरकारचं राज्य जाणार आहे. डाकबाबू पोल्हूरामसुद्धा घाबरला. पण मी मुल्लाजीची दाढी भादरली आणि गावातून हाकलून त्याला सांगितलं, खबरदार पुन्हा इथं पाऊल ठेवलंस तर..."

साहेबाच्या खिशातल्या पिस्तुलातून गोळी सुटली आणि लहानाच्या मांडीला लागली. त्याबरोबर लहानाच्या हेन्री मार्टिनीच्या दोन फायरींनी साहेबाचं क्रियाकर्म उरकून टाकलं. आवाज ऐकून सगळे धावले.

बोधा ओरडला, "काय झालं ?"

लहाना म्हणाला, "एक मरतुकडं कुत्रं आलं होतं त्याला उडवलं, झोप तू."

बाकीच्या लोकांना त्यानं सगळी हकीकत सांगितली. बंदुकी घेऊन सगळे तयार झाले. लहानानं साफा फाडून जखमेच्या दोन्ही बाजूंना घट्ट पट्टी बांधली. गोळी मांसाला चाटूनच गेली होती. पट्टी बांधताच रक्त वाहायचं थांबलं.

इतक्यात सत्तर जर्मनांची टोळी गर्जना करीत खंदकात घुसली. शिखांच्या गोळ्यांनी पहिला हल्ला परतवला. दुसरा हल्लाही परतवला पण इथं तर सगळे होते आठ. लहानासिंग टिपून टिपून गोळया मारीत होता. तो उभा होता. बाकी जमिनीबरोबर होते. आणि जर्मन सत्तर होते. आपल्या मेलेल्या साथीदारांच्या अंगावरून जर्मन पुढं यायला लागले. थोड्याच वेळात ते...

अचानक आरोळी उठली, "वाह गुरुजी दी फतह ! वाह गुरुजी दा खालसा." आणि धडाधड बंदुकांच्या फैरी जर्मनांच्या पाठीवर बसायला लागल्या. जर्मन ऐन वेळी जात्याच्या दोन चाकांत भरडले जायला लागले. मागून सुभेदार हजारासिंगाचे जवान

आग ओकीत होते आणि समोरून लहानासिंगचे साथी संगिनींचा मारा करीत होते. जवळ येताच मागल्यांनीही संगिनी चालवायला सुरुवात केली.

आणखी एक ललकार—"अकाल सिक्खां दी फौज आई. वाह गुरुजी दी फतह. वाह गुरुजी दा खालसा. सत्तसिरी अकाल पुरुष!" आणि लढाई संपली. त्रेसष्ट जर्मन एक तर मातीला मिळाले होते नाहीतर कण्हत ओरडत होते. पंधरा शीख धारातीर्थी पडले होते. सुभेदाराच्या खांद्यातून गोळी आरपार गेली होती. लहानासिंगाच्या बरगड्यांत एक गोळी घुसली होती. त्यानं जखमेत खंदकातली माती भरली आणि साफा वर कमरबंदासारखा आवळून बांधला. लहानाला झालेली दुसरी जखम भयानक आहे हे कुणालाच समजलं नाही.

लढाईच्या वेळी चंद्र उगवला होता. संस्कृत कवींनी दिलेलं 'क्षयी' हे नाव सार्थ करणारा फिकट चंद्र. आणि वारा असा सुटला होता की बाणभट्टाच्या भाषेत 'दंतवीणोपदेशाचार्य' हे नाव त्याला द्यायला हरकत नव्हती. 'मी धावत धावत सुभेदारसाहेबांच्या मागं गेलो तेव्हा फ्रान्सची मण मण भूमी माझ्या बुटांबरोबर येऊ पाहात होती,' वजीरासिंग सांगत होता : सुभेदारानं लहानासिंगाची सगळी हकीकत ऐकली, कागद पाहिले आणि म्हटलं, "तू नसतास तर आज आम्ही सगळेच ठार झालो असतो."

उजवीकडे तीन मैलांवर असलेल्या खंदकातल्या लोकांनी या लढाईचा आवाज ऐकला होता. त्यांनी पिछाडीला टेलिफोन केला होता. तिथून तावडतोब डॉक्टर आणि जखमींना नेण्यासाठी गाड्या रवाना झाल्या होत्या त्या सुमारे दीडएक तासात येऊन पोचल्या. फील्ड हॉस्पिटल जवळच होतं. सकाळ होताहोताच तिथं पोचू या हिशेबानं जखमींना मामुली दवापट्टी करून एका गाडीत ठेवण्यात आलं आणि दुसऱ्या गाडीत प्रेतं हालवण्यात आली. सुभेदारानं लहानासिंगच्या मांडीच्या जखमेला मलमपट्टी करायला सांगितलं पण 'घाव मामुली आहे, सकाळी पाहू' म्हणून त्यानं ते टाळलं. बोधासिंग तापात बरळत होता; त्याला गाडीत झोपवण्यात आलं. लहानाला सोडून सुभेदार जायला तयार नव्हते. ते पाहून लहाना म्हणाला,

"तुम्हांला बोधाची आणि सुभेदारणीची शपथ आहे. तुम्ही याच गाडीतून जायला हवं."

"आणि तू."

"तिथं पोचल्यानंतर गाडी पाठवा मला. आणि जर्मनांच्या मुडद्यांसाठीही गाड्या येतीलच ना. मला काही जास्त नाही लागलेलं. बघा ना, मी उभा तर आहे. वजीरासिंग आहे माझ्याजवळ."

"बरं तर. पण..."

" बोधा झोपला ना गाडीत ? ठीक, आता चला तुम्हीही. आणि हे बघा, सुभेदारीण-बाईना पत्र लिहाल तेव्हा दंडवत लिहा माझे. आणि घरी जाल तेव्हा सांगा, त्यांनी मला सांगितलेली कामगिरी मी पुरी केली म्हणून."

गाड्या चालायला लागल्या. चढता चढता सुभेदारानं लहानाचा हात हातात घेऊन म्हटलं, " तू माझे नि बोधाचे प्राण वाचवले आहेस. काय काय म्हणून लिहू ? आपण दोघेही घरी जाऊ तेव्हा तूच सांग तुझ्या सुभेदारणीला तिनं काय करायला सांगितलं होतं ते."

" तुम्ही चढा गाडीवर आधी, आणि मी सांगितलंय ते लिहा, भेटाल तेव्हा सांगा."

गाडी निघून जाताच लहाना आडवा झाला. " वजीरा, पाणी दे रे मला आणि माझा कमरबंद सोड. त्रास होतोय."

मरणापूर्वी काही वेळ स्मृती अगदी स्वच्छ होते. जन्मभरचे प्रसंग एक एक करून पुढं सरकू लागतात. सगळ्या दृश्यांचे रंग स्पष्ट होतात. काळाचं सावट त्यांच्यावरून दूर होतं.

...लहानासिंग बारा वर्षांचा आहे. अमृतसरला मामाकडे आला आहे. दहीवाल्याकडे, भजीवाल्याकडे आणि कितीतरी ठिकाणी त्याला आठ वर्षांची एक मुलगी भेटते. 'तुझी कुड्माई झाली ?' म्हणून तो विचारतो तेव्हा 'धुत्' करून ती पळून जाते. एक दिवस असाच प्रश्न केल्यानंतर तिनं म्हटलं होतं, " हां, कालच झाली. पाहिला नाहीस का हा रेशमी फुलांचा सालू ?" हे ऐकताच लहानासिंगाला दुःख झालं. क्रोध आला. का असं झालं ?

" वज़ीरासिंग, पाणी..."

पंचवीस वर्षं उलटली. आता लहानासिंग नं. ७७ रायफल्समध्ये जमादार झाला आहे. त्या आठ वर्षांच्या पोरीची आठवणही नाही, ती कधी भेटली होती की नव्हती कोण जाणे. सात दिवसांची सुट्टी घेऊन जमिनीच्या खटल्याची तारीख लागली होती म्हणून तो घरी आला होता तिथं रेजिमेंट ऑफिसरचं पत्र मिळालं की फौज दूरच्या पल्ल्याला निघाली आहे, ताबडतोब निघून ये. त्याचबरोबर सुभेदार हजारासिंगाचंही पत्र आलं, मी आणि बोधासिंगही फौजेबरोबर दूर निघालो आहोत तेव्हा परतीच्या वाटेवर आमच्या घरी येऊन जा, बरोबरच जाऊ. सुभेदाराचं गाव त्याच्या वाटेवरच होतं. त्याचा लहानासिंगावर लोभ होता. लहानासिंग त्याच्या घरी पोचला.

बाहेर पडले तेव्हा फाटकापाशी सुभेदार म्हणाला, " लहानासिंग, सुभेदारीण तुला ओळखते. बोलावते आहे. तिला भेटून ये." लहानासिंग आत गेला. सुभेदारीण मला ओळखते ? कधीपासून ? रेजिमेंटच्या क्वार्टरात तर सुभेदाराची मंडळी कधी राहिली नव्हती. दरवाजापर्यंत जाऊन 'मत्था टेकना' म्हटलं, आशीर्वाद ऐकला. लहानासिंग गप्प.

" मला ओळखलं ?"

"नाही."

"तुझी कुड़माई झाली? धुत्...काल्च...पाहिला नाहीस का रेशमी बुट्टयांचा शालू...अमृतसर..."

भावनांच्या कल्लोळानं शुद्ध आली. कूस परतली. फासळीचा घाव वाहायला लागला.

स्वप्न सुरूच आहे. सुभेदारीण सांगते आहे, "मी तुला येताना पाहताच ओळखलं. एक काम सांगते तुला. माझं सौभाग्य संकटात आहे. सरकारनं बहादुरचा किताब दिला, लायलपुरात जमीन दिली, आता खाल्ल्या मिठाला जागायची संधी आली आहे. पण सरकारनं आम्हा बायकांची घागरा पल्टण का नाही बनवली? मग मीही सुभेदाराबरोबर लढायला गेले असते. एक मुलगा आहे. फौजेत भरती झाल्याला एकच वर्ष झालं त्याला. त्याच्या पाठीवर चार झाले होते पण एकही नाही वाचला." सुभेदारीण आसवं गाळायला लागली. "आता दोघेही जाताहेत. काय आहे नशिबात? आठवतं तुला, एकदा दहीवाल्याच्या दुकानाशेजारी टांग्याचा घोडा उधळला होता. त्या दिवशी तू जीव वाचवला होतास माझा. स्वतः घोड्याच्या टापेखाली जाऊन मला उचलून दुकानाच्या फळीवर उभं केलं होतंस. तसंच या दोघांचं रक्षण कर. ही भीक मागते आहे मी, तुझ्यापुढे पदर पसरते आहे."

रडत रडत सुभेदारीण माजघरात निघून गेली आणि लहाना डोळे पुशीत बाहेर आला.

"वजीरासिंग, पाणी दे...तिनं म्हटलं होतं..." लहानाचं डोकं मांडीवर घेऊन वजीरा बसला आहे. मागेल तेव्हा त्याला पाणी देतो आहे. अर्धा तासभर लहाना गप्प राहिला, मग म्हणाला...

"कोण? कीरतसिंग?"

वजीरानं मनाशी काहीतरी योजून "हां" म्हटलं.

"भैया, जरा उठून बसव मला. तुझ्या खांद्यावर डोकं ठेव माझं."

वजीरानं तसं केलं.

"हां, आता ठीक आहे. पाणी पाज मला. बास. येत्या मोसमात आंबा खूप फळेल बघ. काका-पुतण्या इथंच बसून आंबे खा. तुझा पुतण्या जेवढा आहे ना तेवढाच मोठा हा आंबाही आहे. ज्या महिन्यात त्याचा जन्म झाला त्याच महिन्यात लावला होता मी हा आंबा."

वजीरासिंगाच्या डोळ्यांतून आसवं टपटप गळत होती.

थोड्याच दिवसांनी वर्तमानपत्रात छापून आलं...

फ्रान्स व बेल्जम...६८ वी यादी...रणमैदानात जखमी होऊन ठार...नं. ७७ सिख रायफल्स जमादार लहानासिंग.

कफन

प्रेमचन्द

१

झोपडीच्या दाराशी बाप आणि लेक विझलेल्या शेकोटीपुढं चुपचाप बसले होते आणि आत लेकाची तरणी बायको बुधिया बाळंतपणाच्या वेदनांनी बेशुद्ध होत होती. मधून मधून तिच्या तोंडून असा काळीज कापवणारा आवाज उमटत होता की दोघेही श्वास रोखून धरीत होते. रात्र थंडीची होती. आणि निसर्ग स्तब्धतेत बुडलेला. सगळा गाव अंधारात विलीन झाला होता.

घीसू म्हणाला, "वाचणार नाहीसं दिसतं. सारा दिवस धावपळीत गेला. जा, बघून तरी ये."

माधव चिडून म्हणाला, "मरायचंच आहे तर लवकर का नाही मरत? बघून काय करू?"

"अगदी दया नाही तुला. सालभर जिच्याशी मौजमजेत राहिलास तिच्याबरोबर इतकी बेमानी?"

"पण माझ्यानं तिचं ते तडफडणं आणि हातपाय आपटणं नाही बघवत."

चांभाराचं घर होतं आणि साऱ्या गावात बदनाम. घीसू एक दिवस काम केलं तर चार दिवस आराम करायचा. माधव इतका कामचुकार की अर्धा तास काम केलं तर एक तास चिलीम ओढायचा. यामुळं त्यांना कुठं मजुरी मिळत नसे. घरात मूठभर धान्य असलं की हे काम करतील तर शपथ. दोनचार फाके पडले की घीसू झाडावर चढून लाकडं तोडून आणायचा आणि माधव ती बाजारात विकून यायचा. ते पैसे असेपर्यंत इकडे तिकडे भटकत राहायचे. पुन्हा फाक्यांची पाळी आली म्हणजे आणली लाकडे तोडायचे किंवा रोजगार धुंडायचे. गावात कामाचा तोटा नव्हता. शेतकऱ्यांचं गाव होतं आणि मेहनती माणसाला पन्नास कामं पडली होती. पण दोन माणसांकडून एकाचं काम पदरात पडलं तरी धन्य असं वाटण्यासारखी परिस्थिती असेल तेव्हाच या दोघांना लोक कामाला बोलवायचे. हे दोघे साधू असते तर धीर आणि संतोष यांच्यासाठी त्यांना संयम आणि नियम यांची बिलकुल गरज भासली नसती. तो तर त्यांचा स्वभावच होता. विचित्र जीवन होतं त्यांचं. घरात दोनचार गाडग्या-मडक्यांखेरीज काही संपत्ती नव्हती. शरीर झाकण्यापुरत्या फाटक्या चिंध्या पांघरून जगत होते. व्यवहाराच्या

काळज्यांतून मुक्त. कर्जाच्या बोजाखाली शिव्या खायचे, मारही खायचे, पण चिंता नाही. इतके लाचार की वसुलीची मुळीच आशा नसूनही लोक त्यांना काही-ना-काही कर्ज द्यायचेच. मटार-बटाट्यांच्या हंगामात लोकांच्या शेतांतून शेंगा, बटाटे उचलून आणायचे आणि शेकून भाजून खाऊन टाकायचे किंवा चारपाच ऊस तोडून रात्री चोखत बसायचे. या दिगंबर वृत्तीनं घीसूनं आयुष्याची साठ वर्षं काढली. आणि माधवही सुपुत्र असल्या-प्रमाणं बापाच्या पावलावर पाऊल टाकून चालत होता. इतकंच नव्हे तर त्याच्या कीर्तीत भर टाकीत होता. आताही कुणाच्या तरी शेतातून खणलेले बटाटे ते भाजीत बसले होते. घीसूची बायको मेल्याला बरेच दिवस झाले होते. माधवचं लग्न गेल्या साली झालं होतं. या स्त्रीनं आल्यापासून या घरात स्थैर्याचा पाया घातला होता. दळण करून नाहीतर गवत कापून ती शेरभर आट्याची वेगमी करायची आणि या दोन बेशरम लोकांच्या नरकाची भर करीत राहायची. ती आली तेव्हापासून हे दोघे आणखीनच आळशी आणि सुखासीन बनले. इतकंच नव्हे तर थोडे ताठ्यानंही वागायला लागले. कोणी कामाला बोलावलं तर निर्व्याज मुद्रेनं दुप्पट मजुरी मागायचे. हीच स्त्री आज प्रसववेदनांनी मरत पडली होती आणि हे दोघे बहुधा वाट पाहात होते की ती मेली म्हणजे आपणांला सुखानं झोपायला मिळेल.

घीसूनं बटाटा काढून सोलीत म्हटलं, " जाऊन पाहा तरी कशी आहे ती ? चांडाळीण फिसाद करणार, आणखी काय ? ओझाला बोलवायचा म्हटलं तरी एक रुपया हवा."

आपण आत गेलो की बरेच बटाटे हा सफा करून टाकणार ही माधवला भीती होती. म्हणाला, " तिथं जाण्याची मला भीती वाटते."

" अरे भीती कसली, मी आहे ना इथं."

" तर मग तूच जाऊन बघ ना."

" माझी बायको मेली तेव्हा तीन दिवस मी तिच्याजवळून उठलो नव्हतो. शिवाय मला लाजायची नाही का ती ? जिचं तोंड नाही पाहिलं तिचं उघडं शरीर पाहू मी ? तिला कपड्याची शुद्ध तरी असेल ? मला पाहून बिचारीला मोकळेपणी हातपाय झाडणंही अशक्य होईल."

" मी म्हणतो, पोरबीर झालं तर व्हायचं कसं ? घरात सुंठ, गूळ, तेल, काहीसुद्धा नाही."

" सगळं काही येईल. देवाची इच्छा असली तर—जे लोक आज एक पैसाही देत नाहीत तेच उद्या बोलावून रुपये देतील. मला नऊ मुलगे झाले. घरात कधीच काही नव्हतं. पण देवानं कसं-ना-कसं तडीला लावलं."

ज्या समाजात रात्रंदिवस कष्ट करणाऱ्यांची स्थिती यांच्या स्थितीपेक्षा फारशी बरी

नव्हती आणि किसानांच्या मागासलेपणाचा फायदा कसा घ्यावा हे जाणणारे लोक किसानांच्या मानानं जिथं कितीतरी अधिक संपन्न होते, त्या समाजात अशा तऱ्हेची मनोवृत्ती निर्माण होणं ही आश्चर्याची गोष्ट मुळीच नव्हती. मी तर म्हणेन घीसू किसानांच्यापेक्षा जास्त हुषार होता. किसानांच्या विचारशून्य समूहात सामील होण्याऐवजी तो बैठकबाजांच्या कुजक्या वर्तुळाला जाऊन मिळाला होता.

अर्थात बैठकबाज लोकांच्या धोरणांचं किंवा आचरणांचं पालन करण्याची कुवत त्याच्यात नव्हती. म्हणूनच त्याच्या पक्षातले इतर लोक गावाचे सरपंच आणि पाटील बनले होते, तर याला मात्र सारा गाव दोष देत होता. तरीही त्याला समाधान हे होतं की तो फाटका असेल पण निदान किसानांप्रमाणं त्याला जीव तोडून काम तर करायला लागत नव्हतं! आणि त्याच्या सरळपणाचा आणि भोळेपणाचा दुसरे लोक फायदा तर घेऊ शकत नव्हते!

दोघेही बटाटे काढून ऊनऊन खायला लागले. कालपासून काही खाल्लेलं नव्हतं. निवू देण्याइतकी सबुरी नव्हती. कितीदा तरी जिभा पोळल्या. सोलल्यानंतर बटाट्यांचा बाहेरचा भाग इतकासा गरम लागला नाही तरी दात रोवल्यानंतर आतला भाग जीभ, टाळू आणि कंठ यांना भाजून काढतो. त्यामुळं असली आग तोंडात ठेवण्यापेक्षा ती आत पोचवणं अधिक सोयीचं होतं. तिथं तिला थंड करण्यासाठी भरपूर सामान आहे. यामुळं दोघेही घाईघाईनं गिळीत होते. तथापि या प्रयत्नांत त्यांच्या डोळ्यांतून मात्र पाणी येत होतं.

यावेळी घीसूला ठाकुराच्या लग्नाची आठवण आली. वीस वर्षांपूर्वी या लग्नाला तो गेला होता. त्या वेळच्या मेजवानीत त्याला जी तृप्ती मिळाली होती ती त्याच्या जीवनातली एक सदैव आठवण राहण्यासारखी गोष्ट होती आणि आजही ती आठवण ताजी होती. म्हणाला, "त्या जेवणाची आठवण जात नाही. तेव्हापासून तसलं जेवण आणि तितकं पोटभर कधी मिळालं नाही. नवरीकडल्यांनी सगळ्यांना भरपेट पुऱ्या घातल्या, सगळ्यांना. लहान-मोठ्या सगळ्यांनी पुऱ्या खाल्ल्या, साजुक तुपाच्या. चटणी, रायतं, तीन सुक्या भाज्या, एक रसादार तरकारी, दही, चटणी, मिठाई...आता काय सांगू काय मजा आली त्या जेवणात ती. हात आखडता नव्हता. जे हवं ते मागा, हवं तितकं खा. लोकांनी असं खाल्लं, असं खाल्लं की पाणी प्यायला जागा राहिली नाही. पण वाढपी आहेत ते पानात गरमगरम गोलगोल खमंग कचोऱ्या घालतातच आहेत. लोक नको म्हणताहेत, पानावर हात आडवा धरताहेत पण ते आपले वाढतातच आहेत. आणि तोंड धुतल्यावर तर पानवेलचीसुद्धा मिळाली. पण मला पान घ्यायची शुद्ध होती कुठं? उभं राहावत नव्हतं. चटकन् जाऊन कांबळीवर पडलो. असा उदार मनाचा होता ठाकुर."

या पदार्थांची मनातल्या मनात चव घेत माधव म्हणाला, "आता कोणी घालीत नाही असलं जेवण."

"आता कोण काय देतोय खायला? तो जमानाच वेगळा होता. आता सगळ्यांनाच काटकसर आठवते. लग्नाशादीत खर्च करू नका, क्रियाकर्मात खर्च करू नका. सांगा, गरिबाचा माल गोळा करकरून ठेवणार आहात कुठं? जमवण्यात कमी नाही पण खर्चात तेवढी काटकसर आठवते यांना."

"तू वीस तरी पुऱ्या खाल्ल्या असशील?"

"विसाहून जास्त खाल्ल्या."

"मी पन्नास खाल्ल्या असत्या."

"पन्नासहून कमी मीपण खाल्ल्या नसतील. चांगला तगडा होतो. तू तर माझ्या अर्धाही नाहीस."

बटाटे खाऊन दोघेही पाणी प्याले आणि तिथंच शेकोटीसमोर आपली धोतरं पांघरून, पाय पोटाशी घेऊन झोपी गेले. वेटोळी करून पडलेल्या दोन अजगरांसारखे.

बुधिया अजूनही कण्हत होती.

२

सकाळी माधवनं खोलीत जाऊन पाहिलं तर त्याची बायको थंड झाली होती. तिच्या तोंडावर माशा घोंघावत होत्या. काचेसारखे झालेले डोळे वर चढले होते. सगळं अंग धुळीनं माखलं होतं. पोटात मूल मरून गेलं होतं.

माधव धावत घीसूजवळ आला. मग दोघेही हाय हाय करून ऊर बडवायला लागले. शेजाऱ्यांनी हे रडणं ओरडणं ऐकलं आणि ते धावत आले. जुन्या रीतीरिवाजाप्रमाणं त्यांची समजूत घालू लागले.

पण रडण्याकढण्याला जास्त वेळ नव्हता. कफनाची आणि लाकडांची व्यवस्था करायला हवी होती. घरात तर पैशाचं नाव नव्हतं.

बापलेक रडत रडत गावच्या जमीनदाराकडे गेले. त्याला या दोघांचं तोंडही पाहणं नको होतं. कितीतरी वेळा स्वतःच्या हातांनी यांना झोडलं होतं त्यानं. चोरीसाठी, वेळ देऊन कामाला न येण्यासाठी. विचारलं, "काय आहे रे घिसुआ. रडतो कशापायी? हल्ली तर तू कुठंच जात नाहीस. मला वाटतं या गावात राहायला नको आहे तुला."

घिसूनं जमिनीवर डोकं टेकून, डोळ्यात पाणी आणून म्हटलं, "सरकार, मोठ्या संकटात आहे. माधवची घरवाली रात्री वारली. रात्रभर तडफडली सरकार. दोघेही आम्ही उशाशी बसलो होतो. दवापाणी जे काय शक्य होतं ते सगळं काही केलं, पण

चांडाळीण आम्हांला दगा देऊन गेली. आता कोणी भाकरी घालण्यालाही उरलं नाही मालक. सर्वनाश झाला. घर उजाड झालं. आपला गुलाम आहे मी. आता आपल्याशिवाय तिच्या मातीची कोण व्यवस्था करणार? सरकारची मेहेरबानी झाली तरच तिला माती. आपल्याशिवाय आणखी कुणाच्या दारी जावं आम्ही?"

जमीनदारसाहेब दयाळू होते. पण घीसूवर दया करणं म्हणजे काळ्या कांबळीला रंग देणं. त्यांच्या मनात आलं, म्हणावं, चल जा, चालता हो इथून. एरवी बोलावूनही आला नसता, पण आज गरज पडताच येऊन खुशामत करतो आहे. हरामखोर कुठला, बदमाष! पण ही रागावण्याची किंवा शिक्षा करण्याची वेळ नव्हती. मनातल्या मनात चिडत त्यांनी दोन रुपये काढून अंगावर फेकले. त्याच्याकडे पाहिलंही नाही. डोक्यावरचं ओझं टाकून दिल्यासारखं.

जमीनदारसाहेबांनी दोन रुपये दिल्यानंतर गावच्या वनियांना, महाजनांना नाही म्हणण्याचं धाडस कसं होणार? जमीनदाराच्या नावाचा ढिंढोरा कसा पिटायचा हेही घीसूला चांगलं माहीत होतं. कुणी दोन आणे दिले, कुणी चार आणे. एका तासाभरात चांगले पाच रुपये घीसूच्या हाती जमले. कुठं दाणे मिळाले, कुठं लाकूड आणि मग दुपारी कफन आणण्यासाठी घीसू व माधव बाजाराला निघाले. इकडे लोक बांबू वगैरे तोडायच्या तयारीला लागले.

गावातल्या हळव्या अंतःकरणाच्या बायका येऊन येऊन बुधियाचे प्रेत बघत होत्या. आणि गरीब बिचारीसाठी दोन आसू गाळून निघून जात होत्या.

बाजारात पोचताच घीसू म्हणाला, "लाकूड तर जाळण्यापुरतं गोळा झालंय, काय माधव?"

माधव म्हणाला, "हां, लाकूड तर भरपूर आहे. आता कफन हवं."

"चल तर हलकंसं कफन घेऊ या एखादं."

"नाहीतर काय. मर्तिक निघता निघता रात्र होईल. रात्री कफन कोण पाहतोय."

"किती वाईट चाल आहे ही. ज्याला जिवंतपणी अंग झाकायला चिंधी चिरगूट मिळायची पंचाईत त्याच्यासाठी मेल्यानंतर नवं कफन हवं."

"कफन प्रेताबरोबर जळून तर जातं."

"आणि काय राहतंय काय! हेच पाच रुपये आधी मिळते तर काही दवापाणी करता आलं असतं."

दोघेही एकमेकांच्या मनाचा अंदाज घेत होते. बाजारात इकडे तिकडे फिरत होते. कधी या बाजाराच्या दुकानात, कधी त्या. तऱ्हेतऱ्हेचे कपडे, रेशमी, सुती, सगळे पाहिले, पण काही पसंत पडलं नाही. इतकं की संध्याकाळ झाली. तेव्हा कोण जाणे

कसल्या प्रेरणेने दोघे एका गुत्त्यासमोर येऊन पोचले आणि जसं काही आधी ठरूनच गेलं असावं तसे आत शिरले. तिथं दोघेही थोडा वेळ बावचळून उभे राहिले. मग घीसूनं गादीसमोर येऊन म्हटलं, "साहुजी, एक बोतल आम्हांला पण द्या."

त्यानंतर खाणं आलं, तळलेली मासळी आली आणि दोघेही व्हरांड्यात बसून शांतपणे प्यायला लागले.

लागोपाठ काही पेले संपताच ते नशेत आले.

घीसू म्हणाला, "कफन घालून काय मिळणार होतं? मळून तर गेलं असतं ते. सूनबाईबरोबर तर जाणार नव्हतं."

आकाशाकडे पाहात, जणू देवांना आपल्या निरागसपणाचे साक्षी बनवीत, माधव म्हणाला, "जगाची रीत आहे. नाही तर लोक बामणांना हजारो रुपये का देतात? कुणी पाहिलंय परलोकात मिळतात की नाही ते?"

"मोठ्या लोकांकडे पैसा असतो. फुंकू देत. आपल्याकडे असं उडवायला आहे काय?"

"पण लोकांना काय सांगायचं? विचारणार नाहीत–कफन कुठं आहे म्हणून?"

घीसू हसला. "अबे सांगून टाकू रुपये कनवटीतून गळून पडले. खूप शोधलं, नाही मिळाले. लोकांचा विश्वास नाही बसणार पण तेच पुन्हा पैसे देतील."

माधवही हसला. या अनपेक्षित भाग्याच्या कल्पनेनं म्हणाला, "फार चांगली होती बिचारी. मेली तीही खूप खायला प्यायला घालून."

अर्ध्यापेक्षा जास्त बाटली उडाली. घीसूनं दोन शेर पुऱ्या मागवल्या. चटणी, लोणचं, काळजी. गुत्त्यासमोरच दुकान होतं. माधव झपकन् दोन पत्रावळींतून सगळं घेऊन आला. पुरा दीड रुपया आणखी खर्च झाला. थोडेसेच पैसे उरले.

जंगलात एखादा वाघ आपली शिकार उडवीत असावा तसे दोघेही मोठ्या ऐटीत पुऱ्या खात बसले होते. जबाबदारीची भीती नव्हती की बदनामीची फिकीर नव्हती. असल्या भावना त्यांनी फार पूर्वीच पचवून टाकल्या होत्या.

तत्त्वज्ञानाचा आव आणून घीसू म्हणाला, "आमचा आत्मा प्रसन्न होतो आहे तर तिला पुण्य मिळत नाही काय?"

माधवनं श्रद्धापूर्वक मान लववून दुजोरा दिला. "जरूर मिळेल जरूर! हे भगवान्, तूं अंतर्यामी आहेस. तिला वैकुंठाला घेऊन जा. आम्ही दोघे मनापासून आशीर्वाद देतो आहोत. आज जे खायला मिळालं ते जन्मात कधी मिळालं नव्हतं."

क्षणभर लोटताच माधवच्या मनात एक शंका आली. म्हणाला, "दादा, आपण लोक सुद्धा कधी ना कधी तिथं जाणारच ना?"

घीसूनं या मोळघट प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. त्याला परलोकाचा विचार करून आनंदात विघ्न आणायचं नव्हतं.

"तिथं तिनं विचारलं, तुम्ही मला कफन का दिलं नाहीत, तर काय सांगणार?"

"तुझं डोसकं."

"विचारील नक्की."

"अरे तिला कफन मिळणार नाही हे तुला कसं कळलं? मला काय गाढव समजतोस? साठ साल या दुनियेत काय गवत उपटीत बसलोय? तिला कफन मिळेल आणि चांगल्यापैकी मिळेल."

माधवला विश्वास बसेना. म्हणाला, "कोण देईल? पैशांची तर तू चटणी केलीस. ती मलाच विचारील. तिच्या भांगात सिंदूर तर मी घातला होता ना."

घीसू गरम होऊन म्हणाला, "मी सांगतोय ना तिला कफन मिळेल म्हणून? तू ऐकत का नाहीस?"

"कोण देईल सांगत का नाहीस?"

"ज्यांनी आता दिलं तेच लोक देतील. फक्त यावेळी पैसे आपल्या हातात येणार नाहीत."

जसजसा अंधार वाढत होता आणि तारे चमकत होते तसतशी मधुशाळेची शोभाही वाढायला लागली होती. कोणी गात होता तर कोणी बढाया मारीत होता, कुणी आपल्या सोबत्याच्या गळ्याला मिठी मारीत होता, कुणी आपल्या सोबत्याच्या तोंडाला कुल्हड (कच्च्या मातीचा पेला) लावीत होता.

तिथल्या वातावरणात गुंगी होती, हवेत नशा होती. कितीतरी लोक एका चुळक्यातच मग्न होत होते. दारूपेक्षा इथल्या वातावरणाचाच त्यांच्यावर जास्त परिणाम होत होता. जीवनातल्या अडचणी इथं ओढून आणीत होत्या आणि काही काळ आपण जिवंत आहोत की मेलो आहोत याचा त्यांना विसर पडत होता.

आणि हे बापबेटे अजूनही चवीनं घोट घेत होते. आता सगळ्यांच्या नजरा त्यांच्याकडे लागल्या होत्या. मध्ये अख्खी बाटली घेऊन बसलेले केवढे भाग्यवान लोक हे.

पोटभर खाऊन माधवने उरलेल्या पुऱ्यांची पत्रावळ भुकेल्या नजरेनं आपल्याकडे पाहणाऱ्या भिकाऱ्याला देऊन टाकली. आयुष्यात प्रथमच 'देण्या'तला गौरव, आनंद आणि उल्हास यांचा त्यानं अनुभव घेतला.

घीसू म्हणाला, "जा, घेऊन जा, खूप खा आणि आशीर्वाद दे. जिची कमाई आहे ती तर मेली. पण तुझा आशीर्वाद तिला जरूर पोचेल. जेबीच्या देठापासून आशीर्वाद दे. मोठ्या बिकट कमाईचे पैसे आहेत."

माधवने पुन्हा आकाशाकडे पाहात म्हटलं, "ती वैकुंठाला जाणार दादा, ती वैकुंठाची राणी बनणार."

घीसू उठून उभा राहिला आणि उल्हासाच्या लहरींवर पोहत म्हणाला, "हां बेटा, वैकुंठाला जाईल. कुणाला सतावलं नाही, अडवलं नाही. मरता मरता आमच्या जिंदगीतली सगळ्यात मोठी इच्छा पुरी करून गेली. ती वैकुंठाला जाईल नाहीतर काय हे लठ्ठ लठ्ठ लोक जातील—जे गरिबांना दोन्ही हातांनी लुटतात आणि पाप धुवून टाकण्यासाठी गंगेत न्हातात, देवळात अभिषेक करतात?"

श्रद्धेचा हा रंग तावडतोब बदलला. चंचलपणा हा नशेचा विशेष आहे. दुःख आणि निराशा यांचा झटका आला.

माधव म्हणाला, "पण दादा, बिचारीनं आयुष्यात खूपच दुःख भोगलं. किती दुःख सोसून मेली."

डोक्यावर हात झाकून तो रडायला लागला, अगदी बोंबा ठोकून रडायला लागला.

घीसूनं समजावलं, "का रडतोस पोरा! ती मायाजालातून मुक्त झाली याची खुषी मान. जंजाळातून सुटली. मोठी भाग्यवान, इतक्या लवकर माया-मोहाचं बंधन तोडून गेली."

आणि मग दोघेही उठून गायला लागले—

"ठगिनी क्यों नैना झमकावे। ठगिनी"

दारुड्यांचे डोळे त्यांच्यावर खिळले होते आणि हे आपल्याच मस्तीत गात होते. मग दोघेही नाचायला लागले. उसळले काय, उड्या काय मारल्या, मुरडलेही आणि पडलेही. हावभाव केला, अभिनय केला, आणि अखेर नशेत बेहोष होऊन तिथंच खाली कोसळले.

गुंड

जयशंकर प्रसाद

१

वयानं पन्नासाच्या वर होता, पण तरुणांपेक्षाही धट्टाकट्टा आणि ताकदवान होता. चामडीवर सुरकुत्या पडल्या नव्हत्या. वर्षेची झड असो, पौषाच्या रात्रीची छाया असो की ज्येष्ठातलं कडकडतं ऊन असो, तो मजेत उघड्या अंगानं फिरायचा. वर वळवलेल्या त्याच्या मिशा विंचवाच्या नांगीसारख्या पाहणारांच्या डोळ्यात टोचायच्या. त्याचा सावळा रंग सापासारखा तुळतुळीत आणि चमकदार होता. त्याच्या नागपुरी धोतराचा लाल काठ लांबूनही नजरेत भरायचा. कमरेला बांधलेला बनारसी शेला आणि त्यात खुपसलेला असे शिंपल्याच्या मुठीच्या बिचवा. कुरळ्या केसांवर बांधलेल्या जरीकाठी साफ्याचा शेमला त्याच्या रुंद पाठीवर रुळत असायचा. उंच खांद्यावर टाकलेली रुंद पात्याची फरशी त्याच्या रुबाबात भर टाकायची. पावलांवर जोर देऊन चालायचा तेव्हा शिरांचा चटचट आवाज व्हायचा. तो एक गुंड होता.

उपनिषदातील अजातशत्रूच्या सभेत ब्रह्मविद्या शिकायला ब्रह्मचारी जिथं जात असत ती काशी इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या अंतिम चरणात आता उरली नव्हती. गौतम बुद्ध आणि शंकराचार्य यांच्या धर्मतत्त्वांवरील वादविवाद, कित्येक शतके सतत मठ-मंदिरांचा विध्वंस चालल्यामुळे आणि तपस्वीजनांचा वध झाल्यामुळे, प्रायः बंदच पडल्यासारखे झाले होते. इतकंच नव्हे तर पावित्र्य आणि सोवळेओवळे यांत कडक असलेला वैष्णवधर्मही या विशृंखलतेत नव्यानं आलेल्या धर्मोन्मादापुढे हार खाऊन काशीनगरीमध्ये विकल बनू लागला होता. अशा वेळी सगळा न्याय आणि बुद्धिवाद शस्त्रबळापुढे मान तुकवताना पाहून काशीच्या विच्छिन्न आणि निराश नागरिक जीवनाने एका संप्रदायाला जन्म दिला. वीरता हा त्याचा धर्म होता. शब्दाला जागणे, सिंहवृत्तीने जगणे, प्राणांची भीक मागणाऱ्या भ्याडांवर तसंच मार खाऊन खाली पडलेल्या प्रतिस्पर्ध्यावर शस्त्र न उचलणे, छळणूक झालेल्या दुबळ्यांना मदत करणे आणि प्रत्येक क्षणी प्राण तळहातावर घेऊन फिरणे हा त्यांचा बाणा होता. त्यांना काशीनगरीत लोक गुंड म्हणत असत.

जीवनातील एखादी अलभ्य अभिलाषा पुरी न झाल्यामुळे ज्याप्रमाणे बहुतेक लोक विरक्त होतात त्याचप्रमाणे कसल्या तरी मानसिक आघातामुळे नन्हकूसिंग एका

प्रतिष्ठित जमीनदाराचा पुत्र असूनही गुंड बनला होता. दोन्ही हातांनी त्यानं आपली संपत्ती उधळली. बरेचसे पैसे खर्च करून त्यानं केलेला 'स्वांग'चा खेळ (तमाशा) काशीवाल्यांच्या खूप काळ आठवणीत होता. वसंत ऋतूत हा विनोदी नाट्यप्रकार करण्यासाठी भरपूर पैसा, बळ, निर्भीडपणा आणि उच्छृंखलपणा या गोष्टींची त्या काळी आवश्यकता असे. एकदा तर नन्हकूसिंगानंही एका पायात नूपुर, एका हातात तोडा, एका डोळ्यात काजळ, एका कानात हजारांच्या किमतीचे मोती तर दुसऱ्यात खेटराचा तुकडा घालून एका हातात घेतली होती जडावाच्या मुटीची तलवार आणि दुसरा हात दागिन्यांनी मढलेल्या नाटकी प्रेमिकेच्या खांद्यावर ठेवून गाणं म्हटलं होतं—

'कहीं बैंगनवाली मिले तो बुला देना!'

बहुधा बनारसबाहेरच्या रानात, चांगलं पाणी असलेल्या विहिरींवर किंवा गंगेच्या प्रवाहात डुलणाऱ्या होडीत तो दिसायचा. कधी कधी जुगाराच्या अड्ड्यावरून तो बाहेर चौकात यायचा तेव्हा काशीच्या रंगेल वेश्या हसून त्याचं स्वागत करायच्या आणि त्याच्या भरदार शरीराकडे हावरेपणे पाहायच्या. तो तांबोळ्याच्या दुकानावर बसूनच त्यांचं गाणं ऐकायचा, वर कधी जायचा नाही. जुगारात मिळालेले रुपये मुटी भरून तो अशा रीतीनं त्यांच्या खिडक्यांवर उडवायचा की पाहणारे तोंडात बोटं घालायचे आणि तो हसत सुटायचा. कधी माडीवर चलण्याचा लोकांनी आग्रह केला तर खिन्नपणे निःश्वास सोडून तो गप्प व्हायचा.

आता तो बंसीच्या अड्ड्यावरून निघाला होता. आज कवड्यांनी साथ दिली नव्हती. सोळा परियांच्या नृत्यात त्याचं मन रमेना. मन्नू तांबोळ्याच्या दुकानावर बसता बसता तो म्हणाला, "आज मुहूर्त चांगला नाही लागला, मन्नू."

"का मालक? त्यात कसली चिंता? आम्ही कशाला बसलो आहोत इथं? सगळं आहे हे आपलंच तर आहे."

"वेडपटच आहेस तू! नन्हकूसिंग ज्या दिवशी पैसे काढून जुवा खेळेल त्या दिवशी तो मेलाच म्हणून समज. जुगार खेळायला मी केव्हा जातो माहीत नाही तुला. जवळचे पैसे संपले म्हणजे मी अड्ड्यावर जातो आणि जिथं मोटी रास दिसेल तिथंच पैज लावतो. आणि तो डाव मला मिळतोसुद्धा. बाबा कीनारामचं वरदान आहे ना."

"मग आज असं का मालक?"

"पहिला डाव मी जिंकलाच. पण दोनचार डावांत सगळं गेलं. तरी बघ, पाच रुपये राहिलेच आहेत. घे, एक रुपया पानासाठी ठेवून दे. चार दे मलूकी कथकाला. म्हणावं, दुलारीला गायला सांग. हां, आणि गाणं तेंच... बिलमी विदेस रहे."

मलुकी गांजाच्या चिलमीवर ठेवायला निखारा फुलवीत होता तो नन्हकूसिंगाचा हुकूम ऐकताच गडबडून उठला. धावतच जिना चढला. लक्ष चिलमीकडे असल्यामुळे त्याला ठेचही लागली. पण नन्हकूसिंगाच्या डोळ्याकडे पाहायची काय छाती होती त्याची! त्याला अजूनही आठवण होती. अड्ड्यावरून जिंकून येऊन नन्हकूसिंग याच दुकानावर तेव्हा येऊन बसला होता, हातात रुपयांनी भरलेला तोडा घेऊन. त्यानं विचारलं होतं, "कुणाची वरात आहे ही?"

"ठाकूर बोधीसिंगच्या मुलाची."

मन्नूच्या तोंडातून एवढे शब्द निघताच नन्हकूचे ओठ स्फुरायला लागले. त्यानं म्हटलं, "मन्नू, हे होणार नाही. बोधीसिंग माझ्या प्रेतावरूनच फक्त वरात पुढं नेऊ शकेल."

मन्नू म्हणाला, "मग मालक, मी काय करू म्हणता?"

खांद्यावरून कुऱ्हाड उचलीत नन्हकू मलुकाला म्हणाला, "मलुकिया, बघत काय बसलाहेस? जा ठाकराला सांग, बाबू नन्हकूसिंग बाजी लावायला इथंच उभे आहेत. समजून या म्हणावं, वरात मुलाची आहे."

मलुकिया थरथर कापत बोधीसिंगाकडे पोचला. बोधीसिंग आणि नन्हकू पाच वर्षे एकमेकांसमोर आलेले नाहीत. जुगाराच्या अड्ड्यावर बाचाबाची होऊन कधीतरी वेबनाव झाला होता. पुन्हा सामना होऊ शकला नव्हता. आज नन्हकू जिवावर उदार होऊन एकटा उभा होता. बोधीसिंगालाही त्याच्या शब्दाची खात्री होती. त्यानं मलुकीला म्हटलं, "जा, त्यांना सांग आम्हांला काय माहीत बाबूसाहेब तिथं उभे आहेत म्हणून. आता आहेतच तर वरातीत दोन न्याह्यांचं काय काम?"

बोधीसिंग परतले. वाजंत्र्यांच्या पुढं मलुकीच्या खांद्यावर रुपयांचा तोडा लादून नन्हकूसिंग वरात पुढं घेऊन गेले. लग्नात जो काही खर्च आला तो त्यांनी केला. लग्न वगैरे उरकून दुसऱ्या दिवशी याच दुकानापर्यंत येताच थांबले आणि नवऱ्यामुलाला त्यांनी तिथूनच घरी लावून दिलं.

त्या दिवशी मलुकीला पण दहा रुपये मिळाले होते.

नन्हकूसिंगाचा हुकूम ऐकून थांबणं आणि यमाला निमंत्रण देणं एकच आहे, हे त्याला आता माहीत होतं. त्यानं जाऊन दुलारीला म्हटलं, "मी धरतो ठेका, तू गायला लाग, तोवर बल्लू सारंगीवाला पाणी पिऊन येतोय."

"बापरे, काही आफत आलीय की काय बाबूसाहब? सलाम." असं म्हणत दुलारीनं हसत खिडकीतून वाकून पाहिलं तो नन्हकूसिंग सलाम घेऊन दुसरा कुणी येत होता त्याच्याकडे पाहायला लागला.

हातात जरतारी बारीक छडी, डोळ्यात सुरमा, तोंडात पान, मेंदीनं रंगलेली लाल दाढी—जिची सफेद मुळं ओळखू येत होती—आणि तलम अंगरख्यावर बाकदार टोपी, अशी आसामी बरोबर दोन शिपाई घेऊन येत होती. कोणी मौलवीसाहेब दिसतात. नन्हकूला हसू आलं. त्याच्याकडे न पाहताच मौलवीनं एका शिपायाला म्हटलं, "जा दुलारीला सांग, आज रेसिडेंटसाहेबांच्या कोठीवर मुजरा करायचा आहे, आताच चल. आणि हे बघ, मी जानअलीकडे आहे, अत्तर घेतोय."

शिपाई जिना चढत होता आणि मौलवी दुसरीकडे वळत होते, इतक्यात नन्हकूनं ओरडून म्हटलं, "दुलारी, किती वेळ बसून राहायचं आम्ही इथं? सारंगिया आला नाही काय अजून?"

दुलारी म्हणाली, "वा बाबूसाहेब! तुमच्यासाठी तर येऊन बसलेय मी इथं. जरा ऐका न, ऐका तुम्ही तर कधी वर..." मौलवी एकदम गरम झाला. कडकपणे म्हणाला, "चोपदार, अजून ती सुवरची बच्ची उतरली नाही खाली? जा, कोतवालाला माझं नाव सांग आणि म्हणावं, मौलवी अलाउद्दीन कुबरांनी बोलावलंय. येऊन हिला ठीक करा म्हणावं. बघतोय मी, नवाबी गेल्यापासून या काफरांची मस्ती वाढायलाच लागलीय."

कुबरा मौलवी! बाप रे!—तांबोळी आपल्या दुकानावर बसला. जवळच्याच कापडाच्या दुकानाचा मालक पेंगत होता तो असा चमकला की त्याचं डोकंच आपटलं. याच मौलवीनं महाराज चेतसिंहाकडे मुंग्यांच्या डोक्याचं साडेतीन शेर तेल मागितलं होतं. मौलवी अलाउद्दीन कुबरा! बाजारात गडबड उडाली. नन्हकूसिंगानं मन्नूसिंगाला म्हटलं, "गप्प बसशील की नाही?" आणि दुलारीला, "तिथूनच बाईजी, इकडे तिकडे हालायचं काम नाही. तू गायला लाग. खूप पाहिलेत असले गवतविके. कालपर्यंत तर रमलाचे फासे टाकून ज्योतिष सांगत अधेल्याअधेल्यासाठी हात पसरीत होता. आज आलाय मोठा रुबाब दाखवायला."

आता कुबरा वळून त्याच्याकडे पाहात म्हणाला, "कोण आहे हा पाजी?"

"तुझा काका बाबू नन्हकूसिंग." या शब्दांबरोबर जणू अख्ख्या बनारसला थप्पड बसली. कुबराचं तोंड दुसऱ्या दिशेला वळलं. फीतवाले शिपाई मागल्या मागं पळाले आणि समोरचं काही दिसेनासं झालेले मौलवीसाहेब अडखळत, पडत धडपडत कसे तरी जानअलीच्या दुकानावर जाऊन पोचले.

जानअलीनं म्हटलं, "मौलवीसाहेब, कशाला त्या गुंडाच्या तोंडाला लागलात तुम्ही? नशीब त्यानं कुऱ्हाड नाही उचलली." कुबराच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. 'बिलमी बिदेस रहे' संपलं. कोणीही आलं गेलं नाही. तेव्हा मग नन्हकूसिंग रमतगमत

दुसरीकडे निघून गेला. थोड्याच वेळात रेशमी कापडानं झाकलेली एक डोली आली. सोबत एक चोपदार होता. त्यानं दुलारीला राजमातेचं बोलावणं सांगितलं.

दुलारी गुपचुप डोलीत जाऊन बसली. धुळीनं आणि संध्याकाळच्या धुरानं भरलेल्या वाराणशीच्या अरुंद गल्ल्यांतून वाट काढीत डोली शिवालय घाटाच्या दिशेनं चालायला लागली.

२

श्रावणाचा शेवटचा सोमवार होता. राजमाता पन्ना शिवालयात पूजा करीत होती. दुलारी बाहेर बसून इतर गायकांबरोबर भजन म्हणत होती. आरती होताच पन्नानं फुलांची ओंजळ वाहून भक्तिभावपूर्वक देवाला नमस्कार केला. मग प्रसाद घेऊन बाहेर येताच तिची दुसरीकडे नजर गेली. दुलारी उभी राहिली आणि हात जोडून म्हणाली, "आधीच पोचले असते मी. पण काय करू, तो नीच कुबरा मौलवी आला आणि रेसिडेंटच्या कोठीवर चल म्हणायला लागला. याच भानगडीत घंटाभर वेळ मोडला सरकार."

"कुबरा मौलवी. जिथं ऐकावं तिथं त्याचंच नाव. इथंही येऊन म्हणे त्यानं..." मग का कोण जाणे, विषय बदलीत पन्ना म्हणाली, "बरं तर मग काय झालं? तुला यायला कसं मिळालं इकडे?"

"तिकडनं बाबू नन्हकूसिंग आले. मी म्हटलं, सरकारच्या पूजेसाठी भजन म्हणायला जायचं आहे मला आणि हा जायला देत नाही. त्यांनी मौलवीला अशी थापड मारली की, त्याची मस्तीच उतरली. आणि मग कुठं यायला मोकळीक झाली."

"कोण बाबू नन्हकूसिंग?"

दुलारीनं मान खाली घालून म्हटलं, "अरे, सरकारना माहीत नाही? बाबू निरंजनसिंगाचे पुत्र. मी लहान होते तेव्हा तुमच्या बागेत झोपाळ्यावर बसले होते आणि नबाबाचा हत्ती पिसाळून तिथं घुसला होता, आठवतंय? त्यावेळी बाबू निरंजनसिंगाच्या कुवरनंच नाही का आपणा सगळ्यांना वाचवलं होतं?"

त्या जुन्या घटनेच्या आठवणीनं का कोण जाणे राजमातेचं मुख विवर्ण झालं, पण स्वतःला सावरीत त्यांनी म्हटलं, "मग बाबू नन्हकूसिंग तिथं कसे आले?"

हसत हसत दुलारीनं मान खाली घातली. राजमाता पन्नाच्या वडिलांच्या जमीनदारीत राहणाऱ्या वेश्येची दुलारी मुलगी होती. पन्ना आपल्या बालपणी कितीदा तरी तिच्याबरोबर हिंदोळ्या-झोपाळ्यावर खेळली होती. लहानपणापासूनच दुलारी सुरेल होती आणि सुंदर असल्यामुळं चंचलही होती. पन्ना काशीराजाची माता होती तशीच दुलारीही काशीतली प्रसिद्ध गाणारीण होती. राजमहालात तिचं गाणंबजावणं होत असे.

महाराज बलवंतसिंग होते तेव्हापासूनच संगीत हे पन्नाच्या जीवनाचं एक आवश्यक अंग होतं. अर्थात त्या काळी अधिक ओढ असे ती दुःख व दर्दभऱ्या विरहकल्पनेच्या गीतांकडे; आता होत होतं सात्त्विक भावानं भरलेलं भजन. वैधव्यामुळे शांत अशा तेजानं भरलेलं तिचं मुखमंडल आता मलूल झालं.

बलवंतसिंगाच्या मृत्यूनंतरही मोठ्या राणींची सावत्रपणाची आग विझली नव्हती. अंतःपुरात भांडणांना रंग चढला होता. यामुळेच बहुधा पन्ना काशीच्या राजमंदिरात येऊन पूजापाठात आपलं मन गुंतवीत होती. रामनगरात तिला चैन पडत नसे. धाकटी राणी असल्यामुळं बलवंतसिंगाची प्रेयसी बनल्याचा अभिमान तर तिला होताच. शिवाय पुत्रलाभाचं भाग्यही मिळालं. पण असवर्णाचा सामाजिक दोष तिच्या मनाला दुःखी करीत असे. तिला आपल्या लग्नाच्या वेळच्या चर्चेची आठवण झाली.

छोट्याशा मंचावर बसून, गंगेच्या भरून वाहणाऱ्या पात्राकडे पन्ना विमनस्क होऊन पाहू लागली. हातातून नकळत निसटून नाहीशा झालेल्या वस्तूप्रमाणे भूतकाळात झालेल्या त्या गोष्टीचा विचार करण्याचं आता कारण नव्हतं. आतां त्यानं काहीही बरंवाईट होण्याची शक्यता नव्हती. परंतु हिशेब ठेवण्याच्या प्रवृत्तीमुळं मानवी स्वभाव मधून मधून प्रश्न काढीतच असतो की 'तसं झालं असतं तर?' तेच आताही झालं. राजा बलवंतसिंगानं दांडगाईनं राणी करून घेण्याच्या आधीच्या एका संभाव्य घटनेचा ती विचार करीत होती. बाबू नन्हकूसिंगाचं नाव निघाल्यामुळं हे आठवलं होतं. तिची तोंडपुजी दासी गेंदा जवळ होती. पन्ना बलवंतसिंगाची प्रेयसी झाल्या दिवसापासून ही तिच्यापाशी होती. राज्यभरच्या बातम्या तिच्याकडून ऐकायला मिळत असत. बरंच काही माहीत असे तिला. दुलारीचा नक्षा उतरवण्यासाठी आपण काहीतरी बोलणं आवश्यक आहे असं आता तिला वाटलं.

"महाराणी, नन्हकूसिंगानं आपली सगळी जमीनदारी स्वांग, रेड्यांच्या टकरा, घोडदौड, गाणंबजावणं वगैरेत उधळून टाकली आणि आता डाकू बनलाय. जितके खून होतात त्या सगळ्यांत त्याचा हात असतो. जितक्या..." पण तिला अडवीत दुलारी म्हणाली, "हे खोटं आहे. बाबूसाहेबांसारखा धर्मात्मा नाही दुसरा. कितीक अनाथ विधवांना त्यांच्या पैशानं अंग झाकायला वस्त्र मिळतं, कितीक मुलींची लग्नं त्यांच्या पैशातून होतात, कित्येक दीनदुबळ्यांना त्यांचा आधार मिळतो."

राणी पन्नाच्या मनात एक तरंग उठला. हसत त्या म्हणाल्या, "दुलारी, ते तुझ्याकडे येतात ना म्हणून तू त्यांची इतकी बढाई..."

"नाही सरकार. शपथेवर सांगते की आजवर बाबू नन्हकूसिंगांनी माझ्या माडीवर पाऊलही ठेवलेलं नाही."

या अद्भुत व्यक्तीविषयी माहिती मिळावी म्हणून का कोण जाणे राजमाता उत्सुक झाली होती, पण तरीही दुलारीनं पुढं आणखी काही बोलू नये म्हणून तिनं तिच्याकडे तीक्ष्ण कटाक्ष टाकला. ती गप्प झाली. पहिल्या प्रहराची सनई वाजू लागली. दुलारी परवानगी घेऊन डोलीत जाऊन बसली. तशी गेंदा म्हणाली, "सरकार, हल्ली नगराची दशा मोठी खराब झाली आहे. दिवसाढवळ्या लोक लुटले जाताहेत. शेकडो ठिकाणी जुगाराच्या अड्ड्यांवर लोक आपलं सर्वस्व गमावताहेत. पोरं फसवली जाताहेत. तिरक्या नजरांवरून गल्ल्यांमधून लाठी आणि सुरे घेऊन मारामाऱ्या होताहेत. तिकडे रेसिडेंट-साहेबांशी महाराजांचा बेबनाव झाला आहे." राजमाता काही बोलली नाही.

दुसऱ्या दिवशी नगरातल्या अंदाधुंदीवर कडक टीका करणारं पत्र रेसिडेंट मार्कहॅमकडून राजा चेतसिंहाच्या हाती पडलं. डाकू आणि गुंड लोकांना पकडण्याची, त्यांच्यावर कडक नियंत्रण ठेवण्याची सूचनाही होती. कुबरा मौलवीसंबंधीच्या घटनेचाही उल्लेख होता. हेस्टिंग्जच्या आगमनाची वार्ताही होती. शिवालय घाट आणि रामनगरात गडबड उडाली. कोतवाल हिम्मतसिंग माथं फिरल्यासारखा ज्याच्या हाती लाठीकाठी, फरशी, बिचवा वगैरे दिसेल त्याची धरपकड करायला लागला.

एक दिवस नन्हकूसिंग सुम्मा नाल्याच्या संगमावर एका उंच टेकाडावरल्या घनदाट रानात आपल्या निवडक साथींसह भांगेचा कार्यक्रम करीत होता. त्याची अरुंद नाव वडाच्या पारंबीला बांधलेली होती. कथकांचं गाणं चाललं होतं. बातम्यांची ने-आण करणारे चार एक्के तयारीत उभे होते.

अचानक नन्हकूसिंग बोलला, "मलुकी, गाण्याला मजा येत नाही. चल, गाडीत बस आणि दुलारीला बोलावून आण." मलुका टाळ घेऊन बसला होता तो एकदम धावत जाऊन एक्क्यात बसला. आज नन्हकूसिंगाचं मन ठिकाणावर नव्हतं. कितीदा तरी गोळी चढवूनही नशा येत नव्हती. तासाभरात दुलारी त्याच्यासमोर येऊन उभी राहिली. तिनं हसून म्हटलं, "काय हुकूम आहे बाबूसाहेब ?"

"दुलारी, गाणं ऐकायची हुक्की आलीय."

"या जंगलात का ?" प्रश्नार्थक मुद्रेनं स्मित करीत तिनं विचारलं.

"आता उगीच शंका काढीत बसू नको." तो हसत म्हणाला.

"हे तर मी त्या दिवशी राणीसाहेबांनाही म्हटलं."

"काय ?...कुणाला ?"

"राजमाता पन्नादेवींना..." आणि मग त्या दिवशी गाणं रंगलं नाहीच.

पावसाळी रात्रीत त्या झाडोऱ्यामध्ये मैफलीतल्या लोकांचा आवाज घुमत होता. मंदिराजवळच्या एका छोट्याशा खोलीत नन्हकूसिंग चिंतामग्न होऊन बसला होता.

डोळ्यात झोप नव्हती. सगळे लोक हळूहळू झोपायला लागले होते. दुलारी जागी होती. कसला तरी विचार करीत होती. आज स्वतःला आवरण्यासाठी तिला प्रयास पडत होते. आणि शेवटी त्या प्रयत्नात हार खाऊन ती उठली आणि हळूहळू नन्हकूसिंगाच्या जवळ येऊन उभी राहिली. चाहूल लागताच चमकून नन्हकूसिंगानं जवळच असलेली तरवार उचलली तेव्हा हसतहसत दुलारीनं म्हटलं, "बाबूसाहेब, काय हे ! बायकांवर सुद्धा तल्वार चालवतात का ?"

छोट्याशा दिव्याच्या प्रकाशात वासनेनं ओथंबलेलं ते रमणीमुख पाहून नन्हकूला हसू लोटलं. तो म्हणाला, "काय बाईजी, इतक्यात जायची घाई कसली ? मौलवीनं पुन्हा बोलावलंय की काय ?" दुलारी त्याच्याजवळ बसली तेव्हा तो म्हणाला, "भीती वाटते काय ?"

"नाही, काहीतरी विचारायचं आहे."

"काय ?"

"की...हेच...की कधी तुमच्या हृदयात..."

"ते विचारू नको, दुलारी. हृदयाचा काही उपयोग नाही म्हणून तर ते हातात घेऊन मी फिरत असतो. कुणी त्याला जर काही केलं असतं–चुरडलं असतं, चिरलं असतं, उधळलं असतं–तर बरं होतं. मरण्यासाठी सर्व काही करून पाहिलं पण मरण नाही येत."

"मरायला सुद्धा शोध घ्यावा लागतो. काशीची हालत तुम्हांला काय ठाऊक ? एका घटकेत काय होईल ते नाही सांगता यायचं, काहीतरी उलटपालट होणार की काय ते कळत नाही. बनारसच्या गल्ल्या कशा खायला उठताहेत."

"काही नवीन घडलंय ?"

"कुणी हेस्टिंगसाहेब आलाय. त्यानं शिवालय घाटावर तेलंग्यांच्या कंपनीचा पहारा बसवलाय म्हणतात. राजा चेतसिंग आणि राजमाता पन्ना तिथंच आहेत. कुणी म्हणतात त्यांना पकडून कलकत्त्याला ..."

"काय पन्नासुद्धा...राणीवासही तिथंच आहे ?" नन्हकू अधीरपणे म्हणाला.

"आज राणी पन्नाचं नाव ऐकताच तुमच्या डोळ्यात पाणी का आलं बाबूसाहेब ?"

एकदम नन्हकूचा चेहरा विक्राळ झाला. "चूप बस. तुला काय करायचंय त्याच्याशी ?" तो उठून उभा राहिला. उद्विग्नपणे, कोण जाणे, काय शोधायला लागला. आणि मग स्वतःला सावरीत म्हणाला, "दुलारी, रात्रीच्या एकांतात एक स्त्री माझ्या पलंगावर येऊन बसली अशी ही आयुष्यातली पहिलीच वेळ आहे. चिरकुमार राहून आपली एक प्रतिज्ञा पालन करण्यासाठी मी शेकडो अपराध करीत फिरतो आहे का ! माहीत आहे

तुला ? मी स्त्रियांचा घोर शत्रू आहे, आणि पन्ना...पण तिचा काय दोष ? मीच दुबळा ठरलो. ती बंधनात अडकली पण माझा बिचरा म्यानातच राहिला. आणि आज तिच्यावर दुसरं संकट ओढवलं आहे. आज गोरे तिला गिरफदार करतील, कलकत्त्याला पाठवून देतील. तिथं ... ”

नन्हकूसिंग बेभान झाला होता. दुलारीनं पाहिलं : अंधारातून तो वटवृक्षाच्या खाली पोचला होता. उसळत्या पाण्यात त्यानं होडी सोडली... त्या भयाण अंधारात दुलारीचं काळीज हाललं.

३

१६ ऑगस्ट १७८१ या दिवशी काशीनगरी डळमळत होती. शिवालय घाटावर राजा चेतसिंग लेफ्टनंट इस्टाकारच्या पहाऱ्यात होते. दुकानें बंद होती. घरात मुलं आयांना विचारीत होती, “मां, आज मिठाईवाला नाही आला ?” आणि आया त्यांना गप्प करीत होत्या. रस्ते सुने झाले होते. कधी कधी कुबरा मौलवी तेलंग्यांच्या कंपनीच्या पुढे येता-जाताना दिसत होता. आणि त्यावेळी उघड्या असलेल्या खिडक्याही बंद होत होत्या. सर्वत्र भीती आणि सन्नाटा पसरला होता. चौकात चिथरूसिंगाची हवेली काशीच्या शौर्याला बंदीत टाकून कोतवालीचं सोंग वठवीत होती. अशा वेळी कुणीतरी हाक घातली, “हिम्मतसिंग.”

खिडकीतून डोकावून पाहात हिम्मतसिंगानं विचारलं, “कोण ?”

“बाबू नन्हकूसिंग.”

“अस्सं. अजून तू बाहेरच आहेस तर ?”

“पागल, राजा कैद झालाय. या बहाद्दरांना मोकळे कर. त्यांना घेऊन एकदा शिवालय घाट गाठू या.”

“थांब.” असं म्हणून हिम्मतसिंगानं काहीतरी हुकूम सोडला. नन्हकूची तलवार चमकली. शिपाई आत पळाले. “निमकहरामी ! बांगड्या भरा बांगड्या.” आणि पाहता पाहता नन्हकूसिंग दिसेनासा झाला. कोतवालीसमोर पुन्हा सन्नाटा पसरला.

नन्हकूचं माथं भडकलेलं होतं. त्याचे मूठभर साथी त्याच्या शब्दाखातर जीव द्यायला तयार होते. राजा चेतसिंगावर राजकीय गुन्ह्याचा आरोप ठेवण्यात आला होता हे त्याला माहीत नव्हतं. प्रवाह कापीत तो आपली नाव घेऊन शिवालयाच्या खिडकीखाली पोचला. बाहेर आलेल्या एका खडकाला त्यानं नाव दोरीनं अडकवली आणि माकडाप्रमाणे उडी मारून तो खिडकीत पोचला. त्याच वेळी तिथं राजमाता पन्ना आणि बालराजा चेतसिंग यांना बाबू मणियारसिंग सांगत होते, “आपण इथं राहिलात

तर आम्ही काय करावं काही कळत नाही. पूजापाठाचा नाद सोडून, महाराणी, आपण रामनगराला गेला असता तर हे सारं…"

तेजस्विनी पन्ना म्हणाली, "आता मी रामनगराला कशी जाऊ ?"

मणियारसिंग दुःखी मुद्रेने म्हणाले, "काय सांगू ? माझे शिपाई बंदीत अडकले आहेत."

इतक्यात फाटकाशी कोलाहल उडाला. राजपरिवार सल्लामसलतीत गुंग असतानाच बाबू नन्हकूसिंगानं महालात प्रवेश केला. समोरचं दार बंद होतं. त्यानं गंगेच्या प्रवाहाकडे कटाक्ष टाकला. लाटांशी झगडत एक होडी घाटाला भिडत होती. तो खूष झाला. या होडीचीच तो वाट पाहात होता. आणि मग सगळ्यांचं लक्ष वेधून घेत तो म्हणाला, "महाराणी कुठं आहेत ?"

सगळ्यांच्या नजरा वळल्या. एक अपरिचित वीरमूर्ती. अंगभर शस्त्रसंभारानं मढलेली.

"कोण आहेस तू ?" चेतसिंगानं विचारलं.

"राजपरिवाराचा एक बिनपगारी सेवक."

पन्नाच्या ओठात श्वास अडकला. तिनं ओळखलं. इतक्या वर्षांनंतर. तोच नन्हकूसिंग.

मणियारसिंगानं विचारलं, "काय करू शकतोस तू ?"

"मरू शकतो. आधी महाराणीला नावेत बसव. खाली दुसऱ्या होडीत चांगले नावाडी आहेत. नंतर बोलू आपण."

मणियारसिंगानं बाहेर नजर टाकली. खिडकीला नाव टेकून चार नावाड्यांसह जनान्याचा दरोगा वाट पाहात होता. त्यानं पन्नाला म्हटलं, "चला, मी येतो बरोबर."

"पण…?" चेतसिंगाकडे पाहात तिनं नजरेनंच प्रश्न केला. त्याचं उत्तर कुणापाशीही नव्हतं. मणियारसिंग म्हणाला, "तर मग मीही इथंच…" पण नन्हकू हसत म्हणाला, "मालक, आपण नावेत बसा. राजाही नावेत सुखरूप उतरेपर्यंत सतरा गोळ्या पचवूनही जिवंत राहण्याची प्रतिज्ञा आहे या नन्हकूसिंगाची."

पन्नानं नन्हकूकडे पाहिले. क्षणभर चार डोळे एक झाले. जन्मजन्मांतरीचा विश्वास संथ ज्योतीप्रमाणे त्या डोळ्यात तेवत होता. तिकडे जबरदस्तीनं फाटक उघडण्याचा प्रयत्न चालला होता. नन्हकू एकदम उसळून म्हणाला, "सरकार, जल्दी करा."

दुसऱ्याच क्षणी पन्ना नावेत होती आणि नन्हकूसिंग फाटकापाशी इस्टाकारला सामोरा. चेतरामनं एक चिठ्ठी मणियारसिंगाच्या हाती ठेवली. लेफ्टनंटनं म्हटलं, "तुमचे लोक दंगा करीत आहेत. आता माझ्या शिपायांनी गोळी चालवली तर त्याला मी जबाबदार नाही."

"पण इथं माझे शिपाई कुठं आहेत साहेब ?" मणियारसिंगानं हसून म्हटलं. बाहेर गडबड वाढायला लागली.

चेतरामनं म्हटलं, "आधी चेतसिंगाला गिरफदार करा."

"कोणाची हिंमत आहे?" कडाडत मणियारसिंगानं तलवार उपसली. त्याचे शब्द पुरे व्हायच्या आत तिथं कुबरा मौलवी पोचला. इथं त्याच्या लेखणीचा काही उपयोग नव्हता आणि आता बाहेर जाणंही शक्य नव्हतं, त्यामुळं तो म्हणाला, "पाहतोस काय, चेतराम?"

चेतरामनं राजावर हात उचलताच त्याची भुजा नन्हकूच्या सफाईदार वारानं धडापासून वेगळी झाली. आता इस्टाकार पुढं आला आणि मौलवी किंचाळायला लागला. बघता बघता नन्हकूसिंगानं इस्टाकार आणि त्याचे सोबती यांना जमिनीवर लोळवले. मग मौलवीसाहेब कुठले वाचायला?

नन्हकूसिंगानं म्हटलं, "काय, त्या दिवशीची थप्पड पुरेशी नाही झाली? घे, पाजी." त्याच्या आडव्या वारानं मौलवी पत्त्यांच्या बंगल्यासारखा कोसळला. हा सगळा भयंकर प्रकार काही क्षणांतच आटोपला.

आरोळी ठोकून नन्हकूसिंगानं चेतसिंगाला म्हटलं, "पाहता काय? नावेत उतरा." त्याच्या शरीरावरील घावांतून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. तिकडे फाटकातून तेलंगी आत घुसत होते. खिडकीतून उतरताना चेतसिंगानं पाहिलं, चारी बाजूंनी तेलंग्यांच्या संगिनी अंगावर येत असतानाही बाबू नन्हकूसिंग जागेवरून न हालता तरवार चालवीत होता. चाळण झालेल्या त्याच्या शरीरातून रक्ताचे पाट वाहात होते. गुंडाच्या शरीराचा एक एक अवयव अलग होऊन पडत होता. काशीचा गुंड होता तो!

पैंजण

जैनेंद्रकुमार

हल्ली एक नवीन फॅशनचे पैंजण बाजारात दिसताहेत. पायांत घातल्यावर ते फारच छान दिसतात. त्यांचे दुवे आपसांत असे काही गिळवलेले आहेत की जणू पैंजणांना स्वतःला असा आकार नाहीच आहे. ज्या पायांत पडतील तोच त्यांचा आकार.

शेजारीपाजारी सगळीकडे लहानमोठ्या पायांत हेच पैंजण वाजत होते. एकीने घेतले म्हणून दुसरीने आणि बघता बघता ते पैंजण असणं फार आवश्यक होऊन बसलं आहे.

आमच्या मुन्नीनंही सांगितलं की मला तसले पैंजण पायजेत. शिकस्त म्हणजे चार वर्षांच्या या आक्काबाई आणि म्हणे पैंजण घालणार. मी विचारलं, "कसले पैंजण ?"

ती म्हणाली, "ते—ते रुक्मिणी घालते आणि शीलाच्या पायात आहेत आणि..."

मी म्हटलं, "बरं बरं."

"अं...मला आजच हवेत," ती म्हणाली.

मी म्हटलं, "ठीक आहे. होऊन जाऊ द्या. आजच आज. झालं ?"

तेव्हा कशीतरी मुन्नीची समजूत झाली पण दुपारी मुन्नीची आत्या आली तेव्हा मुन्नी सहजासहजी ऐकेना.

आत्याने मुन्नीला मांडीवर घेतलं. तिला खाऊ दिला आणि सांगितलं की येत्या रविवारी नक्की पैंजण घेऊन येईन.

रविवारी ती खरंच पैंजण घेऊन आली. मुन्नीबाईंना ठुमकताना आणि फिरताना पुरे झालं. रुक्मिणीकडं गेली. तिला आपले पैंजण दाखवले. शीलाला दाखवले. सगळ्यांनी तिचं आणि तिच्या पैंजणांचं कौतुक केलं. खरोखरच चांदीच्या दोन-तीन साखळ्यांत गुंतलेले ते घुंगूर मोठे छान दिसत होते. मुन्नी तर खूष होती.

मुन्नीचा दादा आशुतोष तिला नटलेली सजलेली बघून प्रथम खूष झाला. तिचा हात धरून तिचे पाय छुमछुमवत तिला इकडं तिकडं घेऊन गेला. तिच्या पैंजणांचं कौतुक त्याला आपलंसंच वाटत होतं. तो हसत होता, टाळ्या पिटीत होता. पण मग थोड्या वेळाने म्हणायला लागला की मुन्नीला पैंजण दिले तेव्हा आता मला बायसिकल हवी.

आत्यानं आश्वासन दिलं की वाढदिवसाला देऊ हं. पण तो म्हणाला की, नाही, आजच हवी.

आत्यानं समजुतीच्या स्वरात सांगितलं की, मुलगे कधी हट्ट करत नाहीत, रडत नाहीत...त्या मुली—त्या हट्टी.

वाढदिवसाला बायसिकल घेण्याचं नक्की झालं.

रविवार हसत-खेळत गेला. संध्याकाळी मुलांची आत्या घरी गेली. पैंजणांचं ठुमकणंही झालं. इकडं तिकडं पडून हरवून जाऊ नयेत म्हणून ते काढून ठेवले. नक्षीकामाचे, नाजूक आणि महागाईचे होते.

सौभाग्यवतीने म्हटलं, "दिसतायत तरी चांगले. मला पण करवून घेऊ का?"

मी म्हटलं, "अगदी जरूर."

तर हे ठीक झालं एक. रात्री मी माझ्या लिहिण्याच्या टेबलाजवळ होतो तिथं येऊन सौ म्हणते कशी, "पैंजण बघितलेत का हो तुम्ही?"

मी आश्चर्याने म्हटलं, "आं? काय म्हणालीस तू?"

माझ्या आश्चर्याकडं दुर्लक्ष करून ती म्हणाली, "बघा जरा इथं टेबलाबिबलावर. खाली तर नाही? एका पायातला आहे. दुसरा कुठं दिसत नाही. कुणास ठाऊक बाई कुठं गेला?"

मी म्हटलं, "कुठं जाणार? असेल इथंच. बघा जरा नीट."

"हो, तेच तर..." असं पुटपुटत तिनं टेबलावरचे कागद इकडं तिकडं करायला प्रारंभ केला. कपाटातली पुस्तकंही उलथापालथ करून बघण्याचा तिचा इरादा दिसला.

मी म्हटलं, "अग, अग हे काय करतेस? इथं कसा तो पैंजण येईल?"

ती मलाच उलट विचारू लागली, "मग नाहीतर कुठं आहे?"

मी म्हटलं, "अग, असं काय? तू ठेवलेस ना? कुठं ठेवलेस?"

म्हणाली की दोनअडचाच्या सुमारास दोन्ही पैंजण नीट खालच्या पेटीत ठेवले. आता एकच आहे. एक नाही.

"मग असं जर आहे तर त्या खोलीतून तो इथं कसा उठून येईल? कदाचित डाव्या-उजव्या हातानं ठेवला असशील. बघ तिथंच. सापडेल."

पण हे ऐकलं-न-ऐकलंसं करून ती भांडखोर स्वरात म्हणाली, "तुम्ही तसलेच आहात. आपण निष्काळजी ते निष्काळजी, वर मलाच दोष देता? मी चांगली सांगते आहे की दोन्ही नीट ठेवले होते म्हणून तर..."

मला पण राग आला. मी म्हटलं, "संभाळून ठेवलेस तर मग शोधतेस कशाला इकडे तिकडे? जिथं ठेवलेस तिथंच बघ. तिथं नसेल तर मग घेतली जिन्नस कुणीतरी."

सौ म्हणाली, "मलाही असंच वाटतं. मेल्या बन्सीचंच हे काम. मी पैंजण ठेवले तेव्हा तो तिथंच होता."

"मग विचारलंस त्याला ?"

"हो. पण तो नाही म्हणतो."

"मग आता ?"

"मग काय माझं डोंबल! तुम्हांला कसली फिकीर असेल तर ना! बोलवा त्या बन्सीला आणि चापून विचारा. जळ्ळा नोकर तो! नक्की पैंजण त्यानेच घेतलाय."

"मग मी आता काय त्याला बोलवून असं म्हणू की, 'बाबा बन्सी, आण बघू तो पैंजण'?"

सौ वैतागली. म्हणाली, "झालं तुमच्या हातून काही! तुम्हीच त्या नोकराला शिरजोर करून ठेवला आहात. कधी ओरडाय-रागवायचंच नाही."

मी गप्प राहिलेला पाहून ती पुन्हा म्हणाली, "सोळातलं पंधरा आणे काम बन्सीचंच. मी सांगते."

मी मान हालवून म्हटलं, "मी विचारलं त्याला. त्याने घेतला असं वाटत नाही."

सौ म्हणाली, "तुम्हांला काय ठाऊक नोकराची जात कशी लुच्ची असते! त्यानंच घेतला. नाहीतर काय आकाशातून का कुणी उतरलं म्हणावं?"

मी म्हटलं, "आशुतोषला विचारलंस का?"

"अहो तो तर माझ्याबरोबर मारे खाली वाकून वाकून शोधत होता. त्याने नाही घेतला."

"त्याला पतंगाचा फार नाद आहे नाही?"

"तुम्ही कधी त्याला बोलता का काही? एवढा घोडा झाला पण...! तुम्हीच नाद लावलात त्याला पतंगाचा."

"त्यालाच कुठं तरी पडलेला पैंजण मिळाला असला तर?"

"छे, छे, मिळाला असता तर त्याने दिला नसता का?"

त्याच संध्याकाळी म्हणे आशुतोष नवा पतंग आणि मांजाचा चक्रा घेऊन आला होता.

"तुम्हीच त्याला डोक्यावर बसवला आहेत. सारा वेळ पतंग पतंग. कधी तुम्ही त्याचा अभ्यास घ्याल का काही? नाव नको! मी तर आता तो पतंग आणि मांजा आणि चक्रा सगळं तोडून फेकून देते."

मी कंटाळून म्हटलं, "बरं बरं. उद्या सकाळी बघू."

सकाळी त्याला बोलवून मी गंभीरपणे म्हटलं, "आशू, एक पैंजण मिळत नाही. तू बघितलास का?"

त्याचा चेहरा त्रस्त झाला. मान हलवून त्याने नकार दिला. पण बोलला काहीच नाही.

मी म्हटलं, "घेतला असशील तरी हरकत नाही. पण खरं सांग. खरं बोलावं."

त्याचा चेहरा आणखीच घुम्म झाला.

माझ्या मनात अनेक विचार येऊन गेले. मी मनाशी पक्कं केलं. गुन्ह्याबद्दल माणसाचा राग करण्यात काही अर्थ नाही. दयाच दाखवणं योग्य आहे. विशेषतः लहान मुलांचा स्वभाव फार कोमल असतो. प्रेमानंच वागलं पाहिजे.

मग मी प्रेमळपणे म्हटलं, "राजा, हे बघ, खरं बोलण्यात भिण्याजोगं काही नाही. घेतला असलास तर सांगून टाक. तुला काही कोणी शिक्षा करत नाही की मारत नाही. समजलं ना?"

आशुतोष गप्प बसून ऐकत होता. त्याचं तोंड उतरलं होतं. थोडी चीडही दिसत होती. माझ्याकडे तो सरळ सरळ बघतच नव्हता.

"मग तू घेतला का पैंजण?"

रागानं ओरडून तो म्हणाला, "नाही, नाही, नाही. मी नाही घेतला." त्याच्या डोळ्यांत पाणी जमून आलं होतं. पण त्याने ते परतवलं.

हा सगळा आविर्भाव अपराध लपविण्याचा हे मी पक्कं ओळखलं.

समजावणीच्या स्वरांत मी म्हटलं, "बरं. असं कर. जा, जाऊन शोध. मिळाला पैंजण तर तुला बक्षीस देईन."

तो गेला आणि दुसऱ्या खोलीत जाऊन एका कोपऱ्यात उभा राहिला. थोडा वेळ तसा राहून मग तो इथं तिथं पैंजण शोधू लागला.

सौ आली व विचारू लागली, "आशूला विचारलें का? काय वाटतं तुम्हांला?"

मी म्हटलं, "हे काही नोकराचं काम नाही. मला आशूचाच संशय आहे."

सौ कळवळून म्हणाली, "नसेल हो! तो कशाला घेईल?"

मी काहीच बोललो नाही. माझं हृदय आशूबद्दलच्या प्रेमानं तुडुंब भरलं होतं. वाटलं यावेळीच त्याला प्रेम, सहानुभूती, जिव्हाळा यांची जास्त आवश्यकता आहे. मला हे एक मोठं संकट आल्यागतच वाटत होतं. असं वाटत होतं, आशूने चोरी केली यात त्याला फार दोष येतच नाही. आमच्यावरच जास्त ठपका येतो. चोरीची सवय एकदा का मुलाला लागली की फार वाईट. त्यात म्हणजे त्याला चोरी करावी लागावीच का? यात आमचाच दोष आहे. या चोरीचा सगळा भार खरं तर आमच्यावरच येतो.

मी त्याला बोलावलं. म्हटलं, "काय रे...हे बघ—माझ्याकडे बघ. पैंजण तू छुन्नूला दिलास ना?"

त्याच्या चेहऱ्यावर छाया आली आणि गेली. बोलला मात्र नाही. मी त्याच्या चेहऱ्यावरून अजमावत होतो.

मी आश्वस्त स्वरात म्हणालो, "हरकत नाही. बोल, बोल, घाबरू नकोस. खरं बोल. दिलास ना छुन्नूला?"

नाइलाजाने त्याने मान हलवली.

मला अतिशय आनंद झाला. मी म्हटलं, "दिलास ना छुन्नूला?"

त्याने पुनः मान हलवली.

प्रेमळ स्वरात म्हटलं, "तोंडानं सांग. छुन्नूला दिलास?"

त्याने कसंबसं म्हटलं, "हो."

विलक्षण आनंदाने मी त्याच्या बाहूंना धरून त्याला वर उचललं आणि म्हटलं, "शहाणी मुलं असंच खरं बोलतात. आशू आमचा शहाणा आहे." तसाच मी त्याला त्याच्या आईकडे घेऊन गेलो. तिला म्हटलं, "बघितलंस आशू किती चांगला आहे! त्यानं कबूल केलंन्, त्याने पैंजण छुन्नूला दिला."

त्याच्या आईलाही हे ऐकून आनंद झाला. तिनं त्याचा एक पापा घेतला. त्याचं मुख कुरवाळून म्हणाली, "माझा बाळ तो!"

आशूचा चेहराही जरासा उजळला. पण उदासपणा दूर झाला नव्हता.

नंतर काही वेळाने मी त्याला एका बाजूला घेऊन म्हटलं, "राजा, छुन्नूकडून आता मागून आण बरं पैंजण! आणशील ना?"

तो माझ्याकडं नुसतांच बघत बसला. हां नाही की हूं नाही.

मी म्हटलं, "हं जा बाळा. जा जाऊन घेऊन ये. हं?"

पुन्हा आपलं त्याचं तोंड बंदच.

मग बऱ्याच वेळाने तो म्हणाला, "पण छुन्नूकडं पैंजण नाहीच आहे. मग तो कुठून येईल?"

म्हटलं, "ठीक आहे. नसला तर ज्याला दिला असेल त्याचं नाव सांगेल तो, नाही का?"

पुन्हा एकदा आशुतोष गप्प झाला. मी सारखं त्याला छुन्नूकडं जायला सांगत होतो पण तोही मला बरचंच उत्तर देत होता.

शेवटी मी हरलो. म्हटलं, "पैंजण कुठं तरी असलाच पाहिजे. तू कुठून घेतलास?"

"तिथं पडला होता."

"अस्सं. मग खाली जाऊन तू छुन्नूला दाखवलास."

"हो."

"मग तो काय म्हणाला? हा विकू या?"

"हं."

"कोणाला विकायचा म्हणाला?"

"म्हणाला की—की मिठाई आणू."

"नाही. पतंग आणू ?"

"बरं. म्हणाला की पतंग आणू."

"म्हणजे पैंजण छुन्नूकडं आहे. होय ना ?"

"हो."

"त्याच्याकडं किंवा पतंगवाल्याकडं. होय ना ? जा, घेऊन ये बघू पतंगवाल्याकडून. म्हणावं आमचे बाबूजी तुला बक्षीस देतील."

तो हलेना. पुन्हा त्यानं पहिलं गाणं लावलं. "त्याच्याकडे नाहीच तेव्हा तो कसा देईल ?"

मला त्याच्या अडेलतट्टूपणाचा राग आला. मी रागारागाने म्हटलं, "काय, कुठं पुरूनबिरून ठेवलायस की काय तो पैंजण ? केलं आहेस तरी काय त्याचं ?"

तो काही बोलला नाही.

मी रागानं म्हटलं, "कारट्या, बोलतोस की नाही ?"

अक्षर नाही.

मी म्हटलं, "चल चालता हो. जिथं कुठं असेल तिथून पैंजण घेऊन ये."

जेव्हा तो जागेवरून हलेना तेव्हा मी त्याचा कान धरून त्याला उठवलं. म्हटलं, "मुकाट्यानं पैंजण आण. नाहीतर घरात पाय ठेवू नकोस."

तो उठला आणि खोलीच्या बाहेर गेला. व्हरांड्यात एका कोपऱ्यात उभा राहिला.

मला अतिशय राग आला. खरं बोलून झाल्यावर आता या मुलाला कसली भीती वाटते कोण जाणे !

बाहेर येऊन मी म्हणालो, "अरे, छुन्नूला जाऊन विचारत का नाहीस ?"

तसाच न बोलता तो उभा राहिला. मग पहिले पाढे पंचावन्न. "त्याच्याकडे नाहीच मग तो कसा देईल ?"

मी म्हटलं, "ज्याला विकला असेल त्याचे पैसे आपण देऊन टाकू. हं ! जा. सांग त्याला !"

इकडं छुन्नूची आई म्हणत होती, "माझा मुलगा नाही असलं काम करायचा. त्यानं पैंजण पाहिलाही नाही."

आशूच्या आईनं उत्तर दिलं, "तुमचा छुन्नू खोटं बोलतो. आशू, तू दिलास ना त्याला ?"

हळू आवाजात आशू उत्तरला, "हो."

तिकडून छुन्नू आला आणि हात नाचवत म्हणाला, "मला नाही दिला. केव्हा दिला होतास रे ?"

सगळा धीर एकवटून आशू म्हणाला, "तेव्हा...नव्हता का दिला ?"

या सगळ्याचा परिणाम एवढाच झाला की छुन्नूच्या आईनं त्याला चांगलंच बडवून काढलं. मारता मारता स्वतः रडत बडबडत होती, "आता आम्ही चोर झालो ना? जळ्ळा कुलक्षयी कारटा, मरत का नाही एकदाचा!"

बघता बघता गोष्ट घटकर्णी झाली. आसपास चर्चा व्हायला लागली. सौ म्हणायला लागली की छुन्नू आणि त्याची आई दोघंही तसलीच आहेत.

मी म्हटलं, "तू भांडण का केलंस?"

ती म्हणाली, "तर! शेवटी मीच भांडखोर किनई! जा तर मग तुम्ही आणि आणा त्या सटवीकडून पैंजण."

मी तिला समजावत म्हटलं, "अग पैंजणाचं महत्त्व की आसपास शांतता असल्याचं? वरं, झगडा करून पैंजण मिळाला नाही तो नाहीच."

ती धुसफुसत निघून गेली.

थोड्या वेळाने छुन्नूची आई आमच्याकडं आली. सौ घेऊन आली होती. भांडणाचं काही चिन्ह दिसत नव्हतं. छुन्नूची आई मला म्हणाली, "छुन्नू म्हणतो की त्यानं काही पैंजण घेतला नाही. पैंजणाची किंमत सांगा. मी आपली पैसे देऊन टाकते."

मी म्हटलं, "छे, छे, पैसे कसले? तुम्ही छुन्नूला प्रेमानं विचारलंत का? मूल आहे ते!"

तिनं लगेच छुन्नूला बोलावून आणलं. म्हटलं, "तू पैंजण घेतलास की नाही ते सांग बघू."

जोरात मान हलवून तो म्हणाला, "मी घेतलाच नाही. पण आशूच्या हातात बघितला होता मी. तो पतंगवाल्याला देऊन आलाय. चांदीचा होता पैंजण."

"तुला नक्की माहीत आहे?" मी.

"हो. तो मलाही म्हणत होता की तूही चल. आपण पतंग आणू."

"केवढासा होता रे पैंजण?"

त्याने हाताने दाखवला. तेवढाच होता.

मी त्याच्या आईला म्हणालो, "बघितलंत ना? प्रथम म्हणाला की पैंजण मला ठाऊकही नाही. आता त्याला तो केवढा आहे हेही माहीत आहे."

माझं बोलणं संपायच्या आत छुन्नूच्या पाठीवर तडाखे बसायला सुरुवात झाली. तोंडानं सुरू होतं, "मेला खोटं बोलतो! दम धर तुझी चामडीच सोलून काढते."

मी त्याला बाजूला ओढायचा प्रयत्न केला. तोही बेटा एवढा बेरड! हुतात्म्याचा आव आणून मार खात होता पण डोळ्यांत पाणी म्हणून नव्हतं. कोपऱ्यात उभा राहून आशू हे सगळं बघत होता.

मी जवळ जवळ सगळ्यांना हाकलूनच दिलं म्हणा ना! छुन्नूला म्हटलं, "जा खेळ जा." त्याच्या आईला म्हटलं, "त्याला मारू नका बरं का! पैंजण म्हणजे काही फार मोठी

वस्तू नाही."

सौचा हात धरून ती म्हणाली, "अशाच चला आमच्या घरी आणि तुम्हीच बघा बारीक नजरेनं. असला पैंजण तर मिळेलच. जातो कुठं?"

मी जरा जरबेच्या स्वरात म्हणालो, "छे, छे, हे काय काहीतरीच बोलता?"

मी आणखीही त्यांना समजावलं. नाहीतर ती बाई मुलाचा प्राणच घ्यायला उठली होती. सारखी तोंडानं त्याला लाखोली चालली होती...कुलक्षणी, वगैरे वगैरे.

चला, भांडण तर टळलं. मला आज ऑफिसला जायलाही वेळ झाला या गडबडीत. जातेवेळी सौला म्हटलं, "प्रेमानं, हळूहळू पोटात शिरून त्याच्याकडून सगळं काढून घे. रागावू नकोस हं. त्यानं मुलं बिघडतात."

संध्याकाळी ऑफिसातून आल्या आल्या सौनं बातमी दिली, की आशुतोषनं सगळं कबूल केलं आहे. अकरा आणे घेऊन त्याने पैंजण पतंगवाल्याला विकला आहे. पैसे तो थोडे थोडे देईन म्हणाला. म्हणजे आशूनेच तसं त्याला सांगितलं आहे. पाच आणे त्यानं सध्या दिलेले छुन्नूकडे आहेत. अशा रीतीने थोडी थोडी करून त्यानं सगळी हकीगत सांगून टाकली होती. सौ म्हणाली, "हरतऱ्हेनं लाडीगोडी लावून दोनतीन तास त्याच्यापुढं डोकं फोडलं तेव्हा कुठं त्यानं कबूल केलं."

मला बरं वाटलं. मी म्हटलं, चला, "पाच आणे देऊन पैंजण घेऊन येऊ. पण हा पतंगवालाही किती बदमाश असेल बरं. लहान मुलांच्या हातून असल्या जिनसा घ्यायच्या का? पोलिसातच दिला पाहिजे. लफंगा कुठला!"

मी विचारलं, "आशू कुठं आहे?"

ती म्हणाली, "असेल जवळच कुठंतरी खेळत."

मी बन्सीला म्हटलं, "जा रे त्याला बोलावून आण."

तो गेला आणि हात हलवत परत आला. "आशूबाबा येताहेत थोड्या वेळाने."

"काय करतोय रे?"

"छुन्नूबरोबर विटीदांडू खेळतायत."

थोड्या वेळात आशू आला. त्याचा चेहरा उदास झाला होता. त्याच्यावर मी प्रेमाचा वर्षाव केला पण कळी खुलली नाही.

मी म्हटलं, "काय? शेवटी पाचच आणे मिळाले ना? आमच्याकडं मागितले असते तर आम्ही दिले नसते वाटतं? बरं, ते जाऊ दे. पुन्हा असं करू नको हं."

मी त्याला खोलीत घेऊन आलो आणि पुन्हा एकदा विचारपूस सुरू केली.

"पतंगवाल्यानं पाच आणे तुला दिले होते ना?"

"हो."

"आणि ते छुन्नूकडं आहेत?"

"हो."

"मग आता ते त्याच्याकडे असतीलच?"

"नाही."

"खर्च केले?"

"नाही."

"खर्च नाही केले?"

"हं."

"हं काय? खर्च केले की नाही?"

यावर तो नुसताच गप्प उभा राहिला. पुन्हा विचारलं तर एकदा हो म्हणाला, एकदा नाही म्हणाला.

मी म्हटलं, "माहीत नाही तर तसं सांग. माहीत नाही?"

"हो."

"राजा, हे बघ, आहे ना माहीत?"

"हो."

"पतंगवाल्याकडून छुन्नूनं पैसे घेतले ना?"

"हो."

"तू का नाही घेतले?"

तो गप्प.

"पाची आणेल्या होत्या की दोन आण्याचं नाणं होतं आणि सुटे पैसे?"

तो गप्पच.

"बोलत का नाहीस?"

तो गप्प.

"आणेल्या किती होत्या?"

"दोन."

"अससं. बाकी पैसे होते?"

"हं."

"दोन आण्याचं नाणं नव्हतं?"

"हं."

"होतं?"

"हं."

आतांपर्यंत मी राग कसाबसा आवरला होता. मी दरडावून म्हटलं, "नीट बऱ्या बोलानं सांग. किती आणेल्या न् किती पैसे होते?"

तरी तो गप्पच.

"बोलतोस की नाही?"

तरी गप्प.

"मुकाट्यानं बोल्तोस की आता—"

तो भ्याला. पण त्यानं तोंड उघडलं नाही.

"तुला ऐकू येतंय का रे मी काय म्हणतोय ते?" मी त्याचे कान उपटले. त्याने हाय की हुय केलं नाही.

"आता तरी तोंड उचकटशील की नाही?"

त्याचा चेहरा भयानं पांढरा फट्ट झाला पण तोंडाची खीळ तशीच राहिली.

मी नोकराला हाक मारली आणि आशूला कोंडून ठेवायला सांगितलं. त्याने माझी आज्ञा पाळली. आशू खोलीत बंद झाला.

दहा मिनिटांनंतर मी त्याला बोलावून आणलं. त्याचं तोंड सुजमटल्यासारखं दिसत होतं. त्याच्या ओठाची उघडझाप होत होती. मात्र तो रडला नाही.

मी विचारलं, "काय? अक्कल आली का काही?"

त्याचं एक नाही की दोन नाही.

मी पुनः विचारलं, "कोणता पतंगवाला रे? नाक्यावरचा डाव्या बाजूचा?"

आशू तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटला. मला काही कळलं नाही.

"तो नाक्यावरचाच ना? बोल—"

"हो."

"हे बघ, काकाला घेऊन जा. कोणता तो दाखव, हं? मग त्याच्याकडून काकाच घेईल पैंजण. हं? समजलं ना?"

मी त्याला समजावून सांगितलं की, "पाच आणे घेऊन जा. प्रथम तू लांब राहून बघ. आशू त्याला पैसे देईल आणि पैंजण मागेल. बहुधा तो देईलच. पण नाही म्हणाला तर मात्र त्याला दरडावून धमकी दे की पोलिसांच्या हवाली करीन. लहान मुलांच्याकडून असा माल घेतो? आणि आशुतोष, काकाबरोबर जा."

तो काही हलायचं चिन्ह दिसेना.

"जाणार नाहीस?" मी विचारलं.

तो नाही म्हणाला. मी त्याला समजावून सांगितलं की, "घरची वस्तू आहे. त्याला पैसे पडलेत. तू नुसतं काकाबरोबर जा. बस्स. तुला काही बोलायला नको. पैसे दे

आणि म्हणावं पैंजण द्या. दिला तर दिला नाही दिला तरी हरकत नाही. तुला त्याच्याशी काहीच करायचं नाही. समजलं ! जा आता."

पण कसलं काय न कसलं काय ? तो ढिम्म हलेना. मला त्याचा असा संताप आला ! सगळं समजावूनमुद्धा ऐकत नाही म्हणजे काय ?

मी ओरडून विचारलं, "जातोस ना ?"

त्याने नकारार्थी मुंडी हलवली. मी माझ्या धाकट्या भावाला, प्रकाशला बोलावलं. म्हटलं, "याला पकडून घेऊन जा."

त्याने त्याला उचललं आणि आशूनं लाथा झाडायला प्रारंभ केला.

मी संयम केला आणि आशूला हाक मारून म्हटलं, "अरे भिऊ नकोस. जा तू." मग प्रकाशलाही म्हटलं की, "तू आपला त्याला कडेवरच उचलून घेऊन जा. त्याला दुकानातून काय हवं ते घेऊन दे."

पण त्याचा मुगदळा फुगलेलाच होता. कसाबसा पाय ओढत तो गेला. कार्टं आठ वर्षांचं झालं पण अक्कल आली असेल तर शपथ ! मला तर इतका संताप आला होता ! —पण मनाशी विवेक केला की रागानेच तर मुलं बिघडतात.

थोड्या वेळात प्रकाश आला. म्हणाला,

"आशू पळून आलाय्."

"कुठं आहे, कुठं आहे तो ?"

"तिथं रुसून उभा आहे. घरात येत नाही म्हणतो."

"जा, पकडून घेऊन ये त्याला."

आशूला धरपकड करून आणलं.

माझा संताप अनावर झाला होता. मी त्याला म्हणालो, "काय रे, तुझ्या खोड्या संपणार आहेत की नाही ? जातोस की नाही ?"

तो पुनः गप्प झालेला बघताच मी त्याला दोन तडाखे दिले. एकदाच त्याने किंकाळी फोडली पण लगेच त्यानं तोंड मिटलं.

मी त्याच्याकडं रागारागानं बघत म्हटलं, "उचला रे याला डोळ्यांसमोरून. कोंडून ठेवा खोलीत."

यावेळी त्याला चांगलं अर्धा तास कोंडून ठेवलं होतं. मला सारखं वाटत होतं की करतोय हे काही बरोबर नाही. पण दुसरा इलाजच नव्हता. बडवून सगळं नीटनेटकं करायची सवय होती ना !

मध्यंतरी मी प्रकाशला दोन्ही पतंगवाल्यांच्याकडं पाठवलं. पण कोणाकडंच पैंजण नसल्याचं तो सांगत आला.

मला त्याचा असा राग आला ! म्हटलं एवढंसं काम होत नाही तुमच्याकडून.

तो म्हणाला, "पण मी काय करू ?"

प्रकाश मला मानत होता. माझ्या रागावर तो गुपचूप बसला. आशुतोषची खोली उघडून बघितलं तर तो फरशीवर झोपून गेला होता. झोपेतही त्याच्या डोळ्यांजवळ आसू नव्हते. खरं म्हणजे मला भडभडून आलं त्याला तसं झोपलेलं पाहून.

मी त्याला उठवलं. म्हटलं, "काय, कशी काय हालहवाल आहे ?"

प्रथम त्याच्या चेहऱ्यावर काही न समजल्याचाच भाव होता. मग बहुधा त्याला आठवण झाली. हळूहळू चेहऱ्यावर हट्ट, राग सगळं प्रकट झालं.

मी त्याला म्हटलं, "कोंडून राहायचं नसेल तर पतंगवाल्याकडे बऱ्या बोलानं चल."

आशूला याचं काही विशेष वाटल्याचं दिसलं नाही.

मी त्याला समजावण्याचा पुन्हा प्रयत्न केला. मी त्याला एक रुपया दिला आणि म्हटलं, "हा दे पतंगवाल्याला आणि पैंजण माग बघू. अरे आपली वस्तू ती. तू शहाणा ना ?

तो म्हणाला, "पण पैंजण पतंगवाल्याजवळ नाहीच तर तो कुठून देईल ?"

मला याचा अर्थच कळेना. मी म्हटल

"अरे, तूच तर म्हणालास ना की पाच आण्याला पैंजण दिलास म्हणून ? हवं तर छुन्नूला घे बरोबर."

तो गप्प झाला. खूप समजावल्यावर तो एकदाचा तयार झाला. मी त्याचं ते खत्रूड तोंड बघून त्याला रागावणार होतो—पण त्याची आत्या येताना दिसली.

आत्याने त्याच्या माथ्यावरून हात फिरवत म्हटलं, "आज मी काय काय आणलंय ? केळी, मिठाई..."

आशूचा चेहरा तसाच राहिला. मी आत्याला म्हटलं, "जाऊ दे ग त्याला. अडवू नकोस."

त्याचं काही जायचं लक्षण दिसेना.

आत्या म्हणाली, "काय झालं ?"

मी म्हटलं, "काही नाही. जाऊ दे त्याला."

मी प्रकाशला म्हटलं, "तू नि बन्सी मिळून पकडून न्या त्याला. समजलं ना ?"

त्याची आत्या सारखी हे काय, हे काय असं विचारतच होती. पण मग मी तिच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा मारू लागलो. बायका म्हणजे चालती बोलती वर्तमानपत्रंच !

मग एक पेटी देत ती म्हणाली की, "यात जरुरीचे कागदपत्र आहेत आणि—त्या दिवशी किनई चुकून एक पैंजण माझ्याचबरोबर गेला बघ," असं म्हणून तिनं तो माझ्यासमोर ठेवला.

परकं सुख

यशपाल

सूर्योदय झाला आहे की नाही हेही कळत नव्हतं. आकाश ढगांनी भरून आलं होतं. ओलेपणानं जड झालेला वारा जरा जोराचाच सुटला होता. डोंगरमाथ्यावर जाण्यासाठी आलेले प्रवासी पठाणकोटच्या मुसाफिरखान्यात बसून अंगाभोवती कपडे घट्ट लपेटून घेत होते आणि लॉऱ्या कधी सुटतात याची वाट बघत होते. लॉऱ्यांचे ड्रायव्हर उतारूंच्या शोधात इकडे तिकडे धावत होते. प्रवाशांना पुढं जाण्याची जितकी काळजी होती तिच्यापेक्षा अधिक काळजी होती या ड्रायव्हरना त्यांना मुक्कामावर पोचवण्याची.

स्टेशनचा लांबलचक प्लॅटफॉर्म सुनसान होता. मध्येच एखादा कुली नजरेला पडायचा. प्लॅटफॉर्मच्या एका कडेला लाद्या बसवलेला पट्टा होता. अंगात गरम सूट आणि वर ओव्हरकोट घातलेला मि. सेठी या पट्टयावर फेऱ्या घालीत होता. त्याच्या गरम कपड्यांना भेदून शरीराला स्पर्श करण्याची ताकद पहाडी थंड हवेत नव्हती. त्याच्या चेहऱ्याशी आणि डोक्यावरील केसांशीच तिचा खेळ चालला होता. हवेतला हा गारठा शेकडो प्रवाशांचे प्राण गळ्याशी आणीत होता खरा पण तो सेठीला मोठा स्फूर्तिदायक वाटत होता. या शांततेमध्ये स्वतःतच हरवून जाण्याचा त्याचा प्रयत्न चालला होता.

लॉऱ्यांचे ड्रायव्हर आपली शिकार मुसाफिरखान्यात धुंडाळीत होते. कारचे ड्रायव्हर वेटिंगरूमच्या जाळ्यांना तोंड लावून भीत भीत आपल्या आसाम्यांचा अंदाज घेत होते. एका ड्रायव्हरनं मोठ्या आदबीनं सेठीला सलाम करीत म्हटलं,

"हुजूर, खूप कम्फर्टेबल गाडी आहे."

सेठीने त्याला उत्तर दिलं नाही. थंड हवेची मजा चाखण्यात तो गुंतला होता. उत्तर देऊन आपल्या शांतीचा भंग करणं त्याला योग्य वाटलं नाही. गाडीत जागा मिळण्या-न-मिळण्याची त्याला चिंता नव्हती. गाडीत जागा शोधण्याची त्याला गरज नव्हती. गाड्याच त्याच्या मागं लागत होत्या. ड्रायव्हर दूर उभा राहून साहेबाच्या हुकमाची वाट पाहात होता पण सेठीचं त्याच्याकडे लक्ष गेलं नाही.

बायकांच्या वेटिंगरूमचं दार उघडलेलं सेठीनं पाहिलं. लांब काळा कोट आणि सफेद साडी पेहेरलेली एक तरुणी बाहेर आली. तिचं बोट धरून एक दीडदोन वर्षांचं मूल तिच्याबरोबर चालत होतं. ती तरुणी रिकाम्या प्लॅटफॉर्मच्या दुसऱ्या टोकाकडे निघून गेली.

या शांततेमध्ये सेठीच्या मनात अचानक एक विचार आला. हातात मुलाचा हात घेऊन पूर्वेच्या दिशेनं चालत जाणारी ही युवती म्हणजे सफल जीवनाचंच एक चित्र आहे असं त्याला वाटलं. स्वतःचं आयुष्य प्रयोजनशून्य, निरुद्देश असं त्याला वाटायचं. ढगाचा एखादा चुकार तुकडा वाऱ्यावर भटकत असावा तसं या तरुणीचं आयुष्य सजल मेघासारखं होतं. आपल्या वर्षावानं पोसलेल्या सावळ्या शेतावर पसरलेल्या मेघासारखं. त्या मुलाचे छोटे छोटे गोबरे पाय, लटपटीत चाल, आईच्या हाताला लोंबकळल्यासारखं चालणं, आईची तृप्त, समाधानी आणि संथ गती—मालानं भरलेली नौका संथ पाण्यातून भरदारपणे जात असावी तशी.

दिव्याच्या खांबाला पाठ टेकून त्या मायलेकरांच्या जोडीकडे पाहात सेठी उभा होता. स्टेशनच्या इमारतीच्या टोकापर्यंत चालत जाऊन ती तरुणी परत वळली. परतताना उजव्या हाताचं बोट सोडवून तिनं डाव्या हाताचं बोट मुलाच्या हातात अडकवलं. ती आता सेठीच्या दिशेनं चालायला लागली. वेलीवर लटकलेल्या फळाप्रमाणं ते मूल त्या तरुणीकडून आपला जीवनरस घेत होतं. प्रत्येक पावलागणिक जवळ येत असलेल्या त्या युवतीचा चेहरा आणि बालकाची आकृती सेठीच्या नजरेपुढे स्पष्ट होत चालली होती. युवतीचा गोरा रंग, सडपातळ अंगकाठी, सुखवस्तूपणाची झाक, मोठाले डोळे, मुलाचं इवलंसं नाक, गोलसर डोळे, फुगीर गाल, चेहऱ्यावरचा ताजा रक्तिमा, सगळं काही डोळ्यांवरल्या चष्म्याच्या भिंगांतून सेठीला दिसत होतं. ताज्या थंड हवेची मजा चाखीत शांती मिळवण्याचा बेत सेठी विसरून गेला.

कारच्या ड्रायव्हरनं मेमसाहेबांना सलाम करून काहीतरी विचारलं. नंतर लॉरीच्या एका ड्रायव्हरनं सलाम करून काही सांगितलं...

सेठी व्यवहारचतुर माणूस होता. मेमसाहेब स्वस्त पण चांगल्या वाहनाच्या शोधात असणार, हे त्यानं ओळखलं. लॉरी साताच्या आधी निघू शकत नाही पण कारला असलं काही बंधन नाही. लॉरीचे उतारू थांबले आहेत कारण त्यांच्यासाठी रस्ता बंद आहे. कारचे उतारू थांबले आहेत कारण त्यांना निघण्याची घाई नाही. सेठीच्या मनात एक विचार आला. दिव्याच्या खांबाचा आधार सोडून तो सरळ उभा राहिला आणि त्यानं ड्रायव्हरकडे पाहिलं. ड्रायव्हर धावत समोर आला आणि त्यानं पुन्हा एकदा सलाम ठोकला. सेठीनं विचारलं, "गाडी ठीक आहे?"

"हुजूर बिलकूल न्यू. ऑस्टिन सेलून."

"अच्छा."

"हुजूर आणखी कुणी सवारी तर नाही ना घ्यायची?"

"नाही. एकदम जायगा. तुला काही पैसे मिळणार असतील तर बसव एखादी स्वारी."

ड्रायव्हरनं आणखीनच जोरदार सलाम केला. वेटिंग रूममधून सेठीचं सामान निघालं. तीन मोठ्या सूटकेस, एक मोठा होल्डॉल आणि छोट्यामोठ्या अटॅची केसेस. ड्रायव्हरनं चटकन पुन्हा एकदा मेमसाहेबांना सलाम केला आणि फुकटात मिळालेल्या एका स्वारीचा सौदा स्वस्तात करून टाकला.

सेठी हे सर्व पाहात होता. मेमसाहेबांचं थोडकंसंच सामान होतं. फक्त एक सूटकेस व होल्डॉल. मुलाला घेऊन तीही सेठीच्या मागोमाग कारकडे निघाली. मागं बसण्याऐवजी सेठी पुढं ड्रायव्हरच्या बाजूला बसला आणि मुलाला घेऊन मेमसाहेब मागं बसली.

थंड हवा कापीत गाडी पळत होती. आपल्या पाठीमागे जे चाललं होतं त्याचा अनुभव सेठीला आनंददायक वाटत होता. गाडीचं पुरं भाडं भरूनही पुढल्या सीटवर आखडून बसणं त्यामुळं त्याला अप्रिय वाटलं नाही. समोरून वेगानं पळणारी झाडं आणि रस्त्याच्या कडेची घरं पाहून मागल्या सीटवरचं मूल आनंदानं नाचत होतं. पुढल्या सीटला धरून उड्या मारीत होतं. या प्रकारात कधी सेठीची टोपी वाकडी होत होती तर कधी मुलाचं डोकं त्याच्या खांद्यावर आपटत होतं.

मुलाच्या या अवखळपणामुळं त्याच्या आईला संकोच वाटत होता. कितीतरी वेळा तिनं मुलाला गप्प करण्याचा प्रयत्न केला. लाडीकपणं धमकीही दिली. पण त्यामुळं तिला आणि सेठीला हसू लोटलं. उडी मारून पुढल्या सीटवर जाण्याची मुलाची इच्छा होती. सेठी मागं वळला आणि त्यानं त्याला उचलून घेतलं. आपल्या मांडीवर बसवलं. त्याच्या गुबगुबीत मऊ अंगाच्या स्पर्शानं सेठीला एक नवी अनुभूती प्राप्त झाली. प्रयत्नपूर्वक आणि कष्टाळूपणं त्यानं घडवलेलं आपलं जीवन त्याला आता एकदम असफल, प्रयोजन-शून्य वाटायला लागलं. त्या बालकाच्या चेहऱ्याकडे पाहात असताना त्याला आपल्या जीवनात एक फार मोठी पोकळी असल्यासारखं वाटायला लागलं.

मोटरच्या समोरून धावत असलेल्या दृश्यामध्ये सेठीला आपल्या जीवनाची कहाणी सिनेमातील चित्रांप्रमाणे दिसू लागली. वडिलांच्या मृत्यूमुळे कॉलेजच्या पहिल्याच वर्षात शिक्षण सोडणं भाग पडलं. उपजीविकेचं साधन नसल्यामुळं भटकंती करावी लागली. ठेकेदाराकडे महिना वीस रुपये पगारावर दिवसाचे चोवीस तास हाडाची काडं करावी लागली. आणि मग दुसऱ्या ठेकेदारांची कामं घेऊन बडी ठेकेदारी, एकामागून एक कंत्राटं. ज्या पैशांपायी त्याला दारोदार भटकावं लागलं होतं ते पैसे आता हजारोनी आणि लाखोनी त्याच्या हातात खेळायला लागले. रेल्वेच्या पुलाचं कंत्राट. एकहाती अडीच लाखांचा नफा....

सेठीनं आयुष्यात फक्त एक गोष्ट ओळखली. पैसा! त्याच्यासाठी दिवस पाहिला नाही की रात्र पाहिली नाही. आज तो लखपती आहे. कमाईच्या जोरावर मोठमोठ्या कंपन्यांत

त्याची भागीदारी आहे. खिशात असलेल्या चार आंगळं जाडीच्या इंपीरियल बँकेच्या चेकबुकावर काही आकडे लिहून तो काहीही घडवून आणू शकतो. पण या साऱ्यात पैशापलिकडे त्यानं काय मिळवलं?...पैशानं काय मिळत नाही?...त्याचे नातेवाईक —ज्यांना तो ओळखीत नाही किंवा ज्यांना ओळखण्याची त्याला गरज वाटत नाही, ते त्याच्या नावाशी संबंध जोडून आपली ओळख करून देतात. प्रेमानं ओथंबलेल्या अंतःकरणानं त्याच्याकडे धावत येतात. मानमरातबात काही उणं नाही. राजकीय आणि सामाजिक संस्थांना त्याला आपला आश्रयदाता किंवा अध्यक्ष बनवण्याची ओढ लागलेली असते. पण या साऱ्यातून त्याला काय मिळतं?

प्रेमाच्या आणि प्रणयाच्या कितीतरी देखाव्यांनी त्याला वेढून टाकलं. त्या लाजऱ्या, मुग्ध डोळ्यांमध्ये त्याला दिसली ती फक्त त्याच्या पैशाबद्दलची हाव. त्याला गटवण्याचा प्रयत्न. हे सगळं समजून उमजून त्यानं का या जाळ्यात फसावं? त्याचं मन कुणीही आकर्षित करू शकलं नाही. गुळाच्या ढेपेवर घोंघावणाऱ्या माशा. मुंग्यांप्रमाणं त्यानं सगळ्यांना हाकलून लावलं. त्याचं ध्येय फक्त एकच होतं—पैसा.

आज पैशाला तोटा नाही पण तरीही तो पैसे कमावतोच आहे. हातात असलेल्या पैशात भर घालणं एवढंच उद्दिष्ट. पावसाळ्यात लहानमोठ्या वहाळ-ओढ्यांचं पाणी नदीत जाऊन मिळावं त्याप्रमाणं पैसा त्याच्याकडे वाहात असतो. त्यानं बांधलेल्या संघटनेतून शेकडो जागी हजारो लोक कष्ट करून पैसा निर्माण करताहेत आणि हा पैसा संघटनेच्या नळांमधून वाहात सेठीच्या हिशेबात गोळा होतो आहे. धन आणि पैसा वाहू आणण्यासाठी नवनवीन नळ बांधणं हे त्याचं काम आहे.

आपल्या खर्चाची त्याला चिंता नाही. त्याला कसला शौक नाही. एकटा जीव खर्च तरी कशाकशावर करणार? स्वतःवरचा त्याचा खर्च महिना हजार-बाराशेच्यावर पोचलेला नाही. सुखाकडे कधी त्याचं लक्ष गेलं नाही. पण आज अचानक थंड हवेच्या झोताच्यातून त्याच्या शांत मेंदूत एका नव्या अनुभूतीचा जन्म झाला. अभावाच्या अनुभूतीचा.

तो मुलगा आता आपले बुटाचे पाय त्याच्या भारी किमतीच्या कोटावर रोवून उभा आहे. बर्फासारख्या गप्प झालेल्या समोरच्या काचेवर हात मारीत तिच्यावर तोंड टेकतो आहे आणि मजेनं खिदळतो आहे. त्याच्या पावलांनी तुडवलं जाण्यात सेठीला सुखाचा अनुभव सापडला. त्याचे डोळे ओलावले. चेहरा किंचित् आपल्या बाजूला वळवून तो एकटकपणे मुलाच्या चाळ्यांकडे पाहात राहिला. आपल्या पाठीच्या मागे, कानांजवळ त्याला जाणवत होती एक उपस्थिती, एक व्यग्र वात्सल्यमय अस्तित्व. वृक्षांच्या छायेसारखं व्यापक आणि वृक्षाला जन्म देणाऱ्या फुलासारखं आकर्षक. संततीच्या शिरावर आधाराचा आणि धीराचा हात ठेवणारं आणि पुरुषाच्या हृदयात इच्छेचा तीर मारणारं. प्रणयाचा

कटाक्ष, संरक्षणाचं आश्वासन, आशीर्वादाची सावली, वासनेची झिळमिळ, सगळं काही जिथं एकत्रित झालेलं आहे असं सातरंगी धनुष्य ज्याच्या हास्यातून निर्माण होतं असलं व्यक्तिमत्त्व. अशा तऱ्हेचा एक लोहचुंबक त्याला वर खेचीत होता आणि मांडीवर बसलेल्या मुलाचं आकर्षण त्याला खाली ओढीत होतं. एका नव्याच अनुभवाच्या या अवस्थेत तो भान नसल्यासारखा, हरवलेपणं गुंग झाला होता. विद्युत्प्रवाहासारखं काहीतरी त्याच्या शरीराला विचलित करीत होतं.

मोटर डोंगरावर उंच उंच जात होती तशी थंडी वाढत होती. ढग दाट होत होते. हवा कच्च ओलसर झाली होती. मोटारीच्या काचेवर पाण्याचे ओघळ वाहायला लागले होते. काचेचा धुकटपणा साफ करणारा काटा ड्रायव्हरसमोरच्या काचेवर फिरत होता आणि त्या मुलाचा त्याला पकडण्याचा प्रयत्न चालला होता. त्याचे गुबगुबीत हात सेठीनं आपल्या हातात धरून ठेवले होते. ते सारखे आपल्या हातात राहावे असं त्याला वाटत होतं. मुलगा एकदम मागं वळला आणि त्यानं सेठीकडे पाहिलं. सेठीच्या नेकटायला लावलेल्या जडावाच्या पिनकडे त्याचं लक्ष गेलं आणि ती ओढून काढण्याचा प्रयत्न सुरू झाला. सेठीनं पिन काढून त्याच्या कोटाला लावली. मोटारीत लावण्याचा त्याचा शराबी रंगाच्या मोठाल्या भिंगांचा चष्मा होता तो आता मुलाच्या डोळ्यांवर चढला. मुलाचा अर्धा चेहरा त्यात बुडून गेला. त्या चष्म्याच्या भिंगात सेठीला आपल्या मागचं प्रतिबिंब दिसलं. मुलाची आई ओठावर बोट ठेवून मुलाला चूप राहण्याचा इशारा करीत होती. सेठीनं मागं वळून तिच्याकडे पाहिलं आणि आश्वासकपणं म्हटलं, "इट्स ऑल राइट. काही हरकत नाही." त्याच्या ओठावर एक करुण हास्य होतं. त्यानं त्या आईचं हृदय विरघळलं.

ड्रायव्हरनं मोटारची चाल मंद केली आणि अजीजीच्या सुरात म्हटलं, "हुजर वर जोराचा पाऊस पडतोय. धुकं भलतंच दाटलंय."

सेठीनं उत्तर दिलं, "ओ, इट इज ऑल राइट."

पर्वताच्या वरच्या भागात पडलेल्या पावसाचं पाणी सडकेच्या बाजूनं वहाळासारखं वाहात होतं. त्या पाण्याला कापीत, हवेत पाण्याची कारंबी उडवीत मोटार वळणावर वळणे घेत वरवर जात होती. सायन्सचा जादूचा दिवा घासून वश केलेला हा मोटारचा दैत्य पहाडाचा कठीण चढाव, ढगांचे पडदे आणि वर्षाव यांची पर्वा न करता वर चढण्याचं आपलं काम चालूच ठेवीत होता.

न थांबता दोन तास प्रवास केल्यानंतर 'अधमार्ग'चा डाकबंगला लागला. मोटार वळण घेऊन आवारात शिरली व पोर्चमध्ये येऊन थांबली. आवाराच्या बाहेर बरेच प्रवासी पत्र्याच्या आणि गवताच्या छताखाली अर्धवट भिजत थांबले होते. पहाडी

रस्त्यांवरून ओझी वाहणारे बैल व खेचरे जागजागी पावसात भिजत उभी होती. कुठं अघळपघळ तर कुठं तरतरीतपणे चाललेले माणसांचे व्यवहार ही जनावरे भयातुर नजरेने पाहात होती. माणसं आभाळ मोकळं होण्याची आणि सरकारी हुकुमाची वाट पाहात होती तर ही जनावरं माणसांच्या हुकुमाची प्रतीक्षा करीत होती. रात्रभर जोराचा पाऊस झाल्यामुळं तर अनेक ठिकाणी कडे कोसळून रस्ता बंद झाला होता. प्रवाशांना पुढं जाण्याचा हुकूम नव्हता.

ड्रायव्हरनं मोटारचं दार उघडलं. सेठी उतरला. मुलगा त्याचा हात धरून चालला होता. मागून मेमसाहेब उतरली. डाकबंगल्याच्या चपराशानं आणि खानसाम्यानं कार पाहताच सलामी दिली. वर्दी पेहेनलेल्या खानसाम्यानं अत्यंत आदबशीरपणे न्याहारीची विचारपूस केली. सेठीनं म्हटलं, "हो."

हातातल्या पिशवीत मेमसाहेबांनी मुलाच्या दुधाची बाटली आणलेली होती. तिला स्वतःला न्याहारीची गरज नव्हती. महिना साठ रुपये मिळवणाऱ्या शाळामास्तरणीला डाकबंगल्यातल्या नाश्त्याची सवय नसतेच. व्हरांड्यातल्या एका खुर्चीवर बसून सेठीकडे न पाहता तिनं बल्लूला (आपल्या मुलाला) दूध पिण्यासाठी हाक मारली.

सेठीनं मेमसाहेबांकडे न बघताच म्हटलं, "बल्लूसाठी गरम दूध येईल."

मेजावर न्याहारी मांडताच खानसाम्यानं मेमसाहेबांना तशी सूचना दिली. जणू साहेब, मेमसाहेब आणि मुलगा हे एकच कुटुंब होतं.

खानसाम्याचा असा समज झाला हे मेमसाहेबांना जरा विचित्र वाटलं. पण अस्वाभाविक वाटलं नाही. सेठीला पाहून आदबीनं व औपचारिकपणं त्यांनी इंग्रजीत म्हटलं, "मला काही न्याहारीची गरज नाही."

शिष्टाचारी आग्रहानं सेठीनं म्हटलं, "या असल्या थंडीत कपभर गरम चहा घ्यायला हरकत नाही."

न्याहारीसाठी ती आत गेली. त्या खोलीत फक्त खानसाम्याचीच येजा होती. त्याच्या भिंतींच्या आडोशात बाहेरच्या जगाच्या दृष्टीनं ती दोन्ं पति-पत्नी आणि त्यांचं मूल असं हे छोटंसं कुटुंब होतं. बाहेरच्या जगाचा प्रतिनिधी किंवा साक्षी होता फक्त खानसामा. त्याच्यासमोर विनाकारण संकोचानं स्वतःला भयभीत किंवा अपराधी बनवणं मेमसाहेबांनाही उचित वाटलं नाही. त्यांनी अगदी निःसंकोचपणे चहा बनवायला सुरुवात केली. सेठीनं आमलेटचा एक छोटासा तुकडा बल्लूला भरवला. बल्लू भरल्या तोंडानं तो खायला लागला.

खानसाम्यानं मेमसाहेबांच्या मागं उभं राहून विचारलं, "काही बिस्कुट, जाम, फ्रूट, वगैरे?"

उत्तर सेठीनं दिलं, "आण."

ज्या सहजासहजी खपण्यासारख्या नव्हत्या अशा गोष्टी आता डब्यांतून, अर्ध्या उघडलेल्या डब्यांतून वगैरे मेजावर यायला लागल्या. सेठी हसत हसत एकेका गोष्टीची चव बल्लूला चाखवीत होता. मुलाचा आनंद पाहून आई गदगदली होती. सेठीला पुन्हा-पुन्हा सांगत होती, "आता पुरे हो, आणखी नको, भूक नाही त्याला."

मुलाच्या आधारानं संकोच उडवून लावीत सेठीनं म्हटलं, "आपण डलहौजीला असता?"

"होय. माझं नाव मिसेस मदन. मिस्टर मदन मिलिटरी अकौंट्सच्या ऑफिसात आहेत. मी शाळेत शिकवते. वहिणीला भेटायला अमृतसरला गेले होते."

सेठी स्वतःचा काय परिचय करून देणार? त्यानं केवळ "छान" एवढंच म्हटलं. स्वतःच्या बाबतीत सांगण्यासारखं काहीच त्याला आढळेना. आपलं आयुष्य त्याला नितांत आधारशून्य, अरूप असं वाटत होतं.

"तुम्ही उन्हाळ्यासाठी म्हणून चालला आहात डलहौजीला?" मिसेस मदननं विचारलं.

"नाही. असाच कामानिमित्त चाललोय थोड्या दिवसांकरता. डलहौजी जागा छान आहे. फार चांगली आहे. फारच सुंदर दृश्य दिसतं."...

"मंडळींना नाही आणलंत बरोबर?" जरा जवळिकेच्या आवाजात मिसेस मदननं विचारलं

"नाही. नाहीच आहे कुणी...मी लग्न नाही केलं. माझं नाव आर. एल. सेठी. मी ठेकेदारीचा व्यवसाय करतो. अमृतसरचं नवं चर्च बांधलंय ना, त्याचं कंत्राट माझ्याकडेच होतं." भिंतीकडे पाहात, चहात चमचा ढवळीत त्यानं म्हटलं, "मी एकटाच असतो."

सेठीच्या शब्दांतून कारुण्य आणि दुःखाचा एक भार मिसेस मदनच्या मनावर उतरला. ती विचार करायला लागली, "किती भला माणूस! किती मोठा माणूस आहे!"

चामड्याच्या पट्ट्यातलं सेठीचं सोन्याचं घड्याळ आता बल्लू टेबलावर घाशीत होता. मिसेस मदननं बोट उगारून म्हटलं, "ना!" आणि सेठीकडे पाहून हसत म्हटलं, "भलता गुंड आहे!"

सेठी सारखा आपल्या केसातून बोटे फिरवीत होता. कदाचित् विचारांच्या गोंधळामुळे असेल. खूप मिळवून सुद्धा आपलं जीवन त्याला निराधार, एखाद्या लंगड्यासारखं वाटत होतं. समोर बसलेल्या मिसेस मदनचं मेजावर कोपर टेकून आपल्या मुलाकडे पाहात राहणं, तिचा निर्मळ, खुललेला, टुकटुकीत चेहरा, मोठाले भावपूर्ण डोळे, डोक्यावरील पदर ओघळल्यावर दिसणारा भरदार केशसंभार, तिचे लाल ओठ, कोटाच्या कॉलरच्या त्रिकोणातून दिसणारा गळ्याखालचा भाग, हे सगळं स्वतःच्या आवाक्याबाहेर असलेल्या जीवनाचं प्रतीक असल्याप्रमाणं त्याला वाटत होतं.

मिसेस मदनची नजर सेठीच्या डोळ्यांकडे गेली. सेठीची दृष्टी आपल्या शरीराला कुरवाळीत असल्यासारखं तिला वाटलं आणि अंगातून शहारा उमटल्यासारखं तिला झालं. पण हा अनुभव त्रासदायक वाटला नाही, उलट कसला तरी अधिकार प्राप्त झाल्यासारखा एक भाव तिच्या व्यवहारात उमटला. दोन्ही हात मेजावर ठेवून अगदी सरळ, चमकत्या डोळ्यांनी सेठीकडे पाहात तिनं म्हटलं,

"किती जोराचा पाऊस हा! कसे पोचणार आपण?"

सेठीनं खिशातून सोन्याची सिगरेट केस काढली. सिगरेट ओठात ठेवून पेटवली आणि अगदी मोकळेपणे धूर सोडीत म्हटलं, "न का थांबेना पाऊस? आज नाही पोचलो तर काय होणार आहे?"

दोन्ही हातांची बोटं एकत्र गुंफीत हसून चिंतेच्या स्वरात मिसेस मदननं म्हटलं, "अहो, मला शाळेत हजर व्हायला हवं ना! तुम्हीसुद्धा कामासाठीच चालला आहात की! तुमचीही अडचण होईल नाही का?"

"हां, ज्या कामासाठी आलो आहे ते कदाचित नाही व्हायचं."

व्हरांड्यात उभ्या असलेल्या खानसाम्याकडे पाहून त्याने हाक मारली, "देखो..."

खानसाम्यानं ताबडतोब ताटलीत बिल पुढं केलं. बिलाकडे न पाहता मिसेस मदन म्हणाली, "ड्रायव्हरला विचार कधी निघायचं म्हणून."

बिल घेत सेठीनं म्हटलं, "मी शाळेत होतो तेव्हा नेहमी वाटायचं की शाळेला सुट्टी व्हावी नाहीतर काहीतरी कारण व्हावं आणि शाळा चुकावी. पण मी बघतोय, तुम्हांला तर शाळा भलतीच आवडतेसं दिसतं."

मिसेस मदन म्हणाली, "तुम्ही खट्याळ विद्यार्थी असणार...आजही वाटतंय ना तुम्हांला, पाऊस असाच पडत राहावा आणि त्या निमित्तानं आपणांला असंच इथं मजेत सिगरेट ओढत बसायला मिळावं म्हणून?" आणि ती हसली.

"हां, असं वाटतंय खरं."

"तुमचं मन लागत नाही बिझिनेसमध्ये?"

"कधी विचारच केला नाही. असं वाटतं की जीवनाची गाडी चिखलातून ओढीत नेतोय."

ड्रायव्हरनं येऊन सांगितलं की सडक अद्याप खुल्लेली नाही. सेठीनं पोलिस-स्टेशनवर फोन करून माहिती काढली. आणखी सहा तास तरी रस्ता मोकळा होणार नव्हता.

या बातमीनं मिसेस मदनला घाबरलेली बघून सेठीनं म्हटलं, "रस्ता दुरुस्त करणं तुमच्या हातचं नाही हे तुमच्या शाळाचालकांना समजायला हरकत नसावी."

एका खोलीत मिसेस मदनचा बिस्तरा पसरला आणि ती तिकडे गेली. मुलगा कधी

त्या खोलीत जायचा तर कधी सेटीच्या जवळ यायचा. अधिक खाऊन आजारी पडू नये म्हणून आपल्या समोरून कुणीतरी ताट काढून घ्यावं आणि भूक मात्र तशीच राहावी तसं मिसेस मदनच्या उठून जाण्यानं सेठीला वाटलं. तो आता आरामखुर्चीवर पडून आकाशात धावणाऱ्या ढगांकडे पाहायला लागला तर कधी उठून व्हरांड्यात फेऱ्या मारायला लागला. पुन्हा बसायचा, पुन्हा फेऱ्या मारायचा. नजरेसमोर त्याला स्वतःच्या जीवनाचंच चित्र दिसत होतं. त्याच्यात तो पैशामागे नव्हे तर दुसऱ्याच कशाच्या तरी मागे धावत होता. त्याला वाटत होतं पुढं पुढं पळणाऱ्या एका स्त्रीला पकडण्यासाठी आपण समोरची एक दुर्गम घाटी चढत आहोत. त्या नारीदेहाला स्पर्श करण्यासाठी हात पुढं करावा इतक्यात तो आवाक्याबाहेर जात आहे. एका झिरझिरीत ढगात लपेटलेलं ते शरीर होतं मिसेस मदनचं.

फेऱ्या घालता घालता तो पुन्हा खुर्चीत बसला. त्याच वेळी ओल्या गवतावर आणि झाडांवर धुतलेली ताजी सूर्यकिरणं पसरली. असं अचानक ऊन उघडल्यामुळं त्याचे डोळे चमकले. त्याला वाटलं किती दुबळे आहोत आपण! उठून मिसेस मदनच्या खोलीत जाणंही शक्य नाही होत आपणांला. कदाचित झोपली असेल, कदाचित जागी असेल. दोघांनाही एकत्र बसता नसतं का आलं?

बायकी पावलांचा आवाज ऐकून सेठीनं मान वळवली आणि पाहिलं, मिसेस मदन येत होती. तिचे हात कोटाच्या दोन्ही खिशांत घातलेले होते. तिनं म्हटलं, "उघडीप झालीय आणि सहा तासही होऊन गेलेत. आता तर जाऊ शकतो ना आपण?... किती वाजले?"

घड्याळ अजून बल्लूजवळच होतं आणि त्याची काच आणि काटे निखळले होते. वेळ अजमावायला फक्त ड्रायव्हरचाच उपयोग होणार होता.

सहा तास उलटले होते यात शंका नव्हती पण रस्ता अद्याप दुरुस्त झाला नव्हता आणि मोटारींना जायला परवानगी मिळणं शक्य नव्हतं.

खानसाम्यानं पुन्हा येऊन सलाम केला आणि म्हटलं, "लंचची काही व्यवस्था करायची का?"

"मेमसाहेबांना विचार--" असं म्हणून सेठीनं मुलाचं बोट पकडलं आणि तो बाहेर उन्हात गेला.

खानसामा मनात काय समजत असेल याच्या विचारानं मिसेस मदनला लाजेच्या गुदगुल्या होत होत्या. पण आता लाज बाहेर दिसू दिली तर सकाळचे व्यवहार आणि आताची लाज यांनी परिस्थिती आणखीनच बिघडणार होती. मिसेस मदननं म्हटलं, "जे काही असेल ते आण...पण उशीर होता नये."

सेठीला मिसेस मदनच्या जवळ बसावं असं वाटत होतं पण ते तिची हरकत नसेल तर. जेवणासाठी मग दोघं पुन्हा एकत्र बसली. बोलणार काय? सेठीनं म्हटलं, "या पहाडी रस्त्यांवर कडे कोसळण्याची भानगड नेहमीचीच आहे." मागल्या वेळी तो सकाळी आला आणि तीन तासांत काम संपवून निघूनही गेला होता. "तुम्ही डलहौजीत कुठं राहता?"

मिसेस मदननं आपला पत्ता सांगितला आणि विचारलं, "किती दिवस राहणार आहात तुम्ही?" सेठी आला होता फक्त कामानिमित्त. एक, दोन किंवा तीन दिवस थांबू शकत होता. डलहौजीत चुडैलदण्डा पहाडीवर पल्टणीसाठी नवी इमारत बांधायची होती, तिच्या कंत्राटानिमित्त तो डलहौजीला चालला होता. मागं तो डलहौजीला गेला होता तेव्हा हिलक्रेस्ट हॉटेलात उतरला होता, आताही तिथंच उतरणार होता.

बोलता बोलता मिसेस मदननं आपली हकीकत सांगितली. नवऱ्याला महिना शंभर रुपये पगार होता. तिला स्वतःला शाळेत साठ रुपये मिळत होते. नोकरी करणं भागच होतं. त्यांचा एक बंगला होता पण नवऱ्याच्या आजारात तो ४५०० रुपयांना गहाण ठेवावा लागला होता. सीझनमध्ये त्याचं दोनअडीचशे भाडं मिळू शकतं पण त्यांना आता त्याचा काही फायदा नव्हता. उलट हप्त्यापोटी त्यावर सावकाराला पन्नास रुपये द्यावे लागत होते.

सेठीनं विचार केला, ४५०० रुपये म्हणजे काहीच नव्हे; पण आपण काय करणार? जेवताना बल्लूचे खेळ दोघंही प्रसन्नपणे पाहात होती. त्याला खाऊ देत राहावं असं सेठीला वाटत होतं आणि त्याला आणखी काही देऊ नका असं मिसेस मदन सारखं समजावीत होती. बल्लूनं घड्याळ फोडलं याबद्दल तिनं खेदही व्यक्त केला. पण सेठीनं काही ऐकून घेतलं नाही. जेवण अखेर संपलंच. मिसेस मदन पुन्हा आत जायला निघाली होती पण सेठीनं धाडस करून म्हटलं, "काय, पुन्हा झोपणार की काय?"

"छे हो! पण करायचं तरी काय? खरंच, संध्याकाळपर्यंत काहीतरी करून पोचता नाही का यायचं?"

"मुळीच आशा नाही. तुम्ही भिता कशाला? उद्या शाळेत गेला नाहीत तर दोन रुपये पगार काटतील. पण माझं काम झालं नाही तर किती नुकसान होईल माहीत आहे?...साठ-पासष्ट हजार." सेठी मोठ्यानं हसला आणि मग म्हणाला, "तुम्ही घर सोडवून का नाही घेत सावकाराकडून? मग तर तुम्हांला नोकरी करण्याची गरज पडायची नाही ना?"

"पण कसं? आतापर्यंत जेमतेम एक हजार रुपये परत केले आहेत आम्ही."

"त्यात काय आहे? सोडवून घ्या तुम्ही. पैसे मिळतील. मला व्याज नको. मला तसं पैशाचं मोठंसं नाही."

मिसेस मदनचे डोळे लकाकले. चेहऱ्यावर लाली सरसरली. स्वतःला सावरण्यासाठी तिनं बल्लूला उचलून मांडीवर घेतला आणि त्याच्या हातून घड्याळ काढून घेत म्हटलं, "तुम्ही आता ठेवा; नाहीतर आहे तेही हरवून टाकील."

बल्लूनं तोंड वाकडं केलं तेव्हा बोट उगारून ती म्हणाली, "चूप आता, नाहीतर मामा मारतील." तेवढा एक शब्द उच्चारून मिसेस मदननं सेठीवरचा आपला अधिकार व्यक्त केला. आता तिनं आपल्या माहेरची हकीकत सांगण्याला सुरुवात केली आणि आपलं नाव उर्मिला असल्याचं सांगून टाकलं.

दोघं एकत्रच बसली असताना संध्याकाळ झाली आणि नंतर रात्र. आकाशात चंद्र प्रकाशत होता. समोर उभ्या असलेल्या चीडच्या वृक्षातून चांदणं त्यांच्यावर छनछन् बरसत होतं. बल्लू आत झोपला होता. उर्मिला विचार करीत होती—एकांत रात्रीत दोघांचं असं एकत्र असणं, हे असलं चांदणं. भीतीच्या आणि आतुरतेच्या ठिणग्या तिच्या मस्तकात उडत होत्या, त्वचेला डसत होत्या.

बाहेर थंडी होती. गार वारा वाहात होता. आत जायला खोल्या होत्या. पण खानसाम्यानं आपल्या अकलेनुसार दोघांचेही बिस्तरे एकाच खोलीत घातले होते. असं करू नको असंही त्याला कुणी सांगितलं नव्हतं. पण आत एकाच खोलीतल्या पलंगांवर झोपण्याच्या कल्पनेनं मिसेस मदनच्या डोळ्यावर झापड येत होती. वाटत होतं; छट्, असं कसं शक्य आहे?

रात्र बरीच झाली. सेठीनं म्हटलं, "तुम्हांला त्रास होईल थंडीचा. जाऊन झोपा आत."

"आणि तुम्ही?"

"मला झोप नाही येत अद्याप."

मिसेस मदनला माहीत होतं की सेठीला केवळ तिच्यामुळं बाहेर रात्र काढावी लागणार आहे...किती सज्जन माणूस बिचारा!

आपल्या नात्यातल्या एका चांगल्या शिकलेल्या मुलीची हकीकत सांगून मिसेस मदननं म्हटलं, "तुम्ही लग्न करा आता."

सेठी म्हणाला, "आयुष्याची अठ्ठेचाळीस वर्षं जिथं अशीच निघून गेली तिथं उरलेल्या आयुष्याची काय चिंता? असंच जाईल निघून. आणि लग्न म्हणजे नशिबाशी डाव. फासे सरळ पडतील तसे उलटेही पडू शकतील."

सेठीनं पुन्हा एकदा उर्मिलेला आत जाऊन निजण्याचा आग्रह केला. चांदणं फार छान पडलंय आणि थंडीही विशेष नाही, असं उर्मिलेनं उत्तर दिलं. कोणीही आत गेलं नाही. दोघंही बसून राहिली. कधी सेठी काही सांगायचा आणि उर्मिला ऐकायची, कधी उर्मिला बोलायची आणि तो ऐकत राहायचा!

नवमीचा चंद्र डोंगराआड लपला. वेळ किती झाला हे समजायला मार्ग नव्हता. पण अर्ध्याहून अधिक रात्र उलटली होती. थंडीनं दोघंही कुडकुडत होती. आपल्यासाठी सेठीनं असं थंडीनं मरावं हे उर्मिलेला सहन होणे शक्य नव्हतं. तो आजारी पडला तर ! उठून उभं राहात तिनं म्हटलं, "चला आत जाऊ या. घरातले लोक एकाच खोलीत नाही का झोपत ?" ती दोघं आत जात असताना सेठीनं उर्मिलेच्या पाठीवर हात ठेवला. आपापल्या पलंगावर गरम पांघरुणात लपेटून दोघंही आडवी झाली.

* * *

रस्ता सकाळीच खुला झाला होता. पण चहा प्याल्यानंतरच निघावं असं ठरलं. सेठीनं विचारलं, "रात्री छान झोप आली ना ?" आणि तो मोठ्यानं हसला.

उर्मिलेनं हसत म्हटलं, "तुम्हांला तर नक्कीच आली असेल ?"

दोघांनाही माहीत होतं की झोप कुणालाच आलेली नव्हती. पण रात्रभर झोप न मिळूनही दोघांच्याही अंगांत चांगलाच ताजेतवानेपणा होता. सेठीनं म्हटलं, "हा बंगला सोडून जायची इच्छा होत नाही ना ?"

करुण नजरेनं उर्मिलेनं सेठीकडे पाहिलं आणि डोळे खाली झुकवले. तिच्याजवळ शब्द नव्हते. तिनं संसार केला होता पण असली उदारता, संयम, अनुराग अनुभवला नव्हता. तिचा रोम रोम ओरडून सांगत होता—तू थोर आहेस, महान् आहेस ! पण जीभ बांधलेली होती. स्त्रीची नेहमीच हार होत असते. तिच्यावर आक्रमण होतं तेव्हाही आणि संरक्षण मिळतं तेव्हाही.

निघण्याआधी सेठीनं म्हटलं, "तुझी हरकत नसेल तर या बंगल्यात तुझा एक फोटो काढायचा आहे मला."

हरकत ? उर्मिलाची हरकत कशासाठी म्हणून ? तिनं केवळ कृतज्ञतेच्या नजरेनं सेठीकडे पाहून घेतलं. मान एका बाजूला झुकवून ती खांबाला टेकून उभी राहिली. सेठीनं कितीतरी फोटो घेतले.

* * *

दोन महिने म्हणजे फक्त साठ दिवस पण तेवढ्या अवधीत किती बदल झाले ! मदन मिलिटरी अकाउंट्सच्या कचेरीतली शंभर रुपयांची नोकरी सोडून सेठी अँड कंपनीत अकाउंटंट झाला. त्याला महिना तीनशे रुपये मिळायला लागले. उर्मिला आता साठ रुपयांची मास्तरीण राहिली नाही. आपल्या छोट्याशा बंगल्यासमोर खूप मोठ्याशा छत्रीखाली गुलाबी उन्हात बसून ती बब्लूसाठी स्वेटर विणते आणि गोंडे जिल्ह्यातली काळ्या रंगाची आया बब्लूला रस्त्यावर फिरवायला घेऊन जाते.

फौजी बराकी बनवायचं कंत्राट घेतल्यामुळे सेठीला वारंवार डलहौजीला यावं लागतं. आपल्या सरूच्या बहिणीशी लग्न करायला सेठी तयार का होत नाही याचं उर्मिलेला आश्चर्य वाटतं.

सगळं काही समजूनही उर्मिला ते कबूल करायला तयार नाही. मागल्या वेळी सेठीनं स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं, "पोटभर भोपळा चघळण्यापेक्षा संत्र्याचा नुसता वास मिळाला तरी बरं वाटतं." स्वेटर विणता विणता तिला कळलं की आपणच संत्रं आहोत. एकापाठोपाठ एक असे सेठीचे सगळे व्यवहार तिच्या नजरेसमोरून जायला लागले. बोटांनी आपले केस चाचपण्याचा चाळा सेठीला खूप आवडतो. काही न बोलता केवळ तिला आपल्यासमोर बसवून ठेवायचं असतं त्याला. सेठीनं कपडा आणून दिला तर तो त्याच्या समक्ष घालून दाखवायला हवा. सेठीच्या कुठल्याही गोष्टीला नाही म्हणणं तिच्या लेखी असंभव आहे. सेठीच्या मनात असेल तेव्हा बिनबाह्यांचा आणि बिनपाठीचा ब्लाऊज तिनं पेहनला पाहिजे. हे खरं आहे की उर्मिलेलाही सेठीची इच्छा असेल तेच अंगात घालायला, तसंच राहायला आवडतं. पण मग तिचं स्वतःचं अस्तित्व, वेगळं व्यक्तित्व राहिलं कुठं ?

आणि मग मागच्या बुधवारी रात्री सेठी जेव्हा अर्धी रात्र उलटेपर्यंत बंगल्यावरच राहिला तेव्हा त्यानं काय सांगितलं ?...त्यानं तिला हात नाही लावला, स्पर्श केला नाही, दूरच बसून राहिला. पण मग त्यात बाकी उरतंच काय ? त्यानं म्हटलं होतं..."मी तुझ्यावर प्रेम करतो. माझ्या प्रेमात कसलाही हेतू नाही. तू म्हणजे हृदयाची एक गरज असावी तशी मला वाटतेस. तुला पाहावंसं वाटतं. आपली म्हणावंसं वाटतं."

उर्मिलेकडून हे होऊ शकलं नाही. ती रडायला लागली. तेव्हा, 'माफ कर' असं म्हणून तो गुपचूप निघून गेला.

आज विजेच्या प्रखर प्रकाशात विणकामाच्या विणीमध्ये नजर गुंतलेली असताना त्या रात्रीचं सगळं दृश्य पुन्हा तिच्या डोळ्यापुढं उभं राहिलं, पण त्या रात्री काय तिनं ठीक केलं ?

ज्या माणसानं कसलंही ऋण डोक्यावर न लादता आपल्या आयुष्यभरच्या कष्टाची कमाई तिला भेट म्हणून दिली; स्वतःसाठी काही मागितलं नाही, त्याचं म्हणणं काहीही असो...त्याला निराश करणं...

सेठीनं सांगितलं होतं की तो आपली सर्व संपत्ती बल्लूला देणार आहे परंतु तिच्यात बल्लूला कुणी हिस्सेदार निर्माण होता कामा नये...स्पष्ट शब्दात याचा अर्थ असा होता की उर्मिलेच्या कुशीला टाळं घालून सेठीनं तिच्यावरचा आपला अधिकार शाबीत

केला. मग तो तिला शिवो किंवा न शिवो. बल्लू त्याचाच आहे, मदन त्याचाच आहे आणि सर्वांत आधी उर्मिला त्याचीच आहे.

सेठी किती संयमी, किती उदार, किती विशालहृदयी आहे...कसं सगळं काही देऊन टाकलं त्यानं...उर्मिलानं तर सेठीला काहीही दिलेलं नाही...देण्याची वेळच आली नाही. सेठीनं जिथं सगळ्या गोष्टींवर स्वप्नातच अधिकार प्राप्त केला...आणि किती सरळपणं ? जणू काही सगळ्या गोष्टींची एक चावी होती, ती उचलून त्यानं खिशात टाकली. या जाळ्यातून बाहेर निघण्याचा कसलाही रस्ता नाही उर्मिलेला, बल्लूला आणि मदनलाही...जणू ते सगळे विकले गेले आहेत.

...आणि सेठी उद्या पुन्हा आला आणि उदास मुद्रेनं त्यानं पुन्हा त्या साऱ्या प्रकाराची पुनरावृत्ती केली तर ? एका बाजूला बसून म्हणाला..."मला तू हवी आहेस..." तर काय ती अजूनही 'नाही' म्हणू शकेल ? एकदा नकार देऊन ती अपराध्यासारखी पस्तावली आहे.

उर्मिलेनं विचार केला, त्यात असं काय आहे ? पण तरीही एकदा इन्कार करण्याची तिची इच्छा होती. पण इन्कार करण्याचा हक्क आहे तिला ? तो हक्क, जो सगळ्यांना असतो, तो तिला नव्हता. स्वतःच्या मनाशीही नव्हता...वेश्यांचं जीवन आणखी काय वेगळं असतं ? उर्मिलेच्या डोळ्यांतून टपटप आसवं गळायला लागली.

मग विचार आला, फक्त दोनच महिन्यांपूर्वी जेव्हा दोन छोट्या छोट्या खोल्या होत्या...उर्मिला शाळेतून थकून घरी येत होती आणि मुलाला मांडीवर घेऊन मूर्ख नोकराशी माथेफोड करीत होती. कितीतरी गरजा पुऱ्या होत नव्हत्या. पण तेव्हा ती 'हो' किंवा 'नाही' म्हणू शकत होती. आपल्या इच्छेप्रमाणे काहीही करू शकत होती...सिगरेट कंपनीवाला तो हसमुख बाबू किती सज्जन होता. पण नेहमी तिनं त्याला नकारच दिला.

पुन्हा विचार आला—बहुधा आज सेठी येईल. तिनं डबडबलेल्या डोळ्यांनी फाटकाकडे पाहिलं—त्या डोळ्यांत आतुरता नव्हती, कातरता होती...

गदल

रांगेय राघव

बाहेर आरडाओरडा झाला. डोडीने मोठ्यांदा विचारलं, "कोण रे?" काही उत्तर नाही मिळालं. एक आवाज आला, "चांडाळणी, तुझा जीव घेईन."

एका स्त्रीचा तिखट जबाब आला, "करून तर बघ. हडळ होऊन तुझ्या पोराबाळांना छळीन."

डोडीच्यानं आता राहवेना. तो बाहेर आला.

"अरे निहाल, निहाल, काय करतोहेस? अरे, कसं झालं तरी आई आहे तुझी!" तो पुढं होऊन म्हणाला.

"आई आहे," म्हणून निहाल मागं झाला.

"अरे, हात उचलून बघ," स्त्री फणकारली. "तुझ्या गाडग्या-शिक्यावर मांजर सोडीन, सांगून ठेवते. तुझं खात नाही मी, समजलास?"

"वहिनी, काय बोलतेस? ठिकाणावर ये," डोडी म्हणाला.

तो पुढे झाला. मागं वळून म्हणाला,

"चला, चालायला लागा सगळे जण."

निहाल गेला. त्याच्याबरोबर इतरही गेले.

डोडी घराच्या छपराचा आधार असलेला धरून उभा राहिला. स्त्री तिथंच फतकल मारून बसली होती. तिच्या डोळ्यांत अजून आग सळसळत होती.

ती म्हणाली, "निहालच्यात एवढी हिंमत नाही. मला माहीत आहे. हे सगळं तुमचं कौटाळ आहे भाऊजी?"

"होय गदल," डोडी हळू म्हणाला, "मीच केलं हे सारं."

गदलचा आवेश एकाएकी कमी झाला. ती म्हणाली, "का पण? तुला काय जरूर पडली होती!"

डोडी काही बोलला नाही. डोक्यापासून पायापर्यंत त्याच्या अंगातून एक लहर गेली. पन्नास वर्षांचा, करड्या मिशांचा तो गुजर. छप्परापर्यंत पोचलं होतं त्याचं डोकं. त्याच्या खांद्यांच्या रुंद हाडांवर दिव्याचा मंद प्रकाश पडला होता. त्याने जाडजूड फतोई (कापूस भरलेली रजई) पांघरलीं होती आणि धोतर गुडघ्यांपर्यंत होतं. त्याचे हात पिळदार होते. आता तो अगदी चूपचाप उभा होता.

स्त्री उठली. पंचेचाळीस वर्षांची गौरवर्णा. पण आता वयोमानानं रंग जरा काळवंडला होता. अजून तिच्यात चपळपणा होता. सबंध जन्म ढोरमेहनत करूनही तिच्यातला जोष कमी नव्हता झाला.

"असलं काही करायला मला शरम नसती का वाटली, गदल?" डोडीनं विचारलं.

"कसली लाज वाटायची तुला?" गदलनं विचारलं.

डोडी क्षणभर गोंधळात पडला. आतून आवाज आला,

"हिला कसली आलीय लाजलज्जा? ती केव्हाच कोळून पिऊन पार झालीय!"

"निहाल," डोडी ओरडला, "गप्प बस."

आतला आवाज बंद झाला.

गदलनं विचारलं, "मला कशाला बोलावलं होतं?"

डोडीने याचं उत्तर दिलं नाही. विचारलं,

"भाकरी खाल्लीस?"

"नाही," ती म्हणाली, "कधी खाणार? हे मेले रस्त्यातच भेटले. शेतातून येत होते. रस्त्यात शेण-गौऱ्या वेचून जाणार होते."

डोडी ओरडून म्हणाला, "निहाल, सूनबाईला सांग आपल्या सासूला भाकरी द्यायला."

आतून कुणा बाईचा धीट जबाब आला, "लोहाराची बायको ती, आम्हां गरीब खारियांच्याकडचं खाणं तिला कुठलं चालायला?" आणखी बऱ्याचजणींचं हसणं ऐकू आलं.

निहाल तळमळून म्हणाला, "ऐक, ऐक जगदंबे, सगळी दुनिया हसते आहे. खारियांचं नाक कापलंस तू."

गुन्ना मेला तेव्हा पंचावन्न वर्षांचा होता. गदल विधवा झाली. तिचा मोठा मुलगा निहाल तीस वर्षांच्या सुमाराचा होता. त्याची बायको दुल्लो. त्यांचा मोठा मुलगा सात वर्षांचा होता, दुसरा चार वर्षांचा आणि तिसरी तान्ही होती. निहालहून लहान दोन बहिणी होत्या. चंपा आणि चमेली. त्यांची लग्नं झाली होती. एकीचं सासर होतं झाज गावी आणि दुसरीचं बिस्वारा गावी. त्यांची मुलं रांगत होती. सगळ्यात धाकटा नारायण. त्याचं वय होतं बावीस. आणि त्याची बायको दुसऱ्या वेळी बाळंतीण होती. अशी ही गदल आपलं एवढं थोरलं भरलं घर सोडून बत्तीस वर्षांच्या एका लोहाराकडे जाऊन राहिली होती.

डोडी गुन्नाचा सख्खा भाऊ. बायको होती. मुलंही झालेली होती. सगळी मेली आणि हा बिचारा एकटा एक राहिला. गुन्नानं पुष्कळ समजावलं पण त्यानं पुन्हा लग्न नाही केलं. भाऊ-भावजयीकडंच तो राह्यचा. त्यांच्या मुलांना त्यानं आपलं मानलं. निहाल

आपल्या काकावर प्राणांपलिकडे प्रेम करत होता. शिवाय खारी गुजर स्वतःला लोहारापेक्षा वरिष्ठ समजत होते.

गदल ज्याच्याकडं राहात होती. त्याचाही घरप्रपंच कमी नव्हता. त्यानं गदलच्या वयाकडं लक्ष नाही दिलं. पाहिलं: खारी गुजरीण आहे, राहील. नाहीतरी चूल फुंकायला कुणीतरी हवंच होतं.

आजच सकाळी गदल गेली होती. संध्याकाळी तिच्या मुलांनी तिला धरून पकडून आणली. तिच्या नव्या धन्याला – मौनीला – अजून याचा पत्ताच नसावा. मौनी विधुर होता. त्याची भावजय पाय पसरून लचकत मुरडत ताक घुसळताना जे काही भकायची ते जर दुल्लोनं ऐकलंन् असतं तर काय केलं असतं कोण जाणे!

गदलचं मन रागानं उसळून उठलं.

मध्यरात्र व्हायला आली. गदल तिथंच पासली झाली. डोडीही बसून चिलीम ओढत होता.

त्या शांततेला हळूच डवचत डोडी म्हणाला,

"गदल..."

"काय?" तितक्याच हळू गदलनं विचारलं.

"तू निघून गेलीस ना?"

ती काही बोलली नाही. डोडी पुन्हा म्हणाला, "सगळेच जण जातात ग! एक दिवस तुझी जाऊ गेली. मग पुतणे. माझा भाऊही गेला. पण तू जशी गेलीस तसं कुणी नाही गेलं. जग हसतं ग! कळतं ना तुला?"

गदल म्हणाली, "जगाची पर्वा मी नाही करत. मी जेव्हा चौदा वर्षांची होते, तेव्हा तुझा भाऊ मला गावात पाहून गेला होता. तेल प्यालेली उंच लाठी घेऊन तू त्याच्याबरोबर मला घेऊन जायला आला होतास तेव्हा मी आले होते की नाही? तुला वाटत असेल की आता काय, गदलचं वय झालं. नवऱ्याची काय जरूर तिला? पण तुला ठाऊक आहे मी का गेले ती?"

"अंहं."

"तुला एवढीच काळजी असेल ना की गदल गेली, आता पूर्वीसारखी भाकरी मिळणार नाही. सुना काही तुझं करायच्या नाहीत. तू माझ्यात आणि भावाच्यात राहिलास तेव्हा मी काही तुला परका मानला नाही. खोटं आहे का मी म्हणते ते?"

"नाही गदल. मी कधी म्हटलं तसं?"

"हेच कारण. आता माझं इथं कोण आहे? माझा नवरा मरून गेला. तो होता तेव्हा मी त्याचं सगळं केलं. त्याच्या सगळ्या लोकांचंही केलं. पण आता तोच नाही मग

कुणासाठी हाडं झिजवू? हे मुलगे, या सुना! यांची सेवाचाकरी करणं माझ्यानं नाही होणार. मी नाही करणार."

"पण मूर्खे, हे सगळे तुझे नाहीत का? अग मांजरीसुद्धा आपल्या पोरांकरता सात घरं फिरते. तू तर माणूस आहेस ना? तुला पोरांची माया नाही?"

"भाऊजी, तुमची माया, प्रेम असं कुठं नाहीसं झालं होतं की तुम्ही पुन्हा लग्न नाही केलंत?"

"मला–मला तुझा आधार होता, गदल."

"भेकड! तुझा भाऊ मेला, लेकानं त्याच्या क्रियाकर्म केलं. सगळी बारासार झाल्यावर मला घेऊन तुला घरसंसार थाटता येत नव्हता? पोटासाठी तू मला घरचा उंबरठा ओलांडायला लावलास. माझं असं कुणी असेल तर मी चूल फुंकीन. मी काही गुलाम नाही की माझी कोपरं घासतील आणि कुणाची तरी जोडवी झणकारतील ऐटीत. माझं पोट मी व्यवस्थित भरीन. समजलात भाऊजी? तेव्हा तू पुढं नाही झालास. आता जेव्हा घराच्या अब्रूवर निखारे पडले तेव्हा तुला अक्कल आली. पण सुनांनी जेव्हा तुझ्या गदलकडे एवढाल्या डोळ्यांनी पाहिलं तेव्हा तुला काही वाटलं नाही?"

डोडीने भरल्या गळ्यानं म्हटलं, "गदल, मला भीती वाटत होती."

"भीती? कसली?"

"गदल, मी म्हातारा. वाटलं. जग हसेल. पोरं म्हणतील यांचं आधीपासून काही असेल. म्हणून तर काकानं लग्न नाही केलं. भैय्याचीही बदनामी झाली असती."

"पुरे, पुरे. मोठाच भैय्याचा लागून गेलास. त्याच्या कार्यात तू नव्हतास का? माझा सासरा मेला तेव्हा तुझ्या भावानं सगळ्या जमातीचे हात ओले केले होते. आणि तुम्ही किती बोलवलेत? तू, भाऊ आणि दोन पोरं अवघे पंचवीस लोक बोलवलेत. का तर म्हणे नियम आहे. पंचविसांवर बोलावले तर पोलीस पकडून नेतील. भित्रे मेले! भ्याड! मी नाही राहणार असल्यांच्याजवळ."

डोडीचा आवाज एकदम बदलला. म्हणाला,

"मी असताना तू दुसऱ्याच्या घरी राहणार?"

"हूं."

"पुन्हा म्हण तर..." तो उठून पुढे झाला.

"ये तर खरा," गदलनं आव्हान दिलं. डोडी तिथंच थांबला. गदल बघत होती. डोडी जाऊन पुन्हा जागच्या जागी बसला. गदल हसली. ती म्हणाली, "मला आपलंसं करण्याची तुला कुठची हिंमत माझ्या दिरा? माझा नवा घरठाव आहे ना? मर्द आहे. एवढं ऐकून ठेव. तुझा भाऊ परत मिळाल्यागत वाटतं आहे मला. तू? तू काय मर्द

आहेस ? अरे वैयरला कोणी घाबरून मागं सरतो ? पुढं सरून जर मला मारलं असतंस तर म्हटलं असतं की अजून माझ्याबद्दल तुझ्या मनात कुठंतरी आपलेपणा आहे, राहीन मी या घरात."

डोडी बघतच राहिला. रात्र चढत चालली. गदलनं लहंग्याच्या घोळात अंग झाकून घेतलं. डोडी पेंगू लागला.

ओसरीवर आळस देत बसलेल्या दुल्लोने विचारलं, "आलात का जाऊबाई ? रात्री कुठं होतात वस्तीला ?"

शुक्रतारा मावळला होता. नुक्तं फटफटत होतं. बैल गव्हाणीत उठून उभे राहात होते. हवेत अजून गारवा होता.

दुल्लोच्या प्रश्नाला गदल ताडकन् उत्तरली,

"गप्प बसा, मोठ्या जाऊबाई ! माझ्यावर कुणाचा जोरा चालत नाही बरं. तुझ्याएवढ्या मुली आहेत माझ्या. नात्यानं धाकटी जाऊ असेन तुझी. म्हणजे तुझ्या पायाची वहाण नाही. समजलं ?"

दुल्लो हबकलीच. मौनी जागा होता. आमंत्रण केल्यासारखा तो पुढं झाला आणि गदलला उद्देशून म्हणाला, "कुठं होतीस ?"

गदलने घुंगट ओढला. पण आवाज बदलला नाही. म्हणाली, "तेच धरून पकडून मला तिकडं घेऊन गेले होते. संधी मिळाल्यावर निघून आले."

मौनी चूप झाला. त्याचा बाप बाहेरच्या बाहेर ढोरं घेऊन गेला. मौनीही निघाला.

"कुठं चाललास ?" गदलनं रोखलं.

"शेतावर."

"आधी माझं काय ते ठरव. मग जा कुठं तो !" गदल म्हणाली.

दुल्लो त्या अडाणी बाईचे एक एक थेर बघतच राहिली.

"कसला फैसला ? काय ठरवायचं ?" मौनी म्हणाला. पण मनातून तो तिला दबकला होता.

"मग तुझं म्हणणं काय तुझ्या घरभरच्या माणसांची चक्की पिसू मी ?" गदलनं विचारलं, "आपण फक्त दोघं जणं आहोत. वेगळी चूल मांडू. करू नि खाऊ." त्याच्या उत्तराची वाट न पाहता ती बोलत राहिली, "कमाई एकत्र ठेव. मी नाही म्हणत नाही. पण चूल अलगच बरी."

एक क्षण मौनी सुन्नपणे उभा राहिला. दुल्लो तिडकीनं बाहेर आली. म्हणाली, "काय देवरा, आता गप्प का झालास ? मला जाऊ आणली आहेस की सासू ? दातखीळ का उचकटत नाही तुझी ? मला अशी तशी समजू नकोस. माकऱ्या तव्यावर उलट्यासुलट्या

करताना माझेही हात काही जळून भाजून जात नाहीत ते मी हिचं वेडंवाकडं ऐकून घेईन? चुलीत पिचता पिचताच तिथली माती खाऊनच मला जन्माला घातलंय माझ्या आईनं. समजलं?"

"समजलं समजलं माझ्या सवती," गदलनं दुल्लोचं बोलणं झेललं, "माती खाऊन नाही आलीस, सगळ्या घरादाराला खायला उठली आहेस चांडाळणी! अशी काय तुझी भाकरी म्हणजे गुळाची ढेप आहे की खाल्ली नाही तर अगदी आमच्या गळ्यात अडकेल."

मौनी काही बोलला नाही. चूपचाप बाहेर निघून गेला. दुपार झाली होती. दुल्लो चरखा कातत होती. नारायणानं विचारलं, "कोणी आहे का घरात?"

झट्दिशी घुंगट ओढून दुल्लोनं विचारलं, "कोण आहे?"

रक्ताचा आवंढा गिळल्यागत उत्तर दिलं, "गदलचा मुलगा."

दुल्लो घुंगटात हसली. तिनं विचारलं,

"लहान की सगळ्यांत मोठा?"

"लहान."

"आणखी किती आहेत?"

गदल तरातरा बाहेर आली. म्हणाली, "किती का असेनात! मला काय त्याचं?"

"अगवाई, आली वाटतं," म्हणत दुल्लो उठून आत पळून गेली.

"दम धर जेठाणी, येऊ दे त्याला. तुला मजा दाखवते," गदलनं म्हटलं.

"आई," नारायणनं विचारलं, "ही तुझी मोठी जाऊबाई?"

"तू इथं का आलास ते सांग बघू," ती कडाडली.

"दंड भरला पाहिजे ना अम्मा," असं म्हणत नारायण बसण्यासाठी पुढं होत होता. पण गदलनं त्याला तिथंच थांबवलं, "तिथंच उभा राहून बोल."

त्या वेळेस दोर-कळशी घेऊन मौनी परतला होता. त्यानं पाहिलं गदलनं आपलं कडं आणि हंसळी उतरून फेकली आणि म्हटलं, "जा, भर जा दंड तुझा. आता कोणी येऊ नका, समजलं? ठाण्यावर रपोट करीन की सुनांच्या सांगण्यावरून लेकांनी माझ्या नवऱ्याचे सगळे पैसे खाल्लेत आणि मला घराबाहेर काढली, सांगून ठेवते."

नारायणाचं तोंड काळं ठिक्कर पडलं. मुकाट्याने दागिने उचलून तो चालता झाला, मौनी मनातल्या मनात शंका घेऊन आत आला.

दुल्लोनं तक्रारीच्या स्वरात म्हटलं,

"ऐकलंस तू देवर? जाऊबाईने दागिने दिले. शेवटी गुडघा पोटाच्या बाजूलाच वळायचा बरं. अशी चार ठिकाणी बसेल तर मुलांच्या शेतीवाडीवर ही तर त्यांच्या

घरापुढे पक्का चबुतरा उठेल. देवर, तू आपला भोळा साधा माणूस. असल्या बायांचं चरित्र तुला काय कळणार ? हा देखील एक धंदा आहे. आता म्हणेलं दागिने कर पुन्हा."

गदल हसली. म्हणाली, "वा ग माझे जाऊबाई! जुन्या नवऱ्याच्या घरचं कर्ज नव्या घरोब्याकडून तुझ्या माहेरची बैयरच फेडत असेल. गदल जिथं जाईल तिथं मालकीणच होईल. समजलीस ? कुणाची गुलाम नाही. चाकरी करीन तर स्वतःच्या मर्दाची. नाहीतर अडलंय माझं विधवेचं खेटर. तू मध्ये तोंड घालणारी कोण मोठी ?"

दुल्लो रागारागाने पाय आपटत चालती झाली. मौनीने ते पाहिलं आणि तो म्हणाला, "जीभ लांबवून बोलू नकोस. घरात राह्यचं असेल तर सुनेच्या मर्यादेनं राहा."

ओठ दुमडून हसून गदल म्हणाली,

"अरे, तेव्हा तर तुझा जन्मही झाला नव्हता, बालम. त्या आधीपासून मला सगळं माहीत आहे. मला काय वळण लावतोस तू आणि रीत शिकवतो आहेस ? जातीबाहेरचं कोणतंही काम मी केलं नाही. तूच बघ आणि चुकलं तर माझा कान पकड. मी हू की चू करणार नाही. पण सवतीचं उणंदुणं ऐकून घेणारी मी नव्हे."

"दाखवतो आत्ताच," तो मान हलवून म्हणाला.

गदल हसून आत गेली आणि कामाला लागली.

* * *

थंड हवा अधिकच थंड झाली होती. डोडी गुपचूप बाहेर बसून हुक्का पीत होता. थोड्या वेळाने त्याला कंटाळा आला. त्याने चिलीम उलटी करून झाडून टाकली आणि नुसताच बसून राहिला.

शेतातून येऊन निहालने बैल बांधले. त्यांना गवत टाकलं आणि हाक घातली, "काका!"

डोडी स्वतःच्याच विचारात गुंग होता. त्यानं ऐकलंच नाही.

"काका", थोडं मोठ्यानं निहाल म्हणाला.

"ओ, काय, काय ?" डोडीनं चमकून विचारलं, "मला म्हणालास काही ?"

"तुम्हांला नको सांगू तर कुणाजवळ जाऊ ? सबंध दिवस तुम्ही भेटलातच कुठं ? चिम्मन म्हणत होता की तुम्ही अख्खा दिवस मनमौजी बाबाच्या धुमीवर होतात. खरं ?"

"खरं."

"का गेला होतात ?"

"असंच रे! वाटलं जावंसं, गेलो."

"आणि शहरातून वाण्याचा माणूस आला होता. म्हणत होता तूप जमवून ठेवलं आहेस का, मी म्हटलं नाही, पण तो म्हणे मी घेऊनच जाईन. भांडणच व्हायचं पण थोडक्यात टळलं."

"असं नाही करू राजा," डोडी म्हणाला, "भांडण विकत का घ्यायचं?"

निहालनं चिलीम उचलली. गवऱ्यातला निखारा उचलून त्यावर ठेवला आणि दम भरायला सुरुवात केली. मग म्हणाला, "मी काही गेलो नव्हतो. नाहीतर डोकीच फुटायची पाळी आली असती. नारायणला पाठवला होता."

"कुठं?" डोडीनं चमकून विचारलं.

"त्याच कुलक्षणी चवचाल चांडाळणीकडं."

"तुझ्या आईकडं?"

"तुम्हांला इतकं काय तिच्याबद्दल वाटतं कुणास ठाऊक! इतकं झालं तरी तुम्हांला तिचा राग येत नाही. तिला मी आई म्हणणार? सोडा."

"पण बेटा, तू नाही म्हणालास तरी जग तिला तुझी आई म्हणूनच ओळखणार. जोवर नवरा जिवंत असतो तोवर अमक्याची बायको म्हणून लोक बाईला ओळखतात. नवरा मेल्यावर अमक्याची आई म्हणून ओळखतात. ही काय नवीन रीत थोडीच आहे?"

निहाल स्वतःशीच काहीतरी मिणमिणला. मग तो म्हणाला, "बरं तर तसं म्हणा काका. पण नारायणला मी का पाठवलं होतं ते तुम्ही विचारलंच नाहीत."

"अरे हो खरंच," डोडी म्हणाला "तूं सांगितलंसच नाही."

"दंड भरण्याचं निमित्त करून पाठवलं होतं. पण पंचायत भरायच्या आधीच तिनं दागिने उतरून फेकून दिले."

डोडी हसला. म्हणाला, "अस्सं. घरच्यांनी पंचायत देखील भरवली नाही हेच तिला दाखवून द्यायचंय ना? जसं काही आम्ही तिला काढूनच लावली. नारायण घेऊन आला?"

"हं."

डोडी विचारात पडला.

"मी परत करून येऊ?" निहालनं विचारलं.

"तसं नाही बेटा," डोडी म्हणाला, "ती खरंच रुसून गेली आहे. आणखी काही नाही. तू भाकरी खाल्लीस?"

"अजून नाही."

"मग जा. जेवून घे."

निहाल उठून गेला. पण डोडी तिथंच बसून राहिला. रात्रीचा काळोख सांजेनंतर इतक्या वेगानं आला की जणू काही तिचा पापुद्राच निखळला.

लांबून ढोला गीत गाणाऱ्यांचे स्वर ऐकू यायला लागले. डोडी उठला आणि चालू लागला.

निहालनं बायकोला विचारलं, "काका जेवला?"

ती 'नाही' म्हणाली.

निहाल बाहेर आला. काका नव्हते.

"काका!" त्यानं हाक दिली.

चिरंजी पुजारी गढीवरच्या हनुमानाचं देऊळ बंद करून चालले होते त्यांनी निहालचा आवाज ऐकला. त्यांनी विचारलं, "काय आहे रे?"

"नमस्कार करतो पंडितजी," निहालनं नेहमीप्रमाणं तोंडानं नमस्कार म्हणत म्हटलं, "आता तर काका इथं बसले होते..."

चिरंजी म्हणाला, "अरे ते ढोला ऐकताहेत. मी आताच पाहून आलो."

चिरंजी निघून गेला पण निहाल जिथल्या तिथं रोवल्यागत उभा राहिला. बायकोनं विचारलं, "काय झालं?"

"काका म्हणे ढोला ऐकायला गेलेत," अविश्वासाच्या स्वरात तो म्हणाला, "कधधी जात नाहीत."

"जाऊन बोलावून आणा. रात्र किती झालीय," आणि ती रडणाऱ्या मुलाला दूध पाजू लागली.

निहाल जेव्हा काकाला घेऊन आला तेव्हा त्याच्या अंगात ताप होता.

छोट्या खाटेवर आपले पाय दुमडून घेता घेता डोडी म्हणाला, "अरे, थोडा वारा लागलाय. बाकी काही नाही. आज आता राहू दे भाकरी. नाही खावंसं वाटत."

निहाल तसाच उभा राहिला. डोडी त्याला समजावत म्हणाला, "अरे बघ ना, किती दिवसांनी ऐकलं ढोला. त्या दिवशी भैय्याच्या सुहागरात्रीच्या दिवशी ऐकलं. त्यानंतर आज..."

निहालनं हे सर्व ऐकलं आणि पाहिलं तर डोळे झाकून डोडी स्वतःशीच काही गुणगुणत होता...

* * *

सांजावलं होतं. मौनी बाहेर बसला होता. गदलनं गरम भाकरीवर आंब्याची चटणी घालून त्याच्यापुढं आणून ठेवली.

"छान झाली आहे," खाता खाता मौनीनं सांगितलं.

गदल बसली. म्हणाली, "वयाला साजेशी मुलगी बघून लगीन का नाही करून घेत?"

मौनी चमकला. म्हणाला, "एकाच्या भाकरीलाच तर पुरे होत नाही."

गदल उत्तरली, "म्हणत असाल की सवत बोलावून आणते. पण माझंही वय काय कमी का आहे ? डोळ्यांदेखत तुमचे दोहोंचे चार हात झाले तर बरं होईल. घर भरलेलं दिसेल. नाहीतर हक्क गाजवायला एक मिळेल."

मौनी हसला. "असं म्हण ! भांडायची हौस आहे तुला !"

जेवून उठला तेवढ्यात गदल हुक्का भरून घेऊन आली. त्याच्या हातात देऊन स्वतः भिंतीला पाठ देऊन बसून भाकरी मोडू लागली.

एवढ्यात कुणाला तरी विचारलेलं ऐकू आलं,

"अरे या वेळी कुणीकडं ?"

उत्तर आलं, "जरुरी काम आहे, मौनी. पेशकारसाहेबांनी बोलवलंय."

गदलनं ओळखलं. तिच्याच गावचा होता तो. लंगड्या मैनेचा फाजील गवळी. पेशकाराची गाय चारायची असेल.

"अरे, मग रात्री कुठं जातोस ? ये, चिलीम ओढून जा." मौनी म्हणाला.

चिलमीचं आकर्षण गवळ्याला सोडवेना. तो येऊन बसला. गदलनं दुसरी भाकरी मोडली. तुकडा तोंडात घातला.

"तुला कळलं का ?" गवळी म्हणाला आणि त्यानं झुरका मारला.

"काय ते ?" मौनीनं विचारलं.

"अरे गदलचा दीर डोडी मेला."

गदलचं जेवण थांबलं. लवकर लवकर पाण्याच्या घोटाबरोबर घास गिळून ती ऐकू लागली. काळीज तोंडात आलं.

मौनी म्हणाला, "अरे काय सांगतोस ? तो तर चांगला धडधाकट होता."

"थंडी बाधली. रात्री उघडाच राहिला म्हणे."

उंबरठ्यावर गदल आली. म्हणाली, "गिर्राज..."

"काकी," गिर्राज म्हणाला, "खरंच मरतेवेळी तुमचं नाव होतं त्याच्या जिभेवर. भला माणूस बिचारा !"

गदल स्तब्ध उभी राहिली.

गिर्राज गेला.

ती म्हणाली, "ऐकलं का, मी जरा जाऊन येते."

किंचित् भयाने मौनीनं विचारलं, "कुठं ?"

"तिथंच."

"कशासाठी ?"

"दीर वारला नाही का?"

"आता कसला दीर तुझा तो?"

गदल हसली. कानांत झणझणत राहील असं हसली. म्हणाली, "दीर तो माझा पुढच्या जन्मीही राहील. त्यानं जर मला अडकवलं असतं तर हे पाय मोडले असते तरी त्या उंबरठ्याबाहेर निघाले असते का? त्यानं माझ्याकडून आपलं मन फिरवलं. मीही तोंड फिरवलं; आणि हा बदला घेतला." बोलता बोलता तिचा आवाज कठोर होत गेला.

"तू जायचं नाहीस. समजलं?" मौनीनं ठणकावलं.

"काय म्हणून?" गदल गरजली, "अरे माझ्या पोटचे पोरगे मला रोखू शकले नाहीत. आता राहिलंच आहे काय? ज्याला खाली बघायला लावायचं होतं तोच उरला नाही. थांबवणारा तू कोण? माझ्या खुशीने मी आले होते. राहिले तेव्हा राहिले, नाही तर नाही राहणार. तू काय मला विकत घेतलं आहेस? आता एवढं बोललायस तू, तो असता तर तुझी लांब झालेली जीभ बेताची करायला लावली असती."

"पुरे झाली टकळी! चल हो आत!" मौनीनं तिचा हात पकडून तिला आत टकलून दिलं. आपली चारपाई दारासमोर मांडून तो हुक्का पिऊ लागला.

गदल मुकाट्यानं रडू लागली. पण ती इतकी हलके की बाहेर मौनीला तिचा सुस्काराही ऐकू आला नाही. आज गदलचं मन ढवळून निघालं होतं.

तीन प्रहर रात्र टळून गेली होती. मौनीचं घोरणं चालूच होतं. असेल नसेल तेवढी शक्ती एकवटून गदल छपराच्या एका बाजूनं सर्पिणीसारखी बाहेर निघाली.

राहून राहून मौनी रागाने वेडापिसा होत होता. पण सरळ गावात जाऊन मनगटाच्या जोरावर तिला ओढून आणायची हिंमत होत नव्हती. तिच्या तंगड्या तोडायची तीव्र लालसा त्याला होत होती. दुल्लोने तर त्याची चेष्टाही केली की त्याची बायको पळून गेली आणि त्याचं नाक कापलं. विषाचा घोट गिळल्यागत त्यानं चेहरा केला. गुजरांना जेव्हा हे कळलं तेव्हा ते सर्व म्हणाले, "छः! म्हातारीसाठी झगडाभांडण काय करायचं? आणि असं काय तिनं तुझं खरचलंय? दोन भाकऱ्या खाऊन गेली ना? तुलाही करून घातलंच की."

मौनीचा राग धुमसत राहिला.

गिर्राज ऐकून गेलाच होता.

जेव्हा गदल पोचली तेव्हा पाटील बसला होता. निहाल म्हणाला होता, "खबरदार आत पाऊल ठेवशील तर. का आलीस परत?"

पाटीलही चक्रावला होता. म्हणाला होता, "आता कशासाठी आलीस बहू?"

गदल खाली बसली. म्हणाली, "जेव्हा लहान होते तेव्हा माझा दीर हातात लाठी घेऊन माझ्या नवऱ्याबरोबर आला होता. त्याच्याच हातांकडे बघत राहिले. मी तर विचार केला होता याच्या आधाराने मी सुखानं राहीन. मला सांगा पाटील, माझं कपाळ फुटल्यावर त्यानं मला आधार नाकारला, मग मी काय करायचं होतं? मी नव्हते तर ह्या ह्या पोरांकडून त्याची साधी काळजी करणंही झालं नाही. दोन दिवसांत काका खपला ना? यांच्या आधारानं राहते तर कुणास ठाऊक माझं काय झालं असतं ते?"

पाटील म्हणाला, "पण तुझ्या मुलांची वयंही तू लक्षात घेतली नाहीस."

"कबूल," गदल म्हणाली, "वय बघितलं नाही पण माझी अब्रू? त्याचं काय? माझं दिराशी भांडण होतं. ते संपलं. जातीच्या बाहेर मी काही केलं असेल तर बोला. पंचायत बोलवा. मी जाब द्यायला तयार आहे. पण ही माझी पोरं पंचायतीच्या तोंडावर थुंकली तेव्हा पाटील तुम्ही कुठं होता?"

"कधी ते?" पाटलांनी आश्चर्यानं विचारलं.

"पाटील विचारणार नाही तर कोण विचारणार? फक्त पंचवीस माणसांना जेवायला घालून श्राद्ध भागवलं माझ्या नवऱ्याचं."

"वेडे, पण हा सरकारी नियम होता."

"नियम होता," गदल हसली, "सगळ्या गोष्टी जगात नियमाप्रमाणंच चालल्यात ना पाटील? दिवसाढवळ्या दुसऱ्याच्या दाव्याची म्हैस आणली जाते. माझ्या नवऱ्यावरच नियम लागू होतो होय? ते काही नाही. पोरांनी विचार केला, कशाला पैसा खर्चायचा? कोण विचारतं पुसतं आहे? भ्याड कुठले!"

निहाल ओरडला, "आम्ही भ्याड? तू मोठी आलीस सिंहीण!"

"आहेच मी सिंहीण. आहे तुझ्यात हिंमत?" गदलनं विचारलं.

"बोल."

"जा, सगळ्या जातीला आवतण देऊन ये काकाच्या बाराव्याचं." गदल म्हणाली.

निहाल हडबडला. "पण पोलीस..."

गदलनं म्हटलं, "मी आहे ना!"

"बायकांची जात!" पाटील म्हणाला, "गोळी खावी लागेल."

गदल म्हणाली, "मेल्यांनी धर्म बुडवूनच टाकलाय जसा. सगळा गुजरात डुबला आहे. काय करणार? बांगड्या भरलेले भेकडच फक्त उरलेत."

मग एकाएकी ती म्हणाली, "मीच करते सगळं."

निहाल म्हणाला, "तू?"

"हो," डोळ्यांत भरून आलेलं पाणी सांभाळीत ती म्हणाली, "मरतेवेळी माझं नाव ओठांवर घेऊन तो गेला. त्याचं कार्य मी करायचं नाही तर कोणी?"

मौनी सगळं आश्चर्यानं ऐकत होता. गिरीजनं सांगितलं होतं की तयारी तर जोरात चालू आहे. दरोग्याला गदलनं लाच दिली आहे. तो तिकडं फिरकणारही नाही. गदलची एकंदर तयारी पाहून लोक म्हणताहेत की नवऱ्याच्या मरणाचं झालं नाही इतकं दुःख गदलला दिराचं झालं आहे.

मौनीत विषाची पेरणी करून गिरीज निघून गेला. मनाशी म्हणाला, "तुझ्या मनाजोगं सर्व काही होऊ दिलं तर माझं नांव मौनी नाही. इथल्या दरोग्याचं तोंड बंद करशील. पण मी जिल्ह्याच्या गावी जाऊन याचीच तक्रार करतो. बघू तर."

* * *

कार्य चालू होतं. पंगती उठत होत्या. मोठी प्रशंसा चालू होती.

बाहेर पुरुष व्यवस्था बघत होते. निहाल व नारायण यांनी लढाईच्या दिवसांत चढ्या भावानं धान्य विकून ज्या नोटांच्या घड्या कमावल्या होत्या त्या तर बाहेर निघाल्याच पण वर ऋणही काढावं लागलं. पण डांगमध्ये सगळ्या लोकांनी कबूल केलं की गदलच खरी शहामतीची. पोरगे तर हातपाय गाळून बसले होते. नाहीतरी नियम काय जातीच्या उपर आहेत?

गदल दमून गेली होती. बायकांत बसली होती. दरवाजात पोलिसासारखा कुणी दिसला म्हणून बाहेर आली. मान खाली घालून निहाल उभा होता.

"दिवाणजी, काय आहे?" तिनं विचारलं. बाईमाणसाचं विचारणं ऐकून पोलिस गडबडला.

निहालनंच सांगितलं, "म्हणतायत की कार्य बंद करा."

"काय म्हणून?" गदलनं चमकून विचारलं.

"दरोगासाहेबांनी सांगितलंय," नम्रपणे शिपाई म्हणाला.

"का? त्यांना सांगूनसवरूनच तर चाललंय सगळं," मलिदा पोचवल्याचा संकेत होता हा.

हवालदार म्हणाला, "मला माहीत आहे सगळं. तसे दरोगासाहेब पण मैत्री मानणारे आहेत. पण ते तरी काय करतील? कुणीतरी मोठ्या साहेबांकडे चुगली केली. तेव्हा दरोगांना यावंच लागणार. म्हणून तर त्यांनी निरोप पाठवलाय की गर्दी कमी करा. नाहीतर कायद्याची भानगड करावी लागेल."

गदल थोडा वेळ गप्प राहिली. विचार करत राहिली की कोण असावा बरं? नंतर

ती पोलिसला म्हणाली, "या सगळ्याचा विचार तेव्हा नाही केला दरोगाजींनी? आता जातीला कसं पानावरून उठवायचं? हवालदार, तुम्हीही बसा. जेवून घ्या. काय होईल ते जाईल. आधी दरोगा येताहेतच का? ते तर इथले राजा आहेत."

हवालदार म्हणाला, "काय करतील न येऊन? सरकारी नोकरी आहे. जायची नाही का?"

"मग येऊ देत तर!" जळत्या स्वरात गदल म्हणाली, "माणसाचं क्रियाकर्म एकदाच होतं. जातीला उठवणं मला परवडणारं नाही."

नारायण घाबरला. हवालदारानं समजावणीच्या सुरात म्हटलं, "सगळे पकडले जातील. राजाबरोबर टक्कर घेऊ नकोस."

"अरे मग राज्य काय जातीच्या वर आहे?" गदल ओरडली, "त्याचसाठी आजवर कष्ट काढले पण म्हणून त्याच्या नावानं धर्म नाही सोडणार, समजलात? धर्मच काढून घेतला तर जगायचं कसं?" पाय आपटत निघून गेली.

तीन पंगती उठल्या. शेवटची पंगत जेवत होती. निहालनं बाहेर काळोखात पाहात म्हटलं, "नारायण, आटप लवकर. ही शेवटची पंगत ना!"

आतून गदलनं हाक मारली, "निहाल."

निहाल गेला.

"भीती वाटते?"

सुक्या ओठावरून जीभ फिरवीत तो म्हणाला, "नाही."

"हे बघ बेटा, माझ्या कुशीत जन्म घेतल्याची लाज राखली पाहिजे तुला. तुझ्या काकानं तुम्हांला आपले मुलगे मानले होते. दुसरं लग्नही केलं नाही. माहीत आहे ना? तुमच्याशिवाय त्याचं आणखी कुणी नाही."

निहालनं मान खाली घातली.

पळत पळत एक मुलगा आला.

"आजी!" तो ओरडला.

"काय झालं रे?" भीतीनं गदलनं विचारलं.

"बंदुका घेऊन पोलिस आले."

निहालनं गदलकडे अर्थपूर्ण दृष्टीनं पाहिलं.

गदल म्हणाली, "पंगत उठेलच इतक्यात."

"पण तसं ते कसं ऐकतील?"

"मग त्यांना अडवलं पाहिजे."

"पण त्यांच्याकडं बंदुका आहेत ना!"

" निहाल, आपल्याकडंही बंदुकांना कमी नाही. डांगमध्ये बंदुकांना काय तोटा ?" गदलनं म्हटलं.

" अग—मग आपण काय खायचं ?"

" जे ईश्वर देईल ते."

बाहेर पोलिसांच्या गाडीचा हॉर्न वाजत होता. निहाल पुढं झाला. दरोगा उतरत होता. त्यानं विचारलं, " इथे मेजवानी चालू आहे का ?"

निहाल बघतच राहिला. ह्यानंच ना लाच घेतली होती ? आणि आता ओळखही दाखवत नाही. त्याला राग आला. " हो, चालू आहे," तो म्हणाला.

" पंचवीस माणसांच्या वर लोकं आहेत का ?"

" आम्ही लोकांना मोजून जेवायला घालत नाही, दारोगाजी."

" पण म्हणून तुम्ही सरकारी नियम मोडू शकणार नाही."

" सरकारी नियम आजकालचा आहे; पण पंचायत नेहमीची आहे. सरकारशी आम्हांला काय करायचं आहे ? जातीसाठी मातीही खावी लागते, दरोगाजी."

" असं असेल तर मला धरपकड केली पाहिजे."

गदलनं आतून हाक दिली, " निहाल."

निहाल आत गेला.

" पंगत उठेतो ह्यांना अडवलंच पाहिजे."

" आणि मग ?"

" मग सगळ्यांना मागच्या बाजूने काढून लावू. कुणाला पकडलं तर जात काय म्हणेल ?"

" पण हे असे थांबणार नाहीत. गोळीबार करतील ग."

" तू भिऊ नकोस. छपरावर नारायण चार माणसांना घेऊन बंदुका तयार ठेवून बसलाय."

निहाल थरकापला. गदलला म्हणाला, " अग आपल्या ठासणीच्या आहेत. त्यांच्याकडं रायफल्स आहेत."

" काही असो, पंगत आटपू दे."

" नंतर ?"

" तुम्ही सगळे पळून जा."

झपकन् कंदील विझला.

धाड धाड आवाज आले. अंधारात गोळीबार चालू झाला.

गदलनं ओरडून सांगितलं, " माझ्या गळ्याची शपथ आहे जेवल्याशिवाय उठलात तर."

पण सगळ्यांना घाई झाली होती.

बाहेर ठो ठो होतच होतं. एवढ्यात कुणीतरी किंचाळला. पंगत मागून जाऊ लागली.

जेव्हा सगळे गेले तेव्हा गदल छपरावर चढली. निहालला म्हणाली, "बेटा!"

मायेत भिजलेला तिचा स्वर ऐकून त्या तसल्या भीतीच्या वातावरणात देखील त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यानं काही उत्तर द्यायच्या आत गदल म्हणाली, "तुला माझ्या कुशीची आण आहे. नारायण, सूनबाई आणि मुलांना घेऊन तू बाहेर नीघ, पाठीमागच्या बाजूने."

"आणि तू?"

"माझी चिंता सोड. तुझा काका मला बोलवतोय. त्याच्या हाका मला ऐकू येताहेत."

निहाल काही बोलला नाही. एकाकडून भरलेली बंदूक घेऊन गदलनं हुकूम केला, "चला, निघा सगळे मागच्या बाजूनं."

मुलांबाळांच्या प्रेमात गुंतलेल्या तरुणांना संकटाने अंधारात ढकलून दिले.

गदलने चाप ओढला. कुणीतरी किंचाळला. ती हसली. ते विक्राळ हास्य सर्वत्र घुमलं.

दरोगानं ते ऐकलं आणि तो चमकला. बाईमाणूस? पुरुष सगळे काय झाले? त्याच्या माणसांनी घराला चारी बाजूंनी गराडा घातला. छपरावर ते चढले आणि त्यांनी गोळ्या झाडल्या. त्यांतली एक गदलला पोटात लागली.

* * *

संग्राम संपला. गदल रक्ताच्या थारोळ्यांत पडली होती. पोलिस एकत्र झाले.

दरोगानं विचारलं, "इथं कुणी नाही का?"

एका शिपायानं उत्तर दिलं, "हुजूर, ही इथं एक बाई आहे."

दरोगा पुढं झाला आणि त्यानं विचारलं, "कोण आहेस तू?"

गदल हसली आणि ओढल्या आवाजात म्हणाली, "कार्य पार पडलं दरोगाजी. आता त्याच्या आत्म्याला शांती मिळेल."

दरोगानं भडकून विचारलं, "पण तू कोण आहेस?"

गदलचा स्वर क्षीण होत होता. तिनं उत्तर दिलं, "जो एक दिवसही एकटा राहू शकला नाही त्याची..."

तिची मान कलंडली. तिच्या ओठांवर एक स्मितरेखा होती. जशी खूप वेळ असलेल्या अंधारात आताच पेटवून आणलेली वात—आधी विझून गेलेल्या कंदिलाची...!

तिसरी कसम

फणीश्वरनाथ 'रेणु'

हिरामन गाडीवानाच्या पाटीला गुदगुल्या होताहेत...

गेली वीस वर्षे गाडी हाकतो आहे हिरामन, बैलगाडी. सरहद्दीच्या पलिकडल्या बाजूनं, मोरंग राज नेपाळातून तांदूळ आणि लाकूड वाहून आणलंय त्यानं, कंट्रोलच्या जमान्यात चोरबाजारी माल त्यानं इकडनं तिकडे आणि तिकडनं इकडे पोचवला आहे. पण कधीच अशा गुदगुल्या नाही झाल्या पाठीला...

कंट्रोलचा काळ. हिरामनला त्या काळाचा विसर पडणं शक्य नाही. सिमेंट आणि कापडानं भरलेली गाडी घेऊन जोगबनीहून विराटनगर अशा चार खेपा त्यानं केल्या आणि त्याचं काळीज घट्ट झालं. फारबिसगंजचा प्रत्येक काळाबाजारवाला व्यापारी त्याला बनेल गाडीवान मानायला लागला. बड्या गादीवरले खुद्द बडे सेठजी त्याच्या बैलांची तारीफ करायला लागले—आपल्या भाषेत...

पाचव्या खेपेला गाडी पकडली, सरहद्दीच्या इकडल्या बाजूला, तराईत.

महाजनाचा मुनीम त्याच्याच गाडीत कापडांच्या गाठींमध्ये गुपचूप पडून राहिला होता. दरोग्याच्या दीड हात लांब चोरबत्तीचा उजेड किती तीव्र असतो ते हिरामनला माहीत आहे. डोळ्यावर एक पळभर प्रकाश आला तरी माणूस घंटाभर आंधळा बनतो, आणि त्या उजेडाबरोबर कडाडता आवाज—"ऐऽय! गाडी रोको, साले, गोळी घालीन..."

वीसही गाड्या एकदम कचकचत थांबल्या. हिरामननं आधीच सांगितलं होतं—हा बिसाचा आकडा विघ्न कालवणार. त्याच्या गाडीत दबून बसलेल्या मुनीमजीवर उजेड मारीत दरोगासाहेब पिशाचासारखे हसले—"हा हा हा! मुडीमजीऽऽ ही ही ही... ऐऽय साला गाडीवान, तोंड काय बघत उभा आहेस रे एऽ! कांबळं उचल या पोत्याच्या तोंडावरलं!" आणि हातातली छोटी काठी मुनीमजीच्या पोटात ढोसकीत म्हटलं होतं—"ह्या पोत्याच्या...स्साला!"

दरोगासाहेब आणि मुनीमजी यांच्यात काही जुनी तेढ-मेढ राहिलेली असावी. नाहीतर इतके रुपये मोजल्यावरही पोलीस दरोग्याचं मन हालू नये म्हणजे काय बात आहे! चार हजार तर गाडीवर बसल्याबसल्याच देत होता. पुन्हा एकदा काठी ढोसकली. पाच हजार. पुन्हा एक ढुसकणी—उत्तर पहिले.

मुनीमाला गाडीतून खाली उतरवून दरोग्यानं त्याच्या डोळ्यांवर उजेड मारला. मग दोन शिपायांसह त्याला वीस-पंचवीस वाव दूर झाडीमध्ये घेऊन गेला. गाडीवान आणि गाड्यांवर पाच बंदूकवाल्या शिपायांचा पहारा. हिरामन समजून चुकला, या वेळी निस्तरणं कठीण...जेल ! हिरामनला तुरुंगाचं भय नाही. पण त्याचे बैल ? न जाणो किती दिवस चारापाण्याशिवाय सरकारी कंपौंडात पडून राहतील, उपाशी तान्हेले. मग लिलाव होईल. भाऊ-भावजयीला पुन्हा तोंड दाखवायला नको. लिलावाची बोली त्याच्या कानात घुमायला लागली. एक-दोन-तीन. मुनीम आणि दरोग्याची बोली जमत नव्हती बहुतेक.

हिरामनच्या गाडीजवळ पहारा देत असलेल्या शिपायानं आपल्या भाषेत हलकेच दुसऱ्याला विचारलं—"का हो ! मामला गोल होखी का ?" मग चिलीम-तंबाकू देण्याच्या मिषानं तो त्याच्याजवळ गेला.

एक-दोन-तीन. मध्ये तीनचार गाड्या आहेत. हिरामननं निर्णय घेतला. त्यानं आपल्या बैलांच्या गळ्यातल्या दोऱ्या सोडल्या. गाडीवर बसल्याबसल्याच त्यांना एकत्र बांधलं. बैलांना काय करायचं आहे ते कळलं. मग हिरामन खाली उतरला आणि जुंपलेल्या गाडीला बांबूचं तिकटं लावून त्यानं बैलांचे खांदे मोकळे केले. दोघांच्याही कानांजवळ खाजवून मनातल्या मनात म्हटलं, 'चला रे बाबांनो, जीव बचावला तर असल्या छप्पन गाड्या मिळतील. एक-दोन-तीन—पळा...'

गाड्यांच्या आड रस्त्याच्या कडेनं दूरवर दाट झाडी पसरली होती. श्वास रोखून तीन्ही जीवांनी रान पार केलं. दम न खाता की चाहूल न देता. मग दुडकी चाल. दोन्ही बैल पुन्हा हिंमत करून तराईच्या दाट रानात घुसले. वाट हुंगीत, नदीनाले पार करीत शेपट्या उभारून धावले. त्यांच्या मागे हिरामन. रात्रभर धावत होते तिघेहीजण.

घरी पोचल्यावर दोन दिवस हिरामन बेशुद्ध पडून होता. शुद्धीवर येताच कान पकडून त्यानं कसम खाल्ली होती—आता पुन्हा म्हणून असलं भाडं घेणार नाही. काळ्या बाजाराचा माल ! तोबा तोबा...कोण जाणे मुनीमजींचं काय झालं. देव जाणे त्याच्या गाडीचं काय झालं ते. अस्सल पोलादाची धुरी होती. दोन्ही जरी नाही तरी एक चाक बिलकूल नवीन होतं. गाडीत रंगीत दोऱ्यांचे गोंडे अगदी मन लावून गुंफलेले होते...

दोन शपथा घेतल्या होत्या त्यानं. एक म्हणजे चोरीचपाटीचा माल भरायचा नाही. दुसरी म्हणजे बांबू. प्रत्येक गिऱ्हाइकाला तो आधीच विचारून घ्यायचा—चोरीबिरीचा माल तर नाही ना ? आणि, बांबू ? बांबूच्या ओझ्यासाठी पन्नास रुपये जरी मोजले कुणी तरी हिरामनची गाडी नाही मिळायची, दुसऱ्या कुणाची पाहा...

बांबू लादलेली गाडी. गाडीच्या पुढं चार हात बांबूंची टोकं असतात आणि मागच्या बाजूलाही टोकं चार हात बाहेर. गाडी हमेशा आपल्या काबूबाहेरच राहते. असलं

हाताबाहेरचं ओझं म्हणजे नसतं झंझट. खरैहिया शहरातली गोष्ट. गाडीच्या पुढं बांबूंची टोकं धरून भाडेवाल्याचा महामूर्ख नोकर चालला होता तो पोरींच्या शाळेकडेच बघत राहिला. झालं, वळणावर घोडागाडीशी टक्कर झाली. हिरामन इकडे बैलांचा कासरा खेचतोय तोवर टांग्याच्या छपरात बांबूंची टोकं घुसलीसुद्धा. तडातड चाबूक मारीत टांगेवाल्यानं शिव्या घातल्या...

बांबूंचं ओझंच नव्हे तर हिरामननं खरैहिया शहराचं भाडंच घ्यायचं बंद केलं आणि आता फारबिसगंज ते मोरंगची वाहतूक सुरू केली तर गाडीच साफ झाली... काही वर्षे हिरामननं बैल भागीदारीत जुंपले. अर्धे भाडं गाडीवाल्याचं आणि अर्धे बैलवाल्याचं. गाडी हाकण्याचं काम फुकटात. असल्या अर्दळीत बैलांच पोटच भरताना मारामार. आता गेल्या वर्षीच कुठं त्याला स्वतःची गाडी बनवणं जमलं आहे.

अंबाबाई भलं करो त्या सर्कसकंपनीच्या वाघाचं! गेल्या वर्षी याच जत्रेत वाघाची गाडी ओढणारे दोन्ही घोडे मेले. चंपानगराहून फारबिसगंजला जत्रा हालायच्या वेळी सर्कस कंपनीच्या मॅनेजरनं गाडीपट्टीत दवंडी पिटली—शंभर रुपये मिळतील. एकदोन गाडीवाले तयार झाले. पण त्यांचे बैल वाघाच्या गाडीपासून दहा हात दूर असतानाच भीतीनं बांऽऽ करून डुरकायला लागले. कासरा तोडून पळाले. हिरामननं आपल्या बैलांची पाठ गोंजारीत म्हटलं – "बघा रे बाबांनो, असली संधी पुन्हा नाही यायची. हाच मोका आहे पुन्हा आपल्या मालकीची गाडी बनवायचा. नाहीतर चाललीच आहे भागीदारी...अरे, पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघाची कसली आली आहे भीती. मोरंगच्या तराईत दौडताना काय वाघ पाहिले नाहीत काय तुम्ही...आणि शिवाय तुमच्या पाठीवर मी आहेच ना!"

गाडीवाल्यांच्या घोळक्यात एकदम टाळी कडकडली होती. सगळ्यांची लाज राखली हिरामनच्या बैलांनी. दमदारपणं पुढं झाले आणि वाघगाडीला जुंपण्यासाठी उभे राहिले. फक्त जू घातल्यानंतर उजवीकडचा बैल चळचळा मुतला होता. हिरामननं दोन दिवस नाकाला बांधलेली कपड्याची पट्टी सोडली नाही. बड्या गादीच्या बड्या शेटजीप्रमाणं नकबन्धन लावल्याशिवाय वाघाच्या अंगाची घाण सहन नाही करू शकणार कोणी.

...वाघाची गाडी हाकली आहे हिरामननं. पण अशा गुदगुल्या नाही झाल्या कधी पाठीला. आज राहून राहून त्याच्या गाडीत चाफ्याचा सुगंध उसळतोय. पाठीला गुदगुल्या व्हायला लागल्या की खांद्यावरच्या पंचानं तो पाठ झटकतो.

हिरामनला वाटतं दोन वर्षांपासून चंपानगर जत्रेची भगवती मैया त्याच्यावर प्रसन्न झाली आहे. गेल्या वर्षी वाघगाडी जोडली. नगद शंभर रुपये भाडं आणि वर बक्षिसी, चाय-बिस्कूट, शिवाय रस्ताभर माकड-अस्वलाचा खेळ व विदूषकाचा तमाशा पाहायला मिळाला फुकटात.

आणि यावेळी ही जनानी स्वारी. बाई आहे की चाफ्याचं फूल ? गाडीत बसली तेव्हापासून गाडी सुगंधानं भरभरून येतेय.

कच्च्या सडकेवरून जाताना गाडीचं उजवं चाक एका लहानशा खड्डयात रुतलं आणि अचानक हिसका बसला. गाडीतून हलकेच 'सिस्'चा आवाज आला. हातातल्या वादीच्या टोकानं उजवीकडल्या बैलाला हाणीत हिरामननं म्हटलं – "स्साला, काय वाटलं तुला, गोणी भरल्यायत काय गाडीत ?"

"ओह ! मारू नको."

अनोळखी स्त्रीच्या आवाजानं हिरामन बावचळला. लहान मुलासारखं बारीक, किणकिणतं, फोनूच्या तबकडीसारखं बोलणं.

मथुरामोहन नौटंकी कंपनीत लैला बनणाऱ्या हिराबाईचं नाव ऐकलेलं नाही असा कोणी असेल तरी का ? पण हिरामनची गोष्टच निराळी आहे. त्यानं लागोपाठ सात वर्षे जत्रेची भाडी घेतली आहेत पण कधी नौटंकी थिएटर किंवा बायोस्कोप सिनेमा नाही बघितला. लैलाचं किंवा हिराबाईचंही नाव त्यानं ऐकलेलं नाही कधी. पाहण्याची गोष्ट दूरच. तेव्हा जत्रा संपायच्या पंधरा दिवस आधी, अर्ध्या रात्रीच्या सुमाराला काळी ओढणी लपेटलेली बाई पाहून त्याला मनात खटकलंच होतं. पेटी उचलणाऱ्या नोकरानं गाडीभाड्याबाबत घासाघीस करण्याचा प्रयत्न करताच तिनं मान हालवून त्याला थांबवल्यासारखं नक्की वाटलं होतं त्याला. गाडी जुंपताना त्यानं नोकराला विचारलं होतं, "क्यों भैया, कसला चोरीचपाटीचा मालबील तर नाही ना ?" हिरामनला पुन्हा अचंबा वाटला. पेटी उचलणाऱ्या त्या माणसानं गाडी हाकण्यासाठी त्याला हातानंच इशारा केला आणि अंधारात गायब झाला. जत्रेत तंबाखू विकणाऱ्या म्हातारीच्या काळ्या लुगड्याची त्याला आठवण आली होती...

अशा परिस्थितीत कशी हाकायची कुणी गाडी !

एक तर पाठीला गुदगुल्या होताहेत. दुसरं म्हणजे राहून राहून त्याच्या गाडीत चाफ्याची कळी फुलतेय. बैलांना दटावावं तर इस्-बिस् करायला लागते त्याची सवारी ...त्याची सवारी. एकटी स्त्री, तंबाखू विकणारी म्हातारी नव्हे. आवाज ऐकल्यानंतर वारंवार त्याची नजर आतल्या बाजूला वळतेय आणि तो पंचानं पाठ झटकतोय...देव जाणे काय आहे लिहिलेलं त्याच्या नशिबात या खेपेला. गाडी पूर्वेच्या बाजूला वळली आणि चांदण्याचा एक तुकडा गाडीत पसरला. सवारीच्या नाकावर एक काजवा चमकला. हिरामनला सगळं कसं रहस्यमय, अजगुत-अजगुतसं वाटतंय. समोर चंपानगर ते सिंधिया गावापर्यंत माळ पसरलाय...एखादी डाकीण जखीण तर नाही ना ?

हिरामनच्या सवारीनं कूस परतली. चांदणं तोंडावर पसरलं तसा हिरामन जवळ जवळ

ओरडायचाच काय तो बाकी राहिला — "अरे बापरे! ई तो परी है."

परीचे डोळे उघडले. हिरामननं समोर रस्त्याकडे तोंड वळवलं आणि बैलांना चुचकारलं. टाळ्याला जीभ लावून त्याने टिटिव् टिटिव् आवाज केला. हिरामनची जीभ कोण जाणे कधीपासून लाकडासारखी कोरडी ठाक झाली होती.

"भैय्या, नाव काय तुझं?"

अगदी काचेची किणकिण!... हिरामनचा केसन् केस थरारला. तोंडातून शब्द उमटला नाही. त्याचे बैलही कान उभारून आवाज पारखीत राहिले.

"माझं नाव... माझं नाव हिरामन."

स्वारी हसली. हसण्यातही सुगंध आहे.

"तर मग मीता म्हणेन, भैया नाही. माझं नावही हिरा आहे."

"इस्स्! हिरामनचं अर्धं नाही होत. पुरुष आणि स्त्रीच्या नावात फरक असतो."

"हां जी, माझं नावही हिराबाई आहे."

कुठं हिरामन आणि कुठं हिराबाई. फार फरक आहे.

हिरामननं आपल्या बैलांना खडसावलं : कान उभारून गप्पा ऐकण्यानं काय तीस कोसांची मजल काटणार आहे काय? ह्या डाव्याच्या अंगात मस्ती भरलीय. हिरामननं डाव्या बाजूच्या बैलाच्या पाठीवर वादीचा हलकासा फटका मारला.

"अरे मारू नको. चालू देत हळूहळू. घाई कसली आहे?"

हिरामनला प्रश्न पडला हिराबाईशी बोलायचं कसं? 'तोहें' म्हणायचं की 'अहां'? त्याच्या भाषेत मोठ्या लोकांना 'अहां' म्हणजे अहो म्हणतात. शहरी बोलीत दोनचार प्रश्नोत्तरं होऊ शकतील. पण दिलखुलास गप्पा करायच्या तर गावच्या बोलीतच बोलणं होऊ शकतं.

आश्विन-कार्तिकातल्या पहाटेस दाटणाऱ्या धुक्याची हिरामनला फार पूर्वीपासून चीड आहे. कितीतरी वेळा रस्ता चुकून तो भटकलेला आहे. पण आता दाट धुकं असूनही तो धुंद आहे. नदीच्या काठानं पसरलेल्या शेतांतून पसरलेल्या भाताच्या सुगंधानं भरलेला वारा येतोय. पर्व-पावनाच्या दिवशी गावात असलाच सुवास भरून राहिलेला असतो. त्याच्या गाडीत पुन्हा चाफा फुलला. त्या चाफ्यात एक परी बसली आहे... जै भगवती!

हिरामननं डोळ्याच्या कोपऱ्यातून पाहिलं, त्याची सवारी... मीता — सोबतीण... हिराबाई गुजुर-गुजुर डोळ्यांनी त्याला न्याहाळीत आहे. हिरामनच्या मनात कसलीशी अनोळखी रागिणी वाजायला लागली. सगळं शरीर शिरशिरलं. तो म्हणाला — "बैलांना मारलं की तुम्हांला फार वाईट वाटतं ना?"

हिराबाईला वाटलं, हिरामन खरोखरीच हिरा आहे.

चाळीस वर्षांचा घट्टाकट्टा, काळासावळा, देहाती तरुण आपले बैल आणि आपली गाडी यांच्याशिवाय दुसऱ्या कसल्याही विषयात रस घेऊ शकत नाही. घरी मोठा भाऊ आहे. शेती करतो. हिरामन भावापेक्षाही वहिनीला अधिक मान देतो. तिला भितोही. हिरामनचीही लहानपणी शादी झाली होती. पण बाळपणीच, गौना व्हायच्या आधीच दुल्हन देवाघरी गेली. हिरामनला आपल्या दुलहिनचा चेहरा आठवत नाही... दुसरं लग्न न करण्याची कारणं अनेक आहेत. वहिनीचा हट्ट आहे, कुवारणीशीच हिरामनची शादी करीन. कुमारी म्हणायची म्हणजे पाच-सात वर्षांची मुलगी हवी. सरधा-कायदा (शारदा) कोण मानतोय ? मुलीचा बाप कसल्या अडचणीत असला तरच पोरीला बिजवराच्या गळ्यात बांधणार. भाभी त्याची वाट पाहात बसलीय ती बसलीच आहे. तिच्यापुढं भैयाचंही काही चालत नाही...आता हिरामननं ठरवून टाकलं आहे, लग्न नाही करायचं. कोण बला घेणार डोक्यावर. लग्न करून मग गाडीवानी कसली करणार ? बाकी सर्व काही सोडील पण गाडीवानी नाही सोडू शकत हिरामन.

हिरामनसारखा भोळा निष्कपट माणूस हिराबाईला क्वचितच भेटला आहे. त्यानं विचारलं – "आपला गाव कोणत्या जिल्ह्यात येतो ?" कानपूरचं नाव ऐकताच असं हसू फुटलं त्याला की बैलही उधळले. हसताना हिरामन मुंडी खाली घालतो. हसू ओसरताच म्हणाला – "वा रे कानपूर ! तर मग नाकपूरही असेल ?" आणि जेव्हा हिराबाईनं सांगितलं की खरंच नाकपूरही आहे, तेव्हा त्याची हसता हसता पुरेवाट झाली.

वा रे दुनिया ! काय काय नावं असतात. कानपूर ! नाकपूर !! हिरामननं हिराबाईच्या कानाचं फूल टक लावून पाहिलं. नाकातल्या चमकीमधला खडा पाहून तो शहारला – रक्ताचा थेंबच जणू !

हिरामननं हिराबाईचं नाव नाही ऐकलेलं कधी. नौटंकी कंपनीतल्या स्त्रीला तो 'बाईजी' मानीत नाही. कंपन्यांतून काम करणाऱ्या बायका पाहिल्या आहेत त्यानं. सर्कस कंपनीची मालकीण आपल्या दोन्ही तरुण लेकींबरोबर वाघगाडीपाशी यायची, वाघाला चारापाणी द्यायची, लाड पण करायची. हिरामनच्या बैलांनासुद्धा डाळरोटी-बिस्कुट खायला घातलं होतं तिच्या मोठ्या लेकीनं.

हिरामन चलाख आहे. धुकं कमी होताच त्यानं चादर लावून गाडीत आडोसा केला. बस्स झालंच, दोन तास. त्यानंतर रस्ता काटणं अशक्य आहे. कार्तिकातलं सकाळचं ऊन तुम्हांला सहन नाही व्हायचं. तेगछियाजवळ कजरी नदीच्या काठाला गाडी सोडू. दोन प्रहर ढळल्यावर...

समोरून एक गाडी येताना पाहून हिरामन सावध झाला. बैलांवर नजर ठेवून सावरून

बसला. उलट दिशेनं जाणाऱ्या गाडीवानानं विचारलं, "जत्रा आवरायला लागली की काय?"

हिरामननं म्हटलं – "जत्रेचं काय माहीत नाही आपल्याला. आपल्या गाडीतली स्वारी माहेरी नाहीतर सासरी जाणारी मुलगी आहे." कोण जाणे कुठल्या गावाचं नाव ठोकून दिलं हिरामननं.

"छत्तापुर-पचीरा? कुठंसं आलं?"

"असेल कुठंही. त्याचं तुला काय लागतं?" हिरामनला आपल्या अक्कलहुषारीचं कौतुक वाटलं. मागं पडदा असूनही त्याच्या पाठीला गुदगुल्या व्हायला लागल्या.

पडद्यातल्या भोकातनं हिरामननं पाहिलं...आगपेटीएवढ्या आरशात हिराबाई आपले दात न्याहाळते आहे....मदनपुरच्या जत्रेत एकदा हिरामननं आपल्या बैलांसाठी बारीक कवड्यांची माळ घेतली होती. छोट्याछोट्या, नाजुक कवड्यांची पात.

तेगछियाची तीन्ही झाडं दुरूनच दिसताहेत. हिरामननं पडदा जरा बाजूला करून म्हटलं – "पाहिलंत, हेच तेगछिया. दोन झाडं पारंब्या-वडांची आहेत आणि एक... काय बरं त्या फुलाचं नाव आहे...तुमच्या कुर्त्यावर जसं फूल आहे ना काढलेलं तसलंच आहे पाहा, खूप वास असतो त्याला, दोन कोसांवर वास येतो. तंबाखूबरोबर चिलमीत घालून ओढतात लोक."

"आणि त्या आंबराईमागं घरं दिसताहेत तिथं काय गाव आहे की मंदिर?"

हिरामननं बिडी पेटवण्याआधी विचारलं – "बिडी ओढू का? वासाचा त्रास नाही ना व्हायचा?...ते नामलगार ड्योढी. जिथल्या जत्रेतनं आता आलोय ना आपण तिथल्या राजाच्या नात्यागोत्यातलंच आहे...गेला जमाना."

हिरामननं 'गेला जमाना' म्हणून विषय संपवला. हिराबाईनं पडदा उचलून तिरपा खोचला...हिराबाईच्या दातांची माळ.

"कुठला जमाना?" हनुवटीवर हात टेकून ती आग्रहपूर्वक म्हणाली.

"नामलगार ड्योढीचा जमाना. काय होतं, आणि कशाचं काय होऊन गेलं एकदम."

गप्पांचा रंग कसा खुलवायचा त्याचं तंत्र हिरामनला चांगलं माहीत आहे. हिराबाई म्हणाली – "तू पाहिलायस तो जमाना?"

"पाहिलेला नाही, ऐकलाय फक्त...राज्य कसं गेलं त्याची मोठी चटका लावणारी कहाणी आहे. म्हणतात, त्या घरात देवानं जन्म घेतला. आता सांगा, देव म्हणजे देव, आहे की नाही? इंद्रासन सोडून मिरतूलोकात त्यानं जन्म घेतला म्हणून तेज कुठं जातंय काय? डोळ्याभोवती सूर्यफुलासारखं तेज खुलायचं. पण डोळे आंधळे, ओळखलं नाही

कुणी. एकदा लाटसाहेब समारंभासाठी लाटनीबरोबर सरंजामी गाडीनं आले. लाटानंही नव्हे, अखेर लाटनीनं ओळखलं. सूर्यफुलासारखं तेज पसरलेलं बघून ओरडली–'अरे भय्या राजासाहेब, ऐक, हे माणसाचं पोर नाही. देव आहे देव.'"

लाटनी कशी बोलली ते दाखवताना हिरामननं अगदी डॅम-फॅट-लॅटचा आव आणला. हिराबाई ते ऐकून दिलखुलास हसली. हसताना तिचं सगळं शरीर हिंदकळलं.

हिराबाईनं ओढणी सारखी केली. हिरामनला वाटलं...वाटलं...

"मग? त्यानंतर काय झालं, मीता?"

"इस्स! कथा ऐकायची चांगलीच गोडी दिसतेय तुम्हांला...अहो काळा आदमी, राजा नाही अगदी महाराजा का असेना, अखेर काळा आदमीच तो. साहेबासारखी अक्कल कुठनं येणार? सगळ्यांनी गोष्ट हसण्यावारी नेली. मग देव वारंवार राणीच्या स्वप्नात यायला लागला. तुला नाही सेवा करणं जमत तर जाऊ दे मला, नाही राहणार मी तुझ्याजवळ. आणि त्यानंतर ईश्वरी लीला सुरू झाली. सगळ्यात आधी दोन्ही हत्ती मेले, मग घोडा, मग पटपटांग..."

"पटपटांग म्हणजे?"

हिरामनच्या मनाचे रंग क्षणाक्षणाला पालटताहेत. इंद्रधनुष्य खुलायला लागलंय, त्याला वाटतंय...आपल्या गाडीत देवलोकातील स्त्री बसलीय. देव म्हणजे अखेर देवच ते!

"पटपटांग! धनदौलत, जमीनजुमला, सगळं साफ. देव इंद्रलोकाला निघून गेला." हिराबाईनं वाकून मंदिराच्या कळसाकडे नजर फेकली आणि दीर्घ निःश्वास सोडला.

"पण देवानं जाता जाता सांगून ठेवलं, या राज्यात कधी एक सोडून दुसरा मुलगा नाही व्हायचा. धन मी बरोबरच घेऊन जातोय, गुण मागं ठेवतोय. देवाबरोबर इतरही देवदेवता गाव सोडून गेल्या. फक्त सरस्वतीमैया राहिली. तिचंच मंदिर आहे."

गावठी तट्टांवर कापडाचे बोजे लादून चाललेल्या वाण्यांना पाहून हिरामननं पडदा खाली सोडला. बैलांना हाकारलं आणि बिदेशिया नाचाच्या नांदीचं गाणं म्हणायला लागला–"जै मैया सरोसती, अरजी करत बानी, हमारा पर होखू सहाई हे मैया, हमारा पर होखू सहाई."

मग घोडेवाल्या वाण्यांना ओरडून विचारलं–"कापड काय भावानं दिलं, महाजन?"

लंगडं घोडं हाकणाऱ्या बनियानं उगीच आपलं सांगून टाकलं–"खाली सत्तावीस अठ्ठावीस, वर तीस. जसा माल, तसा भाव."

जवान बनियानं विचारलं, "जत्रा कशी काय आहे भाई? कुठल्या नौटंकीचा खेळ चाललाय? रौता कंपनी की मथुरामोहन?"

"जत्रेची वार्ता जत्रावाल्यांना माहीत." हिरामननं पुन्हा छत्तापुर-पचीराची उजळणी केली.

सूर्य दोन कासरे वर आला होता. हिरामन बैलांशी गोष्टी करायला लागला - "एक कोस जमीन. जरा दमानं चाला. तहानेची वेळ झालीय ना. आठवण आहे? मागं तेगछियाजवळ सरकस कंपनीचा जोकर आणि माकडांचा नाच करणारा साहेब यांच्यात भांडण जुंपलं होतं. जोकरवा अगदी माकडासारखे दात विचकून कचकचायला लागला होता...नकळे कसल्या-कुठल्या देशा-मुलखातले लोक येतात..."

हिरामननं पुन्हा पडद्याच्या भोकातनं आत नजर टाकली. हिराबाई कागदाच्या एका तुकड्यावर डोळे खिळवून बसली होती. आज हिरामनचं मन हलक्याफुलक्या सुरावटीत बांधलं गेलंय. तऱ्हेतऱ्हेची गाणी आठवताहेत त्याला. वीसपंचवीस वर्षांपूर्वी बिबेशिया, बलवाही, नाच्यापोऱ्यावाले, एकाहून एक वरचढ भजल-खेमटे गाणी म्हणायचे. आता काय भोंप्यात भोंप-भोंप करीत कसली तरी गाणी म्हणतात. गेला जमाना. नाच्या-पोऱ्याच्या गाण्याची आठवण आली हिरामनला—

सजनवा बैरी हो गये हमारो। सजनवा...
असे, चिठिया हो तो सब कोई बांचे, चिठिया हो तो
हाय! करमवा, होय, करमवा...
कोई न बांचे हमारो, सजनवा...हो करमवा...।

गाडीच्या बल्लीवर बोटांनी ताल धरीत हिरामननं गाणं संपवलं. छोकरा-नाचातल्या मनुआं-नुटुआचं तोंड हिराबाईसारखंच होतं...कुठं गेला तो जमाना? दर महिन्याला गावात नाचवाले यायचे. छोकरा-नाच सुरू असताना हिरामननं वहिनीची किती बोलणी खाल्ली होती. भावानं घरातून चालता हो म्हणून सांगितलं होतं.

आज बहुधा हिरामनवर सरस्वतीमाई प्रसन्न झालेली दिसतेय. हिराबाई म्हणाली—"वा! किती सुंदर गातोस तू!"

हिरामनचा चेहरा लाल झाला. मान खाली घालून तो हसायला लागला.

तेगछियावर राहणाऱ्या महावीरस्वामीची कृपा झालीय आज हिरामनवर. तेगछिया तळावर आज एकही गाडी नाही. नाहीतर नेहमी गाड्या आणि गाडीवान यांची दाटी झालेली असते इथं. फक्त एक सायकलवाला पेंगतो आहे. महावीर-स्वामीचं स्मरण करून हिरामननं गाडी थांबवली. हिराबाई पडदा बाजूला करायला लागली. हिरामननं प्रथमच नजरेनं बोलणं केलं हिराबाईशी—सायकलवाला इकडेच टकटका बघतोय.

बैल सोडण्याआधी हिरामननं गाडीला बांबूचं तिकटं लावलं. मग सायकलवाल्याकडे वरखाली न्याहाळून पाहात म्हटलं–"कुठं निघाला पावणं? जत्रेला? आणि आले कुठनं? बिसनपूरहून? बस्स? इतक्या अंतरातच हासुहुसू झालं का? वा रे जवानी!"

सायकलवाला किडकिडीत तरुण अजीजीनं काहीतरी बोलला आणि विडी शिलगावून उठून उभा राहिला.

दुनियाभरच्या वाईट नजरेपासून हिराबाईचं रक्षण करायचं आहे हिरामनला. त्यानं सगळीकडे नजर फेकली. कुठंही गाडी नाही घोडा नाही.

कजरी नदीचा क्षीण प्रवाह तेगछियाजवळ येऊन पूर्वेकडे वळला आहे. हिराबाई पाण्यात बसलेल्या म्हशींकडे आणि त्यांच्या पाठीवर बसलेल्या बगळ्यांकडे पाहात आहे.

हिरामन म्हणाला–"चला, घाटावर जाऊन हात-तोंड धुवून या."

हिराबाई खाली उतरली. हिरामनचं काळीज धडधडायला लागलं...छे छे, पाय तर सरळ आहेत, उलटे नाहीत. पण तळवे इतके लाल कसे? हिराबाई घाटाच्या दिशेनं जायला लागली. गावातल्या सुनालेकींप्रमाणंच मान खाली घालून हलक्या धीम्या चालीनं. कोण म्हणेल ही कंपनीतली बाई आहे म्हणून...बाई नाही, मुलगी. बहुधा कुवारीच असेल.

तिकट्यावर ओठंगलेल्या गाडीवरच बसून आहे अद्याप हिरामन. त्यानं गाडीत वाकून पाहिलं. एकदा इकडे तिकडे पाहून हिराबाईच्या उशीवर हात ठेवला. मग कोपर टेकून खाली झुकला. आणखी झुकतच गेला. त्याचं सारं शरीर सुगंधानं भरून गेलं. उशीच्या अभ्र्यावर काढलेल्या फुलांना बोटांनी स्पर्श करीत त्यानं हुंगलं. हाय रे हाय! किती सुवासिक! हिरामनला वाटलं: एकदम गांजाच्या पाच चिलमी फुंकून आपण उठलो आहोत. हिराबाईच्या छोट्या आरशात त्यानं तोंड पाहिलं. त्याचे डोळे इतके लाल कसे झाले?

हिराबाई परत आली तेव्हा हसून त्यानं म्हटलं–"आता तुम्ही पहारा करा गाडीवर. मी येतोच इतक्यात."

हिरामननं प्रवासी पिशवीतून धुवट गंजीफ्राक काढलं, हातात बादली लटकावली आणि तो निघाला. बैलांनी हुंक-हुंक करून पुन्हा पुन्हा त्याला काही सांगितलं. जाता जाता वळून हिरामननं म्हटलं–"हां हां, माहीत आहे. तहान सगळ्यांनाच लागलीय. परत आल्यानंतर देईन घासपाणी. बदमाशी करू नका."

बैलांनी कान हालवले.

आंघोळ वगैरे आटोपून हिरामन कधी परतला ते हिराबाईला कळलंच नाही. कजरीच्या पाण्याकडे पाहता पाहता रात्रभर उडालेली झोप तिच्या डोळ्यात उतरली होती.

जवळच्या गावातून हिरामन फराळासाठी दही, पोहे, साखर वगैरे घेऊन आला होता.

"उठा, झोप उडवा जरा. दोन घास फराळ करा."

हिराबाईनं डोळे उघडले आणि तिला नवलच वाटलं. एका हातात मातीच्या कोऱ्या भांड्यात दही, केळीची पानं आणि दुसऱ्यात बादली भरून पाणी. डोळ्यात स्नेहानं भरलेली विनंती.

"कुठनं आणलंस इतकं सगळं?"

"इथलं दही मोठं नामी आहे...फारबिसगंजला गेल्यानंतरच कुठं मिळू शकेल असलं दही."

हिरामनच्या अंगातल्या गुदगुल्या नाहीशा झाल्या. हिराबाईनं म्हटलं—"तूही घे पान...का? तू नसशील खाणार तर उचल सगळं आणि ठेव आपल्या झोळीत. मीसुद्धा नाही खाणार."

"इस्स!" हिरामन लाजून म्हणाला—"बरं तर. आपण आधी खाऊन घ्या."

"आधी आणि नंतर कशाला? तूही बस."

हिरामनचा जीव गोळा झाला. हिराबाईनं आपल्या हातानं त्याचं पान मांडलं. पाणी शिंपडलं आणि पोहे वाढले. इस्स! धन्य, धन्य! हिरामन पाहात होता: भगवती मैय्या नैवेद्य घेतेय. लाल ओठांवर—गोरस ओघळतोय...पहाडी पोपटाला दूधभात खाताना पाहिलंय?

दिवस ढळला.

गाडीत झोपलेल्या हिराबाईचे आणि जमिनीवर दरी अंथरून झोपलेल्या हिरामनचे डोळे एकाच वेळी उघडले...जत्रेला जाणाऱ्या गाड्या तेगछिया तळावर थांबल्या आहेत. पोरं कलकलाट करताहेत.

हिरामन गडबडून उठला. गाडीच्या आत वाकून म्हणाला, "दिवस ढळला." गाडीला बैल जोडताना त्यानं गाडीवानांच्या प्रश्नांकडे लक्ष दिलं नाही. गाडी हाकताना म्हणाला—"सिरपुर बाजारच्या इस्पितळातली डागदरीन आहे. रोगी पाहायला चाल्लीय जवळच. कुडमागाव."

हिराबाई छत्तापूर-पचीऱ्याचं नाव विसरली. गाडी थोडं अंतर चालून गेल्यावर हसत हसत म्हणाली—"पत्तापुर-छपीरा कुठं गेलं?"

हिरामनची हसून हसून मुरकुंडी वळली. "पत्तापूर-छपीरा? हा! हा! अहो ते लोक छत्तापुर-पचीऱ्याचेच होते. त्यांना कसं सांगणार? ही—ही!"

हसत हसत हिराबाईनं गावाकडे नजर वळवली.

सडक तेगछिया गावाच्या मधूनच जात होती. पडदेवाली गाडी पाहताच गावातली

पोरं टाळ्या वाजवून पाठ केलेल्या ओळी म्हणायला लागली—

लाली लाली डोलिया में
लाली रे दुलहिनिया
पान खाये...

हिरामनला हसू आलं...दुलहिनिया...लाली-लाली डोलिया...दुल्हन पान खाते, दुल्ह्याच्या फेऱ्याला तोंड पुसते. ओ दुलहिनिया, तेगछिया गावाच्या पोरांना विसरू नको बरं! परत येतेवेळी गुळाचा लाडू घेऊन ये. लाखो वर्षे संसार कर तुझ्या नवऱ्याबरोबर. किती दिवसांपासूनची इच्छा पुरी झाली हिरामनची. किती स्वप्नं पाहिली आहेत त्यानं असली! आपल्या नवरीला घेऊन तो घरी परततो आहे. गावागावातली पोरं वाटेवर टाळ्या वाजवून गाणी म्हणताहेत. घराघरातल्या अंगणातून वाकवाकून बायका बघताहेत. पुरुष मंडळी विचारताहेत, कुठली गाडी हो? कुण्या गावाला जायची? मग त्याची नवरी पडदा किलकिला करून पाहाते...अशी कितीतरी स्वप्नं...

गावातून बाहेर निघताच त्यानं कनातीत वाकून पाहिलं, हिराबाई कसल्या तरी विचारात गढली होती. मग तोही कसल्या तरी विचारात गढून गेला. मग थोड्या वेळानं गुणगुणायला लागला :

सजन रे झूट मति बोलो, खुदा के पास जाना है।
नहीं हाथी, नहीं घोडा, नहीं गाडी...
वहां पैदल ही जाना है। सजन रे...

हिराबाईनं विचारलं, "काय रे मीता, तुझ्या स्वतःच्या बोलीतलं गीत नाही का एखादं?"

हिरामन आता सरळ तिच्या डोळ्याला डोळा भिडवून बोलू लागलाय. कंपनीतली बाईही अशी असू शकते? सरकस कंपनीची मालकीण मेमसाहेब होती. पण हिराबाई... गावच्या बोलीतलं गाणं ऐकू म्हणतेय. तो मनमोकळं हसला. "गावची बोली समजेल तुम्हांला?"

"हूंऽऽ!" हिराबाईनं मान हालवली. कानातले झुमके हालले.

हिरामन काही वेळ गुपचूप बैल हाकत राहिला. मग म्हणाला – "गीत ऐकणारच का? बेत बदलणार नाही? इस्स! खेडवळ गाणं ऐकण्याची इतकी आवड आहे तुम्हांला? तर मग चाकोरीतून बाहेर व्हायला लागेल. चालू रस्त्यावर गाणं कसं म्हणणार कुणी?" हिरामननं डाव्या बैलाचा कासरा खेचून उजव्याला चाकोरीतून बाहेर घेतला. म्हणाला – "मग हरिपुरवरून नाही जाता येणार."

सरळ चाकोरी तोडून जाताना पाहून हिरामनच्या मागनं येणाऱ्या गाडीवानानं

ओरडून विचारलं – "काहे हो गाडीवान ! वाट सोडून कुठं निघाला तिकडे भलतीकडे?"

हिरामननं चामड्याची वादी हवेत फिरवीत उत्तर दिलं – "भलतीकडे कुठं ? हा रस्ता नननपुरला जातोय थोडाच ?" मग स्वतःशीच बडबडत राहिला – "या मुलखातल्या लोकांची ही सवयच वाईट. एका रात्रीत शंभर सवाल विचारतील. अरे बाबा, तुम्हांला जायचं आहे तर जा त्या रस्त्यानं...खेडवळ हुच्च सगळे !"

नननपुरच्या सडकेवर गाडी आणून हिरामननं कासरा ढिला सोडला. बैलांनी दुडकी चाल सोडून संथपणे चालायला सुरुवात केली.

हिराबाईनं बघितलं, खरंच नननपूरची सडक अगदी सुनसान आहे. हिरामनला तिच्या डोळ्यांची भाषा समजली. "भ्यायचं कारण नाही. ही सडकसुद्धा फारबिसगंजलाच जाते. राइघाटचे लोक तसे चांगले आहेत...एक प्रहर रात्रीपर्यंत पोचू आपण."

हिराबाईला फरबिसगंजला पोचण्याची मुळीच घाई नाही. हिरामनवर आता तिचा इतका विश्वास बसला आहे की भय-चिंतेला तिच्या मनात मुळीच थारा नाही. हिरामननं आधी पोटभर हसून घेतलं. कुठलं बरं गाणं म्हणायचं ? हिराबाईला गाणंही आवडतं आणि गोष्टही. इस्स ! महुआ घटवारिन ? तो म्हणाला – "अच्छा, तुम्हांला इतका शौक आहे तर महुआ घटवारणीचं गाणं ऐकवतो. त्यात गाणं आहे तशीच कहाणीसुद्धा आहे."

किती दिवसांनी आई भगवतीनं हीसुद्धा इच्छा पुरी केली आज. जै भगवती.... आज हिरामन आपल्या मनची सारी हौस पुरवून घेणार आहे. हिराबाईच्या चेहऱ्यावरून हळू पाझरणाऱ्या हास्याकडे तो पाहात राहिला.

"ऐका. आजसुद्धा परमान नदीवर महुआ घटवारनीच्या नावचे कितीतरी जुने घाट आहेत. याच मुलखातली होती महुआ. होती नदी-घाटावरची कोळीण, पण शंभर सतीसावित्रीत एक अशी होती. तिचा बाप दिवसरात्र दारू-ताडी पिऊन बेहोष पडलेला असायचा. तिची सावत्र आई होती साक्षात राक्षसीण. नजरेची मोठी बेरकी होती. रात्रीच्या वेळी गांजा, दारू, अफू चोरून विकणाऱ्यांपासून तो तऱ्हेतऱ्हेच्या लोकांपर्यंत तिची जानपछान होती. सगळ्यांबरोबर घटकेत देवघेव जमायची. महुवा कुवारीण होती. पण राक्षसणीनं कामाच्या ओझ्याखाली तिची हाडं बाहेर काढली होती. वयात आली पण शादी-सोयरिकीची कुणी गोष्ट काढीना. आता एका रात्री काय झालं ते ऐका."

हिरामननं हलक्या आवाजात गुणगुणत गळा साफ केला.

"हेऽऽ सावनाऽ भादवा केऽरऽ उमडल नदीयाऽ गे मैऽयोऽऽऽ, मैयो
गे रैनी भयावनि हेऽऽ तडका तडके धडके करेज आऽऽऽ
मोरा की हुमहु जे बारी गान्ही रेऽऽ ...

"आई ग, श्रावणभाद्रव्यातली ही भरून आलेली नदी, भयाकुल रात्र, विजा कडकडताहेत, मी कोवळी कुवारीण लहान पोर, माझं काळीज धडधडतंय. एकटी कशी जाऊ घाटावर? आणि तेसुद्धा परदेशी वाटसराच्या पायाला तेल चोळायला? सावत्र आईनं दार बंद केलं. कोयंडा लावला. आकाशात मेघांचा गडगडाट झाला आणि भरभरून पाऊस ओतायला लागला. महुआ रडायला लागली आपल्या मेलेल्या आईची आठवण काढून. आज आई असती तर अशा भयंकर रात्री पोटाशी घट्ट धरून बसली असती आपल्या महुआ बेटीला. गे आई, या असल्या घडीसाठी, हे दिवस दाखवायला का तू आपल्या कुशीत जन्म दिलास? महुवा आपल्या आईवर राग काढीत होती, का ती एकटी मेली म्हणून तळतळून बोलत होती."

हिरामननं पाहिलं, हिराबाई उशीवर कोपर टेकून गीतात गुंग होऊन त्याच्याकडं एकटक पाहात होती...भान हरपलेला चेहरा कसा भोळाभाबडासा दिसत होता.

हिरामननं गळ्यात कंप निर्माण केला.

"हूंऽऽ रे डाइनियां मैयों मोरीऽऽ, नोनवा चढाई काहे नाही
मारलि सांरी घरऽऽ एहि दिनवां खातिर
छिनरो धिया तेंहु पोसलि कि नैनू-दूध उटगन"

हिरामननं दम घेत विचारलं—"'भाखा' (भाषा) थोडीतरी कळतेय की आपलं नुसतं गाणंच ऐकताहात?"

हिरा म्हणाली—"समजतंय मला. उटगन म्हणजे उटणं...अंगाला लावतात ते."

हिरामन आश्चर्यानं उद्गारला—"इस्स!...तर रडण्या-गाण्यानं काय होणार? सौदागरानं महुआची पुरती किंमत भरली होती. केस पकडून ओढीत घेऊन गेला आणि नावेवर चढला. नावाड्याला हुकूम सोडला, नांगर उचल, शीड खोल. शिडाचं जहाज पंख पसरलेल्या पाखरासारखं उडत निघालं. रात्रभर महुआ रडत-तडफडत होती. सौदागराच्या नोकरांनी धाकदपटशानं तिला गप्प करण्याचा खूप प्रयत्न केला. गप्प बस, नाहीतर उचलून तुला पाण्यात फेकून देऊ. बस, महुआला कल्पना सुचली. पहाटेचा तारा ढगातून जरा बाहेर आला आणि पुन्हा लपला. आणि तितक्यात महुआनंही छपाक्‌कन् पाण्यात उडी घेतली...सौदागराचा एक नोकर महुआला पाहताच तिच्यावर आशिक झाला होता. त्यानंही तिच्या पाठोपाठ उडी मारली. प्रवाहाच्या उलट पोहणं म्हणजे काही खेळ नव्हे, आणि तेही भाद्रपदातल्या भरून वाहणाऱ्या नदीत. महुआ अस्सल घटवारणीची—घाटावर नाव चालवणाराची—बेटी होती. मासळी कधी पाण्यात थकते की काय! नदीत चढणाऱ्या मासळीसारखी फरफरत, पाणी चिरीत पळत चालली

आहे, आणि तिच्यामागे सौदागराचा नोकर ओरडून ओरडून म्हणतो आहे—'महुआ, जरा थांब, तुला पकडायला नाही आलेला मी, मी तुझा सांगाती आहे. आयुष्यभर तुझी सोबत हवी आहे मला...पण...'"

हिरामनचं मोठं आवडतं गाणं आहे हें. 'महुआ घटवारिन' गाताना त्याच्यासमोर श्रावणभाद्रपदातली नदी भरून वाहायला लागते, अमावास्येच्या रात्री ढगांनी भरून आलेल्या आभाळात राहून राहून वीज चमकायला लागते. त्या क्षणिक प्रकाशात लाटांशी झगडणारी कोवळी कुमारी महुआ त्याला दर्शन देऊन जाते. प्रवाह काटणाऱ्या मासळीची गती आणखी वाढते. त्याला वाटायला लागतं आपणच तो सौदागराचा नोकर आहोत. महुआ काहीच ऐकत नाही. प्रत्युत्तर देत नाही. वळून पाहातही नाही आणि आपण थकलो आहोत, पोहता पोहता...

या वेळी वाटतंय महुआनं स्वतःला पकडून दिलंय. स्वतःच आलीय पकडीत. त्यानं महुआला स्पर्श केलाय, आपलीशी केलीय, त्याची थकावट नाहीशी झालीय. पंधरावीस वर्षे भरून वाहणाऱ्या नदीत प्रवाहाच्या उलट पोहता पोहता आता त्याच्या मनाला किनारा गवसलाय. आनंदाची आसवं कसलाही बांध मानायला तयार नाहीत.

त्यानं हिराबाईपासून आपले ओलावलेले डोळे लपवण्याचा प्रयत्न केला. पण हिरा त्याच्या मनातच बसून नकळे कधीपासून सारं काही पाहात होती. आपला कापरा झालेला आवाज काबूत आणीत त्यानं बैलांना दटावलं—"या गाण्यात काय आहे कोण जाणे, ऐकता ऐकता दोन्ही रेंगाळायलाच लागतात. जसं काही कुणी शंभर मणांचं ओझंच घातलंय यांच्यावर." हिराबाई दीर्घ श्वास घेते. हिरामनच्या अंगांगातून आनंदाची लहर थरकून जाते.

"तू तर उस्ताद आहेस, मीता."

"इस्स!"

आश्विनकार्तिकाचा सूर्य दोन कासरे वर असतानाच कोमेजून जातो. सूर्य बुडण्याच्या आत ननपूरला पोचायचं आहे. हिरामन आपल्या बैलांना समजावतोय—"अरे पाय खोलून आणि कलेजा बांधून चाला. ए.. छिः छिः...आणखी जोरानं रे भय्यांनो...ले ले लेऽऽ हेयू."

ननपूरपर्यंत त्याचं बैलांना हाकारणं चालू आहे. प्रत्येक ललकारीच्या आधी तो आपल्या बैलांना मागल्या काळातल्या काही आठवणी सांगतो—"आठवतंय का, चौधरीच्या बेटीच्या वरातीत किती गाड्या होत्या आणि सगळ्यांना कसं मागं टाकलं आपण! हां—तसेच उचला पाय. लेलेले. ननपूरहून फारबिसगंज तीन कोस. दोन घंटे आणखी."

ननपूरच्या बाजारात आजकाल चहाही मिळायला लागलाय. हिरामन आपल्या लोट्यात चहा घेऊन आला. कंपनीच्या बायका माहीत आहेत त्याला. सारा दिवस कशा घटकेघटकेनं चहा पीत असतात. चहा म्हणजे प्राण.

हिराचा हसूनहसून जीव जातोय–"अरे तुला कुणी सांगितलं की कुवाऱ्या बाप्यानं चहा पिता नये म्हणून?"

हिरामन लाजला. काय बोलणार तो...शरमेची गोष्ट. एकदा भोगून चुकलाय तो. सरकस कंपनीच्या मेमच्या हातचा चहा पिऊन पाहिलाय त्यानं. भलता गरम पडतो.

"घ्या हो गुरुजी!" हिरा हसली.

"इस्स!"

ननपूरच्या बाजारातच दिवेलागणी झाली होती. हिरामननं आपला प्रवासी कंदील पेटवून पिछाडीला लटकावून दिला...आजकाल शहरापासून पाच कोस दूर राहणारेसुद्धा स्वतःला शहरी समजायला लागले आहेत. दिवा नसलेली गाडी पकडतात आणि खटला भरतात. बारा बखेडे!

"मला गुरुजी म्हणू नका तुम्ही."

"तू उस्ताद आहेस माझा. आमच्या शास्तरात लिहिलेलं आहे की एक अक्षर शिकवणारासुद्धा गुरू आणि एक राग शिकवील तो उस्ताद."

"इस्स! शास्तर-पुराणसुद्धा माहीत आहे तुम्हांला? मी काय शिकवलं...मी काय...?"

हिरा हसतहसत गुणगुणायला लागली–"हेऽऽऽ सावना भादवा केऽरऽ..." हिरामन आश्चर्यानं गुंग होऊन गेला. इस्स! भलती तिखट बुद्धी. हुबेहूब महुआ घटवारिन.

नाल्याच्या कोरड्या पात्राच्या उतारावर गाडी गडगडा खाली उतरली. हिराबाईनं एका हातानं हिरामनचा खांदा धरला हिरामनच्या खांद्यावर तिची बोटं बराच वेळ तशीच होती. कितीतरी वेळा हिरामननं नजर वळवून आपल्या खांद्याकडे पाहण्याचा प्रयत्न केला. गाडी चढावाला आली तेव्हा हिराची ढिली पडलेली बोटं पुन्हा घट्ट झाली.

समोर फारबिसगंज शहराचे दिवे झिळमिळताहेत. शहरापासून जरा दूर जत्रेचे दिवे ...गाडीच्या टपात लटकलेल्या कंदिलाच्या प्रकाशात सावल्या हालताहेत. डबडबलेल्या डोळ्यांना सगळे किरण सूर्यफुलासारखे भासताहेत.

फारबिसगंज म्हणजे हिरामनचं घरदारच आहे.

कोण जाणे किती वेळा आला आहे तो फारबिसगंजला. जत्रेचं माल घेऊन. आणि कुणा स्त्रीला घेऊन? हां, एक वेळ. त्या वर्षी त्याची वहिनी प्रथम सासरी आली होती. अशीच गाडीला चारी बाजूंनी ताडपत्री लावून आडोसा केला होता राहायला...

गाडीतळावर हिरामन आपल्या गाडीला चारी बाजूंनी ताडपत्री वेढतो आहे. सकाळ होताच रौना नौटंकी कंपनीच्या मॅनेजरबरोबर बोलणं करून भरती होईल हिराबाई. परवा जत्रा सुरू होणार आहे. या वेळी जत्रेत बरीच पालं न् तंबू पडले आहेत...बस्स, एक रात्र. आज रात्रभर हिरामनच्या गाडीत राहील...हिरामनच्या गाडीत नव्हे, घरात.

"कुठली गाडी हो?...कोण हिरामन? कुठल्या जत्रेतनं? कसलं सामान आणलं?"

एकाच गावचे गाडीवान एकमेकाला शोधून काढतात आणि गाड्या जवळजवळ लावून मुक्काम करतात. आपल्या गावचे लाल मोहर, धुन्नीराम आणि पलटदास वगैरे गाडीवान पाहून हिरामन गडबडला. तिकडे पलटदासनं गाडीच्या टपरात वाकून पाहिलं. आणि वाघ दिसावा तसा चमकला. हिरामननं खुणेनं सगळ्यांना गप्प केलं. मग गाडीच्या दिशेनं डोळा उडवीत कुजबुजला– "गप्. कंपनीची बाई आहे, नौटंकी कंपनीची."

"कंपनीचीऽऽऽ?"

"??...??...××...!"

एक नाही, आता चार हिरामन झालेत. चौघांनीही आश्चर्यानं एकमेकांकडे पाहिलं. तिवेही एकदम सटकायला पाहताहेत हे हिरामनच्या लक्षात आलं. लालमोहरनं जरा दूर होऊन बोलायची इच्छा दाखवली, इशाऱ्यानं. हिरामननं गाडीकडे तोंड करून म्हटलं– "हॉटेल तर आता उघडं नसणार कुठलं. हलवायाकडनं आणू काही तरी."

"हिरामन, जरा ऐक, इकडे ये...मी काही खाणार नाही आता. घे, तू खाऊन ये."

"काय आहे, पैसा? इस्स!...फारबिसगंजमध्ये कधी पैसा देऊन कच्चं-पक्कं खावं लागत नाही हिरामनला. त्याच्या गावचे इतके गाडीवान आहेत ते कशासाठी? पैशाला शिवणार नाही तो!" त्यानं हिराबाईला म्हटलं– "छट्, चारचौघात उगीच हुज्जत घालू नका. पैसे ठेवून द्या." संधी साधून लालमोहरही टपराजवळ आला. त्यानं सलाम करीत म्हटलं– "चार जणांच्या भातात आणखी दोघेजण सहज जेवू शकतात. तळावर चूल पेटलीय. हँ हँ हँ ...आम्ही सगळे एकाच गावचे आहोत. गावचे गावकरी असताना काय हाटेल आणि हलवायाकडचं खाईल हिरामन?"

हिरामननं लालमोहरचा हात दाबला– "उगीच वचावचा भकू नकोस."

गाडीपासून चार वाव दूर जाताच धुन्नीरामनं मनात चुळबुळ करीत असलेली गोष्ट उघड केली– "इस्स! तूसुद्धा बराच आहेस हिरामन. त्या वर्षी कंपनीचा वाघ, या वेळी कंपनीचा जनाना."

हिरामननं हलक्या आवाजात म्हटलं– "भाई रे, ही काही आमच्या मुलखातली बाई नव्हे लटपटपंची ऐकून गप्प बसायला. एक तर पश्चिमेकडली स्त्री आणि वर कंपनीमधली."

धुन्नीरामनं शंका प्रकट केली—"पण कंपनीत तर म्हणे वेश्या असतात."

"धत्!" सगळ्यांनी त्याला एकदम डाफरलं. "काय माणूस आहे! वेश्या कंपनीत असतात थोड्याच? काय अक्कल आहे बघा याची....ऐकलंय, पाहिलेलं नाही कधी."

धुन्नीरामनं आपली चूक कबूल केली. पलटदासला एक गोष्ट सुचली—"हिरामनभाई, बाई माणूस एकटीच राहणार गाडीवर? काही असो, बाईमाणूस ते बाईमाणूस. काही लागलं सावरलं तर?"

हे सगळ्यांना पटलं. हिरामन म्हणाला—"खरं आहे तुझं म्हणणं. पलट, तू जा परत आणि गाडीजवळ थांब. आणि हे बघा, गपसप जरा सावधपणंच कर, हां."

"हिरामनच्या अंगाला अत्तर-गुलाबाचा वास येतोय. हिरामन करमसांड आहे. मागल्या वेळी महिनेच्या महिने त्याच्या अंगाला वाघाची घाण येत होती." लालमोहरनं हिरामनच्या गमछीचा वास घेतला—"एऽह!"

हिरामन चालता चालता थांबला—"काय करावं लालमोहरभाई, सांग बरं. भलता आग्रह करतेय, म्हणते नौटंकी पाहायलाच हवी."

"फुकटातच?"

"आणि ही बातमी गावाला नाही का पोचायची?"

हिरामन म्हणाला—"छे रे बुवा! एक रात्र नौटंकी पाहायची आणि आयुष्यभर बोलणं कुणी खायचं?...देशी मुर्गी विलायती चाल."

धुन्नीरामनं विचारलं—"फुकटात बघितलं तरी सुद्धा तुझी भावजय रागावेल?"

लालमोहरनं तळ ठोकलाय त्याच्या बाजूलाच लाकडाचं दुकान लादून आलेल्या गाडीवानांचा पडाव झाला आहे. त्यातल्या पुढाऱ्यानं—गाडीवान मियांजान बुड्ढयानं—प्रवासी गुडगुडी पिता पिता म्हटलं—"क्यों भाई, मीनाबाजाराचं भाडं कुणी आणलं आहे आज?"

"मीनाबाजार. मीनाबाजार तर नाचणारणींच्या मोहोल्ल्याला म्हणतात...काय बोलतोय हा बुढा मियां?" लालमोहरनं हिरामनच्या कानात कुजबुजत म्हटलं—"तुझ्या अंगाला घमघम वास येतोय. खरंच."

लहसनवा हा लालमोहरच्या नोकरीला असलेला गाडीवान आहे. वयानं सर्वांत लहान. पहिल्यानंच आला असला म्हणून काय झालं? बाबूलोकांकडे लहानपणापासून काम केलेलं आहे त्यानं. तो राहून राहून नाक वर चढवून कसला तरी वास घेतोय. हिरामननं पाहिलं, लहसनवाचा चेहरा लाल झाला आहे...अरे, हा कोण येतोय दाणदाण धावत? कोण, पलटदास? काय झालं?

पलटदास येऊन गुपचूप उभा राहिला. त्याचं तोंडही लालेलाल झालं होतं. हिरामननं विचारलं—"काय झालं? अरे बोलत का नाहीस?"

पलटदास काय उत्तर देणार? हिरामननं आधीच त्याला इशारा दिला होता की गपसप जरा संभाळूनच कर म्हणून. तो गुपचूप गाडीच्या आसनीवर जाऊन बसला, हिरामनच्या जागेवर. हिराबाईनं विचारलं—"तूही हिरामनचा साथी का?" पलटदासनं मान हालवून होकार दिला. हिराबाई पुन्हा लवंडली. चेहरा-मोहरा आणि बोलणं-चालणं पाहून ऐकून का कोण जाणे पलटदासचं काळीज धडधडायला लागलं. हां! राम-लीलेमध्ये सियासुकुमारी थकून अशीच निजली होती. जै! सियावर रामचंद्र की जै... पलटदासच्या मनात जयजयकार सुरू झाला. हाताच्या हालचालीनं त्यानं थकलेल्या सीतामहाराणीचे चरण चुरण्याची इच्छा प्रकट केली. बाजाच्या पेटीवर फिरावी तशी त्याची बोटं हालली. हिराबाई चमकून उठून बसली..."अरे पागल आहेस का? चल नीघ इथून."

रागावलेल्या या कंपनीच्या बाईच्या डोळ्यातून छटक-छटक ठिणग्या उडताहेत असा पलटदासला भास झाला. तो पळाला...

पलटदास उत्तर काय देणार? आता जत्रेतूनच कसं पळावं याचा तो विचार करतोय. म्हणाला—"काही नाही. एक व्यापारी भेटला. आताच ठेसनावर जाऊन माल लादायचाय. भात व्हायला तर अजून उशीर आहे. तोपर्यंत येतो मी परत."

जेवताना धुन्नीराम आणि लहसनवा यांनी पलटदासची टोपलीभर निंदानालस्ती केली... अगदी छोटा माणूस, हलकट. पैसा पैसा मोजतो. खाणंजेवणं झाल्यावर लाल मोहरच्या लोकांनी आपला तळ उठवला, धुन्नी आणि लहसनवा गाडी जोडून हिरामनच्या तळावर गेले. हिरामननं चालता चालता थांबून लालमोहरला म्हटलं—"जरा माझ्या खांद्याचा वास घेऊन बघ बरं. बघ तर."

लालमोहरनं हुंगलं आणि डोळे मिटले. तोंडातून अस्पष्ट आवाज उमटला—"एऽह!"

हिरामननं म्हटलं—"जरासा हात ठेवला तर इतका सुगंध...काय समजलास?"

लालमोहरनं हिरामनचा हात पकडला—"खांद्यावर हात ठेवला होता? खरंच... ऐक हिरामन, नौटंकी बघायची अशी संधी पुन्हा नाही मिळायची बघ."

"तूही बघशील?"

लालमोहरची बत्तिशी चौकातल्या प्रकाशात चमकली.

तळावर पोचताच हिरामननं पाहिलं की गाडीपाशी उभा राहून कुणीतरी हिराबाईशी गोष्टी करीत होता. धुन्नी आणि लहनसनवा यांनी एकदमच म्हटलं—"अरे कुठं राहिला होतात मागं? किती वेळ वाट पाहतेय कंपनी..."

हिरामननं गाडीजवळ जाऊन पाहिलं–"अरे हा तर पेटी उचलणारा नोकर. चंपानगरच्या जत्रेत हिराबाईला गाडीत बसवून अंधारात नाहीसा झाला होता."

"आलास हिरामन! बरं झालं, इकडे ये. हे तुझं भाडं आणि ही दच्छिना. पंचवीस-पंचवीस पन्नास."

हिरामनला वाटलं आपणाला कुणीतरी अस्मानातून जमिनीवर ढकलून दिलं आहे. कुणीतरी का? या पेटी उचलणाऱ्या माणसानं. कुठून आला? तोंडावर आलेले शब्द तोंडातच राहिले...'इस्स! दच्छिना.' तो गुपचूप उभाच राहिला.

हिराबाई म्हणाली–"घे, धर. आणि ऐक, उद्या सकाळी रौता कंपनीत येऊन भेट मला. पास बनवून देईन...बोलत का नाहीस?"

लालमोहरनं म्हटलं–"इनाम बक्षीस देते आहे मालकीन. घे रे हिरामन." हिरामननं लालमोहरकडे रोखून बघितलं. बोलायची जरासुद्धा अक्कल नाही या लालमोहरला.

धुन्नीरामचं स्वगत भाषण सगळ्यांनी ऐकलं–हिराबाईनंही. 'गाडीबैल सोडून जत्रेमध्ये नौटंकी बघणं कसं जमणार कुठल्याही गाडीवानाला?'

हिरामननं पैसे घेता घेता म्हटलं–"काय बोलणार?" त्यानं हसण्याचा प्रयत्न केला... कंपनीची बाई कंपनीत चालली आहे. हिरामनचं काय त्यात? पेटी उचलणारा माणूस रस्ता दाखवीत पुढं निघाला–"इकडनं." हिराबाई जाता जाता थांबली. हिरामनच्या बैलांना उद्देशून म्हणाली–"अच्छा, मी निघाले भय्यांनो."

भैय्या शब्द ऐकून बैलांनी कान हालवले.

"??...??...××...!"

"...बं–धूं–नो. आज रात्री! दि रोता संगीत नौटंकी कंपनीच्या स्टेजवर! गुलबदन बघा गुलबदन! आपल्यासाठी आनंदाची बातमी! मथुरामोहन कंपनीची मशहूर ॲक्ट्रेस मिस हिरादेवी–जिचा एक एक अदा बघून हजार जान फिदा होतात ती हिरादेवी–यावेळी आमच्या कंपनीत आली आहे. लक्षात ठेवा. आजच्या रात्री. मिस हिरादेवी गुलबदन..."

नौटंकीवाल्यांच्या या घोषणेनं जत्रेच्या सगळ्या पट्ट्यात उत्साहाचं वातावरण पसरतंय. हिराबाई? मिस हिरादेवी? लैला, गुलबदन...? फिलिम एक्ट्रेसवर मात करतं...तेरी बाकी अदा पर मैं खुद हूं फिदा, तेरी चाहत की दिलबर क्या बयां करूं! यही ख्वाहिश है किऽऽ तू मुझको देखा करे और दिलोजान मैं तुमको देखा करूं...किर्रर्र ऽऽ... कड़ड़ डर्र...र्र...घन-बन-घडाम.

दर माणसाचा दिल नगाऱ्यासारखा धडधडायला लागलाय.

लालमोहर धावत धापा टाकीत तळावर आला. 'ऐ–ऐ हिरामन, अरे इथं काय

बसलाहेस. चल बघ लवकर कसा जयजयकार चालला आहे. बाजा-गाजा, छापी-फाहरम, या सगळ्याच्या साथीत हिराबाईची जै-जै चालली आहे."

हिरामन गडबडून उठला. लहसनवा म्हणाला-"धुन्नीकाका, तुम्ही जरा इथं तळावर थांबा. मीसुद्धा बघून येतो."

धुन्नीचं कोण ऐकतो? तिघेहीजण नौटंकी कंपनीच्या जाहिरात पार्टीच्या मागं मागं चालायला लागले. दर नाक्यावर थांबून, बाजा बंद करून घोषणा होते. घोषणेतला प्रत्येक शब्द ऐकताना हिरामन मोहरून उठतो आहे. हिराबाईचं नाव, आणि त्या नावाबरोबर येणारे अदा-फिदा वगैरे शब्द ऐकून त्यानं लालमोहरची पाठ थोपटली. "धन्न, धन्न आहे. आहे की नाही?"

लालमोहरनं म्हटलं-"आता बोल! आता तरी नौटंकी बघशील की नाही?" सकाळपासून धुन्नीराम आणि लालमोहरनी समजावता समजावता हात टेकले होते... "कंपनीत जाऊन भेटून ये. जाता जाता आग्रह करून गेली आहे." पण हिरामनचं एकच उत्तर-"धत्! कोण जाणार भेटायला! कंपनीची बाई, कंपनीत निघून गेली. आता तिचा आपला काय संबंध? ओळखायचीसुद्धा नाही."

तो मनातल्या मनात फुरंगटलेला होता. जाहिरात ऐकल्यानंतर त्यानं लालमोहरला म्हटलं-"जरूर बघायला हवी. काय लालमोहर?"

दोघेही आपसात सल्लामसलत करीत रौता कंपनीच्या दिशेनं जायला लागले. तंबूजवळ पोचल्यावर हिरामननं लालमोहरला खुणावलं की, "पूसतपास करण्याचं काम तुझं." लालमोहरला शहरी बोली येते. त्यानं एका काळा कोटवाल्याला म्हटलं-"बाबूसाहेब, असं बघा..."

काळा कोटवाल्यानं आठ्या चढवून म्हटलं-"काय रे, इकडे काय काम तुमचं?"

लालमोहरची शहरी भाषा गडबडली. तो रागावलेला पाहून म्हणाला-"गुल्बुल... नाही नाही...बुल्बुल...नाही..."

हिरामननं झटकन त्याला संभाळून घेतलं-"हिराबाई कुठं राहाते सांगाल का?"

त्या माणसाचे डोळे एकदम लाल झाले. समोर उभ्या असलेल्या गुरख्याला हाक मारून तो म्हणाला-"या लोकांना इकडे कुणी येऊ दिलं?"

"हिरामन!..." तोच किणकिणता आवाज. कुठून आला बरं? तंबूचा पडदा बाजूला करून हिराबाईनं हाक मारली-"इकडे ये, आत...हे बघ बहादुर, याची ओळख ठेव नीट. हा माझा हिरामन. समजलं?"

गुरख्यानं हिरामनकडे पाहिलं आणि हसत हसत तो निघून गेला. काळा कोटवाल्याकडे जाऊन म्हणाला-"हिराबाईचा माणूस आहे. अडवू नको म्हणाली."

लालमोहर गुरख्यासाठी पान घेऊन आला – "खायलाच हवं!"

"इस्स! एक नव्हे पाच पास. सगळे आठ आणेवाले. म्हणाली इकडे आहेस तोवर रोज रात्री ये बघायला. सगळ्यांची आठवण आहे तिला. म्हणाली, तुझ्याबरोबर दोस्त आहेत, सगळ्यांसाठी घेऊन जा पास. कंपनीच्या बायकांची गोष्टच निराळी. आहे की नाही?"

लालमोहरनं लाल कागदाचे ते तुकडे नीट हाताळून बघितले – "पास! वा रे हिरामन भाई...पण पाच पास घेऊन काय करायचं? पलटदास तर परत आलेलाच नाही अजून."

हिरामन म्हणाला – "जाऊ दे अभाग्याला. त्याच्या नशिबात नाही...हां पण गुरू, सगळ्यांनी आधी शपथ घ्यायला हवी. गावाला गेल्यानंतर घरात ही गोष्ट या कानाची त्या कानाला कळता नये."

लालमोहर उत्साहानं म्हणाला – "कोण साला बोलणार आहे तिकडे जाऊन? पलट्यानं जर का बदमाशी केली तर पुन्हा आणणारच नाही त्याला बरोबर."

हिरामननं आज आपली थैली हिराबाईकडे संभाळायला दिली आहे. जत्रेत काय सांगता येतंय? हरतऱ्हेचे पाकीटमार लोक दरवर्षी येत असतात. आणि आपल्या दोस्त सोबत्यांचा तरी काय भरवसा? हिराबाईनं कबूल केलं. हिरामनची काळ्या कापडाची थैली तिनं आपल्या चामड्याच्या पेटीत ठेवून दिली. पेटीच्यावर कापडाची खोळ आणि आतसुद्धा रेशमी अस्तर. मनाचे पांग फिटले.

लालमोहरनं आणि धुन्नीरामनं हिरामनच्या डोक्याची तारीफ केली. त्याच्या भाग्याची वारंवार स्तुती केली. त्याच्या भावाची आणि भावजयीची निंदा केली... हलक्या आवाजात. हिरामन म्हणजे हिऱ्यासारखा भाऊ मिळाला आहे म्हणून, दुसरा एखादा भाऊ असता तर...

लहसनवाचं तोंड उतरलं आहे. नौटंकीची जाहिरात ऐकता ऐकता कुठपर्यंत पोचला होता कोण जाणे! आता घडीभर सांज झाल्यानंतर परतला आहे. लालमोहरनं मालकाच्या नात्यानं झाडंपट्टी केली आहे. शिवीगाळीसह – सोदा कुठला.

धुन्नीरामनं चुलीवर खिचडी चढवता चढवता म्हटलं – "आधी हे ठरवा की, गाडी-जवळ कोण थांबणार आहे?"

"कोण म्हणजे? हा लहसनवा कुठं जाणार आहे?"

लहसनवा रडायला लागला – "हेऽऽ मालिक, पाया पडतो. फक्त एकदा, नुसती एक झलक."

हिरामननं उदारपणं म्हटलं – "अच्छा अच्छा, एक झलक का, चांगला घंटाभर पाहा. मी येईन."

नौटंकी सुरू व्हायच्या आधी दोन तास आधीच नगारा वाजायला लागतो आणि नगारा वाजायला लागताच लोक पतंगांसारखे तुटून पडायला लागतात. तिकीटहपिसा-जवळची गर्दी पाहून हिरामनला हसून लोटलं.–"लालमोहर, तिकडे बघ लोक कसे धक्काबुक्की करताहेत."

"हिरामनभाय!"

"कोण पलटदास? कुठलं भाडं घेऊन आलास?" लालमोहरनं परक्या गावच्या माणसाप्रमाणं प्रश्न केला.

हात चोळीत चोळीत पलटदासनं माफी मागितली. "चूक माझी आहे, तुम्ही लोक जी सजा द्याल ती भोगायला तयार आहे मी. पण खरी गोष्ट सांगायची म्हणजे सियासुकुमारी..."

हिरामनच्या मनाचं कमळफूल नगाऱ्याच्या तालाबरोबर पूर्ण फुललं आहे. म्हणाला–"हे बघ पलटा, ती गावघरातली बाई आहे असं नको समजू. बघ तुझ्यासाठीसुद्धा पास दिला आहे तिनं. पास घे आपला आणि तमाशा बघायला जा."

लालमोहरनं म्हटलं–"पण एका अटीवर पास मिळेल. मधनं मधनं लहसनवाला सुद्धा..."

"पलटदासला काही सांगायची गरज नाही. तो येताना लहसनवाशी बोलणं करूनच आलेला आहे."

लालमोहरनं आता दुसरी अट घातली–"गावात जर काही गोष्ट कळली..."

"राम राम!" जीभ चावीत पलटदासनं म्हटलं.

"आठआणेवालं फाटक इकडे आहे." पलटदासनं दाखवलं. दारावर उभ्या असलेल्या दरवानानं पास हातात घेऊन पुन्हा पुन्हा त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. म्हणाला..."हा तर पास आहे. कुठून मिळाला?"

आता लालमोहरची शहरी बोली कुणीही ऐकून घ्यावी. त्याचा राग बघून दरवानही घाबरला.–"कुठून मिळणार? आत जाऊन विचारा आपल्या कंपनीला. चारच नाहीत, बघा आणखीही एक आहे." खिशातून पाचवा पास काढून दाखवला लालमोहरनं.

एक रुपयावाल्या फाटकावर नेपाळी दरवान उभा होता. हिरामननं ओरडून त्याला विचारलं, "ए शिपाईबाबू, आज सकाळीच ओळख करून दिली आणि विसरलात एवढ्यात?"

नेपाळी दरवान म्हणाला–"हिराबाईचे लोक आहेत सगळे. सोड आत. पास असल्यावर अडवायचं काय कारण?"

आठ आणे क्लास.

तिघांनी 'कपडघर' प्रथमच आतून पाहिलं, समोर खुर्ची-बेंचवाले वर्ग आहेत. पडद्यावर राम-वनगमनाचं चित्र आहे. पलटदासनं ओळखलं. त्यानं हात जोडून नमस्कार केला पडद्यावर काढलेल्या राम, सियासुकुमारी आणि लखन लला यांना. जै हो, जै हो! पलटदासचे डोळे भरून आले.

हिरामन म्हणाला – 'लालमोहर, चित्रातले लोक उभे आहेत की चालताहेत?"

लालमोहरनं आपल्या आसपास बसलेल्या प्रेक्षकांशी ओळखपाळख जमवली आहे. त्यानं म्हटलं – "खेळ अद्याप पडद्याच्या आतच आहे. आता लोक जमवण्यासाठी ही नुसती जाहिरात आहे."

पलटदासला ढोलकी वाजवता येते. त्यामुळं नगाऱ्याच्या तालावर मान हालवून तो काड्याच्या पेटीवर ठेका धरतो आहे. विडीकाडी देऊन घेऊन हिरामननंही आतापर्यंत एखाददुसरी ओळख करून घेतली आहे. लालमोहरच्या ओळखीच्या माणसानं शाल पांघरून घेत म्हटलं – "नाच सुरू व्हायला अजून वेळ आहे तोवर एक झोप काढावी म्हणतो...सगळ्या वर्गात अठनिया दर्जा चांगला. सगळ्यात मागं, सगळ्यात उंच जागी आहे. जमिनीवर गरम गरम गवत. हे–हे! खुर्ची-बेंचवर बसून अशा थंडीच्या मोसमात तमाशा बघणारे आता धुच-धुच करून चहा प्यायला उठतील."

त्या माणसानं आपल्या सोबत्याला म्हटलं – "खेळ सुरू झाला की उठव. नाही नाही. खेळ सुरू झाल्यावर नको. हिरिया जेव्हा स्टेजवर उतरेल ना तेव्हाच जागा कर मला."

हिरामनच्या काळजाला जराशी आच लागली...हिरिया! मोठा लटपट्या माणूस दिसतो. त्यानं लालमोहरला डोळ्यानं खुणावलं. या माणसाशी बोलायची गरज नाही.

...घन – घन – घन – धडाम. पडदा उघडला. हेऽ, हेऽ, हिराबाई सुरवातीलाच स्टेजवर आली. कपडघर खेचाखेच भरलंय. हिरामनचं तोंड आश्चर्यानं उघडं पडलंय. लालमोहरला का कोण जाणे खूप हसू लोटतंय. हिराबाईच्या दर गाण्याला उगीच हसतो आहे.

गुलबदनचा दरबार भरला आहे. ती घोषणा करते आहे : जो आदमी तख्त हजारा बनाकर ला देगा, मुंहमांगी चीज इनाम में दी जाएगी...अजी, है कोई ऐसा फनकार, तो हो जाए तैयार, बनाकर जाए तख्त हजाराऽऽ, किड्किड् किर्र...मोकळेपणे नाचते आहे. काय गळा आहे. माहीत आहे, हा माणूस म्हणतो की हिराबाई पान-बिडी सिगारेट-जर्दा कशालाही शिवत नाही...खरं आहे तो म्हणतो ते. बडी नेमवाली रंडी आहे...कोण म्हणतो रंडी आहे म्हणून! दातांना मिस्सी कुठं आहे...पावडरनं दात धूत असेल. शक्य नाही...कोण माणूस हा एकाचे दोन करणारा! कंपनीच्या बाईला वेश्या म्हणतो! अरे तुला कां खुपतं! कोण रे तो रांडेचा भडवा! मारो साले को, मारो. तेरी...

हा धुमाकूळ माजला आहे आणि त्यातून तंबू फाडून हिरामनचा आवाज वर उसळतो आहे—"या, या, एकेकाची मुंडी उतरून ठेवतो."

लालमोहर समोरच्या लोकांना फटाफट चाबूक लगावतो आहे, पलटदास एका माणसाच्या छातीवर बसला आहे—"साला सियासुकुमारीला शिव्या देतो...आणि स्वतः मुसलमान असून..."

कंपनीचा काळा कोटवाला मॅनेजर नेपाळी शिपायाला घेऊन तिथं धावत आला. दरोग्यानं हंटरनं फटकावायला सुरुवात केली. हंटरच्या फटक्यानं लालमोहर तिरमिरला आणि शहरी बोलीत भाषण करायला लागला—"दरोगासाहेब, मारताहात मला? मारा! काही हरकत नाही. पण हा पास बघा आधी. एक पास आणखीही आहे पाकिटात. बघा हुजूर, बघून घ्या. तिकिट नाही, पास आहे...तर मग आमच्यासमोर कंपनीच्या बाईबद्दल कुणी वाकडा शब्द उच्चारला तर कसा ऐकून घ्यावा आम्ही?"

कंपनीच्या मॅनेजरला सगळा उलगडा झाला. त्यानं दरोग्याला समजावलं—"हुजूर, लक्षात आलं सारं. ही सगळी बदमाशी मथुरामोहन कंपनीवाल्यांची आहे. तमाशात झगडा उभा करून कंपनीला बदनाम...नाही हुजूर, या लोकांना सोडून द्या. हिराबाईचे लोक आहेत. बिचारीचा जीव धोक्यात आहे. हुजूरना सांगितलंच होतं आधी..."

हिराबाईचं नाव ऐकताच दरोग्यानं तिघांनाही सोडून दिलं, पण तिघांचेही चाबूक काढून घेतले. मॅनेजरनं तिघांनाही एक रुपयेवाल्या खुर्च्यांवर बसवलं—"आपण इथं बसा.. पान पाठवतो." कनातीत पुन्हा शांतता झाली आणि हिराबाई स्टेजवर आली. नगारा पुन्हा घडघडायला लागला.

जरा वेळानं तिघांनाही एकदम धुन्नीरामची आठवण झाली, "अरे, धुन्नीराम कुठं गेला?"

"मालिक! ओ मालिक!" लहसनवा तंबूच्या बाहेर मोठमोठ्यानं हाका मारतो आहे—"ओ लालमोहर मालिक!'

लालमोहरनं तारस्वरात उत्तर दिलं—"इकडे, इकडे, एक टकिया फाटकातून ये." सगळ्या प्रेक्षकांनी लालमोहरकडे वळून पाहिलं. नेपाळी शिपाई लहसनवाला लालमोहरकडे घेऊन आला. लालमोहरनं खिशातला पास काढून दाखवला. लहसनवानं आल्याबरोबर विचारलं, "मालक कुठला माणूस काय बोलत होता? सांगा तरी. त्याचं तोंड दाखवा, एक झलक."

लोकांनी लहसनवाची रुंद सपाट छाती पाहिली. थंडीच्या दिवसांतही उघडा देह... चेल्या-चपाटयांसह आलेत हे लोक. लालमोहरनं लहसनवाला शांत केलं.

...तिघा-चौघांनाही नौटंकीत काय पाहिलं ते विचारू नका. गोष्ट कशी लक्षात

राहणार. हिरामनला वाटतंय, हिराबाई सुरुवातीपासूनच त्याच्याकडे टक लावून बघत गातेय, नाचतेय. लालमोहरला वाटतंय, हिराबाई आपल्याकडेच बघतेय, लालमोहर हिरामनपेक्षा जास्त पावरवाला आदमी आहे असंच तिला वाटतंय. पलटदासला गोष्ट समजतेय...आणखी काय असणार – तीच रामैनाची गोष्ट. तोच राम, तीच सीता, तोच लखनलला आणि तोच रावण. सियासुकुमारीला रामजीपासून पळवून नेण्यासाठी रावण तऱ्हेतऱ्हेची रूपं घेऊन येतो. राम आणि सीताही रूपं बदलतात. इथंही तख्त-हजार बानवणारा माळ्याचा पोर रामच आहे. गुलबदन सियासुकुमारी आहे. माळ्याच्या मुलाचा दोस्त म्हणजे लखनलला आणि सुलतान म्हणजे रावण...धुन्नीरामला जोराचा ताप चढलाय. लहसनवाला सगळ्यात आवडला जोकरचा पार्ट...चिरैया तोंहके लेके ना, जइबे नरहट के बजरिया. जोकरबरोबर दोस्ती जमवायची इच्छा आहे त्याची...नाही करणार दोस्ती जोकरसाहेब ?

एका गीताची अर्धी ओळ हिरामनच्या हाती लागली – 'मारे गये गुलफाम'. कोण होता हा गुलफाम ? हिराबाई रडत रडत गात होती – "अजी हां मारे गये गुलफाम !" टिडिडिडि...बिचारा गुलफाम !

तिघाच्याही चामड्याच्या वाद्या परत करताना पोलीसशिपायानं म्हटलं – "चाबूक-लाठ्या घेऊन नाच बघायला येता काय रे ?"

दुसऱ्या दिवशी जत्राभर ही वार्ता पसरली. हिराबाई मथुरामोहन कंपनीतून पळून आली आहे त्यामुळं यावेळी मथुरामोहन कंपनी आलेली नाही. फक्त तिचे गुंड आले आहेत. हिराबाईही काही कमी नाही. मोठी तगडी बाई आहे. बारा-बारा देहाती लाठीकाठीवाले पाळले आहेत तिने. काय बिशाद आहे कुणी नुसतं 'वाह रे मेरी जान' तरी म्हणेल !

दहा दिवस, दिवस-रात्र...

हिरामन दिवसभर भाडं करतो. संध्याकाळ होताच नौटंकीचा नगारा वाजायला लागतो. नगाऱ्याचा आवाज ऐकताच हिराबाईची हाक कानात घुमायला लागते.—भैया... मीता...हिरामन...उस्ताद...गुरुजी ! सारखा कसला तरी बाजा त्याच्या मनाच्या एका कोपऱ्यात वाजत राहतो, दिवसभर. कधी हार्मोनियम, कधी नगारा, कधी ढोलक, तर कधी हिराबाईच्या पायातले पैंजण. त्यांच्या साथीवर हिरामनचं उठणं-बसणं, चालणं फिरणं सुरू असतं. नौटंकी कंपनीच्या मॅनेजरपासून तो पडदे ओढणाऱ्यापर्यंत सगळे त्याला ओळखतात....हिराबाईचा माणूस आहे.

पल्टदास दर रात्री नौटंकी सुरू होण्याआधी श्रद्धापूर्वक स्टेजला नमस्कार करतो हात जोडून. लालमोहर एकदा हिराबाईला आपली शहरी भाषा ऐकवायला गेला होता.

हिराबाईनं ओळखलंच नाही. तेव्हापासून त्याचं तोंड एवढंसं झालं आहे. त्याचा नोकर लहसनवा आता त्याच्याकडून निसटला आहे आणि नौटंकी कंपनीत भरती झाला आहे. त्याची विदूषकाबरोबर दोस्ती झाली आहे. दिवसभर पाणी भरतो, कपडे धुतो. म्हणतो, 'आहे काय गावात परत जायला?' लालमोहर उदास असतो. धुन्नीराम आजारी पडून घरी गेला आहे.

हिरामन सकाळपासून भाडं घेऊन तीनदा स्टेशनावर जाऊन आला आहे. आज का कोण जाणे त्याला आपल्या भावजयीची सारखी आठवण येते आहे...धुन्नीरामनं तापात बरळताना काही सांगून तर टाकलं नसेल? इथंच कसा वडबड करीत होता—गुलबदन, तख्त-हजारा...लहसनवा मजेत आहे. दिवसभर हिराबाईकडे बघत असेल. काल म्हणत होता, हिरामन मालिक, तुमच्या आशीर्वादानं खूप मजेत आहे मी. हिराबाईची साडी धुतल्यानंतर घंगाळातलं पाणी अत्तरगुलाब होऊन जातं, मग त्यात आपला पंचा बुडवून ठेवून देतो. वास घेणार?...दररात्री कुणाच्या ना कुणाच्या तोंडून त्याला ऐकू येतं—हिराबाई रंडी आहे, किती लोकांबरोबर भांडणार? बिन बघताच कसं काहीतरी बोलतात लोक. राजालाही पाठीमागं शिव्या देणारे लोक असतातच...आज हिराबाईला भेटून सांगायचं, नौटंकी कंपनीत राहिल्यामुळं फार बदनामी करतात लोक, सरकस कंपनीत का जात नाही तुम्ही?...सगळ्यांसमोर नाचते, हिरामनचं काळीज भपभप जळत असतं त्यावेळी. सरकस कंपनीत वाघाला. वाघाच्या जवळ जायची कुणाची हिंमत होणार आहे? सुरक्षित राहील हिराबाई...कुठली गाडी येतेय?

"हिरामन, ए हिरामन भाय!" लालमोहरचा आवाज ऐकून हिरामननं मान वळवून पाहिलं...कसलं भाडं घेऊन आला आहे लालमोहर?

"तुला शोधतेय हिराबाई इस्टीशनावर. जाते आहे." एका दमात ऐकलं. जत्रेतून लालमोहरच्या गाडीतूनच आली.

"जाते आहे? कुठं? लालमोहर, रेलगाडीतून जातेय?"

हिरामननं गाडी सोडली. मालगुदामाच्या चौकीदाराला म्हटलं—"भैया, जरा गाडीबैलांकडे नजर ठेव. येतोच."

"उस्ताद!" ओढणीनं चेहरा झाकून हिराबाई बायकांच्या मुसाफिरखान्याच्या दारात उभी होती. थैली पुढं करीत म्हणाली—"घे हे भगवान! चला, भेट तरी झाली. माझी तर आशाच खुंटली होती. आता तुझी भेट होणं कठीण...मी जातेय गुरुजी."

पेटी वाहणारा माणूस आज कोट-पाटलोण घालून बाबूसाहेब बनलाय. मालकाच्या थाटात हमालाला हुकूम सोडतोय—"बायकांच्या डब्यात चढव. समजलं?"

हातात थैली घेऊन हिरामन गुपचूप उभा राहिला. कुर्त्याच्या आतून काढून दिली आहे थैली हिराबाईनं. चिमणीच्या अंगासारखी गरम आहे थैली.

"गाडी येतेय." पेटीवाल्यानं तोंड करीत हिराबाईकडे बघितलं. त्याचा भाव स्पष्ट आहे...इतकं काय आहे...?

हिराबाई हळवी झाली. म्हणाली—"हिरामन, इकडे ये, आत. मी पुन्हा परतून मथुरामोहन कंपनीत चाललेय. आपल्याच मुलखाची कंपनी आहे...बनैली जत्रेला येशील ना ?"

हिराबाईनं हिरामनच्या खांद्यावर हात ठेवला. यावेळी उजव्या खांद्यावर. मग आपल्या थैलीतून रुपये काढीत म्हणाली—"एक गरम शाल घे..."

हिरामनला इतक्या वेळानंतर आता आवाज फुटला—"इस्स ! दरवेळी रुपया—पैसा. ठेवा तुमचे पैसे. शाल काय करायचीय ?"

हिराबाईचा हात अडकला. तिनं हिरामनच्या तोंडाकडे निरखून पाहिलं. मग म्हणाली—"फार वाईट वाटतंय तुला, होय ना मीता ?...महुआ घटवारनीला सौदागरानं विकत घेऊन ठेवलंय ना गुरुजी !"

हिराबाईचा गळा भरून आला. पेटीवाल्यानं बाहेरूनच म्हटलं—"गाडी आली." हिरामन खोलीतून बाहेर आला. नौटंकीच्या विदूषकासारखं तोंड करीत पेटी उचलणारा तो माणूस म्हणाला—"प्लाटफारमाच्या बाहेर हो—पळ, नाहीतर विनाटिकट पकडून तीन महिने हवा खायला जाशील...'

हिरामन गुपचूप फाटकाबाहेर जाऊन उभा राहिला...टीशनाचा प्रश्न, रेलवेचं राज्य, नाहीतर या पेटीवाल्याचं थोबाड सरळ करून ठेवलं असतं हिरामननं.

हिराबाई सरळ समोरच्याच डब्यात चढली. इस्स ! किती ताण हा ! गाडीत बसल्यावरही हिरामनकडे बघतेय, टुकुरटुकुर....लालमोहर दिसताच संताप होतो, सारखा मागं मागं. हरघडी भागी करायला बघतो.

गाडीनं शिटी दिली. हिरामनला वाटलं, आपल्या अगदी आतूनही असाच कसला आवाज शिटीबरोबर वरवर चालला आहे...कूऽऽ...इस्स !

...छिईऽऽ छक्क. गाडी हालली. पायाचा उजवा अंगठा हिरामननं आपल्या डाव्या खोटेनं जोरात दाबला. काळजाची धडधड थांबली...हिराबाई हातातल्या बैंगणी रुमालानं तोंड पुसते आहे. रुमाल हालवून इशारा करते आहे—जा आता...शेवटचा डबा गेला, फलाट खाली झालं...सगळं खाली...पोकळ...मालगाडीचे डबे. सगळी दुनियाच रिती झालीय जणू. हिरामन आपल्या गाडीकडे परतला.

हिरामननं लालमोहरला विचारलं—"तू कधी परत जाणार आहेस गावाकडे ?"

लालमोहर म्हणाला – "आता गावाला जाऊन काय करायचं ? आता इथंच चांगलं भाडं मिळण्याचा मोका आहे. हिराबाई गेली तेव्हा आता जत्रा ओसरायला लागणार."

"ठीक आहे तर. घरी काही निरोप ?"

लालमोहरनं हिरामनचं मन वळवण्याचा प्रयत्न केला पण हिरामननं गाडी आपल्या गावाला जाणाऱ्या रस्त्याकडे वळवली..."आता जत्रेत उरलंय काय ? पोकळ झाली जत्रा."

बैलगाडीची कच्ची सडक दूरवर रेलवे लाइनच्या बाजूनं जाते. हिरामन कधी रेल-गाडीत बसलेला नाही. फार जुनी एक इच्छा पुन्हा त्याच्या मनात डोकावून गेली. रेलगाडीत बसून गाणी म्हणत म्हणत जगरनाथ धामाला जाण्याची...मागं वळून आपल्या गाडीच्या रिकाम्या टप्पराकडे बघण्याचा त्याला धीर होत नाही. आजही पाठ शिवशिवतेय. आजही राहून राहून चाफ्याचं फूल उमलतंय त्याच्या गाडीत. एका गाण्याच्या अर्ध्या कडव्यावर नगाऱ्याचा ताल तुटतोय...पुन्हा पुन्हा...

त्यानं वळून पाहिलं : पोती नाहीत, बांबू नाहीत, वाघही नाही...परी...देवी... मीता...हिराबाई...महुआ घटवारीन...कोणी नाही. मेल्या मुहूर्तांचे मुके आवाज मुखर होऊ बघताहेत. हिरामनचे ओठ हाल्ताहेत. कदाचित तो तिसरी कसम खातोय... कंपनीच्या बाईचं भाडं...

हिरामननं एकदम दोन्ही बैलांना हिसका दिला. चामड्याच्या वादीनं मारीत म्हणाला : "सारखे सारखे वळून रेलवे लायनीकडे काय बघताहात ?" दोन्ही बैलांनी दुडकी चाल घेतली. हिरामन गुणगुणायला लागला : "अजी हां, मारे गये गुलफाम..."

लंडनची एक रात्र

निर्मल वर्मा

मी दुसऱ्यांदा तेथे गेलो होतो. पहिल्या रात्री उशिरा पोचलो होतो. जाण्यापूर्वीच सर्व काम-वाटणी झालेली होती. मी परत गेटच्या बाहेर अनिश्चितपणे उभा होतो. वाटले की शेवटच्या क्षणी कदाचित कुणा माणसाची त्यांना जरुरी वाटेल व ते मला बोलावतील. कितीतरी वेळ धडधडाट करणाऱ्या यंत्रांतून सोड्याच्या बाटल्यांचे आवाज ऐकू येत. आमच्यापैकी ज्यांना काम मिळाले होते, ते भराभर सूट काढून कामाचे कपडे घालत होते.

बाहेर दालनात बोतली होत्या – फिक्या चांदण्यात चमकणाऱ्या, एकावर एक ओळीने, फॅक्टरीच्या भिंतीशी लावलेल्या. दुरून पाहणाऱ्याला वाटावे की जणू काचेच्या लांब डोंगरीवर बऱ्याचशा मांजरी एकमेकींचा गळे पकडून बसल्या आहेत.

मी उभा राहिलो. मग थोड्या वेळाने एक इंग्रज गृहस्थ माझ्याजवळ आले : "तुम्ही अजून उभेच ?..." मी म्हटले : "अं, आज काहीच नाही का ?..." त्याने आपले हात माझ्या खांद्यावर ठेवले.

"नाही, मी फक्त पाहात होतो." मी हळूच त्याचा हात खांद्यावरून वेगळा केला.

"उद्या पंधरा मिनिटे पूर्वी या. जर काही लोक कामावर नच आले तर तुम्हांला घेऊ. गुडनाइट !" आणि तो निघून गेला.

ही दुसरी रात्र. ट्यूब-स्टेशनच्या शिड्या चढून वर आलो, तर तेथे कालचे चांदणे आज एखाद्या अप्सरेप्रमाणे खुललेले, पसरलेले. दूर गिरण्यांच्या भोंग्यांतून लंडनचे धुरटलेले आभाळ आकुंचित झालेले.

मला परत वाट शोधावी लागली. मी त्याच वाटांवर परत चालू लागलो, ज्यांचा मागोवा काल घेतला होता. आता या वाटा ओळखीच्या झाल्या होत्या पण चांदण्यात विचित्र अपरिचित वाटल्या.

पण नॉर्थ ॲक्टनपासून थोड्या पुढे जाताना माझे पाय स्वतःच घुटमुळले. मी विचार केला होता की आज लौकर परतलो म्हणून गेटवर माझ्याशिवाय दुसरं कोणी नसेल. पण माझा अंदाज खरा नव्हता. तेथे पहिल्यापासूनच वीस-पंचवीस बेकार युवकांची गर्दी जमलेली. इंग्रज मुलं, काही विद्यार्थी, ते बर्मी वाटत होते अणि दक्षिण आफ्रिका व वेस्ट इंडीजचे नीग्रो – सर्व वेगळया-वेगळया गटांतून उभे. सर्वांचे डोळे गेटवर लागलेले.

काही चेहरे ओळखीचे वाटले. त्यांना कदाचित काल रात्री पाहिले असेल. त्या सर्वांचे डोळे माझ्यावर खिळले. अबोल पण ताणलेल्या नजरा, मला वाटले जणू त्या अबोलपणात एक विचित्र भीती तरंगत आहे, माझ्याबद्दल व त्या अज्ञात भाग्याबद्दल, ज्याचा निर्णय पुढील काही क्षणात लागणार आहे.

मीही त्यांच्याबरोबर एका कोपऱ्यात उभा राहिलो—त्यांना भीत, तरीही त्यांच्याशी बांधलेला.

पावणेनऊ वाजता मॅनेजर आमच्याजवळ आले. मला थोडी निराशा वाटली. ते कालचे गृहस्थ नव्हते, ज्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला होता. त्यांच्या हातात कागदाचा एक तुकडा होता. सर्व त्यांच्याजवळ सरकले—एखाद्या 'झू'मधील मुक्या, निरीह प्राण्यांप्रमाणे, जे काही तरी मिळेल या आशेने यंत्र-चालिताप्रमाणे लोखंडी गजांजवळ घोटाळतात. एक क्षणभर त्यांनी आम्हांला पाहिले, आमचे खुले, नागडे भावशून्य चेहरे त्यांना फार भयंकर वाटले असावे, कारण त्यांनी आपले डोळे कागदाकडे वळवले व एकानंतर एक भराभर नावे वाचू लागले.

ते सर्व लोक आधीच निवडले होते, त्यांना काल रात्री काम मिळाले होते. त्यांच्याशिवाय आणखी फक्त तीन मुलांना निवडले होते. दोन अनाथ दिसणारे इंग्रज तरुण व एक दक्षिण आफ्रिकेचा विद्यार्थी, जो सर्वांत पुढे उभा होता व वारंवार वाकून मॅनेजरच्या कानात काहीतरी पुटपुटत होता.

"आज इतकेच" त्यांनी सहानुभूतिपूर्ण भावनेने आमच्याकडे पाहिले. "तुम्ही लोक उद्या या, कदाचित आणखी काही माणसं लागतील."

गर्दीतून तीनचार तरुणांनी पुढे येऊन त्यांच्याबरोबर वादंग करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी मोठ्या लाचारीने आपले हात हलवले, व डोळ्यांनी आमच्याकडे पाहात ते परत आत गेले.

आमच्या वाट पाहण्यात आता काही अर्थ नाही हे सर्व जाणूनही आमच्यापैकी कोणी त्या गोष्टीवर विश्वास करू शकला नाही. मॅनेजर गेल्यानंतरही कुणीही आपल्या जागेवरून हालला नाही. असे वाटले : जणू गेल्या तीन मिनिटांत जे काही कमीजास्त झाले, ते सर्व अपूर्व आहे...एक अशी अवास्तव घटना आहे, जिचा आमच्याशी जणू काहीच संबंध नाही...अजून काही व्हायचे बाकी आहे, जे प्रतीक्षेनंतरही आपली दारं उघडी ठेवतं... आमच्यापैकी कैक असे होते की जे 'ट्यूब' मध्ये तीन-चार शिलिंगचे तिकीट खरेदी करून लंडनच्या दूरच्या कोपऱ्यातून आले होते. आमच्या सर्वांच्या हातांत एकेक पिशवी होती, ज्यात रात्रीच्या ड्यूटीचे कपडे व खाण्याच्या वस्तू ठेवल्या होत्या. आमच्यापैकी कुणालाही यावर विश्वास करणे कठिण होते की पुढच्या 'ट्यूब'ने

आम्हांला परत जावे लागेल. पाइपमधून निघणारे कोमट पाणी, चांदण्यात चमकणारी घाणेरडी डबकी...गटारमध्ये पडलेली एक रिकामी बोतल, हे सर्व आम्हांला भारी अप्रासंगिक अर्थशून्य वाटत होते—आम्ही कदाचित हेही विसरलो असू की आम्ही येथे कशासाठी आलो. काही क्षणांपूर्वी नोकरी न मिळण्याचे जे दुःख होते, ते आता फक्त एक बेडौल, विकृत भार बनून आमच्या आवतीभोवती लपेटले गेले होते, ज्याला परत दुसऱ्यांदा आम्हांला सरपटत न्यायचेच होते.

त्या क्षणी भूक व निराशा असूनही मनात क्षोभ किंवा कटुता नव्हती.

पण हे सर्व क्षणापुरतेच. एकदम एक मायावी क्षण तुटला. आम्ही परत आपल्या मूळ रूपात परतलो. एक लांब, जड श्वास त्या अदृश्य, बेडौल गर्दीवर गेला आणि काही अश्लील, अनर्गल शिव्यांत जणू विरला. एक दुसऱ्याच्या शरीराचे वास—जवळ जवळ उभे राहिल्यामुळे ते येतच होते, शिव्यांच्या बरोबर तेही सह्य मानावे लागत—आता वेगवेगळ्या वाटांवर विखरू लागले. केवळ आम्ही तिघे अजूनही कारखान्याच्या आवारात अनिश्चित मुद्रेने उभे होतो. माझ्यामागे हलकासा आवाज झाला.

"ब्लडी बास्टर्ड!" पहिल्या माणसाने काही दबलेल्या, काहीशा जड आवाजात म्हटले. तो पुढे चालत आला. भ्यालेल्या भ्याड, साशंक डोळ्यांनी त्याने चारीकडे पाहिले व मग त्या बोतलीच्या टोपल्यांतून एक सोड्याची बोतल काढून तो पिऊ लागला. दुसरी बोतल त्याने तिसऱ्या माणसाच्या हातात कोंबली: "पी लेका, त्या साल्यांना काही पत्ता लागणार नाही."

तिसरा, लहान वयाचा नीग्रो विद्यार्थी वाटत होता, बोतल घेण्यास थोडा कचरत होता. पण त्याला काय वाटले कुणास ठाऊक, मानेला झटका देऊन एखाद्या दूध पिणाऱ्या लहान मुलीप्रमाणे बोतल दोन्ही हातांनी धरून त्याने तोंडाला लावली. एक मोठा घोट पिऊन आपल्या उघड्या हाताने तोंड पुसले आणि बोतल मला दिली.

"तिसऱ्यांदा मी येथे आलो आहे. काल ज्या बाबूने मला काम देण्याचा वायदा केला होता, तो आज येथे दिसत नाही."

"उद्याही असेच होईल. कुणी दुसरा येईल व त्याला ठाऊक नसेल की आज रात्री आम्ही आलो होतो."

"उद्या कोण येईल! मी तर इकडे डोकावणारही नाही. डॅम दीज..."

पहिल्या माणसाने ओव्हरकोटची बटनं उघडली. इतक्या उष्णतेतही ओव्हरकोट घातला होता त्याने—याचे मला काहीच आश्चर्य वाटले नाही. त्या माणसाचे व्यक्तित्व ओव्हरकोटाशी असे निगडित होते की दोघांना विलग करता येत नव्हते. एक हृष्ट-पुष्ट तरुण, लहानशी 'गोरी' दाढी, त्याच्यामागे डोळे सुक्या, तिखट, वैतागाने सारखे

किलकिल्त. बैतागही नाही, पण एक विचित्र 'नर्व्हस' ताण, जो शिकार केल्या जाणाऱ्या जनावरांतून बहुधा आढळतो. हॉलीवुडमधील व्हिलनसारखी त्याची शरीरयष्टी अंधारात एखाद्या अनोळखी व्यक्तीप्रमाणे भयाण वाटत होती.

आम्ही हळू हळू चालत नॉर्थ ॲक्टनच्या पुलापलीकडे आलो. लंडनची डबल-डेकर बस आमच्या जवळून निघून गेली. ऑगस्ट महिन्याच्या सुक्या पानांचा पाचोळा बसच्या मागे पळत सुटला, बऱ्याच वेळपावेतो.

तिसरा, नीग्रो तरुण, आता बराच उदास होता व गुपचूप वाटेकडे डोळे लावून मान वाकवून चालला होता.

"लंडनमध्ये केव्हापासून?" दाढीवाल्या तरुणाने (नंतर त्याने आपले नाव विली सांगितले) नीग्रोच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले.

तो गप्प.

"कुठून आलास?"

"दक्षिण अफ्रिकेतून. येथे शिकतो."

तो कदाचित संभाषण येथेच संपवू इच्छीत होता. त्याने खिशातून एक सिगारेटचे पॅकेट काढले व आमच्या दोघांसमोर पुढे केले. आम्ही आभार मानून डोळे फिरवले. ही त्याची शेवटची सिगारेट होती आणि आमच्या भुकेल्या लालसा असूनही आमच्यात एवढा सभ्यपणा शिल्लक होता की ती घ्यायला आम्ही नकार दिला. पण हा सभ्यपणा अधिक वेळ टिकला नाही. थोड्या वेळाने आम्ही तिघे ती सिगारेट आळीपाळीने पिऊ लागलो.

समोर लंडनची रात्र—जड, घाणेरडी, शांत. शहराचा हा निर्मनुष्य कोपरा. वाट रिकामी. रिकामी पण अगदीच सुनी नाही. पैलांचा फडफडाट, जुन्या घरांचा कुबट वास—वाटले जणू मधूनच बऱ्याचशा निष्प्राण वस्तूंना पुढे ढकलत आम्ही चाललो आहोत—वस्तुतः मधून हवा व लॅंप-पोस्टच्या बंधनांशिवाय काही नव्हते.

"तुम्ही कुठे जाणार?"

"वॉरेन स्ट्रीट," त्याने म्हटले. "गेल्या दोन दिवसांपासून येत आहे. आतापर्यंत पाच 'पॉण्ड्स' फक्त येण्या-जाण्यावर खर्च झाले. या पैशात तर मी टेनिस खेळायला गेलो असतो."

त्यावेळेस खेळण्याचा उल्लेख मोठा विचित्र वाटला—त्याच्या चेहऱ्यावरून असा भ्रम होत होता की जणू गेल्या कितीतरी दिवसांपासून त्याला पोटभर खायलाही मिळालेले नाही.

"माझ्या मित्राला काम मिळाले आहे," नीग्रो विद्यार्थ्याने थोड्या उत्साहाने म्हटले. "आम्ही दोघेही बरोबरच राहतो. उद्या कदाचित तो मला काही शिलिंग उधार देईल.

"डॅम हिम इफ ही डझंट," विलीने विचित्र रागाने म्हटले. "उद्या तर मी काही झालं तरी येणार नाही—'प्लीझ कम टुमॉरो!'" मॅनेजरच्या आवाजाची नक्कल करीत त्याने तोंड वेंगाडले. "टुमारो बी डॅम्ड. तुम्ही उद्या याल?" त्याने प्रथम माझ्याकडे वळून म्हटले.

"कदाचित येईनही," मी मुद्दाम त्याला जास्त चिडवण्यासाठी म्हटले. त्याने यावेळी 'उद्या'चा विषय काढला याचे मला दुःख वाटले.

"साले किती देतात?"

"अडीच पाउंड," नीग्रो विद्यार्थ्याने म्हटले.

"प्रत्येक सकाळी?"

"हो, प्रत्येक सकाळी. अर्ध्या रात्री चहा व सँडविचेस सुद्धा देतात—माझा मित्र सांगत होता. काल तो व मी आलो होतो. त्याला मिळाले, मी राहिलो."

"नीग्रो होता?"

"नाही, तो बर्मी आहे."

"आणि तुम्ही?" विलीने संशयित नजरेने माझ्याकडे पाहिले. जणू मला दृष्टीने तोलत असावा. "तुम्ही जपानी आहात का?"

मी मान हलवून होकार दिला. या लहानशा गोष्टीवर त्याचा प्रतिवाद करणे मला निरर्थक वाटले.

थोड्या वेळेपर्यंत आम्ही न बोलता ट्यूबकडे चाललो होतो. जेव्हा कधी इष्ट हवेचा झोत येई, आम्ही शहारत असू. तेव्हा आमची भूक सर्व ठिगळं तोडून उघडी होत असे. वाटे, जणू हवा लँप-पोस्टाच्या पिवळ्या, मध्यम प्रकाशाला तोडून आम्हांला आपल्याबरोबर वाहवून नेत आहे."

"उष्मा फार आहे...गेल्या पाच वर्षांत अशी उष्णता नव्हती."

"गेली पाच वर्षे तुम्ही लंडनमध्ये आहात?"

"कदाचित जास्तच...तेव्हापासून कैक कामं केली. आता जास्त नाही राहणार."

"का? परत घरी जाणार?" विलीने विचारले.

"घरी?" नीग्रो विद्यार्थी जॉर्जच्या आवाजात एक प्रकारचे शून्य भकासपण दिसून येई. जणू 'घर' हा शब्दच विचित्र, जणू त्याने हा शब्द प्रथमच ऐकला! "माझी इच्छा होती इथंच राहावं म्हणून. पण तेच आम्हांला नावडत्याप्रमाणे मानतात."

"ते—आह!" विली म्हणाला.

"ते..." आम्ही सहज चहूबाजूंना पाहिले. कुणीच नव्हते. वस्तुतः ते सर्व जागी सर्व काळी आमच्याबरोबर होतेच. आमच्या बाहेर तितकेच, जितके आतही...

"नाही, तेव्हा मी लंडनला नव्हतो आलो."

"मी तेथेच राहतो. तीन दिवस मी एका इंग्रज मुलीच्या घरी लपून राहिलो. जेव्हा ते एक एक नीग्रोला निवडून 'लिंच' करत होते, मी त्या गोऱ्या 'व्होर'बरोबर झोपून राहिलो. तिला वाटले, मला ती आवडते...पण नंतर मी तिला कधीही पाहिले नाही. तिला माहीत नव्हते, मी सूड घेत होतो...तिच्या गोऱ्या कातडीबरोबर..." आणि त्याने हाताने इशारा केला.

...अश्लील इतका नाही जितका ओंगळवाणा!

दूर कारखान्याच्या धुरापलीकडे ट्यूब व स्टेशनच्या बत्त्या चमकत होत्या. वाटत होते की जणू जमिनीचा एखादा तुकडा एकदम मधूनच फाटला जावा व त्यातून खालची हिऱ्यांची चमकणारी झालर वर निघाली असावी.

"तुम्ही येथे शिकता?"

"हो...परंतु उन्हाळ्याच्या सुट्टीत काम करतो. पूर्वी मी डान्ससाठी जात असे." जॉर्ज म्हणाला. त्याचा आवाज खूपच उदास होता. जणू काम न मिळाल्याचे दुःख अजूनही पूर्ण बुजले नसावे.

"कॉंटिनेंटमध्ये का जात नाहीस, मित्रा?" विली म्हणाला. "माझा एक दोस्त जर्मनीत गेला होता. तेथे कामाला तोटा नाही. मी ऐकलंय् की तेथील पोरी काळ्या रंगासाठी मरतात...फक्त इशारा करायचा उशीर."

"कदाचित गेल्या महायुद्धामुळेही असेल," जॉर्ज म्हणाला. "काही वर्षांपूर्वी माझे वडील तेथे गेले होते. ते म्हणत की पुरुष कुठे दिसूनच येत नसे. सर्वत्र मुलीच मुली..."

"ओह, हाउ आय विश फॉर ॲनादर वॉर...ॲनादर अँड देन ॲनादर..." विली म्हणाला.

जॉर्जने आश्चर्याने विलीकडे पाहिले. मग माझ्याकडे. तो कदाचित काही सांगणार होता. पण मग काही विचार करून त्याने फक्त मान हलविली. तो काहीच बोलला नाही.

आणि कदाचित हे बरोबरच होते. लंडनच्या त्या शांत उष्ण रात्री 'वॉर' फार दूरची चीज वाटत होती. अर्थहीन व हास्यापद. पण त्याबद्दल वाद करणे कुणालाच अर्थपूर्ण वाटत नव्हते. झालेही तेच. आम्ही विलीची गोष्ट फार लौकर विसरलो. त्यानंतर आम्ही बऱ्याच वेळपर्यंत निरनिराळ्या देशांतील मुलींबद्दल बोलत राहिलो. असे वाटले, जणू जुन्या भुकेतून एकाएक नवी भूक जागी झाली असावी.

मी स्पेनला जाऊ इच्छीत होतो. तिकडच्या मुली! वा! पॅशन. पण साल्यांनी व्हिसाच दिला नाही. आपल्या देशाच्या कुमारिकांच्या व्हर्जिनिटीची त्यांना फार काळजी वाटत असावी.

"स्पेन..." जणू कुणीतरी बरीच जुनी राख डिवचली.

"तू गेला आहेस ?"

"मीही जाऊ म्हणत होतो—फार पूर्वी."

"सिव्हिल वॉरमध्ये ?"

"तेव्हा मी फारच लहान होतो."

"सिव्हिल वॉर आमच्या देशात कदाचित..." आणि जॉर्ज अचानक गप्प झाला. त्याच्या कुरळ्या केसांवर घामाचे थेंब चमकत होते.

"आय डोंट लाइक सिव्हिल वॉर !" विली म्हणाला.

आमच्या गोष्टी परत तेथेच अडकत होत्या—बॅगाटेलच्या त्या गोळीप्रमाणे जी चारीकडून फिरत, वळणं घेत शेवटी एकाच छिद्रात अडकते. आमचा त्याच्याशी काही संबंध नव्हता. ती लंडनची अत्यंत शांत व उष्ण रात्र होती. आणि 'वॉर' फार दूरची चीज वाटत होती.

वाटेच्या डावीकडे एका जुन्या 'टॅव्हर्न'मधून हास्य व संगीत यांचा सरमिसळ स्वर वाहात येत होता. टॅव्हर्नच्या मागच्या गल्लीबोळाच्या अंधाऱ्या कोपऱ्यांतून दोन सावल्या —एक-दुसरीशी लगट करताना—पुनःपुनः हालत. वर केलेल्या स्कर्टच्या खाली एक सुरेख नागवा पाय मधूनमधून शहारायचा आणि परत चाचपडणाऱ्या विव्हल हातांखाली ती सावली आवळली जायची.

"चला, थोडी बियर घेऊ या. बिना पिता नीट झोप येत नाही." विली म्हणाला.

मला थोडे अवघडल्यासारखे वाटले. माझ्या खिशात शेवटचे दोन शिलिंग शिल्लक होते, जे मी ट्यूबसाठी राखून ठेवले होते. जॉर्जची स्थितीही विशेष चांगली नव्हती. विलीच्या सूचनेकडे लक्ष न देता तो अंधारात शीळ वाजवीत होता.

विली कदाचित समजला. जॉर्जच्या खांद्यावर हात ठेवून त्याने म्हटले, "काळजीची कोणतीही गोष्ट नाही. येथील लोक मला ओळखतात—एके काळी मी येथे नेहमी येत असे."

जॉर्जची उपेक्षावृत्ती अचानक संपली. एक विचित्र पोरकट आनंद त्याच्या चेहऱ्यावर पसरला.

"मी थोडीशी 'जिन' घेईन. मला वाटतं उद्या माझा मित्र काही शिलिंग मला उधार देईल."

आमचे पाय वाटेकडे वळले.

दार उघडताच आवाजाबरोबर एका उष्ण सळसळत्या गर्दीने त्यांना घेरले—धुरात लपेटलेले, एकात एक मिसळलेले, एकमेकाला सोलणारे आवाज, ज्यांचा कुठेच विस्तार

होत नव्हता. फक्त घाणेरड्या उकळत्या पाण्याप्रमाणे एकाच डबक्यात ते साठत होते. उजेड होता, मध्यम, धुराने घेरलेला, ज्यात कुणाच्याही चेहऱ्याला ओळखणे, त्याला दुसऱ्यापासून वेगळे करणे कठिण होते.

खाली बेसमेंट. काही शिड्या उतरून. कधीकधी नाचणाऱ्या जोड्यांच्या सावल्या जिन्यावर पडायच्या. कधी एकदम बेडौल, लांबच लांब, तर कधी इतक्या लहान की जणू पारदर्शी पाण्यातल्या मासळ्या वर येत असाव्या व दुसऱ्याच क्षणी बुडून जात असाव्या.

आम्ही कोपऱ्यातल्या टेबलाभोवती बसलो. विली काही वेळानंतर बियरच्या तीन बोतली व ग्लास घेऊन आला. आम्ही पिऊ लागलो.

"पूर्वी मी येथे काम करीत असे. काही दिवस राहिलो. मग मन कंटाळले. या पबचा मालक इटालियन. वाईट नाही. पण भितो फार. इकडे आला तर मी तुझी गाठ घालून देईन." विली म्हणाला.

"बरीच टिप मिळत असेल?"

"इंग्रज जास्त देत नाहीत. जास्तीत जास्त सहा पेनी. पण कॉंटिनेंटचे टूरिस्ट... त्यांची गोष्टच वेगळी. त्यांचे हृदय खुले असते. पण ते मूर्खही असतात."

"आता मला कोणतेही काम मिळाले तर मी करीन." जॉर्ज म्हणाला.

आतल्या ग्रंथींतून बियरने वाट केली होती. जेथे कुलुपबंद कपाटं होती तेथे आता फडफडणारे पंख होते—उडण्यात चतुर.

"मी जास्त दिवस आता येथे राहणार नाही." विली म्हणाला. "माझा मित्र जर्मनीत आहे. जमल्यास तेथे एका दिवसासाठी जाईन." विलीने ग्लास खलास केला. मग टेबलावर तो पालथा केला—एकही थेंब नव्हता. बियरचे फेन दाढीवर विखुरले होते, जणू वाळूचे पांढरे ओले कण असावेत.

"मी जर्मनांना सहन करू शकत नाही," जॉर्ज परत म्हणाला.

"देअर इज रिअल लाइफ. प्रत्येक कोपऱ्यात तरुण पोरी उभ्या आहेत." विली म्हणाला.

"मी जर्मनांना सहन करू शकत नाही" जॉर्ज परत म्हणाला. मी हसू लागलो. जॉर्जने माझ्याकडे पाहिले. त्याचे डोळे फार निरीह झाले होते.

"सगळे लोक एकसारखेच," विली म्हणाला.

"पण ते लोक—" जॉर्जने इशारा केला—बाहेर, दाराबाहेर, तेथे अंधार गुडुप होते.

"ते लोक सुद्धा—तुम्ही केवळ भिता." विली म्हणाला.

एका क्षणासाठी जॉर्जचा हात, जो ग्लासावर ठेवलेला होता, शहारला.

"यू आर ए रॉटर!" जॉर्ज म्हणाला.

त्याच्या आवाजात असे काही होते की विलीचा चेहरा एकदम फिका पडला.

"पाहा, मी फार वाईट माणूस आहे. हा 'रॉटर' शब्द परत तोंडातून काढू नकोस."

"ओह! खरंच?" जॉर्जचा आवाज कापरा. जणू काय तो हवेत लोंबकळत्या रश्शीवर चढत होता. आणि खाली डबके होते. जणू तो कधीही पाय घसरून पडू शकतो. "प्रेस, यू आर रॉटर!"

विली ग्लास घेऊन एकदम उभा राहिला, जणू काही हाही एक खेळच, व नियमा-प्रमाणे त्याला उभे राहणे प्राप्त होते.

"एकदा परत म्हण—" त्याने ग्लास जॉर्जच्या डोक्याजवळ नेला. काचेवरील बियरचा फेस उजेडात चमकत होता.

जॉर्जचे अर्धवट उघडलेले डोळे त्याच्याकडे वळले. "यस, यू आर ए रॉटर ऑलराइट."

ग्लासाखाली त्याचे डोके हलत होते. माणसाचे डोके पूर्ण धडापासूनच वेगळे होऊन केवळ आपल्या धुरीवर अशा तऱ्हेने शहारू शकते, हे सर्व मला फारच हास्यास्पद वाटले.

विली फार आश्चर्याने त्याच्याकडे पाहून हसू लागला. "कदाचित तुझे म्हणणे बरोबरच असेल...कदाचित आय ॲम..." तो परत आपल्या खुर्चीवर बसला.

आम्ही जास्त प्यालो नव्हतो. फक्त कुणीतरी आमच्याभोवती एक भयंकर फास टाकला होता. त्याला स्पर्श करताच रक्त वाहू लागले.

थोड्या वेळाने पबचा मालक आमच्या मेजापाशी येऊन उभा. गोल्मटगरीत देह, पण मजबूत, रंग पिवळसर. लहानशा कपाळावर तेलाने माखलेले, काळेकुरळे केस झुकलेले.

"आणखी हवी?" त्याने विलीकडे पाहून स्मित केले.

"अजून आहे...नंतर..." विली म्हणाला. त्याच्या आवाजात पूर्वीसारखा ताण नव्हता. पण त्यातील तिरस्कार आमच्यापासून लपू शकला नाही. "हे आमचे मित्र आहेत."

इटालियन माणसाने आमच्याकडे पाहिले, परंतु डोळ्यांत कोणतीच उत्सुकता नव्हती.

"विली आमच्याकडे काम करीत असे." त्याने गर्वाने विलीकडे पाहिले, जणू काही त्याच्या दृष्टीत विलीच्या तुलनेने आम्ही अगदीच क्षुद्र होतो.

"बऱ्याच दिवसांपासून आहात?" त्याने विचारले.

जॉर्ज गप्प. (ईश्वर भलं करो, त्याचे डोके आता हालत नव्हते.) मी रिकाम्या ग्लासशी खेळत होतो. हात थांबले.

"फक्त काही दिवस," मी म्हटले.

"इजंट इट फाइन?"

"इजंट इट फाइन?" मी म्हटले.

"काही काम ?" तो माझ्या शर्टच्या कॉलरीकडे पाहात होता. न जाणो किती देशांची धूळ त्याच्यावर जमलेली होती.

"हल्ली काही नाही..."

"विलीला काम मिळू शकेल—पण हा एका जागी टिकेल तर." त्याने विलीकडे पाहिले, थोडेसे लाडाने, थोडेसे रोषाने.

"मी तुमच्याकडे राहू शकत होतो. केवळ तुम्ही..." विली म्हणाला.

इटालियनाचा चेहरा एकदम क्षुब्ध झाला. "तुला ठाऊकच आहे..." त्याने म्हटले.

"आहे," विली म्हणाला. "तुम्ही सर्व लोक एकसारखेच आहात."

"फार उष्णता आहे," जॉर्ज म्हणाला.

"तुम्हांला माहीत आहे..." इटालियन फार आग्रहपूर्वक म्हणाला.

"नाही...मला काहीच ठाऊक नाही. मी फक्त एवढेच जाणतो की मी आता डान्स करीन." विलीने आपली खुर्ची मागे ढकलली व तो उभा राहिला.

पण इटालियनाने लगेच त्याचे खांदे पकडले. त्याबरोबर त्याचे डोळे जणू एकदम भीतीमुळे थबकले. विलीच्या लांबसडक देहासमोर त्याची ठेंगू, चेंडूसारखी काया एकदम दयनीय वाटू लागली.

"विली...तुम्हांला ठाऊक आहे, येथे..."

विलीने झटक्याने आपले खांदे सोडविले. त्याची पाठ आमच्या मेजाला टेकून होती. जॉर्जने बियरची बाटली हाताने घट्ट आवळली. एका क्षणात असे वाटले की आम्ही एखाद्या जहाजाच्या डगमगणाऱ्या डेकवर आहोत.

ऑर्केस्ट्रा सुरू होताच 'पब' च्या वेगवेगळ्या कोपऱ्यातील मुलं-मुली बेसमेंटच्या पायऱ्या उतरू लागली.

इटालियनाने मागे वळून पाहिले नाही. तो फक्त हवेकडे एकटक पाहात होता.

विली कुठेही नव्हता.

त्याचा रिकामा ग्लास आमच्या मेजावर होता. जॉर्जने बोतल हाताने उचलली. त्याच्या तळहाताचा घामाचा डाग काचेवर एखाद्या पांढऱ्या डागाप्रमाणे अंकित झाला होता. इटालियनाने आमच्याकडे पाहिले. वाटले, जणू तो आम्हांला ओळखत नव्हता. मग अगदी लाचारीने त्याने दोन्ही हात पसरले.

"वेडा आहे...आहे ना ?"

आम्ही गप्प. त्यावेळी तेथे काहीतरी असे होते ज्याचा आमच्या कुणाशीही संबंध नव्हता, त्याची म्लान उदास छाया चुपचाप आमच्यामध्ये गोळा झाली. जड, थकल्या पावलांनी तो काउंटरकडे वळला.

"का ?" मला अचानक राग आला त्या सर्वांचा.

"दीड शिलिंग मजजवळ आहे. यात 'लागर' मिळू शकेल ?" त्याने विचारले.

मी विलीच्या रिकाम्या ग्लासकडे पाहात होतो. "कुठे असू शकेल ?"

मध्यम प्रकाशाखाली जोडे व सँडलांच्या खटखटाटात, आजूबाजूला तुटक्या, आकारहीन आवाजांचा पूर पसरला होता, ज्याच्या एका टोकावर आम्ही होतो—एक मेज, जॉर्ज, 'लागर'चे दोन ग्लास. सर्व काही तसेच, जसे आम्ही प्रथम पाहिले होते.

फक्त एक खुर्ची रिकामी होती.

"कदाचित तो रागावला होता. मी स्वतःला सांभाळू शकलो नाही." जॉर्ज म्हणाला.

"तुम्ही त्याला काहीच म्हटले नाही ?"

"मी स्वतःला सांभाळू शकलो नाही." त्याने टेबलावर पडलेला माझा हात जोराने पकडला. माझी बोटं त्याच्या तळहाताखाली ओलीचिंब झाली.

"तुम्हांला ठाऊक नाही...मला बॉक्सिंगचा फार षोक आहे...जेव्हा मी प्रथम लंडनला आलो व बेकार नव्हतो, तेव्हा रोज बॉक्सिंगसाठी जात असे. पण मी आजपर्यंत एकदाही जिंकलो नाही. ऐकताहा, एकदाही नाही... माझ्यात एक विचित्र ताण पसरू लागला. मी वाट पाहातो आहे, थोड्या क्षणांपावेतो, दुसरा माणूस मला 'हिट' करील...आणि जेव्हा तो तसं करत नाही तेव्हा माझे रक्त उसळते. मी येणाऱ्या संकटाशी सामना करू शकत नाही. ठीक मोका येण्यापूर्वीच मी अंधाधुंदपणे हल्ला करतो...मला ठाऊक आहे की अशा तऱ्हेनें लढणे कायद्याविरुद्ध आहे...आणि म्हणूनच घरून पळून मी येथे आलो आहे. मी माझ्या बापासारखा सारखी वाट पाहू शकत नाही."

"आणि तो...तुझा बाप...कसली वाट पाहात आहे ?"

"मला ठाऊक नाही...मला राजकारणात मुळीच रस नाही." त्याचे डोके लागरच्या ग्लासामागे लपले.

मी आपला हात हळूच सोडवला...तो घामाने निथळत होता. मी त्याला आपल्या जवळ खेचून आणले, जणू काही तो पाळीव प्राणी असावा—बोटांत गुंतलेला, एक गोरा मांसाचा गोळा, त्याच्यावर भुरे केस, बरेचसे केस, जे त्याच्या स्पर्शाखाली दबलेले होते. आणि मला वाटले, आम्ही खरोखरीच कितीदा तरी स्वतःच्या हातांकडे असे पाहातो जणू ते असतात जसे ते मुळात असतील, आणि मग भ्रम होतो की जी वस्तू ते पकडतील ती आमची होऊच शकत नाही.

"तुम्हांला माहीत आहे मी विलीला रॉटर का म्हटले ?"

"इट इज नथिंग," मी त्याच्या चेहऱ्याकडे सरळ नजरेने पाहू शकत नव्हतो.

"का...वस्तुतः मी स्वतः एक आहे. मी आत्ताच तुला सांगितले होते ना की आपल्या बापाची मी फार कदर करतो (जरी त्याने हे कधीच मला सांगितले नव्हते) पण तुम्हांला ते माहीत नाहीत. ते त्याच्या मागे लागले होते."

"ते कोण?"

"ते..." एक थंड आतंक त्याच्या डोळ्यांत सर्पाच्या कुंडलीप्रमाणे घट्ट बसला.

"तुम्ही कधीच पाहिले नाही." त्याने आपल्या तळहातांनी माझे हात जोराने दाबले. त्याच्या काळ्या चेहऱ्यावर फक्त पांढरे दात दिसत होते–एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत पसरलेले–आणि मला हे समजले नाही की तो हसतो आहे की केवळ एका विसरलेल्या क्षणात त्याचे दात असेच उघडे राहिले आहेत.

"मी येथे सुरक्षित आहे...अँड फॉर दॅट आय हेट हिम, आय हेट हिम लाइक हेल."

आम्ही चुपचाप पीत राहिलो. माझ्यासमोर घड्याळाचे डायल होते, जे मी प्रथम पाहिले होते. मला वाटले, एक सिगारेट ओढावी...मला वाटले मी फार वेळानंतर सिगारेट ओढत होतो.

"तुला काय वाटते?" त्याच्या आवाजात मुलांसारखा हट्ट होता.

"काहीच नाही."

"जर तू माझ्या जागी असतास तर काय केले असतेस?"

"तुझ्या जागी?" मी हसू लागलो. "मला आजपर्यंत हेच माहीत नाही की मला आपल्या स्वतःच्या जागी काय करायला हवे."

"पण तू काहीतरी निश्चय जरूर केला असशील...देश सोडण्यापूर्वी?"

"कदाचित वाचण्यासाठी..."

"कोणापासून वाचण्यासाठी?"

"आपल्या देशातील लोकांपासून...कदाचित आणखी काही वस्तूंपासून, ज्या मला आठवत नाहीत.'

आणि त्याच क्षणी मला वाटले की आता जास्त पिणे शक्य नाही. सकाळपासून काहीच खाल्ले नव्हते. रिकाम्या आतड्यांना लागर भिजवून गेली. एक निळे हिरवे धूसर धुके जिथे वाट फुटेल ती शोधत प्रत्येक खिडकीसमोर गोळा झाले होते. मला त्या खिडक्यांतून बाहेरचे काही दिसेना. तेथे घड्याळीचे डायल होते–खूप पांढरे–हवेत लटकणाऱ्या एखाद्या जुन्या प्रेतासारखे, जे न जाणे केव्हापासून माझ्याबरोबर घसट करीत सरपटत होते...

"तू का हसतोस?"

मला हे ऐकून फार नवल वाटले की मी हसतोय आणि जेव्हा मला कळले की मी हसतोय, तेव्हा मग स्वतःला थांबवणे बेकार होते.

"काय कारण आहे?"

"काही नाही, थोडीशी आठवण आली—" मी टाळायचा प्रयत्न केला. मला काहीच आठवले नव्हते.

"काय आठवले?" तो माझ्यावर वाकला, जणू आत्ताच तो गळ्याला लोंबकळेल. "सांग, काय आठवलं?"

"माहीत आहे...तीन दिवसांपूर्वी मी जेलमध्ये जाणार होतो. मी अगदी साफ बचावलो."

असह्य दाबाखाली कोणतीही वस्तु आठवू शकते...आणि मला खरेच तीन दिवसांपूर्वीची एक गोष्ट आठवली.

"हो, खरंच मी अगदी थोडक्यात वाचलो." (मला अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग फार आठवतात व मी वेळप्रसंगी ते परत परत म्हणतो.)

"माहीत आहे, लंडनमध्ये मी माझ्या एका मित्राकडे राहतो. त्याच्याकडे काही दिवसांपूर्वी त्याची एक गर्लफ्रेंड फिनलँडहून त्याच्याबरोबर राहायला आली होती. खोली एकच होती म्हणून मी बाहेर गेलो होतो. दिवसभर म्यूझियमच्या लायब्ररीत व रात्री झोपायला यूस्टेंड स्टेशन येथे जात असे. प्रत्येक दिवशी माझा मित्र मला काही शिलिंग देऊन जाई. त्या संध्याकाळी काही कारणामुळे तो माझ्याजवळ येऊ शकला नाही. माझ्याजवळ फक्त दहा पेनी होत्या. दिवसभर म्यूझियममध्ये बसून राहताना भुकेचा पत्ता लागला नाही, पण रात्र होताच मी स्वतःला थांबवू शकलो नाही. त्यावेळी किंग्स क्रॉसचे स्वस्त रेस्त्रां बंद झाले होते आणि बसमध्ये बसून शहराच्या सेंटरच्या आजूबाजूला मी वेड्याप्रमाणे फिरत राहिलो. शेवटी एक ग्रीक रेस्त्रां दिसला, जो वरून फार स्वस्त वाटला. बटाट्याचे चिप्स व टोस्टची ऑर्डर देऊन मी आत बसलो. तुम्हांला माहीतच आहे की या वस्तू सर्वांत स्वस्त असतात—अधिकात अधिक आठ पेनी बिल येईल असे मला वाटले. थोड्या वेळानंतर सहज माझी दृष्टी समोरच्या भिंतीवर गेली. तेथे खाद्यवस्तूंच्या किंमती लागल्या होत्या, ज्या सुरवातीला मी घाबरल्यामुळे पाहू शकलो नाही. टोस्ट आणि चिप्सची किंमत दीड शिलिंग— आणि माझ्याजवळ तर दहा पेनींपेक्षा एक पेनीही जास्त नव्हती...मग मी काय केले? मी एकदम उभा राहिलो (मी जॉर्जसमोर तसाच उभा राहिलो) व जोरात ओरडलो, 'गुड इव्हिनिंग, अरे बाहेर का उभा आहेस?' (आणि खरोखरीच मी ओरडत होतो—जॉर्जच्या तोंडावर) होटेल-मालक उत्सुकतेने माझ्याकडे पाहात होता. 'माझे एक मित्र बाहेर उभे आहेत...त्यांना भेटून

मी आत्ताच येतो.' टोस्ट व चिप्सची प्लेट टेबलावर सोडून मी पुढे गेलो, दाराकडे, अगदी मोजक्या पावलांनी (आणि मी खरोखरीच टेबलातूनच चालून दाखविले) आणि दारापलीकडे जाताच... तुम्हांला माहीत असेल मी मागे वळूनही पाहिले नाही. (मी परत वळून जॉर्जजवळ आलो...लागरचा मोठा घोट घेऊन मी परत बसलो.) मी पुष्कळ वेळपावेतो सारखा पळत सुटलो."

"आणि तो तुझा पाठलाग करीत होता?"

"नाही. हसण्याचा विषय हाच की तो माझ्या पाठोपाठ नव्हता आणि तरी देखील एक अंधाऱ्या बोळातूनच दुसऱ्या अंधाऱ्या गल्लीतून मी गेलो. माझ्या खिशात दहा पेनी उरल्या होत्या. माझी भूक मी पूर्णपणे विसरलो होतो."

"तूही खूपच आहेस!" जॉर्ज हसत म्हणाला.

मला खूप आनंद वाटला की तो आता हसतोय. माझा मित्र व त्याची प्रेमिकाही अशीच हसू लागली होती, जेव्हा दुसऱ्या दिवशी मी त्यांना हा किस्सा सुचवला जरी मला नेहमी आश्चर्य होते की लोक, विशेषतः ते लोक ज्यांच्यावर अशा आपत्ती येतात, ते नंतर किती आरामात त्यांना हलका रंग देऊन टाकतात. कारण पाहा, त्याच वेळी, म्हणजे अगदी त्याच वेळी, जेव्हा ही गोष्ट घडत असते तेव्हा, माणूस किती वेड्या-सारखा होतो, बगलेतून थंड घाम गळतो, शर्टला तो चिपकतो व आतून एक प्रकारची विव्हल कातरता, हुरहूर म्हणा, एकदम उठते, आपले बळ, आपले अनुभव सर्वांचा विसर पडतो...मला आठवतं त्या रात्री जेव्हा मी दहा पेनी खिशात दाबून अंधाऱ्या वाटेवर पळत होतो, तेव्हा कुणीतरी वारंवार मला म्हणत होते—'यू फकिंग फूल, यू इडियट, यू...'

"तूही कमाल आहेस!" जॉर्ज म्हणाला. जेव्हा त्याने तिसऱ्यांदा हीच गोष्ट सांगितली, तेव्हा मला तेथे बसवेना. डोळ्यांसमोर घड्याळीचे डायल परत घुमू लागले आणि मी टॉयलेटकडे वळलो. टॉयलेट खाली बेसमेंटमध्ये होते. मी लौकर लौकर पायऱ्या उतरू लागलो. मला भीती वाटली की काही पायऱ्यांवर न होवो. मी तोंडावर हात ठेवला व फारच गूढ पद्धतीचे हसू लागलो.

झालं काहीच नाही – पायऱ्यांवरही नाही, की वॉश-बेसिनमध्येही. मी त्यावर बराच वेळ वाकून होतो – या भीतीने की वांती होते की काय. आता घड्याळीचे पांढरे डायल फिरत नव्हते. मी पंप उघडला की मी निश्चितपणे एकेका गोष्टीची आठवण करू व स्वतःचा आवाज न ऐकू शकू. (रात्री या या घड्याळीत मी येथे काय करत आहे. नाही असे नाही चालणार. मला एक एक करून प्रत्येक वस्तूची आठवण केली पाहिजे, जणू ती फार महत्त्वपूर्ण आहे, जणू एखादे मोठे 'सत्य' या गोष्टीवर अवलंबून होते.)

'तपशीलवार'...हा शब्द मला फार आवडला आणि वारंवार मी तो घोकू लागलो. कारण मी कितीतरी वेळ या वस्तूची आठवण करण्याऐवजी हेच म्हणत राहिलो की मला प्रत्येक वस्तू 'तपशीलवार' आठवणीत ठेवायला हवी.

टॉयलेटच्या बाहेर आलो तर पाय थबकले. नाचणाऱ्या जोड्यांच्या आवर्तात मी पकडला गेलो. लोक धक्के देऊन पुढे निघून जात आणि मी कधी डाव्या तर कधी उजव्या बाजूला लाकडी पुतळीप्रमाणे सारखा फिरत होतो. कारण जेव्हा मी पाय जमवण्याचा प्रयत्न करायचा तेव्हा डान्सिंग फ्लोअर पायांखाली आकुंचित होई व वाटे जणू मी एक फार जोराने फिरणाऱ्या भोवऱ्यावर उभा आहे. तेव्हा मला आपल्या खांद्यावर एक विचित्र भार पडल्यासारखे वाटले.

"तू येथे आहेस?" विलीची दाढी माझ्या कपाळाला स्पर्श करीत होती. "आणि जॉर्ज?"

"तेथेच आहे." मी वर इशारा केला.

ज्या मुलीबरोबर तो नाचत होता, तिचा चेहरा त्याच्या छातीत लपला होता...फक्त तिचे ब्लॉंड केस दिसत होते.

"तू चलणार नाही?...तुमचे लागर..." मी म्हटले.

"येईल...तू नाचणार नाही?"

यावेळी मुलीने चेहरा वर केला. तिच्या नागड्या खांद्यांवर पावडरीचे हलके चिन्ह होते आणि तिने स्वस्त छिटाचे समर-स्कर्ट घातले होते. ओठांवर घामाचे थेंब, जे जास्त वेळ नाचत राहिल्यामुळे लिपस्टिकवर विखुरले होते.

गर्दीत उभे राहणे असंभव होते. ती माझ्याजवळ येऊन फार हलक्या पावलांनी नाचू लागली. एका तंग घेऱ्यात कधी विलीचे डोके माझ्याजवळ येई तर कधी मुलीचे ब्लॉंड केस.

"कशी आहे?" विलीने हळूच तिचे केस बोटांनी चाळवले.

ती हसत होती.

"हा फार वाईट आहे – आहे ना?" तिने हसत म्हटले आणि प्रथम मला वाटले की जणू तिचे डोळे झोपणाऱ्या-जागणाऱ्या बाहुलीसारखे आहेत. डोके मागे करताच ते जणू बंद होतील व पुढे करताच उघडतील.

"नाचशील...मे ब्री विथ हर..." विलीने म्हटले.

ती दोघे गोलगोल फिरत होती...हलक्या स्टान्ससहित. जेव्हा ज्याचा चेहरा माझ्याजवळ येई, तेव्हा तो माझ्या कानात काही सांगे.

"तिचे मित्र तिकडे बसले आहेत...मला तिच्याबरोबर पाहून ते मरून जातील."

विलीने म्हटले.

"तू नाचणार नाहीस? मे बी विथ मी..." मुलीने म्हटले.

"तो इटालियन नाही म्हणत होता!" मी विलीला म्हटले.

"मरू द्या त्याला!" विली म्हणाला.

ऑर्केस्ट्राच्या त्याच जुन्या ध्वनीत मोत्झार्थच्या लिटल नाइट म्यूझिकची हलकीशी चाहूल वर तरंगत येई...केवळ अर्ध्या मिनिटापुरती – आणि तेव्हा मला वाटे, जणू कुणी तरी माझ्या श्वासाला पूर्वीप्रमाणे बोटावर लपेटून खेचून घेतले आहे.

"जिन पिशील? पैसे ती देईल." विलीने हलक्या आवाजात पुटपुटून सांगितले.

"मे बी विथ मी..." मुलगी परत तशाच उदास स्वरात म्हणाली.

मी काही म्हणणार तोवर नाचणाऱ्या जोड्यांचे आवर्तन मला दूर खेचून घेऊन गेले. ते अचानक डोळ्यांपासून दूर गेले.

माझे डोके अजूनही गरगरत होते. पण ही गरगर कसली—टॉयलेटला जाण्यापूर्वी-सारखी. आता या गरगरीत एक विचित्र प्रकारचे हलकेपण होते, जणू धुक्याच्या ऐवजी केवळ विखुरलेले, वितळलेले ढग असावे व तेथे अपार खुलेपणा असावा.

गर्दीतून वाट काढणे सोपे नव्हते. बेसमेंटच्या पायऱ्यांजवळ मी थबकलो. त्या पायऱ्यांवर झोपण्याची अनावर इच्छा झाली.

"हॅलो!" माझे हात कुणीतरी पकडले. मागे वळून पाहतो तर पबचा इटालियन मालक उभा. कदाचित तो दुरून पळून माझ्याजवळ आला होता. हातावर शर्टच्या वर गुंडाळलेल्या. बाह्या खाली लटकत होत्या. सारखे हापरे भरल्यासारखा, जणू अवती-भोवतीची हवा श्वास घेण्यास अपुरी होती.

"ऐक, तो तुझा दोस्त आहे."

मी खांदे उडविले.

"तू याला येथून घेऊन जाऊ शकत नाही का...माझे म्हणणे – येथून?"

आमच्या चहूकडे नाचणाऱ्या लोकांचा घेरा कधी लहान होई तर कधी एकदम पसरू लागे. बँडसमोर कुणीतरी लाउडस्पीकर दोन्ही हातांनी पकडून गाऊ लागला.

आमच्या दोघांच्या मध्ये आमच्या नजरांशिवाय दुसरे काहीच नव्हते.

"तू का सांगत नाहीस?" मी म्हटले.

"मी त्याच्याबद्दल काहीच करू शकत नाही. तो माझे ऐकणारच नाही."

"पण का? तो येथे का राहू शकत नाही?"

"ही जागा त्याच्याकरता चांगली नाही." एक अगदी लाचार कातरता त्याच्या आवाजात उमटली. "मी त्याला पूर्वीही पुष्कळदा मना केले आहे."

माझ्या मनात परत इच्छा झाली—त्याच पायऱ्यांवर झोपून जाण्याची! "पहा—मी काहीच करू शकत नाही. आमची मुलाखत थोड्या घंट्यांपूर्वी झाली होती. तुम्हांला विश्वास वाटत नाही?..." कारण एका क्षणासाठी मला त्याच्या दयनीय चेहऱ्याची किळस वाटली, जणू एखाद्या लिबलिबीत वस्तूला मी स्पर्श केला असावा! "मी त्याला नीट ओळखत नाही. मला हेही ठाऊक नाही की त्याचे पूर्ण नाव काय आहे?" मी हे सर्व असे म्हटले की जणू जीवनात पूर्ण नाव जाणणे फार महत्त्वाचे आहे, जणू त्याच्याविना काहीच होऊ शकत नाही.

एकदम त्याने माझे दोन्ही हात पकडले. तो अगदी माझ्याजवळ सरकून आला. "तू...तू येथेच राहणार?"

"हो!" मी मान हालवली. "जोवर तू मला ढकलून बाहेर फेकणार नाहीस."

त्याची पकड ढिली झाली होती. पण त्याचे डोळे अजूनही मला चाचपडत होते. मी पायऱ्या चढू लागलो. मला बरोबर असेच सारखे वाटत राहिले की मला त्याने मागून धरून ठेवले आहे...हे परमेश्वरा, जर मला एखादी सिगारेट मिळाली असती तर...असे वाटले की बऱ्याच वेळेपासून मी सिगारेट ओढली नव्हती.

जेव्हा मी धक्के खात व आपल्या शक्तीप्रमाणे दुसऱ्यांना धक्के देत आपल्या टेबलाजवळ पोचलो, तेव्हा जॉर्ज सर्वांपासून तटस्थ होऊन झोपलेला होता. त्याचे डोके टेबलाच्या कोपऱ्यावर टेकलेले होते. त्याचे शरीर खुर्चीवर अवघडलेले होते. अर्धवट उघडलेल्या डोळ्यांतून पांढरी बुबुळं मळक्या कापसाच्या बोळ्यासारखी दिसत होती. प्रथम मला भास झाला की तो माझ्याकडे टक लावून पाहात आहे, झोपलेला नाही. त्याच्या ओठांच्या कडांतून थुंक वाहात होती—एखाद्या पाकाच्या बारीक रेषेप्रमाणे, शुष्क व पांढरी—ती मी रुमालाने, सर्वांच्या नजर वाचवीत, पुसून टाकली.

त्या रात्री प्रथम मला वाटले की तो वयाने फार लहान आहे. हास्यास्पद वाटेल इतका फारच लहान व भोळा.

माझा ग्लास रिकामा होता...मी थोडीशी लागर त्याच्या ग्लासात स्वतःच्या ग्लासातून ओतली. एका क्षणापुरते वाटले, जणू अर्ध्या-उघड्या डोळ्यांनी तो माझ्याकडे पाहात आहे व हसत आहे...आणि त्याच्यात थोडासा उपरोधही लपलेला आहे. कदाचित तो नाटक करीत आहे, मला वाटले, तो झोपलेला नाही, पण माझ्याकडे पाहात आहे...पण कदाचित हा माझा भ्रमच असेल, मी विचार केला व पिऊ लागलो. मग मला थोडे एकटे वाटू लागले. विचार केला की मित्राला फोन करावा. असेही असू शकेल की त्याची गर्ल-फ्रेंड आतापर्यंत निघून गेली असेल व मी त्याच्या खोलीत झोपू शकेन. पण ती असली तर त्याला वाईट वाटेल...याला जागवून देईन तो असा

कुठवर झोपून राहणार, मला वाटले. इतक्या वयात घरची आठवण आली. युरोपमध्ये येण्यापूर्वी ती घरातली शेवटची रात्र होती. आई वारंवार झोपेतून जागायची व पाणी पिण्याच्या बहाण्याने मला पाहायची...आपल्या घराच्या वरच्या गच्चीवर शेवटची रात्र—ती जुलैची रात्र होती आणि मला दुसऱ्या दिवशी जायचे होते...आणि बाबू माझ्या बिछान्याजवळ उभे होते. त्यांना वाटले होते, मी झोपलेलाच आहे...मी सर्व काही पाहू शकत होतो...तशाच आमच्या शहरात जुलैच्या रात्री खूपच स्वच्छ असतात. डोळे झाकल्यावरही सर्व काही दिसून येई...मग सहसा इच्छा झाली की मी बाहेर जावे...हे फार सोपे होते. आधी मी आपल्या खुर्चीवर उठून उभा राहीन, मग दार उघडीन व बाहेर चालू लागेन...जस्ट टु कम आउट...ही मोठी गोष्ट आहे, मी विचार केला...त्याच्या तोंडावरून परत थुंक गळू लागली—ओठांवरून हनुवटीवर, जेथे निळ्या काट्यासारखे केस उगवले होते...मी रुमालाने परत त्याचे तोंड पुसले.

कैक आवाज...एक वेड्यासारखी आरडाओरड.

बेसमेंटच्या भिंतीवर सावल्या नाचतात—एक भयंकर दुःस्वप्नाप्रमाणे खुर्च्या खेचण्याचे आवाज, चमत्कारिक हसू...पण कुठेच काही नाही. मी उठत नाही. ग्लासात अजून लागर शिल्लक आहे आणि मी उठू शकत नाही...आणि आता अचानक त्या क्षणी मला मात्र स्वतः एक विचित्र शांती वाटू लागली...घनदाट, चमचमणाऱ्या, ऊन वाळूच्या अंतहीन विस्तारासारखी...आणि मी त्याला पकडून उभा राहतो.

जस्ट टु कम आउट, जस्ट टु...

मी पूर्ण शक्तीने जॉर्जला गदगदा हालवतो.

तो एकदम घाबरून उठून उभा राहिला व विमूढ भावनेने मला पाहू लागला—जवळ-जवळ त्या शिकवलेल्या जनावराप्रमाणे, जो ऐन वेळेवर आपला 'घडा' विसरून जवळ उभ्या असलेल्या तमासगिरांकडे पाहू लागतो. मग परत त्याचे डोळे विचित्र भीतीने ग्रस्त झाले.

"काय झालं?"

"चला...येथून चलावं लागेल."

"पण...आत्ताच?"

त्याला काहीच ठाऊक नाही. मी अवश्य निश्चित करू शकत नव्हतो की अजूनही त्याला काही सांगणे बरोबर होईल की काय!

"मी झोपलो होतो काय?" त्याने विचारले. न जाणे माझ्या चेहऱ्यावर काय होते की तो एकदम शंकित झाला.

"हा कसला गलका?"

त्याचा चेहरा परत तसाच झाला, जसा सोडावॉटरच्या फक्टरीबाहेर आम्ही उभे होतो तेव्हा झाला होता...आता तो क्षण किती दूरचा वाटतो व किती अप्रासंगिक.

"आम्हांला जावे लागेल...बाहेर."

बाहेर लंडनची रात्र आहे...आमची वाट पाहात...आम्हाला गिळून जायला उत्सुक.

"बिली कोठे आहे?...आम्ही त्याच्यावाचून जाऊ शकत नाही."

"तो...तो जाऊ शकणार नाही."

पबचे दार उघडते. लोक घाबरून आत घुसतात.

"दे आर देयर...द डॅम्ड..." एक खूपच घाणेरडी शिवी हासडली जाते. कैक आवाज, माशांप्रमाणे घोंघावणारे, अर्थशून्य.

मी त्याचा हात पकडून फरपटून नेतो.

"मी जाणार नाही..."

"तू पागल तर नाहीस?"

"ते कोठे आहेत..."

"ते..." मी रागाने त्याला उठवतो. तो अगदी माझ्यासमोर उभा आहे. "सांग, ते कोण?" मी त्यांचे खांदे हलवतो आणि तो...

"चला ते कोण?"

"यू आर ड्रंक." त्याने म्हटले व एका झटक्यानिशी त्याने स्वतःला सोडवून घेतले.

"कदाचित हे सर्व खरे आहे..." मी विचार केला. "कदाचित मी फार प्यालो आहे." या विचाराने मला फार सांत्वना वाटली.

"तू येथेच राहणार?"

"मी कुठेही राहीन," तो म्हणाला.

"ऐक..." मी मधली खुर्ची हटवण्याचा प्रयत्न करतो.

"यू आर ड्रंक." तो मागे सरला.

मी जाऊ लागलो. तोही. पण माझ्यापासून वेगळा. असे वाटले जणू हे काय खेळासारखे सोपे, ज्यात दोन माणसे डोळ्याला पट्टी बांधून चालतात व समजतात की ते एकमेकापासून दूर जात आहेत. पण वस्तुतः ते एकमेकाजवळ सरकत येत असतात.

दाराकडे...प्रथम टेबलं येतात. अर्धवट जळलेल्या सिगारेटची थोटकं, खाली ग्लास व बोतली, खुर्च्यांवर ठेवलेले कालच्या सायंदैनिकाचे तुकडे, फरशीच्या एका कोपऱ्यात एक लिपस्टिकची डबी, कुणी स्त्री घाईत ती न्यायला विसरली असावी...आणि मला वाटले जणू काहीतरी अचानक घडले असावे. अगदी अप्रत्याशित पद्धतीने, आणि सर्व लोक पूर्वसूचनेविनाच पळणाऱ्या गर्दीच्या आपत्तीत फसले आहेत.

विली कोठे आहे ?

आणि तो इटालियन ?

पुढे विचाराला जागाच नव्हती. दार सपाट्याने उघडले. आणि मला वाटले, जणू एका झटक्यासरशी जॉर्ज मजपासून वेगळा झाला—शेवटच्या क्षणसाठी किंवा प्रथम क्षणीच. मी प्रयत्न केला की त्याला घट्ट पकडून ठेवू, जणू हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट असावी, पण माझे डोके सणाणून खाली वळले. ज्या हाताने जॉर्जला धरणार, तो वाहत गेला. वरचे छत, नाही ते छत नव्हते, फक्त उजेड—एक विचित्र रीतीने लटकता-झुलता बल्ब—आणि माझे हात सारखे वळवले गेले. डोंट लेट देम एस्केप—एक फूत्कारासारखा आवाज, मग तोही नाही. तो एखाद्या पत्र्यासारखा थरथरत होता व मी त्याला पाहू शकत होतो...थरथरताना—जणू तो माझा हात नव्हता. कुणी वसत जात होता शेवटच्या क्षणापावेतो आणि तेथे पोचण्यापूर्वीच जणू तुटला...पूर्ण शरीरात...नाही, ही व्यथा नाही. व्यथेची एक सीमा असते आणि त्याच्या पलीकडे तिची ओळख संपते.

"आय से—लीव्ह हिम अलोन..." हा काय इटालियनचा आवाज ? मला थोडेसे आश्चर्य वाटले. माझ्यावर वाकलेले चेहरे एक एक करून उठत होते, पण मी त्यांना पाहू शकत नव्हतो...फक्त त्यांचे उष्ण श्वास, जे मानेला वारंवार चाटून जात—मग तेही नाही.

"तू उठू शकतोस ?"

मी माझा हात पाहतो...तो आता फरशीवर पडला होता—आश्चर्य आहे—तो अजून माझ्या शरीराला चिकटलेलाच.

मी बसलो. मग अचानक माझे हात गालावर जातात. ते ओले आहेत—ते अश्रू असतील यावर माझा विश्वास बसेना—ते विचित्र रीतीने स्वतःच निघाले व मला पत्ताही लागला नाही...काही त्या व्यक्तीप्रमाणे जो सकाळी आपला बिछाना ओला पाहतो आणि विश्वास वाटत नाही त्याला की त्यानेच...

"थोडे पी..." इटालियन माझ्याजवळच घोंघावत होता.

"विली कोठे आहे ?" मी विचारले.

"ते त्याला मारून टाकतील—मी तुला काय म्हटले होते ?" त्याचा गळा विचित्र रीतीने बसला होता.

"काय म्हटले होते ?" मला आता काहीच आठवत नाही.

"तुम्हांला माहीत आहे...जर तू त्याला आपल्याबरोबर घेऊन गेला असतास तर काहीच झाले नसते."

"काहीच झाले नसते..." पण जे झाले आहे, त्याला कोण थांबवणार, हेही कुणाला माहीत नाही.

"आता मी जाईन," तो म्हणाला.

"कुठे?" इटालियन दरवाज्यासमोर उभा होता.

"कुठेही...बाहेर..." चारीकडे पाहिले, जॉर्ज कुठेही नव्हता. मला थोडासा अचंबा वाटला.

"बाहेर?" इटालियनला कदाचित विश्वास झाला नाही, तो कदाचित काही निश्चय करू शकत नव्हता की किती प्यालो आहे...माझे म्हणणे कितपत गंभीरतेने तो घेईल.

"या वेळेस नाही...ते बाहेर उभे आहेत."

"ऐक..." मी फार सहज भावनेने म्हटले, "मी काही करणार नाही. मी सरळ घरी जाईन."

"कशा गोष्टी करतोस?" या वेळी तो एकदम भडकला. "त्यांना ठाऊक आहे, तू विलीबरोबर आला आहेस—तू त्यांच्या तावडीतून वाचू शकणार नाहीस."

वादविवाद फुकट होता. तो ऐकणार नाही.

बाहेर एकदम कोलाहल वाढला...एका क्षणासाठी वेडावाकडा गोळा पोटात उठला व पाठीकडे सरकला...बर्फाच्या तुकड्याप्रमाणे. याला मी ओळखतो. ही भीती आहे ...फार सुरवातीची भीती, अगदी नागडी-उघडी, अगदी आवाज न करणारी.

मला लागले, जणू मी स्मित करीत आहे.

"पाहा...तू मला एक लहानशी व्हिस्की देऊ शकतोस?"

तो माझ्याकडे थोडा वेळ पाहात राहिला. मी पुढे घसरत आलो होतो. आमचे दोघांचे चेहरे इतके जवळ आले होते की बाहेरच्या हल्ल्यात सुद्धा मी त्याचे श्वास ऐकू शकत होतो.

"तू जाणार नाहीस..." संदेह व अनिश्चय यांमुळे त्याच्या आवाजात एक प्रकारचा ताण आलेला होता.

"मी वेडा नाही."

तो थोडा वेळ माझ्याकडे चुपचाप पाहात राहिला.

"तुम्हांला येथे सोडून मी जाऊ शकत नाही," त्याने म्हटले.

एकदा असे वाटले की त्याच्या घामाने निथळत्या गोलगुबऱ्या चेहऱ्याचे वेगळे-वेगळे तुकडे मी करून टाकले. पण मी तसाच हसत राहिलो.

"मी येथेच राहीन...तुझ्यासाठी नाही तर व्हिस्कीसाठी. तू माझा इतकाही विश्वास करू शकत नाहीस?"

यावेळी त्याचे ओठ एका अप्रत्याशित हास्याने पसरले. त्या हास्यात एक लाचार निरीहता लपलेली होती. जणू तो हसून स्वतःला विश्वास देत होता की त्याने माझ्यावर विश्वास केला आहे.

तो काउंटरकडे वळला, जेथे निरनिराळ्या दारूंच्या व बियरच्या बाटल्या ठेवल्या होत्या. तो वारंवार मागे वळून माझ्याकडे पाहात होता.

मी उभाच राहिलो.

स्कॉचची बाटली त्याने काउंटरवर ठेवली. मग माझ्याकडे पाहू लागला, जणू आमच्या दोघांत काहीतरी रहस्यमय समझोता झाला असावा.

आमचे मौन जणू या आवाजापेक्षा मोठे होते, जे लहरींप्रमाणे उठत होते—एक दुसऱ्यात मिसळलेले, उठलेले, दाराशी टकरा खाणारे व नंतर अनंत अंधारात विखरून जाणारे.

तो ग्लास धूत होता. नळातून वाहणारे पाणी...आणि चमकत्या ग्लासावर ओघळणारा एक एक थेंब—मी थेंबांकडे पाहात राहिलो आणि मला असे वाटत राहिले की मला वांती होईल. मी नागड्या काचांवर वाहणारे पाणी पाहू शकत नाही...माझ्या मनात एक विचित्र प्रकाराचे शहारे उठतात...मी पुढे गेलो. दाराजवळ. त्याची पाठ माझ्याकडेच होती...नळातून वाहणाऱ्या पाण्याचा आवाज माझ्या हृदयाचा ठोक्यांना झाकत होता. आणि त्या क्षणी मला वाटले जणू आता माझी इच्छा झाली तरी मी परतू शकणार नाही...जणू माझे स्वतःवर, स्वतःच्या पायावर काही नियंत्रणच राहिले नाही...जणू मी स्वतःपासून मुक्त आहे.

आणि दार उघडलं...दुसऱ्या क्षणी मी बाहेर.

बाहेर...अंधारात.

"जस्ट टु आउट..." मी स्वतःला म्हटले...

ती उन्हाळ्यातली एक उघडी, उष्ण रात्र होती...एखाद्या प्रचंड रानटी प्राण्याप्रमाणे मुकी...जो दिवसभराच्या श्रांतीनंतर आपल्या गुंफेत सगळे शरीर पसरवून झोपून गेला असावा.

घाम वाळत होता. मी एकदा खूप जोराचा श्वास घेतला...एकदा, दोनदा...थोडास पश्चात्ताप वाटला...मी व्हिस्की सोडून निघून आलो...जर यावेळी ती माझ्या शरीरात असती...मी परत उसासा घेतला...जर एक सिगारेट ओढू शकलो असतो तर...मी मोठ्या सडकेवरून एका बारक्या गल्लीकडे वळलो...बहुतेक गल्ल्यांच्या टोकावर सिगारेटच्या ऑटोमशिनी असतात...

"हियर ही इज...द सन ऑफ ए बिच..."

मी थांबतो...नाही, ही भीती नाही. मी फार शांत आहे....फक्त एक प्रकारची थंडी माझ्या पाठीच्या मणक्यांवर हळूहळू सरकत आहे–एका लिबलिबीत पालीप्रमाणे, तटस्थ.

ते तेथे होते...भिंतीला चिपकलेल्या सावल्या पुढे सरकतात.

"होल्ड हिम—" एक भरवाडा चीत्कार...आणि मी एकदम मागे वळलो. एक सळसळणारी हवा माझ्या बगलेतून निघून गेली.

गॉडेम्ड निगर

पेस्ट, जस्ट वेट...

तो मागून आला–मला पत्ताही लागला नाही की माझे डोके मागे वळत गेले... एक क्षणभर आणखी...माझी दोन शकलं होतील...

जर मला त्याचा चेहरा दिसला असता.

हात, ओले...माझ्या कानशिलापर्यंत सळसळणारे रक्त ऐकू येत होते. मी थोडासा हलतो...आणि थोडासा पुढे सरकत जातो. तोही माझ्याबरोबर सरकत येतो–हा कुणी तरी आणखी व्यक्ती असावा, त्याने फक्त माझे हात बांधून ठेवले आहेत.

क्षणभर मला फार आश्चर्य वाटते. हे माझे शरीर आहे का, जे असे थरथरत आहे?

"यू शिटिंग स्वाइन!"

मी एका झटक्यासरशी स्वतःला वाचवतो. पण माझे केस, माझे केस त्याच्या मुठीतच आहेत–त्याचे नागडे बाहू माझ्या तोंडाच्या समोर हलतात...आणि सहज मी आपल्या दाताने त्याच्या हाताचा चावा घेतो..."ओह लीव हट, बगर..." एक तुटका श्वास...तो मला गदगदा एकदा, दोनदा हलवतो आणि प्रत्येक वेळी एकाद्या दारुड्या-प्रमाणे मी त्याच्या बाहूवर लटकतो.

"लीव्ह हिम अलोन, यू सन आफ ए व्हाइट व्होर."

हा काय विलीचाच आवाज? मी पूर्ण प्रयत्न करीत आहे ओरडण्याचा. पण एक भयंकर घुर्र-घुर्रशिवाय माझ्या तोंडून आवाजच निघत नाही.

आणि तेव्हा मला सहसा वाटते, त्याची पकड ढिली झाली आहे...मी स्वतःला उचलू शकतो. माझे डोळे उघडतात. अंधाराचा एक निळा समुद्र माझ्या समोरून निघून जातो आणि त्याच्या पलीकडे लाल, हिरवे, गुलाबी ठिपके तरताना दिसतात–मी यांना कधी पाहिले आहे, कितीतरी वर्षांपूर्वी पाहिले आहे, जणू हे एक परिचित दुःस्वप्न आहे, जे मी परत परत पाहात आलो आहे...सुरवातीपासून शेवटपावेतो.

माझ्यापासून दोन गजांच्या अंतरावर तो उभा होता. गल्लीच्या भिंतीला चिपकलेला, एक क्षणभरासाठी मला विश्वास होईल की तो विली आहे. तीच व्यक्ती जिच्याबरोबर मी काही वेळापूर्वी लागर पीत होतो.

पण तो परत ओळखू शकतो का ?

आणि ती ब्लॉंड मुलगी...आणि जॉर्ज...ते सर्व स्मृतीच्या परिधीबाहेर कुठे रात्री बुडाले काय...आम्हांला येथे सोडून...जे या क्षणी स्वतःलाच ओळखू शकत नाहीत ?

केवळ दोन गज...आणि अंधार.

गर्दी, अर्धा चेहरा, एक उंचसा तरुण, विलीवर वाकलेला...विलीच्या शर्टची कॉलर हातात पकडून त्याला भिंतीजवळ तो खेचतो—खटाक...खटाक...

स्कार्फ फुगतो...त्या उंचशा व्यक्तीच्या गळ्यातला स्कार्फ...रंगीत—त्यावर गुलाबाची फुलं छापलेली आहेत...गुलाबाची फुलं...आणि रक्त जे त्याच्या ओठातून ओघळत त्याच्या 'गोटी'(दाढी)पर्यंत वाहात आहे...

एका क्षणाच्या प्रकाशात जणू सर्व काही स्पष्ट होते...कैक आवाज, घाम, आंबट वास...आणि हसू...

आणि तेव्हा तो आला होता...एक ठेंगूसा माणूस, जो आत्तापर्यंत गर्दीच्या अंधारात लपला होता. त्याच्या घनदाट भुवयांच्या मध्ये बारीक अस्थिर डोळे चमकतात...भुवयांचे केस इतके दाट व लांब की डोळ्यांवर वळून आलेले. असे वाटे की जणू चेहऱ्यावर त्याने कुत्र्याचा मुखवटा घातला असावा...

तो फार सावकाश पावलांनी विलीकडे येत होता.

"कुठे गेली तुझी डार्लिंग ?" त्याने झटक्यासरशी विलीच्या हनवटीला वर उचलून धरले.

"बोल–कुठे गेली ?"

प्रत्येक वेळी 'कुठे गेली' म्हणताना तो विलीचे डोके भिंतीवर ढकलत असे... प्रत्येक वेळी विलीचे शरीर एखाद्या दारुड्याप्रमाणे झोकांडे खाई–

आणि ते हसत होते.

"बॅश हिम देअर !..." दुसऱ्याने आपल्या ...कडे इशारा केला. खटखट डोके भिंतीवर आपटण्याचा आवाज. खटखट. माझ्या हृदयाची वेडी ज्वरग्रस्त धुकधूक. घाम आणि रक्त यांनी माखलेले विलीचे शर्ट आणि एक अनवरत, कधी न संपणारी खटखट व भुताटकी हसू..

"बोल, कुठे गेली ?...स्पीक, स्पीक, स्पीक, यु फिल्दी...हा–हा–हा...खट–खट–खट..."

स्कार्फमध्ये झुलणारी रंगीत गुलाबाची फुलं...

आता मला काहीच आठवत नाही...खरं म्हणाल तर मला हेही ठाऊक नाही की मी स्वतः ओरडलो की कोणता तरी बाहेरचा चीत्कार मला सहसा हालवून गेला. नाही...

आजही मी विश्वास करू शकलो नाही की तसली भयंकर आरोळी माझ्या गळ्यातून निघाली असेल. मला फक्त इतके वाटले की माझे श्वास...एका अंधळ्या वटवाघळाप्रमाणे माझ्या छातीच्या भिंतीला टकरा देत सारखे फडफड करीत होते. व मी एका धक्क्याने या दोन्ही हातांतून माझी मान सोडवून घेतली, जे आतापावेतो मला थोपवून होते...

केवळ दोन गज...आणि मध्ये अंधार.

मी विलीकडे वळलो. मी त्याला काही सांगू इच्छितो. मला वाटतं ते फार महत्त्वाचं आहे.

मधला अंधार–आणि ते थंड हात आणि ती आरोळी...

माझे डोके त्या अदृश्य व्यक्तीच्या हनवटीवर आपटले, ज्याने मला मधेच पकडले होते. दुसऱ्या हाताने त्याने माझा चेहरा दाबून टाकला...माझे तोंड त्याच्या शर्टवर घसरत गेले. मी तुला शिकवीन...हाउ टु रन...बास्टर्ड...न जाणे का, मी आपले पाय एकसारखे एखाद्या सन्निपाताच्या रोग्याप्रमाणे हवेत हलवू लागलो—काही होणार नाही...मी विचार केला...मला सोडणार नाही...आणि तेव्हा मला वाटले की जणू आता मी श्वास घेऊ शकणार नाही. पण हे सर्व चुकीचे होते. प्रत्येक दुसरा श्वास पहिल्या श्वासाच्या मगरमिठीतून जणू स्वतःला सोडवून वर येत होता आणि परत मला चिपकून जात होता आणि मी विचार करीत होतो, हा शेवटचाच श्वास, पण तिसरा परत धडपडत आपल्या दुसऱ्या श्वासाला पिंजऱ्यातून सोडवून पुढे येई. आणि मला आश्चर्य वाटे की कोणताही श्वास मागे राहून शेवटचा बनू इच्छीत नाही...आणि तेव्हा एक भयंकर आनंदाने मला चोहीकडून लपेटून घेतले, जणू मी फक्त याच क्षणासाठी आतापर्यंत जगत होतो आणि आता तो क्षण आला आणि येणाऱ्या प्रहरातून कोणतीही भीती पहिल्यासारखी राहणार नाही...मी विसरलो की मी एकटा आहे...मला फक्त हे माहीत होते की ते मला एकटा सोडणार नाहीत आणि मी आता वाचू शकत नव्हतो. आणि त्या रात्री मला ते प्रथम असे समजले की एकटे होणे पुरेसे नाही...पुरेसे नाही. कारण ते तर सर्वत्रच आहेत. आणि हे मला कळलेले होते. फक्त हे कळले नव्हते की एके दिवशी ते मला पकडतील...आता ती पूर्वीची भीती तशी आकारहीन राहिली नव्हती...आता ते अगदी प्रत्यक्ष आणि मर्यादित भय होते. जितका मोठा मी तेवढेच मोठे ते भय. आम्ही दोघे अंधारात जनावरांप्रमाणे श्वास घेत होतो. आणि मला वाटले की शेवटपर्यंत मी माझे पाय असेच हवेत थरथरत ठेवीन–ओह डियर, हाउ फनी इटीज...हाऊ फनी! कुणी हलत आहे–(काय तो हसणारा मीच आहे?) हसू असे की त्यातून ध्वनी निघत नाही! बुक्के... शिव्या...आणि मग परत हसू.

ते मला सरपटत ओढून नेतात...गल्लीच्या कोपऱ्यापर्यंत.

मी उठण्याचा प्रयत्न करतो आणि परत बसतो. परत इच्छा होते पडण्याची. त्याच सडकेवर पण डोळे बंद करताच असे वाटते की कोणती तरी एक वस्तू भरतीप्रमाणे वर उठते, माझ्या पायांतून, छातीतून, हातांतून, संधींतून—उठते आणि विरते...ही कशी वेदना आहे ? आणि मला किंचित आश्चर्य वाटते की मी जीवनाची इतकी वर्षे घालवली आणि तरी मला हे दुःख माहीत नसावे. वाटले, माझ्या चेतनेने या दुःखाचे टोक पकडले आहे – नी ती ही सरपटत आहे...कधी केवळ चेतना राहते – दुःखापासून वेगळी. तेव्हा वाटते की जणू मी काही हरवले आहे. पावसाळी संध्याकाळ आहे व मी पुनः आपल्या शहराच्या सडकेवर एका टोकातून दुसऱ्या टोकापर्यंत पळत आहे...एक लहानशी गुंफा माझ्यासमोर उघडली आहे आणि एक उत्कट भयंकर आकांक्षा मनात जागली आहे त्यात लपून जाण्याची...जणू त्यात लपून जाण्यानेच माझे सर्व काही प्रश्न सुटतील, सर्व काही सहज होऊन जाईल...पण ती गुंफा नाही. ती वेदना आहे जी माझ्या शरीराच्या अंगांगांतून जणू बरोबर वाटली गेली आहे.–ही फारच नव्या प्रकारची वेदना आहे, जी स्वतः संपूर्ण आहे आणि जी आजपर्यंत मी ओळखू शकलो नाही. 'हाउ फनी इट इज, हाउ वंडरफुली फनी!' मधूनमधून चेतनेचा पडदा उघडतो व मग मला आश्चर्य वाटते की मीच आहे का...आणि मला सहसा विश्वास होत नाही की मी बाहेर आलो आहे...स्वतःच्या बाहेर, जेथे मला कोणीच वाचवू शकत नाही.

अंधाराच्या बाहेर—जेथे ते आहेत.

ती ऑगस्ट-आरंभीची रात्र. ते मला गल्लीच्या एका गलिच्छ, निवांत कोपऱ्यात सोडून गेले होते. किती वेळ मी तेथे पडून होतो मला आठवत नाही. मधून मधून माझे डोळे उघडत. एका बारीक, पारदर्शी धुक्यामागे लंडनचे आकाश पसरले होते. मग डोळे बंद होत आणि. .मला वाटे, जणू मी एक धुके सोडून दुसऱ्या धुक्यात लपेटला जात आहे.

कितीतरी वेळ असेच चालले. पण मी सावधान झालो. पायांची चाहूल माझ्याजवळ येतेशी वाटली. फार हळूहळू. मी डुलक्या घेऊ लागलो. कदाचित हे स्वप्न असेल. बराच वेळपर्यंत ठाऊक पडले नाही की कुणी माझे खांदे गदगदा हलवत होतं...

"का जास्त दुखतंय ?"

"नाही...जास्त नाही." डोळे उघडले. माझ्यावर जॉर्जचा चेहरा वाकलेला. लागरचा हलका वास मला स्पर्श करून गेला. न जाणे का, त्या वासाबरोबर एक दुसरी आठवण वर तरंगली–मोत्सार्टच्या सेरेनेडची एक जुनी ट्यूब–ट्यूबदेखील नाही, पण एक तुटकी डहाळी जणू नाचते आहे, काही तासांपूर्वी 'पब'मध्ये तिला मी सहसा ओळखले होते...

"तुम्ही येथे?"

"मला ठाऊक होते, ते तुला येथे आणतील...मी पाहात होतो." तो म्हणाला.

"विली कुठाय?"

"लेट हिम गो टु हेल...जर तो नसता...तर हे सर्व काही झालेच नसते."

"काय झाले नसते?"

एकदम एक मोठी कार सडकेवरून निघून गेली. आमचे डोळे दिपले. माझे लक्ष सर्वात प्रथम स्वतःकडे वळले. शर्टाची कॉलर वरून फाटली होती, पोटावर धूळ आणि बियरचे डाग होते आणि मला वाटत होते की शरीराच्या घामाला चिपकलेल्या बनियनमधून एक भारी, ओली वाफ जणू निघत आहे.

"तू परत कशाला आलास?"

"मी आत जाऊ इच्छीत होतो–तुमच्याजवळ, पण तुम्हांला माहीत आहे..."

"इट इज ऑल राइट, जॉर्ज," मी त्याला मध्येच थांबवले. माझ्या तोंडाचा स्वाद कडू झाला होता, जणू मी खूप दिवसांच्या तापानंतर उठलो असेन. जवळच लॅंपपोस्टचे विवळ वर्तुळ होते. मी त्याच्या मध्यभागी थुंकलो. अगदी लाल, जणू पानाचे पीक असावे. ते रक्त होते...मला विचित्र वाटले. मी परत एकदा थुंकलो. एकदा पुनः स्वतःचे रक्त पाहण्याचा लोभ आवरेना.

"तुला जास्त तर लागले नाही ना?" जॉर्ज म्हणाला. त्याच्या आवाजात एक मर्यादित कुंठा होती. मला ते फार विचित्र वाटले.

मी गप्प बसलो व परत उभा राहिलो. त्या क्षणापावेतो गल्लीच्या भिंतीवर माझे डोके टेकलेले होते...

खट–खट–खट...

अजूनही तो आवाज माझ्या नसांतून फडफडत होता...

आम्ही चुपचाप ट्यूबकडे चालू लागलो. माझ्या खिशात आता दोन शिलिंग पडले होते. सहज माझी कापरी बोटं त्यांना चाळवीत होती.

बाहेर सडकेवर ऑगस्टची पानझर पडली होती...लंडनचा धूर रात्रीपलीकडे पडत होता.

"तुला अजून माझा विश्वास नाही...तुला वाटते..." जॉर्जने जबरदस्तीने माझे खांदे पकडले.

"इट इज ऑल राइट—" मी त्याचा हात खांद्यावरून दूर केला. तो यावेळी माझ्याबरोबर नसता तर बरे झाले असते.

आम्ही ट्यूब स्टेशनच्या पायऱ्या उतरू लागलो.

प्लॅटफॉर्म निर्जन होता. बेंचावर एखादुसरा मनुष्य डुलक्या घेत होता. आमच्या अगदी जवळ खांबाच्या आड एक जोडपे भिंतीला चिपकले होते...मुलगी आपल्या केसांवर वारंवार हात फिरवी. तिच्या समोर उभा असलेला तरुण तिच्या कानात काहीतरी पुटपुटत होता. मुलगी परत परत हसायची आणि मग परत चमकून दोन्हीकडे पाहू लागायची.

तिकीट विकत घेऊन आम्ही जवळच्या रिकाम्या बेंचावर बसलो.

"तू लंडनमध्येच राहणार ?"

तो गप्प. त्याचे डोळे बत्त्यांखालीकडे अंडरग्राउंड सुरंगाकडे लागले होते. अंधाऱ्या, ओलसर. जणू सुरंगाचा अंधार वरील शहराच्या अंधाराला छेद देत होता...जणू घाणेरड्या पाण्याचे स्थिर डबके.

"न जाणो विली कुठे गेला ?"

"विली, मी त्याला पाहिले नाही," तो म्हणाला.

"पण तू बाहेर उभा होतास, तू आत्ता म्हणालास ना ?"

"मी काहीच पाहिले नाही."

आम्ही परत गप्प झालो. पण या मौनात एक भारी ताण होता. जणू कोणती तरी वस्तू परत परत आमच्यामध्ये येत होती व आम्ही ती परत परत मागे ढकलीत होतो.

"तुला वाटते मी खोटे बोलतो ?" तो म्हणाला.

मी दुसरीकडे पाहू लागलो.

"तू काहीही समज. मला याची मुळीच फिकीर नाही," तो म्हणाला.

"डोंट बि सिली !" मी म्हटले.

"तू माझा विश्वास करत नाहीस." आता त्याने माझ्याकडे पाहिले.

"तुला वाटते की मी पळून गेलो होतो..." त्याचे ओठ थरथरत होते

"डॅम इट, आय से, डॅम इट."

"त्यांनी मला पकडून ठेवले होते...आणि मी तुझ्याजवळ..."

"इट इज ऑल राइट, जॉर्ज."

"ओ नो...इट इज नॉट ऑल राइट..." तो जणू ओरडत होता.

जवळच्या बेंचावर डुलक्या खाणारा माणूस एकदम जागा झाला व आम्हांला पाहू लागला.

"जॉर्ज, ऐक," मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. बेंचच्या हातावर त्याचा चेहरा दोन्ही हातांत दाबलेला होता व वारंवार हलत होता.

"आय वॉज अफ्रेड, टेरिबली अफ्रेड..."

आम्ही दोघे शहारत होतो.

"अफ्रेड..."

मी समोर पाहात होतो...अंडरग्राउंडचा अंधार जणू हळूहळू हलत असावा– एका पडद्याप्रमाणे जो आत्ताच उठेल. मी त्या क्षणी जॉर्जला भ्यालो. स्वतःची भीती मला वाटू लागली. मला वाटले की मी आता त्याच्याकडे कधी पाहू शकणार नाही. त्या क्षणी मी कोणतीही भयंकर गोष्ट करू शकत होतो–मी त्याला पुष्कळ सांगू इच्छीत होतो, काहीही...पण आता आम्ही दोघे एकत्र असूनही असे अनुभवत होतो जणू अचानक एककटे वळलो आणि तो रडत आहे व मी काहीच करू शकत नाही. कदाचित यापेक्षा भयंकर काहीच नसेल की जेव्हा दोन व्यक्ती एकत्र असूनही असा अनुभव करू लागतात की गेलेल्या काळातील एकदेखील स्मृती एक क्षण देखील त्यांच्या वर्तमान...या जाणाऱ्या क्षणाच्या अगदी एकटेपणाला साथ देऊ शकत नाही, त्यात काहीच उपयोगी पडू शकत नाही.

तेव्हा आम्ही चमकलो. दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर वॉरेन स्ट्रीटला जाणारी ट्यूब येत होती, जॉर्जला त्यानेच जायचे होते. आमच्या भोवतालचे झोपाळू लोक एकदम उभे राहिले. ट्यूबच्या तेज हेडलाइटमुळे न्यू ॲक्टनच्या पुढच्या सुरंगाचा अंधार थोडा मागे सरला. पायऱ्यांवरून काही लोक पळतपळत प्लॅटफार्मकडे येत होते; वॉरेन स्ट्रीटला जाणारी शेवटची ट्यूब पकडावी या आतुरतेने.

जॉर्ज उभा राहिला. त्याने एकदासुद्धा मला पाहिले नाही आणि दुसऱ्या क्षणी गर्दीबरोबर तोही ट्यूबकडे पळू लागला. ट्यूबची ऑटोमॅटिक दारं क्षणभरासाठी उघडली व गर्दीने त्याला स्वतःच्या पोटात घेतले व दुसऱ्या क्षणी दारं बंद झाली.

चाकांचा खडखडाट हळूहळू बंद पडत गेला व मग सर्व काही पूर्ववत शांत झाले. सुरंगाच्या ज्या अंधाराला ट्यूबच्या हेडलाइटने मागे ढकलले होते, तो परत फिरत आला.

फक्त प्लॅटफॉर्मच्या उघड्या छतापलीकडे न्यू ॲक्टनचा प्रकाश अंधारात गुपचुप चमकत होता.

खांबाआडच्या तरुणाने म्हटले–"नंतरच्या गाडीने..." व तिचे चुंबन घेतले. मुलीने डोळे मिटले.

त्याने पाहिलेही नाही...

आणि मला वाटले, किती काळ लोटला मी सिगारेट ओढली नाही.

दुपारचं भोजन

अमरकान्त

स्वयंपाक झाल्यावर सिद्धेश्वरानं चूल विझवली आणि दोन्ही गुडघ्यांत डोकं घालून ती स्थिर नजरेनं जमिनीकडं बघत राहिली. जणू काही जमिनीवरच्या मुंग्या-माशा किंवा पायांची बोटंच मोजते आहे. अचानक तिला खूप तहान लागली. झिंगल्यासारखी ती उठली आणि मडक्यातलं पाणी गटागटा प्याली. अनशेपोटी प्यालेलं ते पाणी सिद्धेश्वरीला लागलं आणि "हाय रे राम" असं कण्हून ती तिथंच लवंडली.

जवळजवळ अर्ध्या तासानंतर तिच्या जिवात जीव आला. ती उठून बसली. डोळे चोळत इकडं तिकडं बघता बघता तिची दृष्टि जीर्णशीर्ण खाटल्यावर झोपलेल्या आपल्या सहा वर्षांच्या मुलाकडं गेली. प्रमोद उघडावाघडा झोपला होता. छातीच्या गळ्याच्या हड्डया स्पष्ट दिसत होत्या. हातपाय वाळक्याप्रमाणं निर्जीव भासत होते. पोट मात्र डेरेदार होतं. त्याचं तोंड उघडं पडलं होतं आणि त्यावर माशा घोंगावत होत्या.

ती उठली आणि त्याच्या तोंडावर आपला एक फाटका घाणेरडा ब्लाउज पांघरून थोडा वेळ तशीच सुन्न उभी राहिली. मग बाहेरच्या दरवाजाजवळ येऊन गल्ली न्याहाळू लागली. बारा वाजून गेले होते. ऊन्ह रणरणत होतं. मधूनच कोणीतरी डोक्यावर टावेल किंवा रुमाल ठेवून जाताना दिसत असे. क्वचित कोणी छत्री उघडून.

दहा-पंधरा मिनिटं ती तशीच राहिली. पण मग क्षणोक्षणी वाढणाऱ्या उन्हाकडं बघून तिच्या चेहऱ्यावर काळजी दाटली. काही वेळाने जेव्हा तिने दरवाजातून वाकून पाहिलं तेव्हा तिचा मोठा मुलगा रामचंद्र हळूहळू येताना तिला दिसला.

घाईघाईने तिनं एक तांब्याभर पाणी ओसरीजवळ ठेवलं आणि स्वयंपाकघरात जाऊन पाटपाणी करायला लागली. पाट ठेवून तिनं दरवाजाकडं तोंड केलं आणि रामचंद्र आत आला.

रामचंद्र येऊन धापकन चौक्यावर बसला आणि तिथंच निप्राणपणे लवंडला. त्याचं तोंड लाल झालं होतं आणि रागीट दिसत होतं. केस अस्ताव्यस्त झाले होते आणि फाटक्या जोड्यांवर धूळ जमली होती.

सिद्धेश्वरीला प्रथम आपल्या मुलाजवळ जायची हिंमतच झाली नाही आणि ती बसल्या ठिकाणाहूनच मुलाची व्यग्र स्थिती बघू लागली. दहा मिनिटांनीही जेव्हा मुलगा उठेना, तेव्हा मात्र ती घाबरली. जवळ जाऊन तिनं हाका मारल्या, "बडकू, अरे

बडकू!" (मोठ्या! अरे मोठ्या!) तो काहीच बोलला नाही. तिनं नाकापाशी हात नेऊन पाहिला. श्वास धीमा-धीमा चालत होता. मग तिनं कपाळाला हात लावून बघितला. ताप नव्हता. तिच्या हाताच्या स्पर्शासरशी रामचंद्राने डोळे उघडले. त्यानं झोपाळू नजरेनं आईकडे बघितलं. थोड्या वेळानंतर तो एकदम झटदिशी उठून बसला. यंत्रवत त्यानं वहाणा काढल्या, खाली ठेवलेल्या लोट्यातून पाणी घेऊन हातपाय धुतले. आणि तो पुनः चौक्यावर येऊन बसला.

भीतभीत सिद्धेश्वरीनं विचारलं, "स्वयंपाक झालाय. ताट इथंच आणू वाढून?"

उठता उठता रामचंद्रानं विचारलं,

"बाबूजी जेवले?"

लवकर लवकर स्वैपाकघराकडे जाताना सिद्धेश्वरी म्हणाली, "येतीलच आता ते."

रामचंद्र पाटावर बसला. एकवीस वर्षाच्या सुमाराचा हा मुलगा गोरटेला, मोठमोठ्या डोळ्यांचा आणि उंच होता. त्याच्या ओठांच्या जवळ सुरकुत्या पडल्या होत्या. तो स्थानिक वर्तमानपत्राच्या कचेरीत प्रूफरीडरचं काम शिकत होता. गतवर्षीच तो इंटर झाला होता.

सिद्धेश्वरीनं ताट वाढून समोर ठेवलं आणि ती जवळ बसून पंख्यानं वारा घालू लागली. रामचंद्रानं जेवणाकडं स्थितप्रज्ञाच्या नजरेनं पाहिलं. दोन चपात्या, वाडगाभर पाणीदार आमटी आणि तळलेल्या चणाडाळीची भाजी.

रामचंद्राने चपातीचा तुकडा चावत विचारलं, "मोहन कुठं आहे? ऊन्ह रणरणतंय बाहेर."

मोहन सिद्धेश्वरीचा मधला मुलगा. अठरा वर्षांचा मुलगा हायस्कूलच्या शेवटच्या वर्षात शिकत होता. कोण जाणे तो केव्हाचा कुठं तरी गेला! सिद्धेश्वरीलाही माहीत नव्हतं.

पण असं खरं सांगायला तिचा जीव झाला नाही आणि लटकंच ती म्हणाली, "कुणा मुलाकडे अभ्यासाला गेलाय बघ. येईलच एवढ्यात. त्याचं डोकं मोठं हुषार आहे बाबा आणि सारखा आपला अभ्यास. जेव्हा ऐकावं तेव्हा फक्त अभ्यासाची गोष्ट. दुसरं नाव नाही."

रामचंद्र काही बोलला नाही. घास तसाच ठेवून तो घटाघटा पाणी प्याला. मग चपातीचे अगदी बारीक तुकडे करून तो खाऊ लागला.

सिद्धेश्वरी भयभीत काळजाने त्याच्याकडे टक लावून बघत होती. थोड्या वेळाने काळीज मुठीत घेऊन तिनं मुलाला विचारलं, मग "तिथं काही झालं काय रे?"

रामचंद्रानं आपले मोठे भावहीन डोळे आईवर रोखले. नंतर खाली बघत तो म्हणाला, "योग्य वेळी सगळं ठीक होईल."

सिद्धेश्वरी गप्प बसली. उन्हाचा कडाका आणखी वाढला. छोट्याशा अंगणावर असणाऱ्या आभाळाच्या तुकड्यात बारीकसे ढग कागदाच्या तुकड्यांप्रमाणे तरंगत होते. बाहेरच्या गल्लीतून जाणाऱ्या टांग्याचा खडखडाट आणि खाटेवर झोपलेल्या मुलाच्या श्वासाचा खरखराट एवढेच आवाज ऐकू येत होते.

मध्येच रामचंद्रानं विचारलं, "प्रमोदनं काही खाल्लं ?"

उदास सुरात तिनं उत्तर दिलं, "हो."

"आज रडला बिडला नाही ना ?"

सिद्धेश्वरी पुन्हा खोटं बोलली, "आज अगदी रडला नाही बरं. इतका शहाणा झालाय. सारखा म्हणत होता दादाकडं जाईन. असा मुलगा..." पण तिच्या तोंडून आणखी शब्द फुटेना. कालच प्रमोदनं रेवड्यांचा हट्ट घेतला होता आणि दीड तास रडून काही न खाताच तो झोपला होता.

रामचंद्रानं आईकडं आश्चर्यानं पाहिलं. मग थोड्या घाईनंच तो जेवण संपवू लागला. ताटात फक्त एकच चपातीचा तुकडा राहिला तेव्हा उठण्याची लगबग करीत सिद्धेश्वरीनं म्हटलं, "आणखी एक चपाती आणू ?"

हाताने नको म्हणत रामचंद्र म्हणाला,

"अंहं, बिल्कुल नको. माझं पोट भरलं. खरं म्हणजे ही चपातीसुद्धा मला जात नव्हती."

सिद्धेश्वरी आग्रह करीत म्हणाली, "अर्धी तरी ?"

तिरसटून रामचंद्र म्हणाला, "जास्त खायला घालून काय अजीर्ण होऊ दे म्हणतेस ? सारखं आपलं तेच खरं. भूक असती तर मी घेतलं नसतं ?"

सिद्धेश्वरी जिथल्या तिथं बसून राहिली. ताटात राहिलेल्या चपातीवरून हात काढून घेत तो म्हणाला, "पाणी आण जरा."

तांब्या घेऊन सिद्धेश्वरी पाणी आणायला गेली. रामचंद्राने वाटीवर बोटं हलकेच टकटकवली. मग हात ताटातच राहू दिला. एकदोन क्षण त्यानं राहिलेल्या चपातीच्या तुकड्यांकडं पाहिलं. मग इकडंतिकडं बघत त्यानं अशा रीतीनं तो तुकडा तोंडात ठेवला की जणू काही तो विडाच आहे.

मधला मुलगा आल्याबरोबर हातपाय धुवून पाटावर बसला. तो सावळा होता आणि त्याचे डोळे लहानच होते. त्याच्या चेहऱ्यावर देवीचे वण होते. भावासारखाच तो हाडकुळा होता पण उंच नव्हता. वयापेक्षा तो प्रौढ, समजदार दिसत होता.

त्याच्यासमोर थाळी सरकवत सिद्धेश्वरीनं विचारलं, "कुठं गेला होतास रे ? दादा विचारत होता."

चपातीचा मोठा तुकडा चावत मोहन म्हणाला, "कुठं गेलो होतो ग ? इथंच तर होतो !"

पंखा हलवीत स्वप्नात बोलावं तसं ती बोलतच राहिली, "दादा तुझं कौतुक करत होता. म्हणत होता की मोहन नेहमी अभ्यास करत असतो. हुषार आहे." असं म्हणून तिनं मोहनकडं अशा रीतीनं पाहिलं की जशी काही त्यानं चोरी केलीय.

मोहन आईकडं बघत कसनुसं हसला आणि पुन्हा जेवू लागला. आतापर्यंत एक चपाती आणि अर्ध्याहून जास्त आमटी त्याची खाऊन संपली होती.

सिद्धेश्वरीला काय करावं ते कळत नव्हतं. या दोन्ही मोठ्या मुलांचं तिला भय वाटत होतं. अचानक तिचे डोळे भरून आले. तिनं दुसरीकडं मान वळवली.

थोड्या वेळाने मोहनकडं पाहाते तर त्याचं जेवण जवळजवळ झालं होतं. सिद्धेश्वरी म्हणाली, "थांब, एक चपाती वाढते."

स्वयंपाकघराच्या दिशेने त्यानं एक नजर फेकली. मग म्हणाला, "नको."

सिद्धेश्वरीनं म्हटलं, "अरे तुझ्या दादानंही घेतली होती. माझी शपथ आहे, थोडी वाढते."

मोहननं आईकडं निरखून बघितलं आणि शिष्याला समजावण्याच्या थाटात तिला म्हणाला, "नको ग, एक तर भूक नाही आणि तू चपात्या केल्यायस ना त्या खरं खाववत नाहीत. आता तू शपथ म्हणतेस म्हणून थोडीशी डाळ दे. झकास झालीय."

ती गप्प झाली. त्याच्या वाटीत तिनं आणखी डाळ ओतली.

मोहन डाळ पीत होता. एवढ्यात मुंशी चंद्रिकाप्रसाद बाबू वहाणा फरफटवीत आले आणि 'हरे राम' म्हणून चौक्यावर बसले. सिद्धेश्वरीनं डोक्यावरचा पदर थोडा पुढं ओढला. मोहननं डाळ एका दमात पिऊन टाकली आणि आचवायला तो निघून गेला.

दोन चपात्या, वाटीभर आमटी आणि हरभऱ्याच्या डाळीची भाजी. मुंशी चंद्रिकाप्रसाद पाटावर बसले आणि म्हातारी गाय रवंथ करते त्याप्रमाणे घास चावू लागले. ते पंचेचाळीस वर्षांचे होते पण दहा वर्षांनी म्हातारे वाटत होते. त्वचेवर सुरकुत्या पडल्या होत्या. टकल तर होतंच. कळकट धोतरावर गंजिफ्रॉक त्या मानानं बरं दिसत होतं.

डाळीची वाटी हातात घेऊन भुरकता भुरकता मुंशीजींनी विचारलं, "बडकू कुठं दिसत नाही तो !"

सिद्धेश्वरीच्या काळजात काहीतरी कुरतडल्यासारखं होत होतं. पंखा जोरजोरात हलवत ती म्हणाली, "आत्ता हेच जेवून कामावर गेलाय तो. सांगत होता की थोड्या दिवसांतच नोकरी लागेल. सारखं तोंडात 'बाबूजी' असतं. म्हणतो बाबूजी देवासारखे आहेत."

त्यांचा चेहरा चमकून उठला. मग शरमेच्या स्वरात ते म्हणाले, "छेः! काय वेडा मुलगा आहे!"

सिद्धेश्वरीला कसली नशा चढली होती कोण जाणे! वायू झाल्यासारखी ती बोलत होती, "वेडा नाही काही. हुषार आहे तो. पूर्वजन्मीचा योगी असावा बघा. मोहनला त्याचं फार वाटतं. आज मला म्हणत होता की गावात दादाला फार मान आहे. बाकी काही होवो, पण प्रमोदला काही झालं तर म्हणतो मला सहन नाही होणार."

मुंशीजी डाळीचा हात चाटत होते. समोर बघून हसत ते म्हणाले, "बडकू हुषार खराच. लहानपणी खोडकरही होता, नाही? सारखा खेळत असायचा. पण अभ्यासही करत असे. तोच का? तिन्ही मुलगे मोठे हुषार आहेत. प्रमोदला काय समजतेस तू?" असं म्हणून ते उगीचच मोठमोठ्याने हसले.

मुंशीजींची दीड चपाती खाऊन झाली होती. एकाएका घासाबरोबर युद्ध करत. गिळायला जरा त्रास पडला की पाणी पीत. आताही खोकून खोकून ते दुसरा घास चावत होते.

पुन्हा एकदा शांतता पसरली. लांबून दळण्याच्या गिरणीची पुकपुक् ऐकू येत होती. जवळच निंबाच्या झाडाखाली एक बेडूक डरॉंव डरॉंव करत होता.

काय बोलावं ते सिद्धेश्वरीला समजत नव्हतं. तिला सगळं समजून घ्यायचं होतं आणि पूर्वी जशी ती सर्व घटनांवर बडबड करायची तसं करावंसं तिला फार वाटायचं. पण तिला कसलं तरी भय वाटायचं.

आता मुंशीजी दोन दिवस मौनव्रत धारण केल्यासारखे गप्प बसून जेवत होते.

सिद्धेश्वरीच्याने चूप बसवेना. ती म्हणाली, "आज पाऊस पडेलसं वाटत नाही, नाही?"

मुंशीजीनी इकडं तिकडं पाहिलं आणि निरुत्साही स्वरात म्हटलं, "माशा फार झाल्यात."

"आत्याबाईच्या कडून काहीच समजलं नाही. कोण जाणे त्यांच्या यजमानांची तब्येत कशी आहे ती!"

मुंशीजी चण्यांकडे अशा प्रेमळ दृष्टीने पाहात होते की जणू काही ते त्यांचे दोस्तच होते. मग ते एकदम म्हणाले, "गंगाशरणबाबूंच्या मुलीचं लग्न ठरलं. मुलगा एम. ए. पास आहे."

सिद्धेश्वरी गप्प झाली. मुंशीजीही गप्प होते. त्यांचं जेवण झालं होतं. आणि ताटांतलं उरलंसुरलं ते माकडाप्रमाणं वेचून वेचून खात होते.

सिद्धेश्वरी म्हणाली, "मोठ्याची शपथ एक चपाती वाढते. हं! अजून पुष्कळ आहेत."

मुंशीजींनी अपराधी नजरेनं पत्नीकडं आणि स्वयंपाकघराकडं पाहिलं, मग गुदमरलेल्या आवाजात ते म्हणाले, "पोळी...राहू दे. पोट भरलं माझं. शिवाय अन्नावरची व विशेषतः तिखट पदार्थांवरची माझी वासना उडालीय. तू उगीचच शपथ नि बिपथ घातलीस. शपथेपुरती थोडीशी दे झालं. गूळ आहे ?"

ती हो म्हणाली. आहे थोडासा.

मुंशीजी म्हणाले, "असं कर, गूळ पाण्यात घालून त्याचा थंडसा रस कर. काय ? तुझी शपथही राहील आणि काहीतरी वेगळं खाल्ल्यागतही वाटेल. नुसती चपाती खाऊन खाऊन वीट आला," आणि ते जोराजोरात हसू लागले.

त्यांचं सगळं आटोपल्यावर त्यांच्याच उष्टया ताटात सिद्धेश्वरी जेवायला बसली. टोपातली आमटी सगळीच्या सगळी वाटीत काढली. तरी वाटी सबंध भरली नाहीच. तरसाळ्यातली भाजी जवळ केली. चपात्यांची थाळी जवळ घेतली तर त्यात एक चपाती शिल्लक होती. जाडजूड, करपलेल्या त्या भाकरीला ती उष्टया ताटात ठेवणार होती. एवढ्यात तिचं लक्ष खाटेवर झोपलेल्या प्रमोदकडं गेलं. त्याच्याकडं तिनं काही वेळ पाहिलं आणि मग हातातल्या चपातीचे दोन तुकडे केले. एक थाळीत ठेवला अणि एक स्वतःला वाढून घेतला. तांब्या पाण्यानं भरून घेऊन ती जेवायला बसली. पहिला घास तिनं तोंडात घातला मात्र, तिच्या डोळ्यात टपटप आसू सांडायला लागले.

सगळ्या घरात माशा भणभणत होत्या. आंगणातल्या दोरीवर एक मळकं लुगडं वाळत होतं. हजार ठिकाणी त्याला ठिगळं लावली होती. मोठी दोघं मुलं कुठं गेली होती कोण जाणे ! बाहेर मुंशीजी निश्चिंत मनाने घोरत होते. जणू भाडेनियंत्रक विभागातली त्यांची नोकरी गेलीच नव्हती !

त्याची भाकरी

मोहन राकेश

बसला यायला उशीर आहे हे बालोला चांगलं माहीत होतं. पण तरीही पदरानं घाम पुसता पुसता तिचे डोळे वरचेवर सडकेकडे वळत होते. नकोदर रोडच्या तेवढ्या भागावर कोणती सावलीही नव्हती. मोठं झाडच नव्हतं. सगळा मोकळा वैराण माळ होता तो. शेतंही चांगली तीस-चाळीस फर्लांगांवर सुरू होत होती. नाहीतरी आता कापणी झाल्यावर शेतांतून तरी ढेकळांशिवाय काय उरलं होतं म्हणा! कडकडीत उन्हात नकोदर रोड जणू वितळत होता. त्याचा सुरमई रंग बाकीच्या धुळीत उठून दिसत होता. बालो जिथं उभी होती तिथून थोड्या अंतरावर एक लाकडी खोका होता. त्यात पाण्याचे दोन भले मोठे डेरे ठेवून एक जण पेंगत होता. पेंगता पेंगता तो अगदी पडायला यायचा. एक झटका बसला की स्वतःला संभाळायचा. निजसुऱ्या डोळ्यांनी आसपासच्या उदास वातावरणाकडं बघून गळ्याचा घाम पुसून पुन्हा पेंगायला लागायचा. त्या खोक्याची एका बाजूला अडीच-तीन फूट सावली पडली होती, त्यात एक दाढीवाला भिकारी खोक्याला टेकून बसला होता. त्याची आशाळभूत नजर बालोच्या हातातल्या गठळ्याकडे होती. त्याच्याजवळ एक कुत्रं बसलं होतं. त्याचीही नजर बालोच्या हातांवरून हलत नव्हती.

बालोनं हातांतलं भाकरीचं गठळं मळक्या पदरात झाकलं होतं. मेली कुणाची तरी वाईट नजर पडते. भाकरी तिनं आपल्या नवऱ्यासाठी आणली होती. सुचासिंह ड्रायव्हर होता. तिला यायला वेळ लागला आणि सुचासिंहाची बस निघून गेली. आता नकोदरला जाऊन पुन्हा बस येईल तेव्हा भाकरी देईन या हिशेबाने बालो उभी होती. ती वेळेवर पोचली नाही तेव्हा सुचासिंह रागावला असणार हे ती पुरेपूर जाणून होती. एरव्हीही त्याची बस जालंदरहून निघायला दोन वाजून जायचे आणि नकोदरला पोचून भाकरी खायला तीन-साडेतीन वाजायचे. ती रात्रीची भाकरीही बरोबरच घ्यायची. मग बसचा शेवटचा फेरा करून तो ती खायचा. आठवड्यातून सहा दिवस सुचासिंहाची ड्यूटी असायची आणि हाच क्रम चालू असायचा. बालो एक-सव्वा वाजता भाकरी घेऊन निघायची आणि टळटळीत दुपारच्या उन्हात अर्धा-एक कोस चालून दोन वाजेतो रस्त्याच्या कडेला पोचायची. दोनपाच मिनिटं वेळ झालाच तिला तर सुचासिंह काहीबाही बहाणा करून बस तिथं थांबवायचा. पण ती आली की, तिच्यावर

खेकसून म्हणायचा, "बस काय तुझ्या बापाची बाटली होय? मी सरकारी नोकर आहे." बिचारी ते सगळं निमूट ऐकून घेत त्याला भाकरी द्यायची.

पण आज ती दोन-चार मिनिटं नव्हे, चांगली दोन-अडीच तास उशिरा आली होती. आता जाऊन काही उपयोग होणार नाही, सुचासिंहला दुपारची भाकरी कुठल्या ना कुठल्या तंदुरावर खावी लागली असणार, हे सगळं जाणूनही ती सगळा रस्ता चालून आली होती. रात्रीची भाकरीही द्यायची होती आणि शिवाय घडलेलं सगळं सांगायचं होतं. कारणाशिवाय का तिला उशीर झाला होता? ती वारंवार झाली गोष्ट मनातल्या मनात आठवत होती. विचार करीत होती की कोणत्या रीतीने सांगितली म्हणजे सुचासिंहाचं माथं एकदम भडकणार नाही! त्याचा राग भारीच वाईट...

जंगीच्या बाबतीत बरंच बोललं जात होतं. गेल्या वर्षी त्याने गावातून एक पळवली आणि कोण जाणे कुठे विकून आला. नंतर म्हणे नकोदरच्या पंडित जीवारामबरोबर त्याची बाचाबाची झाली आणि त्यात त्याने पंडित जीवारामचा खूनच केला. गावचे लोक आपले त्याच्यापासून लांबलांबच राहायचे. पण त्याचं आणि आपलं कुणी वाकडंही पडू देत नसत. पण माणसाच्या बदमाषपणालाही काही मर्यादा असते ना? असेल तो लाख गोष्टीत वाईट पण म्हणून चौदा वर्षांच्या जिंदांला एकटीशी बघून तिचा हात धरण्याइतका तो हलकट असेल असं नव्हतं बालोला वाटलं. मेला जिंदांपेक्षा वयाने तिप्पट होता आणि कालपर्यंत तिला 'बेटी', 'मुली', 'बाळा' करून हाक मारत होता. पण मेल्याने आज शेतातून येणाऱ्या जिंदांचा हात धरला!

तिनं जिंदांला नंतीच्या इथून गवऱ्या आणायला पाठवलं होतं. बालोचं घर शेताच्या या कडेला होतं आणि गावची बाकी घरं त्या कडेला. ती पीठ मळून वाट बघत होती की आत्ता जिंदां गवऱ्या घेऊन आली की भाकऱ्या भाजायच्या आणि बसची वाट धरायची. पण जिंदां जेव्हा आली तेव्हा तिचा चेहरा पांढराफटक पडला होता. आणि हातात काहीच नव्हतं. जोपर्यंत ती आली नव्हती तोवर बालो तिच्यावर चडफडत होती. पण तिचा तो पांढराफट्ट चेहरा बघताच तिच्या काळजात धडली मरली.

"काय ग जिंदां, काय झालं?" तिनं विचारलं. पण जिंदांचं एक नाही नि दोन नाही. ती गुपचूप आली. तिच्याजवळ बसली आणि गुडघ्यात डोकं खुपसून हुंदके देऊ लागली.

"मेले, बोल तरी काय झालं ते?"

जिंदां काही बोलली नाही. तिच्या हुंदक्यांचा आवाज मात्र वाढला.

तिच्या डोक्यावर ममतेने हात फिरवीत बालोनं विचारलं, "कुणी काही बोललं तुला? होय?"

"तू मला शेण्यागवऱ्या आणायला धाडत जाऊ नकोस," रड्यातून वाट काढून गेंगाण्या आवाजात जिंदां म्हणाली. "आजपासून मी घराच्या बाहेर नाही पाय घालणार. तो मेला जंगी आज मला म्हणत होता..." गळा भरून येऊन ती बोलायची थांबली.

"काय म्हणत होता जंगी तुला? बोल, सांग लवकर–" एका अज्ञात भीतीचं प्रचंड ओझं पडलं होतं. "चांडाळणी, बोललीस तर काय जीभ झडेल?"

"तो म्हणत होता..." मुसमुसत जिंदां सांगू लागली, "म्हणत होता चल जिंदां आत येऊन थोडं सरबत पिऊन जा. आज तू फारच सुंदर दिसतेस..."

"हलकट मेला," ती एकदम भडकून म्हणाली, "भडव्याला आपली आई-बहीण सुंदर नाही वाटली? जळ्ळी त्याची नजर. मेल्याच्या डोळ्यात किडे पडतील. निसंतान्या, तुला आज मुलगी असती तर ती हिच्यापेक्षा मोठी असती. डोळ्यांच्या खाचा होतील मेल्या...मग तू काय म्हणालीस त्याला?"

"मी म्हटलं काका मला तहान नाही लागली." जिंदांचं मुसमुसणं थोडं कमी झालं.

"मग?"

"म्हणाला तहानेली नसलीस तरीही एखादा घोट पी. काकाचं सरबत प्यालीस तर जन्मभर विसरणार नाहीस, आणि माझा हात धरून ओढायला लागला."

"पटकी येऊ दे मेल्याला, तळपट होवो त्याचं! येऊं दे सुचासिंगला. नाही त्याचे तुकडे तुकडे करायला लावले तर बघ! हलकट मेला! मेल्या, तुला जागच्या जागीच नाहीसा करते बघ. मग पुढे?"

"मी हात सोडवून घ्यायला लागले तर मला मिठाईची लालूच दाखवायला लागला. माझ्या हातातल्या गवऱ्या तिथंच पडल्या. मी त्या तशाच पडू दिल्या आणि हात सोडवून पळून आले."

बालोनं लक्षपूर्वक जिंदांकडं पायापासून डोक्यापर्यंत न्याहाळून बघितलं आणि आवेगानं तिला मिठीत कवटाळलं.

"आणखीन् नाही ना मेला काही बोलला?"

"मी जशी पळत पळत थोडी दूर गेले ना, तेव्हा मागून दात काढून हीही करत म्हणतो कसा, 'अग मी तुझी चेष्टा केली. इतकंही समजत नाही ना तुला? ये इकडे. बघ हं. नाही आलीस तर आज तुझ्या ताईजवळ येऊन सांगेन की जिंदां उद्धट होत चालली आहे. मोठ्या माणसांचं ऐकत नाही.' पण मी मागं वळूनही पाहिलं नाही. सरळ घरी आले."

"चांगलं केलंस. मी त्याचा मारून कुट्टा केल्याशिवाय सोडत नाही आज. आता जाते आणि विचारते. मेल्याला माहीत नाही वाटतं जिंदां अशी तशी नाही हात

भरायला. सुच्चासिंगाची मेहुणी आहे," बडबडता बडबडता ती थांबली. बहिणीला म्हणाली, "तुला कुणी बघितलं तर नाही ना?"

"नाही. शेताच्या त्या बाजूला राघूकाका बसला होता आंब्याच्या झाडाखाली, त्यानं मला बघून विचारलं, 'एवढ्या उन्हाची कुठं गेली होतीस ग?' मी सांगितलं की ताईच्या पोटात दुखत होतं म्हणून वैद्यबुवांकडे चूर्ण आणायला गेले होते."

"बरं केलंस. मेला जंगी काय बोलनचालून हल्कट. त्याच्या नावाबरोबर आपलं नाव लागलं तर आपलीच बेअब्रू व्हायची. त्याला मेल्याला काय त्याचं? लोकांना काय कुठूनही काहीतरी बोलायला मिळालं की झालं."

या सगळ्या भानगडीनंतर तिनं गवऱ्या आणल्या, भाकरी भाजल्या, वाडग्यात बटाट्याची भाजी आणि लोणच्याची फोड ठेवून खादीच्या तुकड्यात गठळं बांधतानाच तिला कळलं होतं की दोन केव्हाच वाजून गेलेत आणि दुपारची भाकरी काही सुच्चासिंगला देणं शक्य नाही. म्हणून मग गठळं बाजूला ठेवून ती घरातलं इकडचं तिकडचं काम उरकायच्या मागं लागली. काम उरकल्यानंतर मात्र तिला चैन पडेना. साडेतीन चार नाही वाजले तो तिनं गठळं घेऊन जायची तयारी करायला सुरुवात केली.

"ताई, तू कधी परत येशील?" जिंदांनं विचारलं.

"दिवस मावळायच्या आधी येईन." ती म्हणाली.

"लवकर ये हं. मला एकटीला भीती वाटते."

"भ्यायचं काय कारण आहे?" उसन्या धैर्यानं तिनं म्हटलं, "तुझ्याकडं वाकड्या नजरेनं बघायची कुणाची हिंमत आहे? सुच्चासिंगाला कळलं तर त्याला तो कच्चा खाऊन टाकील. तसा मला वेळ नाही लागणार म्हणा. संध्याकाळच्या आत मी येईनच. तू असं कर. आतून कडी लावून घे. समजलं? कुणी दरवाजा खडखडवला तर पहिल्यांदा नाव विचार. हं?" मग जरा आवाज उतरवून ती म्हणाली, "आणि जर जंगी आला आणि मी कुठं आहे काय वगैरे विचारायला लागला तर म्हणावं सुच्चासिंगला बोलावून आणायला गेली आहे. हं?...पण तसं नको. तू बोलूच नकोस काही. उत्तर देऊ नकोस. हं?"

ती उंबऱ्यापर्यंत पोचली तेव्हा जिंदांनं मागून काकुळतीनं म्हटलं, "ताई, मला भीती वाटते ग."

"तुला काय वेड लागलं आहे?" प्रेमळपणे जरा झिडकारल्यागत करून ती म्हणाली, "सगळा गाव आहे, घाबरायचं काय त्यात? तूही चांगली खबरदार आहेस. अशी काय हातपाय गाळतेस?"

जिंदांला तिनं धीर दिला खरा. पण तिला स्वतःलाच आतून हिंमत नव्हती. सडकेपर्यंत

पोचेतो ती मनातल्या मनात प्रार्थना करीत होती की, देवा, बस लवकर येऊ दे. एकदा भाकरी देईन आणि लवकर जिंदांकडं जाईन.

"वीरा, दोन वाजताची बस जाऊन किती वेळ झाला?" अशाळभूतपणे तिच्या हातातल्या भाकरीच्या गठळ्यावर नजर लावून बसलेल्या दाढीवाल्या भिकाऱ्याला तिनं विचारलं. उन्हाचा ताप अजून कमी झाला नव्हता. खोक्याची सावली मात्र बरीच लांबवर पसरली होती. कुत्रं प्याऊच्या जवळ पडलेल्या पाण्याला मधूनच जीभ लावत इकडं तिकडं फिरत होतं.

"कोण जाणे ताई," भिकारी म्हणाला, "किती बशी जातात किती येतात. कुणाला घड्याळाचा हिशोब आहे?"

बालो गप्प बसली. थोड्याच वेळापूर्वी एक बस नकोदरला गेली होती. तिच्या मनात आलं : धुरळ्याच्या दोन बाजूला दोन वेगवेगळी जगं आहेत. बस एका जगातून येते आणि दुसऱ्या जगाकडे जाते. कसं असेल ते जग? मोठीमोठी दुकानं, बाजार असलेलं? एका ड्रायव्हरचा अर्ध्याहून जास्त पगार गिळंकृत करणारं? देवी ठकार सांगत होता की सुच्चासिंगने नकोदरमध्ये एक राख ठेवली आहे. बालोला फार वाटायचं एकदा त्या बयेला बघावी तरी कशी ती! एकदा ती सुच्चासिंगला म्हणाली देखील होती की मला एकदा नकोदरला घेऊन चल. पण त्याने रागावून सांगितलं, "का फारशी शिंगं फुटायला लागली? घरी चैन पडत नाही? बायकोच्या हातात हात घालून फिरणारा बायल्या सुच्चासिंग नाही समजलीस? मटकभवानीपणा करायचा असेल तर दुसरा घरठाव कर. माझ्याकडून तुला सुट्टी."

त्यानंतर तिनं ही गोष्ट काढलीच नाही. सुच्चासिंग कसाही असो, तिचं तो म्हणजे सर्वस्व होता. तो तिला मारायचा, शिव्यागाळी द्यायचा, पण पगार झाला की दर महिन्याला तिला वीस रुपये द्यायचा. कसंही असो तिला आपली घरवाली म्हणायचा. तोंडाचा फटकळ असेल पण सुच्चासिंग अंतःकरणानं फार चांगला होता. आता तिनं जिंदाला ठेवून घेतलं होतं म्हणून तो चिडचिडत असे पण गेल्या महिन्यात त्यानेच जिंदासाठी काचेच्या बांगड्या आणि अडीच वार मलमल आणून दिली होती.

एक बस धुरळ्याचा लोट उठवत आकाशाच्या त्या बाजूहून इकडं येत होती. बालोनं दुरूनच ओळखलं की ही बस सुच्चासिंगची नव्हे. तरीपण जवळ येऊन थांबेस्तोवर ती उत्सुक नजरेने तिला न्याहाळत राहिली. बस प्याऊच्या जवळ येऊन थांबली. एक माणूस कांद्या-घल्गमचं गाठोडं घेऊन खाली उतरला. कंडक्टरने जोरात दरवाजा बंद केला आणि बस निघून गेली. उतरलेल्या माणसाने प्याऊजवळ जाऊन आतल्या माणसाला जागं केलं. ओंजळीने दोन लोटे पाणी पिऊन मिशा पुसत आपल्या गठळ्याजवळ आला.

बालो थोडी पुढं झाली आणि त्या माणसाला म्हणाली, "वीरा, नकोदरहून दुसरी बस कधी येईल?"

"एकेका तासानं बस सुटते माई," तो म्हणाला, "कुठं जायचंय तुला?"

"जायचं नाही वीरा, मी घरधन्याची वाट बघते आहे. सुच्चासिंग ड्रायव्हर आहे ना तो माझा घरवाला. त्याला भाकरी द्यायची आहे."

"तोऽ सुच्चास्यों," आणि त्या माणसाच्या ओठावर मिस्किल हसण्याची छटा आली.

"तू ओळखतोस त्याला?"

"वाः! नकोदरमध्ये त्याला कोण ओळखत नाही?"

बालोला त्याच्या बोलण्याची तऱ्हा आवडली नाही. ती गप्प बसली. सुच्चासिंगबद्दल ती अगदीच काही अंधारात नव्हती. पण त्या गोष्टी परक्या माणसाकडून ऐकणं तिला बरं वाटलं नाही. परक्यांना काय हक्क आहे त्याच्याविषयी अशा तऱ्हेनं बोलायचा?

"सुच्चासिंग बहुधा याच्यानंतरच्या बसनं येईल," तो माणूस म्हणाला.

"हां. आता त्याचीच बस येईल."

"मोठाच निर्दय आहे ग. इतका वेळ तुला ताटकळायला लावतो."

"जा जा वीरा, आपल्या वाटेनं चालायला लाग," चिडून बालो म्हणाली, "तो कशाला बिचारा मला ताटकळत ठेवील? मलाच मेलीला भाकरी आणायला उशीर झाला. बिचारा सकाळपासून उपाशी असेल."

"उपाशी? आणि सुच्चास्यों?" तो माणूस फिदीफिदी हसला. वैतागून बालोने तोंड फिरवले. 'या माई सच्चे' म्हणत त्यानं गठळं डोक्यावर घेतलं आणि शेतातल्या पायवाटेवरून तो चालायला लागला.

बालोच्या डाव्या पायाला मुंग्या आल्या होत्या. तिनं उजव्या पायावर भार टाकला आणि दूरवर पुन्हा न्याहाळू लागली.

कितीतरी वेळाने लांबवरून एक बस येताना दिसली. तोवर उभं राहून राहून तिचे पाय दुखायला लागले होते. बस येताना पाहून तिनं गठळं साफसुफ करायला सुरुवात केली. तिला सारखी रुखरुख लागून राहिली होती की आणखी थोडा वेळ थांबून जरा तिनं भाकरी भाजल्या असत्या तर तेवढ्याच रात्रीपर्यंत ताज्या राहिल्या नसत्या का? सुच्चासिंगला कडाप्रसाद इतका आवडतो! का आपल्या लक्षात येऊ नये कडाप्रसाद करून आणायचं? स्वतःलाच असा दोष लावत बालो उभी होती. उद्या गुरपरब आहे. उद्या कडाप्रसाद करू....

पाठीमागे धुळीचा फवारा उडवीत बस जवळजवळ येत होती. सुच्चासिंगचा चेहरा बघून दुरूनच बालोला समजलं की तो फार रागावला आहे. दुरून तिला बघून त्याच्या

भिवया चढल्या आणि ओठ दाताखाली दाबला गेला. धडधडत्या अंतःकरणाने बालोने भाकरीचं गठळं धरलेला हात उंचावला. पण बस तिच्याजवळ न थांबता प्याऊच्या जरा पुढे जाऊन थांबली.

एकदोन उतारू तिथं उतरायचे होते. कंडक्टर बसच्या टपावर चढून एका उतारूची सायकल खाली काढत होता. बालो लवकर लवकर चालत ड्रायव्हरच्या सीटकडं पोचली.

"सुच्चा स्यां," तिनं हात उंच करून गठळं आत पोचवायची खटपट केली.

"चल चालती हो," सुच्चासिंगने तिचा हात झटकून ढकलत म्हटलं.

"सुच्चा स्यां, एक मिनिट खाली उतर. हे बघ आज एक खास कारण झालं. नाहीतर मला उशीर नसता झाला..."

"वटवट बंद कर आणि टळ," असं खेकसून त्यानं कंडक्टरला विचारलं सगळं सामान उतरलं का म्हणून.

"फक्त एक पेटी उतरायची आहे हो," त्यानं टपावरून आवाज दिला.

"सुच्चा स्यां, मी गेले दोन तास इथं उभी आहे," विनवणीच्या स्वरात बालो बोलत होती, "तू नुसतं खाली उतरून माझं म्हणणं तरी ऐकून घे."

"उतरली पेटी?" सुच्चासिंगनं कंडक्टरला विचारलं.

"हां, चला," पाठीमागून त्याचं उत्तर आलं.

"सुच्चा स्यां, तू माझ्यावर रागव. पण भाकरी तरी ठेव. तू मंगळवारी घरी आलास की मी सगळं सांगेन." बालोनं आणखी गठळं वर केलं.

"मंगळवारी घरी येईल तुझा..." सुच्चासिंगनं एक शिवी दिली आणि बस स्टार्ट केली.

दिवस कलला आणि आकाशाचा रंग बदलला. मध्येच एकाद्दुसरा पक्षी उडायचा. शेतातून कुठे कुठे रंगीत पगड्या (सरदारांचे फेटे) दिसायला लागल्या होत्या. बालो प्याऊजवळ जाऊन पाणी प्याली आणि थोडासा शिडकावा तिनं डोळ्यांतोंडावर केला. पदरानं तोंड पुसत ती प्याऊपासून काही अंतरावर उभी राहिली. सुच्चासिंगची बस जालंदरहून आठनऊ वाजेतो परत येईल हे तिला माहीत होतं. तोवर तिला थांबलं पाहिजे! कमीतकमी सुच्चासिंगनं तिचं म्हणणं तरी ऐकून घ्यायचं होतं? तिकडं जिंदां घरी एकटी भयानं चूर झाली असेल. मेला जंगी कसलं तरी निमित्त करून घरी आला तर? सुच्चासिंगनं तेवढी भाकरी घेतली असती की याअगोदर अर्धा तास ती घरी पोचली असती. आता भाकरी तर बाहेर कुठं तरी खाईल म्हणा – पण त्याच्या रागाचं काय? तो काही विनाकारण रागावला नव्हता. मेहनती शरीर आहे, भूक जबरदस्त लागते. आपण आणखी थोड्या विनवण्या केल्या असत्या तर कदाचित त्यानं ऐकलं असतं. पण आता?

प्याऊवाला प्याऊ बंद करत होता, भिकारी देखील कधी कोण जाणे उठून गेला होता. कुत्रं तेवढं अजून इकडं तिकडं घोटाळताना दिसत होतं. उन्हं सांजावत होती आणि आकाशात उडणारे पक्षी त्यात सोनेरी वाटत होते. जवळच्या शेतात कुणी एक तरुण आपल्या मस्तीभरल्या आवाजात माहिया गात होता :

> बोलण दी नां कोई नां।
> जिहड़ा सानूं ला ने दिधा,
> उस रोग दा नां कोई नां।"

माहियाची ती लय बालोच्या नसानसांत भिनली होती. लहानपणी उन्हाळ्याच्या दिवसांत संध्याकाळी रहाटाच्या वाहत्या पाण्याच्या धारेखाली इतर मुलांबरोबर हुंदडत न्हायची तेव्हादेखील माहियाची ही लय सांजवेळेत अशीच सामावलेली असायची. संध्याकाळच्या कातरवेळेचा आणि माहियाचा जणू कसला तरी संबंध होता. मग जसजशी ती मोठी होत गेली तसतसं जीवनाशी हे नातं अधिकच गहिरं होत गेलं. तिच्या माहेरचा लाली लोचदार आवाजात माहिया गायचा. गावच्या बाहेर एक पिंपळ होता. त्याच्याखाली कानावर हात ठेवून माहिया गाताना त्याला बालोनं कैक वेळा ऐकलं होतं. पुष्पा आणि पारोबरोबर ती बऱ्याच उशिरापर्यंत त्या पिंपळाखाली असायची. मग एक दिवस तिची आई म्हणायला लागली की तू आता मोठी झालीस. असं उशिरापर्यंत पिंपळाखाली उभं राहणं चांगलं नाही दिसत. त्याच दिवसांत तिच्या सोयरिकीची चर्चाही व्हायला लागली. ज्या दिवशी सुच्चासिंगबरोबर तिची सगाई झाली त्या दिवशी मध्यान्हरात्र होस्तोवेरी पारो ढोलक बडवून गाणी म्हणत होती. शेवटी तिचा गळा बसला तरी ढोलक सोडून तिच्या गळ्यात गळा घालून पारो गातच राहिली.

> "बीबी, चंमण दे ओहले ओहले किउं खडी,
> नीं लाडो किउं खड़ी ?
> मैं तां खड़ी सां बाबल जी दे बार,
> मैं कंनिआ कंवार,
> बाबल वर लोड़िए।
> नीं जाईए, किहो जिहा वर लेड़िए ?
> जिउं तारिआं विचो चंद,
> चंदां विचो नंद
> नंदा विचो कान्ह कन्हैय्या वर लोड़िए।"

तिचा वर कसा आहे तिला माहीत नव्हतं. पण मनातल्या मनात तिला वाटत होतं की गाणं म्हणताना जी मूर्ती डोळ्यांसमोर येते अगदी तसाच तिचा नवरा असणार. पहिल्या रात्री सुच्चासिंगनं जेव्हां तिच्या चेहऱ्याचा घुंघट बाजूला केला तेव्हा त्याला बघून तिची खात्रीच झाली. मग त्यानं जेव्हा तिची हनुवटी उचलली तेव्हा डोक्या-पासून पायांच्या नखांपर्यंत अनेक लाटा गेल्या. बालोला वाटलं सगळं आयुष्य अशाच लहरींनी भरलेलं असेल. रोज त्या भेटायला येतील आणि रोज आठवणीच्या घड्यात ती त्यांना भरून ठेवील.

"तू हिरकणी आहेस हिरकणी," तिला मिठीत गोळा करताना सुच्चासिंग म्हणाला होता. तिला म्हणावंसं वाटलं होतं की ही हिरकणी तुझ्या पायाची धूळ आहे. पण लाजेनं तिच्या तोंडून शब्द फुटेना.

"माई, काळोख झाला. घरी जा आता. इथं उभी राहून काय करतेस?" प्याऊवाला घरी जायच्या आधी तिच्याजवळ थांबून म्हणाला.

"वीरा, ही बस आता आठ-नऊ वाजेतो जालंदरहून परत जाईल ना?" करुण वाणीनं बालोनं विचारलं.

"कुणास ठाऊक कधी येईल ती? तोपर्यंत तूं इथं उभी राहणार?"

"वीरा, त्याची भाकरी द्यायची आहे रे!"

"त्याला घ्यायची असती तर मघाशीच नसती का घेतली त्यानं? त्याचं मस्तक तर आभाळातच गेलं होतं!"

"त्यात काय आहे वीरा? पुरुषाची जात. रागवायचीच. त्याचं काय एवढं?"

"ठीक आहे. राहा तर मग. बस कसली नऊ वाजायच्या आधी येते!"

"येऊ दे म्हणे कधीही."

प्याऊवाल्याशी बोलताना तिचा कसं न कसं वाटणारा निश्चय पक्का झाला. कितीही वेळ होवो बसची वाट बघायची. येऊन जाऊन काय जिंदां घाबरून बसेल ना? पुन्हा तिची छेड काढायची काही जंगीची हिंमत व्हायची नाही. गाव आहे, पंचायत आहे. दुसऱ्याच्या मुलीबाळीवर वाईट नजर ठेवणं ही काय अशीतशी गोष्ट आहे? सुच्चासिंगला कळलं तर सगळ्या गावासमोर मारून तो जंगीची नाचक्की नाही करील तर नाव दुसरं! पण त्याच्या कानावर ही गोष्ट न जाईल तरच बरं. कोण जाणे, दोघांच्यात एवढ्यावरून माथाफोडी झाली तर! आधीच सुच्चासिंगला घरच्या कटकटी सांगायला सुरुवात केली की राग यायचा. तो वैतागायचा. बरं झालं तेव्हा त्यानं काही ऐकून घेतलं नाही ते! म्हणतच होता मंगळवारी घरी येणार नाही म्हणून. आणि तो खरंच रागावून नाही आला तर? नको, नको. त्यापेक्षा घरच्या कटकटी आपल्या तिच्या तीच बघून घेईल.

तिला धडकी भरली. गावचा छोटूसिंग आपल्या बायकोला टाकून गेला होता. त्याच्या मागे बिचारी अन्नाला मोताद झाली. शेवटी बिचारीने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. पाण्यात फुगलेला तिचा देह किती भयानक दिसत होता!

अगदी उभं राहावेनासं झालं म्हणून जाऊन ती प्याऊच्या तक्तयावर बसली. काळोख पसरायला लागला होता. शेजारची शेतं न् आसमंत शांत झालं होतं. माहियाचं गीत केव्हाच थांबलं होतं. त्याच्या जागीं रातकिड्यांचं संगीत ऐकू येत होतं. एक बस जालंदरच्या बाजूने आणि दुसरी नकोदरच्या बाजूने येऊन गेली. सुचासिंग जालंदरहून शेवटची बस घेऊन यायचा होता. आपल्या बसड्रायव्हरला तिनं विचारलं होतं तेव्हां त्यानं सांगितलं होतं की आता एकच बस जालंदरहून यायची आहे. म्हणजे आता ज्या बसचे दिवे दिसतील ती सुचासिंगचीच म्हणायची. थकव्यामुळे तिचे डोळे सारखे मिटत होते. मोठ्या प्रयासाने ते उघडे ठेवून दूरवर गहिऱ्या होणाऱ्या काळोखावर ती नजर केंद्रित करत होती. जरा खुट्ट झालं की तिला वाटायचं, आली बस. पण दिवे दिसले नाहीत की निराशेनं सुस्कारा टाकून परत बसायची. एकदोन वेळा तिला भास झाला की बसच्या बत्त्या येताहेत. ती धडपडून उठली, पण बस नव्हती. पुन्हा ती झोपेच्या साम्राज्यात शिरली. तिला भास झाला की ती घरात आहे आणि कुणीतरी बाहेरचं दार जोरजोरात ठोठावतं आहे. जिंदां आत गळाठून बसली आहे. तिचा चेहरा चुन्यासारखा पांढरा फट्ट पडला आहे. रहाटाचे बैल सारखे फिरताहेत. त्यांच्या गळ्यांतल्या घंट्यांच्या तालावर पिंपळाखाली बसलेला एक तरुण बाप्या माहिया गातो आहे. वावटळ आली आहे, आणि जमिनीवरच्या सगळ्या वस्तू ती जोरात उडवून नेते आहे. ती आपली भाकरीचं गठळं सांभाळायचा प्रयत्न करते आहे पण वावटळ तिलाही ओढून नेते आहे...प्याऊवर रिकामे डेरेच ठेवलेत, ती आपला लोटा सारखा त्या माठात घालते आहे पण त्यात पाणी नाहीसं बघून निराश होते आहे...तिच्या पायांतले कात्रे दुखताहेत...हातांच्या बोटांनी ती त्यांवर तेल लावते आहे पण तेल सुकून जातं आहे. ...जिंदां आपले केस वाखरून गुडघ्यांत डोकं घालून आक्रोश करते आहे: तू मला सोडून का गेलीस? का गेलीस? हाय! माझा वेणीचा गोंडा कुठं गेला? कुणी नेल माझा वेणीचा गोंडा?

खांद्यावर कुणाचा तरी हात पडला. ती धडपडून जागी झाली.

"सुचा स्यां," डोळे चोळत तिनं म्हटलं.

"तूं अजून घरी नाही गेलीस?" तिच्या शेजारी तक्तयावर बसत सुचासिंहानं विचारलं. बस अगदी प्याऊच्या नाकासमोर उभी होती. रिकामी. फक्त कंडक्टर आत पेंगत होता.

"मी म्हटलं की भाकरी देऊनच जावं. बसल्या बसल्या झोप लागली. तुला येऊन फार वेळ झाला?"

"नाही. बस आताच उभी केलीय. मी तुला लांबूनच बघितलं. मघापासून भाकरी द्यायला तू इतका वेळ बसलीस? वेडबीड तर नाही ना लागलं?"

"मग काय करू? तू म्हणालास की घरी नाही येणार..." तिचा गळा भरून आला. डोळ्यात उभे राहणारे आसू तिनं पापण्या फडफडावून झटकले.

"बरं बरं आण भाकरी. आणि आता घरी जा. तिथं जिंदां एकटी असेल घरी घाबरून बसलेली," सुचासिंगनं तिच्या खांद्यावर थोपटलं आणि तो उठून उभा राहिला.

भाकरीचं गठळं तिच्या हातून घेत तिच्या पाठीवर हात ठेवून सुचासिंग तिला आपल्याबरोबर ड्रायव्हरच्या सीटपर्यंत घेऊन आला. उडी मारून सीटवर बसला आणि बस स्टार्ट करू लागला. भीत भीत ती त्याला म्हणाली,

"सुचा स्यां, मंगळवारी घरी येशील ना?"

"हो येईन. तुला शहरातून काही आणून हवंय?"

"नको, नको. मला काही नकोय."

बसचा घरघराट सुरू झाला तशी ती एकदोन पावलं मागं झाली. सुचासिंगनं आपल्या दाढीमिशांवरून हात फिरवत एक ढेकर दिली आणि तिच्याकडं बघत त्यानं विचारलं, "मघाशी काय सांगणार होतीस तू?"

"नाही. तसं काही खास नाही. तू मंगळवारी येशील तेव्हा..."

"बरं तर, आता घरी जा लवकर, एक मैल जायचं आहे..."

"सुचास्यां, उद्या गुरपरब आहे. उद्याला मी तुझ्यासाठी कडाप्रसाद करून आणीन हं?"

"बरं, बरं."

बस निघून गेली. मागच्या धुळीच्या लोटात बालो सापडली. तिनं पदरानं डोळे पुसले आणि लांब जाणाऱ्या बसच्या लाल दिव्याकडं ती बघत राहिली. तो दिसेनासा होईतो.

सुगंध

राजेन्द्र यादव

सुमेराला रिक्षा आपल्या शरीराचाच एक भाग असल्यासारखा वाटायला लागलाय. झोपेत किंवा जागतेपणी त्याला तो आपल्यापासून अलग भासतच नाही. घंटीची टिणटिण शरीराच्या कणाकणातून पायातल्या घुंगरांप्रमाणे झणझणते. पॅडल थांबवताच मागच्या धुरीवर चेन घासते तेव्हा होणारा किर्रकिर्र आवाज त्याच्या नसानसांतून आऱ्यासारखा घुमतो. आणि बैठकीवर बसल्यानंतर तर त्याला स्वतःचं भानच राहात नाही. खरं म्हणजे सुमेरा आपल्या या रोगानं अगदी परेशान झाला आहे. आपसांत ज्यांचा काही ताळमेळ नसतो अशा कसल्या कसल्या तरी अजब गोष्टी त्याला एकाच वेळी आठवायला लागतात.

या दोन स्वाऱ्या त्यानं बसवल्या तेव्हापासून काहीतरी पुन्हा घडत असावं तसं त्याला वाटायला लागलं होतं. आणि आता रिक्षाच्या पायरीवर पडलेला तो रुमाल पाहताच तो असा काही चमकला होता की जणू तो रुमाल जिवंतच होता. म्हाताऱ्या मडमेच्या हातात आवळून गोळा बनलेला तो रुमाल उचलताच प्रथम त्याला वाटलं धावत जाऊन तो तिला देऊन यावं. पण मग हात नकळत नाकाकडे गेला. मग एकदम आठवलं, आताच तर या रुमालानं म्हातारी त्या म्हाताऱ्याची लाळ पुशीत होती. शीः! मन किळसलं. चटका बसल्याप्रमाणं हात उडवताना त्याला वाटलं : असू दे, काही नाही तर ग्रीज काजळी पुसायला तरी उपयोगी पडेल. बाकून तो रुमाल सीटखाली खोचताना त्याला वाटलं, हल्काहलकासा सुगंध आहे या रुमालाला.

चढण्यासाठी त्यानं पॅडलवर पाय ठेवला. दोन्ही बाजूंनी फुंकून विडी शिलगावली. मग तो आठवायला लागला, असं आधी कधी बरं झालं होतं? आणि पुन्हा पुन्हा आठवण येते आहे ती कशाची? वर्षेच्या वर्षे रात्रंदिवस डझनावारी स्वाऱ्या बसवतोय आपण...आताच असं का वाटतंय? आजच त्याला त्या चोरीच्या हाराची आठवण होतेय. नाहीतर कधी कधी तर वाटायचं की त्या गोष्टीचा विसरच पडलाय. उगीच डोळ्यांची उघडझाप करीत तो त्या दोघांकडे लक्षपूर्वक पाहात राहिला.

म्हातारा पुढं जाऊन थांबला होता आणि म्हातारी मागं वळून फाटक बंद करीत होती. दोघंही साठी-सत्तरीच्या जवळपास असावीत. वाकडीतिकडी, दगडी रंगाची कोटपाटलोण, भिजून आक्रसल्यासारखी नमद्याची टोपी, पावलापावलाबरोबर रेतीवर रेघ ओढीत जाणारी वेताची काठी...म्हातारा मागून बिलकूल जपानी बाहुल्यासारखा

दिसत होता. म्हातारीनं मोठाल्या लाल पांढऱ्या फुलांचा फ्रॉक घातला होता आणि तिचे उघडे पाय कमानीसारखे वाकलेले होते. फाटक बंद करून म्हातारी त्याच्याजवळ आली आणि हातात हात घालून दोघं त्या पिवळ्या भुरभुरीतशा घराच्या दिशेनं चालायला लागली. त्यांच्या डोलत्या शरीरांकडे आणि हालत्या सावल्यांकडे सुमेरा गमतीनं पाहात होता. कशी बाहुल्यांसारखी लटपटत, एकमेकांवर आपटत चालली आहेत. त्याच्या ओठांवर हसू उमटलं. मनाला होणाऱ्या गुदगुल्यांना मोकळं करण्यासाठी दुसरं काही सुचेना म्हणून त्यानं उगीच घंटी वाजवली टिणन् टिणन्...पण खटकन् हात थांबला. डोळ्यांपुढं तो हार चमकून गेला. वाटलं, मागं कुणीतरी बसलं आहे आणि अशी घंटी वाजवली तर त्याला त्रास होईल.

का कोण जाणे, वळणापर्यंत त्याला सारखं वाटत राहिलं की रिक्षात अजूनही त्या स्वाऱ्या बसलेल्या आहेत आणि आता इतक्यातच आपल्या हातून काहीतरी चांगलं काम झालेलं आहे. मनाला मोठं छान छान वाटत होतं, पण सांगायचं कुणाला? ऐकेल तो हसेलच. आणि सांगायला जावं तर तसं काही खास सांगण्यासारखंही नाही. बाबू तर नक्की म्हणेल, हा साला एक दिवस पागल होणार.

बँकेच्या समोर म्हातारा-म्हातारी उभी होती. चाकावर पाय ठेवून त्यानं रिक्षा थिमी केली : "मेमसाब, रिक्षा?"

"कँट जाएगा? कितना पइसा लेगा?" म्हातारीनं थरथर हालणारी मान सरळ ठेवण्याचा प्रयत्न करीत विचारलं.

एका नजरेत सुमेरानं ओळखलं. ख्रिस्ती नाही तर अँग्लो-इंडियन आहेत, बाहेरचे किंवा टूरिस्ट नाहीत.

उतरून त्यानं डोक्याला बांधलेल्या पंचानं सीट पुसली, जणू या बसा असं सुचवायला. म्हटलं, "अरे मेमसाब, जो खुसी हो सो दीजिये...तुम्ही काय नवीन आहात?"

म्हातारा जणू तिथं नसल्यासारखाच उभा होता. पण म्हातारीच्या चेहऱ्यात कोण जाणे काय होतं, जे त्याला आपल्याकडे ओढीत होतं.

"नाई, बाद में जगडा करता है" पण त्याच्या आवाजावरूनच म्हातारीनं ओळखलं, झगडा नाही करणार. कदाचित् ती लोकं बराच वेळ उभी होती. म्हाताऱ्याच्या हातात हात घालून म्हातारी त्याला रिक्षाकडे घेऊन गेली.

"नहीं, मेमसाब, आपण नाही हां त्यातले. ते खेड्यातनं येतात ना नवेनवे उपरे. तेच लोक सवाऱ्यांना त्रास देतात." असल्या त्याच्या बोलण्यासाठीच टूरिस्ट लोकांनी त्याला पाच पाच रुपयांची बक्षिसी दिलेली आहे. पण इथं तसं काही मिळणार नाही हेही त्याला माहीत होतं. मनात आलं, म्हातारा आंधळा बिंधळा तर नाही?

निरखून पाहिलं. दोघांचाही रंग गव्हाळी. म्हातारीचा सगळा चेहरा बारीक बारीक सुरकुत्यांनी भरलेला. म्हाताऱ्याच्या गालांवर, दोन्ही बाजूंला डोळ्यांखाली, ओठांच्या कोपऱ्यांपर्यंत लोंबणाऱ्या मोठाल्या वळ्या. चष्म्याच्या काचा पाहताच त्याला कळलं, खूप दिवसांचा मोतीबिंदू आहे. ऐकू येण्यासाठी कानांना मशीन लावलेलं होतं. त्याची दोरी त्याच्या जुन्या मळक्या सुटाच्या कॉलरवरून खमिसाच्या खिशात गेली होती. तिथं बॅटरी असणार. म्हातारा खुळ्यासारखा एकदा नजर वळेल तिकडेच पाहात चालायचा. हां, काठी धरलेला हात सारखा कापत होता. त्याला पाहताच सुमेराला पहिलं सुचलं ते हे...याचा आता बाडबिस्तरा हालणार आहे लवकरच. बिचारा बँकेत पेन्शन घ्यायला आला असणार. पण म्हातारीच्या तोंडाकडे पाहताच पुढचा विचार अर्ध्यावरच तुटला.

लटलटणाऱ्या काठीच्या साहाय्यानं म्हाताऱ्यानं एकदोनदा रिक्षात पाय ठेवण्याचा प्रयत्न केला. पण पाय अर्ध्यापर्यंतच उचलत होता. आधार द्यायला सुमेरा पुढं आला. पण म्हातारी आडवी आली. जणू, तू शिवू नको, असा भाव तिच्या मनात होता. काठी हातात घेऊन म्हाताऱ्याचा हात तिनं आपल्या खांद्यावर ठेवला आणि कमरेभोवती एक हात घालून त्याला रिक्षात चढवायला लागली. अशा अलगदपणं की जणू काही काचेची एखादी नाजूक वस्तूच ती आत ठेवीत होती. त्याला बसवणं जमलं तेव्हा तिच्या चेहऱ्यावर वात्सल्य असं काही ओसंडून आलं की म्हातारा म्हणजे दोनतीन वर्षांचं मूलच होतं जणू. सुमेरा तिच्याकडे पाहात होता. त्याच्याशी हसताना जणू ती क्षमायाचना करीत होती—काय करायचं, बिचारा म्हातारा झालाय ना आता, नाही चढवत. सुमेरा तिच्या चेहऱ्यावरचे भाव पाहात होता. तिच्या गळ्यातल्या पातळ साखळीकडे त्याची नजर गेली आणि पुन्हा त्या हाराची आठवण झाली. त्यांची कसली तरी किमती वस्तू चोरताना कुणी पकडावं तसा तो एकदम चपापला.

"ऊन आहे फार, हुड चढव." दुसऱ्या बाजूनं येऊन म्हातारी आता रिक्षात बसली होती.

सुमेरा पुन्हा थांबला. काही तरी पुन्हा एकदा घडतं आहे असं का वाटतं आहे आपणाला? मागं जाऊन हुड उभारताना तो आठवायला लागला—हे असं आधी केव्हा पाहिलं होतं आपण? केव्हा ऐकलं होतं? इकडे म्हातारी त्याला अशी काही जपतेय—दसऱ्यात लोक टेसूच्या मूर्ती विसर्जनासाठी जमून नेतात तशी. सुमेरा पुढं आला. गुडघ्याखाली उघडे असलेले आपले पाय त्यानं डोक्याच्या पंचानं फरफर करून झाडले. दोन्ही हात पुढं उभ्या धरलेल्या काठीवर ठेवून गुपचुप बसलेला म्हातारा टेसूसारखा तर दिसतोच आहे. संध्याकाळी हे बाबूला सांगायला हवं. त्यानं विचारलं, "चलायचं मेमसाहेब?"

"हां, मगर रेस नही करेगा. धीरे धीरे चलेगा." म्हातारी जराशी उठली. म्हाताऱ्याच्या कोटाचं टोक अंगाखाली आलं होतं म्हणून. कोट सारखा करून तिनं आपला हात त्याच्या अंगाभोवती घातला.

पुन्हा तेच...अखेर सुमेर नं हे सगळं कुठं ऐकलं होतं? कुठंतरी हे सगळं आधी घडलं आहे तर नक्कीच. रिक्षाची गती कमी करून मधेमधे तो जवळजवळ थांबतच होता. वाटायचं, मागं वळून त्यांच्या तोंडाकडे पाहावं, काय आहे त्यांच्यात असं – जे पुन्हा पुन्हा त्याला ओढून घेत आहे? मागं वळून पाहण्याची इच्छा दाबण्यासाठी तो गाणं म्हणण्यात मन गुंतवायला लागला. "टेसूरा रे, टेसूरा...टेसूरा की सात बहुरियां...नौ मन पीसें दस मन खाएं...बडे मल्ल से जूझन जाएं..." लहानपणी घरोघर दिव्याभोवती घुमणाऱ्या टेसूच्या गाण्यांची नानापरीची चित्रं त्यांच्या डोळ्यांपुढं नाचायला लागली आणि स्वतःशीच त्याला हसू यायला लागलं. नकळत कधीतरी त्यानं मागं वळून पाहिलं. असंच विचारलं, "ऊन तर नाही ना लागत, मेमसाहेब?"

लोकांच्या तोंडावरच्या सुरकुत्यांकडे पाहताना सुमेराच्या मनात नेहमी एक प्रश्न उभा राहतो. समजा, एका वर्षात एक सुरकुती उमटली आणि जन्मभर या माणसानं सुरकुत्या जमवल्या, तर काय हो, त्या बदल्यात याला मिळालं काय? पैसा, घर, बायको, मुलं? की आपलं उगीच जिंदगीभर रडणं भेकणं...रात्र रात्र जागत विड्या फुंकणं... की दारूच्या नशेत गटारात लोळणं? वीस वर्षांनंतर जेव्हा त्याच्या स्वतःच्या चेहऱ्यावर अशा चामड्या लोंबायला लागतील तेव्हाही काय तो असाच रिक्षा चालवीत असेल? त्याही वेळी काय तो अर्ध्या रात्री धीराच्या मायला जागं करून बदडून काढील? त्याही वेळी काय असंच वाटत राहील—काहीतरी हवंय...कशाची तरी गरज आहे...नहीं जी, तो वेळपर्यंत तर धीरा मोठा होईल. पण आपण तरी आपल्या बापाला असं काय सुख दिलं? म्हातारा आजही घरांच्या विटा रचतोच आहे...

सहासात दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. टोलनाक्याच्या नळावर तो आंघोळ करीत होता. पाणी भरायला आलेल्या बोबाच्या बायकोनं म्हटलं, "लाला, तुझ्या बरगड्या दिसायला लागल्या की रे." साबण लावता लावता हात थांबला. खूप वेळ तो बरगड्याच मोजीत बसला. हल्ली खूपच अशक्तपणा वाटायला लागलाय. चेहऱ्यावरही पाणी नाही राहिलं. कुणास ठाऊक सुरकुत्याही पडायला लागल्या असतील...खरंच, आपला चेहरा या म्हातारीसारखा बारीक बारीक सुरकुत्यांनी भरेल की म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर वळ्या लोंबतायत मोठाल्या तशा वळ्या जमतील? त्या क्षणी आरशात आपला चेहरा पाहावा अशी त्याला जबरदस्त इच्छा झाली. एके काळी त्याच्या रिक्षावरही समोर आरसा लागलेला होता, फुगे उडत असायचे, चाकांवर रंगीबेरंगी फुलं गरगरत असायची.

आता सारा अस्थिपंजर खिळखिळा झालाय. कधी बॉलपिन निघते, कधी फ्रीव्हील फिरतच राहातं, तर कधी चेन उतरते. उतारूंच्या शिव्या खात रस्त्यावरच्या दगड-विटेनं बॉलपिन ठोकायची, हात काळे करून चेन बसवायची—किती खराब दिसतं. वाटतं, होळीत फेकून जाळून टाकावं या असल्या रिक्षाला. हुडचा कपडा चिरून झेंड्यासारखा फडफडतो. टांग्याबरोबर झालेल्या टकरीनंतर उजवं चाक आता नागमोडीनंच चालत असतं. आता या दुरुस्त्या करायच्या की लच्छीचे पैसे द्यायचे ? पण हीसुद्धा एक मजेचीच गोष्ट आहे—आपल्या शरीराचा विचार सुचतो तेव्हा रिक्षाकडेही नजर वळते. जणू दोघांनाही कशानं तरी एकत्र बांधून ठेवलंय.

ट्रिन्...ट्रिन्...टक्कर आठवताच बोटांनी आपोआप घंटी वाजवली. पण तो स्वतःला सावरीत एकदम थांबला. वळून पाहिलं. घंटीच्या आवाजानं मागं बसलेल्या स्वाऱ्यांना त्रास तर नाही होत ना ? घंटीचा आवाज किती कर्कश आहे याची प्रथमच त्याला जाणीव झाली. त्याच वेळी म्हातारी हळुवारपणे म्हाताऱ्याच्या कोटाची कॉलर सारखी करीत होती. कानामागून आलेल्या दोरीकडे लक्ष गेलं आणि आठवलं, म्हातारा तर बहिराच आहे. त्याला कसली ऐकू येतेय घंटी ? पण काय हो ? हा म्हातारा मरेल तेव्हा म्हातारी काय करणार ? या बिचारीला तर फारच वाईट वाटेल. घरी पोरंबाळं असतील ? राम भजो. आजकाल कोण पाहातंय आईबापांकडे ? आणि मग सुमेराला आपल्या बापाची आठवण आली. किती वेळा तरी मनात आलं होतं त्याच्या, एकदा जाऊन त्याचे पाय धरावे...म्हणावं झालं गेलं विसरून जा, माफ कर. आता घरी बस, रामाचं भजन कर. मी तुझी सेवाचाकरी करीन...पण बापाचा मार आठवताच सगळ्या कोमल भावना एकदम विरघळून जातात. अर्ध्या रात्री, कडाक्याच्या थंडीत लाथाबुक्क्यांबरोबर मिळालेल्या शिव्या कानांना टोचा मारायला लागतात, "साले, हरम्मे, अरे सख्खी नसेल, पण तुझी आई लागते ती. तुझ्या अंगात किडे पडतील. जवानीची मस्ती आल्येय तर रांडेच्या माडीवर जा. खबरदार पुन्हा घरात पाय ठेवशील तर. तुझे तुकडे तुकडे करून कुत्र्यांपुढं टाकीन." तेव्हा सुमेराला पहिली गाडी मिळाली ती छिंदवाड्याची होती. तिथंच तर तो हाराचा किस्सा घडला होता.

रिक्षा पुढं जात होता. चेन किर्र किर्र आवाज करीत होती.

म्हातारीच्या गळ्यातली साखळी आठवली आणि त्यानं पुन्हा एकदा मागं वळून पाहिलं. का नकळे, दूर असलेल्या बापाची कीव येत होती तशीच या दोघांचीही. दोघांच्याही चेहऱ्यावर संतोष होता, तृप्ती होती, कोमलता होती. तीर्थयात्रा करून परत येत असावीत तशी. पाहताच कळतं, यांचं जीवन सुखात गेलंय. आणि एक तो—असल्या म्हातारपणी चटके देणाऱ्या उन्हात बसून करणीनं गारा पसरीत विटा रचीत

असेल...मारलं असेल त्यानं तर त्यात काय झालं? चूक तर आपलीच होती. हुं... असेल. अजूनही पुन्हा पुन्हा तेच उगाळीत बसलाय. हीच त्याची सवय नडते. अरे, वय होतं, होऊन गेलं हातून काहीतरी. हां, त्या हाराची गोष्ट मात्र...देव जाणे जिवावरचे हे दोन भार किती काळ असेच राहणार आहेत...

तो अचानक चमकून थांबला. ही म्हातारा-म्हातारी म्हणजे तो मालबाबू आणि त्याची बायको तर नव्हेत? वळून पाहिलं, हट्, ते लोक तर हिंदू होते. खाली वाकून तो पिंढरी खाजवायला लागला. तसं पाहिलं तर हे भय त्याला नेहमीच वाटत असतं—कधी अचानक त्या मालबाबूची गाठ तर पडणार नाही? ओळखणार थोडाच आहे... कोण जाणे किती स्टेशनं त्यानं आतापर्यंत बदलली असतील, कित्येक कुली त्याच्या हाताखाली काम करून गेले असतील.

मुख्य रस्ता जिथं कच्च्या सडकेला मिळतो तिथं पिंपळाच्या झाडाखाली सफेदी पोतलेल्या घुमटीत शेंदरानं माखलेला मारुती आहे. त्याच्या पुढून जाताना त्याला रोज त्या हाराची आठवण होते. तोंडावर फडकं बांधून मालबाबूच्या बायकोला खोलीत कोंडलं...हार काढून घेऊन धूम ठोकली, दोन महिने तोंड लपवलं, नंतर आई मेल्याचं निमित्त सांगून इथं मंगीबरोबर रात्री काढल्या...सगळं एका पळभरात त्याच्या नजरेपुढून सरकून जातं. तशी हाराची गोष्ट तर हा रिक्षा असेपर्यंत विसरणं कठीणच आहे. नाहीतर आजही त्याला मंगीप्रमाणं कधी रिक्षा मागून आणावा लागला असता तर कधी कुंची-डबा घेऊन रंगसफेती करीत फिरावं लागलं असतं. त्याला कधी कधी वाटतं, हा रिक्षा आपला नाही—उधार घेतलाय...कर्ज काढून बनवलाय.

कधी कधी एक विलक्षण विचार त्याच्या मनात येतो—कसं तरी करून पैसे साठवावे, अगदी तसलाच एक हार घडवावा आणि जाऊन मालबाबूचे पाय धरावे, रडावं—मालक, चूक झाली माझ्या हातून. आंधळा झालो होतो मी...

"समोरच्या फाटकासमोर थांबव." त्याच्या कानी शब्द आले.

फाटकासमोर थांबून त्यानं मागं पाहिलं. दूध पाजल्यानंतर लहान मुलाचं तोंड पुसावं तसं अगदी हलक्या हातानं म्हातारी त्या रुमालानं म्हाताऱ्याच्या ओठांच्या कोपऱ्यात जमलेली लाळ पुशीत होती. किती जपते याला ही म्हातारी.

स्टेशनाकडे जाताना बराच वेळ त्याच्या डोक्यात त्या स्वाऱ्याच घोळत होत्या. आपल्या आईची तर त्याला आठवणच नाही, सावत्र आईनं जळत्या लाकडांनी दिलेला मारही त्याला आता कधीमधीच आठवायचा. हां, ती तिसरी मात्र आठवते. त्याच्या बापानं तिला विकत आणलं होतं. तिच्या सुरेल आवाजानं त्याला कित्येक दिवस वेडं केलं होतं. त्यात आपल्यापेक्षा आपल्या बापाचीच चूक होती असं त्याला वाटत होतं.

त्यामुळंच त्या दिवसात तो कित्येकदा बंड करून उठला होता. गोवऱ्या स्मशानात गेल्या पण हाव सुटत नाही. ते असो म्हणा, झालं ते होऊन गेलं, पण आज आपण असं काय पाहिलंय की त्यामुळं हे सारं सारखं आठवत राहावं ? स्वारी बसवली, पैसे घेतले आणि तरीही असं कां वाटतंय—काहीतरी पुण्य घडल्यासारखं ? आपल्या आयुष्यात नसलेलं असं काहीतरी त्याला आज समजलंय.

ठेकेदाराबरोबर भांडण झालंय म्हणून बाहेर झाडाखालीच रिक्षा थांबवून तो सीटवर आडवा झाला आणि वरच्या पानांकडे पाहात राहिला. स्वारी तर काय इथंही मिळेल. आत जा, फुकटचा एक आणा द्या आणि नंबर लावून वाट बघा—हे कुणी सांगितलंय. बस बंद पडावी म्हणून लोक हरताळ करतात, मोर्चे काढतात, पण या ठेकेदार आणि शिपायांच्या अंदाधुंदीकडे काही कोणी लक्ष देत नाही. लूट चाललीय. हल्ली आमचे मंगीसाहेबही लीडर बनले आहेत की. कुर्ता पायजमा आणि वर जाकीट पेहनून फिरत असतात. तेव्हा रंगानं चिताडून घरोघर रंगकाम करीत फिरायचे. किती लवकर बदलतात लोक. डोळ्यांपुढची गोष्ट आहे. याच मंगीबाबूला त्यांच्या जामिनकी-शिवाय रिक्षा द्यायला सिंध्यानं इन्कार केला होता. ठीक आहे, त्यानं सुमेराचं लग्न करून दिलं, रामदेईच्या बापाशी सौदा पटवला. पण गाळलेल्या सोन्यातला पुरा हिस्सा तर घेतलाच होता ना ! आता आपला हिस्सा दारूच्या बाटलीत घालवा, सिगरेट-सिनेमात फुंकून टाका, 'फीचर' वर लावा आणि गांजेकस नशाबाजांना नंबर विचारीत दिवसच्या दिवस घरातून नाहीसे व्हा...तर भैय्या, या सुमेरानं काय भांग झोकलीय तुमच्या नशा-जुगाराला पैसे पुरवून वर गुपचूप तुमच्या रंगढंगांकडे डोळेझाक करायला !

सुमेराचं तोंड कडवट झालं. कमीना. ज्या हांडीतलं खातो तिलाच भोक पाडून ठेवतो. रिक्षात पडल्या पडल्या त्यानं मूठ वळून तिच्या पोकळीच्या भोकातून दुर्बिणीप्रमाणं पानांकडे, आभाळाकडे बघण्याचा चाळा सुरू केला. हा खेळ त्याला लहानपणापासूनच आवडतो. तेव्हा दिवसभर तो सेलमची–कच्च्या संगमरवराची–खेळणी बनवण्याच्या कारखान्यात काम करायचा आणि रात्री आपल्या या दुर्बिणीतून तासचे तास चंद्राकडे पाहात राहायचा. कधी चंद्रावरची म्हातारी चरख्यावर सूत कातताना दिसायची. कधी हरीण पळत असायचं. आता निंबाच्या थरथरत्या पानांतून दिसणाऱ्या गहिऱ्या निळ्या आकाशातल्या पांढऱ्या ढगांच्या छोट्या छोट्या तुकड्यांकडे तो पाहात होता. पांढरे पांढरे बगळे पंख पसरीत उडावे तसे दिसत होते...

हुं ! मंगीसाहेबांनी रामदेईसाठी झुमके आणले होते कानातले..."रेल्वेच्या लिलावात अडकलो. बक्षिसाच्या लालचीनं चढ्या बोली बोलत राहिलो आणि एका बोलीत पठ्ठयानं मालच बांधला गळ्यात. मी काय करणार वहिनी ?" देव जाणे कधीपासून यांचं मेतकूट

जमलं होतं. त्या दिवशी ट्यूब बदलायला मधेच घरी यावं लागलं नसतं तर जन्मभर कळलंच नसतं. मोठे मोठे कल्ले राखून दिवसभर सिनेमाची गाणी म्हणत फिरा, म्हणजे आणखी दुसरं काय शिकणार? रिक्षा चालवायचा म्हणजे असा की सर्कसचा खेळच चाललाय; रिक्षाऐवजी विमानच चालवताहेत जणू. वळायचं असं की हाती मोटारगाडीच आहे. बरं तर बरं, ॲक्सिडेंटमधे खोपडी फुटण्यावरच निभावलं, नाहीतर सरळ स्वर्गाचा रस्ता सुधारतानाच दिसायचे. मग 'घर आया मेरा परदेसी' कुठला व्हायला? आणि ती हरामजादी रामदेई. तिनं शरमेनं डुबून मरायला हवं होतं पण कडकून उलट बोलते कसं—"आधी आपल्याकडे तर बघ बाबू. विकतची असेन नाहीतर पळवून आणलेली असेन, पण होते तर तुझ्या आईच्याच वयाची ना?" इतकी पिटली पण बेटी गप्प बसेना. बापाच्या टेचात असते. बाप सरपंच आहे ना...असल्या बापांना मारतो आडवे. ठग साले...नारंगीछाप दोन बाटल्या पोचवा, निकाल तुमच्या बाजूचा. पंचायत आहे की मस्करी? आमच्याकडून दंड घेणार हे....तसं तर काय, मोहात फसलो नसतो तर जन्मभर पडून राहिली असती बापाच्या घरी. करून घेतला असतान् दुसरा...

कसल्या भलत्या गोष्टीच्या आठवणीत गुंतलो आपण. अच्छी खासी तब्येत खराब झाली. आख्-थू. पडल्यापडल्याच त्यानं खाकरा काढून बडका मागल्या बाजूला थुंकून टाकला. मनगटानं तोंड पुसलं आणि पुन्हा ढगांकडे पाहण्याचा चाळा सुरू केला. कसे एकामागे एक तरंगत जाताहेत. निळ्या निळ्या पाण्यात सफेद रुमाल वाहात जावे तसे...ओहो. आणखीही एक रुमाल मिळाला होता की त्याला. हेच तर किती वेळ आठवत नव्हतं त्याला प्रयत्न करून. मार खाल्ल्यानंतर रामदेई आपली चीजवस्तू बांधून घेऊन बापाकडे निघून गेली होती, त्यानंतर दोन एक दिवसांनी तर घडलं ते.

सारा दिवस तो उदास होता. पडल्यापडल्या, कुटकुट करणाऱ्या खारींकडे आणि नख्यांनी राख उकरणाऱ्या कोंबड्यांकडे, त्यांच्या पिल्लांकडे तो पाहात होता. दाणा मिळाला की कोंबडी कुच करायची आणि तिची पिलं चोचीभोवती गोळा व्हायची. झोळण्यासारख्या, भुईला टेकणाऱ्या खाटेत घुसून चिकट मेणचट उशीखालची 'तोता मैना' कहाणी आणि 'दिलबहार' सिनेमाची गाणी तो वाचीत राहिला. मग लाकडी हातोड्यानं मुंजाचं गवत कुटून त्याचा कुंचा बनवला छानसा. बाहेर कुठं जावंसं वाटतच नव्हतं. कोणीही भेटो, त्याला वाटायचं चूक रामदेईची नसून याचीच आहे. सगळे साले धोकेबाज, निकम्मे आणि आपमतलबी आहेत. त्या आठदहा घरांत स्वतःच्या मालकीचा रिक्षा त्याच्याकडेच आहे ना, म्हणून त्यांना वाटतं याच्याकडे बराच पैसा असणार लपवून ठेवलेला. नाहीतरी काय रिक्षा पळवून आणून बेलन-गंजच्या लालाकडे गहाण ठेवला. तासन् तास घासून घासून धूत आणि चमकवीत बसला.

एक घर सोडून पलिकडे भुऱ्याची बायको हात नाचवून भिसनाऱ्या काकीबरोबर भांडत होती, 'दारी, मौत खसम के तेहे में मती न रहियो. आमन दे आज, न तेरे बाप से चसमा घर वाय लऊं. बोलो, भौंडा—ए खेलतई—नांय दें...कढी खाए, चोट्टा. सारे...'' कसा चिवचिवता गळा आहे. वाटतं जाऊन आवळावा. पोरं घालतात तो दोन पैसेवाला चष्मा तुटला बिटला असेल त्यासाठी सकाळपासून इतका गहजब चाललाय. दिवसभर जोडाजोडी होतेय. पळभर चैन म्हणून नाही. साले गावढळ भांडकुदळ लोक. त्यानं रिक्षा शिकंदऱ्यासमोर आणून उभा केला. खाली उतरून तो एका बाजूला उभा राहिला आणि तोंड घोळवून घोळवून गुडदाणी चघळायला लागला. सर्रकन् दोनतीन गाड्या आत गेल्या, बाहेर आल्या. या गोऱ्या पोरी डोक्याला रुमाल बांधून अशी काही गाडी चालवतात की जणू मोटार चालवीतच जन्माला आल्यायत. गाडी वळणं, स्टार्ट होणं, वेग घ्यायला लागणं या गोष्टींकडे कौतुकानं पाहात राहाणं ही सुमेराची नेहमीची सवय आहे. आपणही ड्रायव्हरी शिकलो असतो तर अशी सण्णकन् नेली असती गाडी, सटकन् बाजूला काढली असती. त्या हरामजादी रामदेईला पण आणलं असतं फिरवून. मग कळलं असतं तिला की आपणही कुणीतरी आहोत म्हणून. त्यानं समोर पाहिलं. एका बाजूला कसून बांधलेल्या बंदातून उघडी दिसणारी छाती, गुडघ्यापर्यंत नेसलेलं धोतर आणि डोईला भारीपैकी मुंडासं, असा एक माणूस तोंड उघडं टाकून शिकंदराचे घुमट पाहात होता, कौतुकानं शेजाऱ्याला दाखवीत होता. सुमेराला त्यानं विचारलं, ''चौं भैया, जे अकबरा को मकबरा ऐ के मकबरा को अकबरा ऐ ?''

तोंडातली गुडदाणी विसरून सुमेरा जोरजोरानं हसायलाच लागला. पण मग त्याचा साधेभोळेपणा बघून त्यानं म्हटलं, ''ठाकुर, हा सिकंदरा आहे. इथं अकबर बादश्याला पुरलाय. कुठनं आलात ?''

ठाकुराचं सुमेराच्या हसण्याकडे लक्षच नव्हतं. तसाच तोंड उघडं ठेवून, विस्फारलेल्या डोळ्यांनी तो पाहात राहिला. ''बा बा ! रंग ऐ रे अकबर बास्सा. मरायला काय छान मुलूख शोधून काढलाय पण.'' मग सुमेराचा प्रश्न लक्षात येऊन ओशाळेपणं म्हणाला, ''हम तो भैया भरतपुर के हैं. असलं कधी कुठं बघायला मिळालंय आम्हांला. कामासाठी आलो तर म्हटलं भेटेल ते बघून जावं.''

ठाकुर निघून गेल्यानंतर टांगेवाल्या बुंदननं सांगितलं, ''हा बिचारा तर पहिल्यानंच आलाय खेड्यातनं. पण शहाण्यासुरत्यांना आपण असं बेवकूफ बनवलंय की अजून आठवण काढीत असतील. कुणी इंग्रज अमेरिकन असतील तर गोष्ट वेगळी. त्यांच्याकडनं दहापाच रुपये बक्षिसी मिळायची तरी आशा असते. ह्या साल्यांकडे काय ठेवलंय ? घंटाभर झिगझिग करतील आणि खोटा रुपया देऊन चालायला लागतील. म्हणून काय

करायचे आम्ही, स्टेशनवरून आणून सेंट जॉन्स कॉलेजच्या आसपास फिरवायचे अशा लोकांना. सांगायचं, बघा हाच सिकंदरा. आज बंद आहे. इथपर्यंत कोण आणणार घोड्याला किट किट करीत? पाच रुपये लागले कनवटीला की अल्ला अल्ला खैर सल्ला. दुनियाभरचे लोक येतात जीव टाकीत इथं. कोण जाणे काय पाहातात या कबरांमध्ये. आपणाला तर काहीच दिसत नाही त्यात पाहण्यासारखं. हां, या गाइडांचे किस्से ऐकून मात्र खूश होत असतील लोक. तेव्हा असल्या गोष्टी बनवायच्या बसून रोज."

खरं सांगायचं तर आजवर सुमेरालासुद्धा इथं पाहण्यासारखं काय आहे हे मुळीच कळलेलं नव्हतं.

"रिक्षा!"

आवाजाबरोबर त्याच्या रिक्षाचीही घंटी टिण्-टिण् वाजली, चटकन् तो वळला. निघताना अभिमान वाटला, आपलाच रिक्षा सगळयात नवा आणि फॅशनेबल आहे. स्वारी इतर कुठं जाणारच नाही.

एक तरुण मुलगा आणि एक मुलगी उभी होती. फिक्या दगडी रंगाचा, बटनं उघडी असलेला चेस्टर, एक वेणी खांद्यावरून पुढं आणलेली आणि एक माग, उजळ रंग, लांबट चेहरा, चमकदार डोळे...दोन्ही हात चेस्टरच्या खिशात घालून मुलगी मोठ्या प्रेमानं सोबत्याला काही सांगत होती. त्यानं गरम पँट आणि जर्किन घातला होता. रंग गडद सावळा. सारखा हातानं केस सारखे करण्याच्या निमित्तानं ते ऐटबाजपणं विस्कटून ठेवीत होता. काहीतरी प्रकरण आहे ही गोष्ट सुमेराच्या मनात विचित्रपणं उमटली होती. सुमेरानं ओळखलं, हा बेडरपणा आणि निश्चितपणा या केवळ दाखवण्याच्या गोष्टी आहेत. मनातनं वाटणारं भय लपवण्यासाठी पांघरलेल्या. त्यानं विचारलं, "ताजमहैल साब?" विचार केला, ताजगंजला जायला मिळालं तर बाहेरनं त्या साल्या रामदेईचीही खबर घेता येईल. पाच दिवस झालेत.

"दयालबाग." तरुण म्हणाला.

"चलेंगे साब." गादीवर हात थापटीत सुमेरा म्हणाला.

"चल बस." मुलीच्या कोपराला स्पर्श करीत तो तरुण म्हणाला. मग त्यानं उंच उंच झाडांकडे आणि चहावाल्याच्या दिशेनं एक नजर टाकली.

"हुड चढव." ती मुलगी सुमेराला म्हणाली. तिच्या तोंडाकडे पाहताना सुमेराला फार छान वाटत होते. मग तिचं बोलणं कानावर पडताच तो सावध झाला. ती म्हणत होती, "याच्याशी आधी पैसे ठरवून घे. नाहीतर टूरिस्ट समजून मागून त्रास देतात." आणि मग चेस्टर अंगाभोवती आवळून ती नीट बसली. ती वर चढत असताना पोरटी अर्धवट उघडी पडली तेवढ्यानं सुमेराचं मन चेतून उठलं. हुड चढवताना मनात आलं,

विचार : 'पुढं पडदा पण टाकू का मेमसाब?' जास्त होईल. म्हणाला, "पैशासाठी भांडणाऱ्यांपैकी आपण नाही, मेमसाब."

दोघंही बसल्यानंतर सुमेरानं पाहिलं तो त्याची नजर टाळण्यासाठी तिनं तोंड दुसरीकडे वळवलं होतं आणि तिच्या गालावरचं हसू तेवढं कळत होतं. वा रे नखरा! त्याला वाटलं हळूच...आंगठ्यानं घंटी वाजवली टिणन् टिणन्.

"जरा पुढं हो, हात मागं ठेवू दे मला." तरुण म्हणाला.

पायी पायी रिक्षाला डांबरी सडकेवर ओढून आणताना मनातल्या मनात, सुमेरा म्हणाला, "हां हां, हातच कशाला, तू अख्खाच झोप ना मागं." आणि मग उगीचच तो घंटी वाजवीत राहिला.

"भई जरा जल्दी पहुंचना है." तरुणीचा आवाज मोठा गोड होता.

आता घरी जायची घाई लागलीय. आई मारील ना! मघापासून आत बसून मजा मारीत होती असणार. सुमेरा म्हणाला, "निघालोच, बघा विमानासारखा पळवतो रिक्षा." गुळगुळीत सडकेवर रिक्षा येताच मन उत्साहानं भरून आलं. दात आवळून सगळा दम एकवटून रिक्षा पळवीत नेण्यासाठी शरीराचा कण न् कण उसळू लागला. त्यानं एका मुलीला शाळेत पोचवण्यासाठी मंगीला एक महिन्यासाठी लावून दिला होता. तिला बसवून तो रिक्षा असा काही दौडवायचा की बिचारीनं तिसऱ्याच दिवशी सांगितलं, जरा हळू चालव. मंगीनं म्हटलं, बैलगाडीत बसायचं असेल तर सुमेराच्या रिक्षात बसा. हा तुफान मेलपेक्षा कमी नाही चालायचा...म्हणजे ही आमची बैलगाडी. उल्लू का पठ्ठा. बेबंदपणं रिक्षा हाकण्याची इच्छा माणसाला कशी होते हे त्याला आज कळलं. त्याचे कान एकदम विलक्षण तीक्ष्ण झाले.

"काही म्हण, पण रिक्षाचं वाहन आहे मोठं छान." तरुण.

"का नसेल चांगलं? असं लगटून बसायला मिळतं ना!" ती हसली. हसताना तिचे गाल कसे होत असतील?

पुढं ऐकू आलं.

"चल, हात काढ हं. रस्ता आहे. रिक्षावाल्याचा तर काही..." पुढचं काहीतरी इंग्रजीत ती वटवटली.

अरे रिक्षेवाल्याचा विचार कशाला करता? आंधळे झाला आहात. मजा मारा हराम्यांनो. आईबापांना फसवा...आपल्याला ठाऊक आहे सगळं, इथं कोण कोण काय काय करायला येतात ते. दिवसातून दोनतीनदा तरी तुमच्यासारख्यांशी गाठ पडतेच की: सुमेरा विचार करीत होता, हिला बहुधा पाहिलेलं आहे आपण कुठंतरी, पण मुलगा इथला नाही दिसत. किंवा यालाही पाहिला असेल मेडिकल कॉलेजावरून जाताना.

"खरंच उशीर झाला हं, ऊन जायला लागलं."

"आता वाटतंय उशीर झाला म्हणून. पण मी मघापासून म्हणत होते तेव्हा? तेव्हा तर एवढी कसली घाई, एवढी कसली घाई, चाललं होतं." ती रोषानं म्हणाली.

"असू दे बाई, असू दे. तुझ्या या घाईनं प्राण कंठाशी आले."

"हळू बोल ना रे," तिनं बहुधा त्याच्या दंडाला चिमटा काढला असणार.

हुं...आता जल्दी चल...हळू बोल...तेव्हा लाडू मटकावीत होती असतील. तेव्हा नाही आली रिक्षेवाल्याची आठवण? अरे रिक्षा तो रिक्षाच, मोटरकार तर नाही? देव करो आणि दिल्लीवाली पॅसेंजर जाण्यासाठी फाटक बंद झालेलं असो. होऊ दे बेट्यांची फजिती घरी पोचल्यावर.

"नहीं जी, असं काय संकट आलंय मोठं? आस्ते आस्ते हवा खात चल दोस्त. पल्ला लांबचा आहे. थकून जाशील."

होय रे बाबा, तुला कशाला असेल घाई? तुला तर स्वर्ग सापडलाय बच्चू. घरी गेल्यानंतर बोलणी खायला लागणार आहेत तिला. तू राहशील दूर...कोण जाणे कुणाच्या सुनेलेकीला बहकवून आणलंय. त्याला तिची कीव आली. पण त्यानं वेग मंद केला.

मार्ग काहीतरी खसफस झाली आणि त्याचं माथं भडकलं, वाटलं रिक्षा थांबवावा आणि उतरून द्यावं यांना. कोण जाणे का, पण त्याला सारखं वाटत होतं कसल्यातरी भलत्या गोष्टीत मदत करतो आहोत आपण. हे थांबवायला हवं. हा तरुण नक्की कुणीतरी लुच्चा बदमाष आहे. खरंच या पोरी भलत्याच साध्याभोळ्या असतात. पण थोडासा उतार लागला तेव्हा पॅडल थांबवून, ब्रेकवर हात ठेवून तो मोठ्या ऐटीत ताठ बसून राहिला. जणू त्याला दाखवून द्यायचं होतं, हे बघा, तुमच्या सगळ्या खुब्या माहीत आहेत मला, सगळं कळतंय, पण तरीही गप्प आहे मी. खरंतर त्याच्या पाठीची नसन् नस मागं वळून पाहण्यासाठी तडकत होती. एकदा बघावं तरी खाली बसली तरी कशी आहेत ती. त्याचे डोळे कानांत आले होते आणि त्यांच्या बसण्याचं, बोलण्याचं एकेक चित्र त्याच्या नजरेसमोरून सरकत होतं. आता दोघंही गप्प झाली होती. बस्, फक्त मागची धुरी आणि चेन यांचा काय तो आवाज येत होता. आता सवय झालीय, नाहीतर आधी या आवाजानं त्याला भास व्हायचा मागून एखादी सायकल येत आहे असा.

हं, सुस्कारे टाकणं चालू झालंय. भांडण तर नाही झालं? त्याला वाटायला लागलं या पोरानं काहीतरी चावटपणा केला असणार. आजकालच्या या कारट्यांची माथीच बिघडून गेलीत सिनेमा बघून बघून. काम तर कसलंही येत नाही. अरे बाबा, पोरींचं मन ओढून घेणं काय सोपी गोष्ट आहे? हळू हळू जवळ येतं.

दुरूनच त्याला रेलचं फाटक बंद असल्याचं दिसलं. बिचारीला आणखीनच उशीर

होतोय. वरून हसत खेळत असेल पण आतून मन कसं धाकधूक होत असणार !

इतका वेळचं मौन सोडून तरुण म्हणाला, "हा उजवीकडे घोडा आहे ना, दगडी – तो अमरसिंग राठोडाचा आहे म्हणतात. असलाच एक तिथं किल्ल्याच्या जवळ आहे. तिथं उडी मारली आणि इथपर्यंत येऊन मेला तो, मागं फौज येत होती..."

"माहीत आहे. हिस्ट्री घेतली होती मी." मुलगी रुक्षपणं म्हणाली.

हे आणखी ऐक. आधी रुसून बसला आणि आता सांगतोय की हा अमरसिंग राठोडचा घोडा आहे...अमरसिंग राठोड बाप होता ना तुझा ! सगळी मजा खराब करून टाकली. खरं तर त्याला स्वतःला मुळीच माहीत नव्हतं हा कुणाचा घोडा आहे ते. कोणी म्हणतात हुमायूनचा तर कुणी म्हणतात अमरसिंग राठोडाचा.

चढावावर हातानं रिक्षा ओढून नेताना तिच्या पायातल्या सॅंडलला त्याचं अंग घासत होतं. त्या पायांना हात लावून बघण्याची इच्छा त्यानं कशी दाबून धरली होती ते त्याचं तोच जाणे. कुठे हा काळा बेंद्रा आणि यानं या परीसारख्या पोरीला फसवून आणलंय. साडीच्या काठाशी बोटांचा कसा चाळा चालूलाय.

"आम्ही उतरू का रिक्षावाले ?" उठल्यासारखं करीत तो तरुण म्हणाला.

"अजी नहीं साहब, हा एवढासा तर चढ आहे." त्यानं दोघांच्या चेहऱ्यांकडे पाहून घेतलं. वातावरण तंग होतं. काय झालं असेल ?

"च्या. मेलो डार. आता हे फाटक कधी खुलणार ?" त्रासिक आवाजात तो तरुण बोलला. "आज आमच्यावर सगळ्यांचीच नाराजी दिसतेय."

आता दिसलं होय तुला फाटक ! नाराज तर आहोतच.

"हे बघ उम्मी. हे काही खरं नव्हे. तू आता असं करायला लागलीस तर—सांग, असं जाता येता भांडणार का आपण ? ही तुझी सवय आवडत नाही मला."

"आणि तुझ्या सवयी मोठ्या चांगल्या आहेत नाही ?" सुमेरानं रिक्षाला हाताचा आधार देऊन मागच्या बाजूनं चाकांखाली विटा लावल्या तेव्हा चिंतेच्या स्वरात ती बोलत होती, "अरे रिक्षावाले, पूछो भाई कितनी देर है. जास्त वेळ असेल तर चालत पलीकडे जाऊन दुसरा रिक्षा घेऊ आम्ही."

तिच्या चेहऱ्यावरचं सावट पाहताना सुमेराला खरोखरीच तिची दया आली. सगळा दोष या तरुणाचा. आधी त्यानं विचार केला होता इथंच उभं राहून घंटी खोलावी आणि टीक करावी. पण आता, "येईलच आता गाव, सिंगल तर डाऊन आहे." असं म्हणत तो फाटकवाल्याकडे निघून गेला. एक ट्रक, दोन कार, एक टांगा आणि दोनएक रिक्षे लायनीत उभे होते. बगलेत लाल हिरवे झेंडे ठेवलेल्या निळ्या युनिफॉर्मवाल्या फाटकवाल्याला तो म्हणाला, "आण पंडित, एक विडी तर काढ."

रोज इथनं जाणं येणं असतं. फाटकवाला त्याचा दोस्त आहे. "बिडी ठेवलीय तुझ्या बापानं," अशासारखे एकदोन प्रेमळ संवाद झाल्यानंतर ते उभ्या उभ्या गप्पा मारायला लागले. बिडीचा जोराचा झुरका मारून आतली गलबल थांबवण्याचा सुमेराचा प्रयत्न चालला होता. काहीतरी महत्त्वाचं आपणाला माहीत झालंय, आपण त्यात भागीदार आहोत, हे कोणाला सांगायचं? फाटकवाल्यानं एरवीच विचारलं, "कुठल्या स्वाऱ्या? छान दिसतात." तेव्हा धुरात आपलं हसू मिसळीत तो म्हणाला, "अरे पंडितजी, आपलं तर कामच हे आहे. काही नवीन नाही यात. दूर उभं राहून दुनियेच्या मजा बघायच्या." मग हलक्या आवाजात बोलला, "सांग, ठाण्यावर घेऊन जाऊ या दोघांना? मिया-बिबी नाही आहेत."

"अबे, असे जूते पडतील की डोक्यावर केस नाही उरणार तुझ्या. सगळ्या गमजा ओसरतील तुझ्या. आजकालच्या नवराबायकोंना ओळखत नाहीस तू. साले यांच्यापुढं भाऊबहीण काहीच नव्हेत. बेटा, तू आपला रिक्षा खेच आणि दुनियेला जाऊ दे आपल्या मार्गानं." आगगाडीच्या धडधडाटात पुढलं बोलणं तसंच राहिलं. झुक–छां करीत, फाटक आणि खांबे थरथरवीत आगगाडी पुढं निघून गेली आणि सुस्तपणं सुमेरा परत आला.

एवढ्या वेळात बहुधा दिलजमाई झाली होती. पोरीचा चेहरा पुन्हा खुलला होता. सारखं तिकडे पाहात राहावं असं मग त्याला वाटू लागलं.

"आणि या गाडीनं तुझे पापाजी परत आले असले तर?"

सुमेरानं हँडल सावरताना त्याचा खट्याळ आवाज ऐकला: "येऊन मम्मीला विचारतील तेव्हा कळेल की उम्मी बेटी मीनाच्या घरी गेली आहे."

"सांगेन, उशीर झाला म्हणून तिचा भाऊ आला होता पोचवायला."

"सिकंदऱ्याच्या बाजूला राहतात काय ते? आणि त्यांना कुठं माहीत आहे की हा मीनाचा भाऊ औषधी कंपनीचा एजंट आहे, मुंबईला राहतो, दिल्लीला आला होता, तेव्हा मधेच..." दोघंही खळखळून हसली. अंधार पडायला लागला होता.

"रिक्षात चढलो ना आपण तेव्हा हा रिक्षावाला असा टक लावून बघत होता.. म्हटलं ओळखलं बिळखलं तर नाही यानं." आता तिच्या स्वरात लाडिक हेलकावा होता.

सुमेराचं मन मरगळलं. हट, ही पोरगीही चालूच आहे साली. मंगी आणि रामदेईची आठवण झाली. हे लोक दिसायला सरळ साधे दिसतात. आतापर्यंत त्याला या मुलीबद्दल सहानुभूती वाटत होती, कारण त्याला वाटलं होतं हा मुलगा मुंबईवाला आहे आणि त्यानं या साध्याभोळ्या पोरीला भुलवून आणलंय. तसा तर दिसायला मुंबईच्या मवाल्यासारखाच आहे. सिनेमातली मुंबईची अनेक दृश्ये त्याच्या डोळ्यांपुढे उभी

राहिली. त्याला वाटलं याची सूरतही सिनेमात बदमाशांचा सरदार बनणाऱ्या रामसिंगा-सारखीच दिसते. लांबलचक उतारावर मागच्या धुरीवर करकरणाऱ्या चेनचा आवाज यायला लागला आणि फ्रेमवर एक पाय ठेवून तो स्वस्थ बसून राहिला. साली रामदेई!

पुच्च!

खटकन् त्याचे ब्रेक लागले. हद्द झाली आता. हा रिक्षा आहे की हे असलं सगळं करण्याची जागा? त्याच्या मनाला फार लागलं हे. या पोरीनं त्याच्या थोबाडीत नको का भडकावून द्यायला?

"काय रे, काय झालं?" रिक्षा थांबताच दोघंही गडबडली. तिचा चेहरा लाल लाल होऊन आता कसा दिसत असेल याची सुमेरा कल्पना करायला लागला. सरळपणं पाहणं त्याला जमलं नाही.

"समोरच चौकी आहे साहेब. जरा बत्ती लावतो." दुसरं काही सुचलं नाही तेव्हा पॅडल उलट फिरवीत त्यानं म्हटलं. मागून आलेले रिक्षे आणि मोटारी पुढं गेल्या. बत्तीच्या दृष्टीनं आता घाई होती. खड्ड खड्ड करीत रिकाम्या जाणाऱ्या एका रिक्षाला थांबवून त्यानं माचीस घेतली आणि बत्ती पेटवली. मनात आलं, खरंच यांना समोर चौकीवर नेऊन उभं केलं ना तर बडा मजा येईल. सगळी मजा जिरून जाईल.

"बरं, चेष्टा पुरे झाली. गंभीरपणं सगळ्या गोष्टी आता ठरवून टाकायला हव्यात. मलाही त्या दृष्टीनं सगळी तयारी करायला लागेल ना?" आता रिक्षा चालू झाल्यानंतर तरुणाचा आवाज एकदम बदलला होता. उत्तरासाठी थोडा वेळ थांबून तो म्हणाला, "परीक्षा संपताच पत्र लिही मला. तोपर्यंत मला दिल्लीला ठेवताहेत की मुंबईला तेही नक्की होईल. जागाबिगा सगळं पक्कं करून ठेवीन. पापाजींना फक्त सांगायचं काम तुझं."

"ना—बाबा. आपली हिंमत नाही होणार. तूच लिही पत्र."

"हे बघ मूर्खासारखं बोलण्यात अर्थ नाही. मी माझं काम करतो, तुझं काम तू कर." आता त्याच्या आवाजात आलेली जरब सुमेराला आवडली. शाबास, हे मर्दासारखं बोलणं झालं.

तरुण पुढं म्हणाला, "आणि मी तर म्हणतो, मारो गोली सबको; गुपचूप सिव्हिल मॅरेज करून टाकावं. मागनं होईल सगळं सावकाश."

अरे, हा तर छुपा रुस्तम निघाला. चर्चमध्ये जाऊन लग्न करायचं म्हणतोय.

"नाही!" दृढ आवाजात मुलगी म्हणाली. काही वेळ दोघंही गप्प राहिली. आणि मग जणू त्याच्या खांद्यावर गाल घाशीत रडव्या आवाजात ती म्हणाली: "त्याला खूप वेळ आहे रे अजून! तोवर काय करू मी? खरंच खूप भीती वाटते रे मला! कोण जाणे काय होणार आहे! ऐक..."

हाय राम. सगळा सत्यानाश करून टाकला या पोरीनं. ही काय मुलगी म्हणायची की मेणाची बाहुली? एवढ्यात तर अशी उफळत होती! आणि आता म्यां म्यां करायला लागली.

"खरंच माझ्यानं नाही राहवणार. तुझं पत्र मिळाल्यापासून तसूभर काम नाही झालं माझ्या हातून. बस, वाटायचं कधी दुपार होतेय आणि कधी चार वाजतायत. घड्याळाचा तर असा राग येत होता की काय सांगू तुला. सगळ्या पोरी चेष्टा करायला लागल्या. खरंच, फार त्रास होतो. पाहा तू, मी तर परीक्षेलाही बसणार नाही. फेल होऊन हसं थोडंच करून घ्यायचं आहे?"

सगळी मरगळ झडून गेली आणि सुमेराच्या मनात उकळ्या फुटायला लागल्या. अबे लो, हा तर बंबई का खेल झाला. बस, आता एक गाणं टाका म्हणजे झालं.

"अरे अरे, हे काय उम्मी? इकडे बघ, अशी रडू नको भर रस्त्यावर. कुणी पाहिलं तर? ऐक, शपथ आहे तुला."

टिनन् टिनन् घंटी वाजवून, मागनं गाडीबिडी तर येत नाही हे बघण्यासाठी उजवीकडे हात देत सुमेरानं डोळ्याच्या कोपऱ्यातून आतलं दृश्य पाहून घेतलं. तिचं डोकं खरंच त्याच्या खांद्यावर टेकलेलं होतं आणि तो रुमालानं तिचे डोळे पुशीत होता. अंधार होता आणि घाईघाईत नीटसं दिसलंही नाही. लाल लाइट आला. कसं छान चाललं होतं. आता अडकलास बेट्या. आता ही तिरिया चरित्तर दाखवतेय. उद्याच बघ, आणखी कुणाच्यातरी कुशीत शिरून अशीच रडेल...रामदेईची आठवण येऊन पुन्हा तोंड कडवट झालं. ही पोरगी सोळा आणे शेणाचा गणपती आहे. आणि सगळ्या गमजा खऱ्या मानून चाललाय हा तरुण. अबे, दोन लाथा घाल आणि घरी जा आपल्या. कसल्या लफड्यात अडकतोयस तू!

"जरा या बाजूच्या रस्त्यानं चल बरं." रेलवे पुलावर तरुणानं सांगितलं.

हवं तिकडे घेऊन चल. मला आज तुझ्याकडून दोन रुपये काढायचे आहेत एवढं कळतंय.

"इकडे बघ उम्मी, भ्यायचं नाही. काय? सगळं ठीक होईल. आणि हे बघ, मी तिथं पोचायच्या आधी तुझं पत्र पोचायला हवं. अं?" हलक्या हातानं गाल थोपटल्याचा आवाज. "बघ, त्या जंगलात तुझ्या या गोड गोड पत्रांमुळंच जिवंत आहे मी. नाहीतर ही औषधं..."

"तू फारच वेळ लावतोस. ऐक, मी सांगतेय तुला, पास करायचं असेल ना मला तर उलट टपाली उत्तर घालीत जा. नाहीतर मग बोल नको लावूस. इकडे आम्ही दररोज मीराकडे जाऊन विचारावं आणि पत्र नाही म्हणून कळलं की असा राग येतो—जन्मात कधी पुन्हा पत्र लिहू नये तुला."

त्याच्याही बरोबर कुणी असल्या गोष्टी केल्या असत्या तर! आतल्या आत काहीतरी कसकसलं. तीव्रतेनं वाटायला लागलं काहीतरी हवंय...हवंय...काय हवं ते नीटसं नाही कळू शकलं. पण सावत्र आईशी नजरेनं खेळण्याचं केलेलं पाप आणि हाराच्या चोरीचा अपराध, या दोन्ही गोष्टी एकसाथ खिळ्यासारख्या ठणकायला लागल्या...

"त्या समोरच्या फाटकापुढं थांबव," मुलीनं म्हटलं आणि रिक्षा पुरा थांबण्या-आधीच ती पटकन् उतरली. चेनची किरकिर थांबली.

"अच्छा, तू नको उतरू. आतून बाहेर यायचं कुणीतरी."

"अच्छा," तिचे दोन्ही हात हातात घेत त्यानं म्हटलं आणि कदाचित तिचे हात आपल्या ओठांकडेही नेले असावेत.

"चलो."

निवता निवता रिक्षाकडे पाहणाऱ्या तिच्या नजरेला सुमेराची नजर मिळाली. तिच्या डोळ्यांत भय, सावधपणा, संकोच असलं काहीही नव्हतं; पण कोण जाणे असं काहीतरी होतं की ज्यानं सुमेराचं मन भरून आलं. एखाद्या झाडाचं पान तोडलं तरी बारीक बारीक धागे त्याच्याबरोबर दूरदूरपर्यंत ओढले जातात. असलेच धागे सुमेराला तिच्या चेहऱ्यावर उमटलेले दिसले. उडत्या चालीनं ती फाटकापर्यंत गेली आणि तिनं मागं वळून पाहिलं. तो तरुणही पाठीमागला पडदा वर करून तिच्याकडे पाहात होता. जीव नसलेल्या हातातून फाटकाची कडी सुटली आणि दुसऱ्या बाजूला आदळली त्याच वेळी रिक्षाही वळला. सुमेराचं मन उदास झालं.

पैशांसाठी त्यानं हुज्जत घातली नाही. बिडी घेण्यासाठी तो एका दुकानापाशी थांबला. खाली उतरताच प्रथम त्याची नजर गेली ती एखादं कबूतर बसलेलं असावं त्याप्रमाणं पायरीवर पडलेल्या सफेद रुमालाकडे. उचलून उघडला. मोठासा रुमाल होता, जागजागी ओला झालेला. वाटलं जाऊन परत करावा का? नकळतच त्यानं रुमाल नाकाला लावला. मंद मंद सुगंध तरळत जाऊन त्याच्या मस्तकात भिनला. हसऱ्या कमळांच्या तळ्यात हरवून जावं तसं वाटलं. डोळे कधी ओले झाले कळलं नाही आणि त्या मुलीचा चेहरा नजरेपुढं उभा राहिला. सुगंधात लपेटून तो रितारितासा परतला. बस्स. मागच्या धुरीवर चेन करकरायला लागली. कुणीतरी हळूहळू विटेवर वीट वाजीत राहावं तशी.

मुठीच्या दुर्बिणीतून ढगांचे रुमाल उडताना पाहात असताना का कोण जाणे त्याला वाटलं, आज तो म्हातारीचा रुमाल मिळालाय त्याला येणारा सुगंधही तसलाच आहे. तो रुमाल त्यानं ठेवून दिला होता. पुन्हा ती मुलगी कधी रिक्षात बसली तर धीर करून तिला तो परत करावा म्हणून. पण थोड्याच दिवसांनी कोण जाणे कुठं गेला तो.

आता त्यालाही आठवत नव्हतं. आज इतक्या दिवसांनी जणू तोच सुगंध त्याच्या नाकपुड्यांशी येऊन लपकत होता.

इतक्यात आवाजांचा गोंगाट ऐकून तो हडबडून सावध झाला आणि उठून सरळ बसला. पाहतो तर त्याच्या नाकाशी वहाण धरून कुणीतरी हुंगवीत होता. मिर्गीच्या रोग्याला हुंगवावी तसं. "आल तू...जलाल तू...आई बला को टाल तू..." त्याला उठताना पाहून म्हणाला : "अबे ए, उपडा पडून अफीमबाजासारखा झोप काढणार आहेस की मजुरी करणार आहेस? पंजाब मेल येऊन कधीची उभी राहिल्येय." त्याच्या खदखदा हसण्यानं गुंगी उडाली. पाहतो तर हा बाबू रिक्षेवाला—त्याचा दोस्त. उठून त्यानं जोरदार आळस दिला आणि हवेत हात उडवून तोंडं वेडीवाकडी करीत म्हणाला, "हां यार, जरा असाच पडलो तर डोळा लागला."

उतारू भरभरून टांगे रिक्षे टिन् टिन् भों भों करीत पावसाळी पूर आल्यासारखे चालले होते. एक क्षणभर त्याला वाटलं, आपण याच गाडीनं या शहरात प्रथमच उतरलो आहोत. इथलं काहीही ओळखीचं नाही आपल्या. सगळं नवं नवं आहे. इतकं की हा रिक्षाही ओळखीचा नाही...हा रिक्षा...जो त्याच्या शरीराचाच जणू एक भाग होता...

उन्हाळ्याचे दिवस

कमलेश्वर

टोलनाक्याची कचेरी मोठी रंगेल आहे. त्याच्या फाटकावर इन्द्रधनुष्यी आकाराचे बोर्ड लागलेत. सैय्यद अली पेंटरने आपल्या कसबी हाताने ते बोर्ड बनवलेत. बघता बघता शहरात साइनबोर्ड लावलेली बरीच दुकानं झाली. साइनबोर्ड लावणं म्हणजे गल्ला वाढवणं. फार पूर्वी जेव्हा दीनानाथ हलवायानं पहिला साइनबोर्ड लावला तेव्हा तिथं दूध पिणाऱ्यांची संख्या एकदम वाढली. त्यानंतर साइनबोर्डांचं पेवच फुटलं. हरतऱ्हेच्या कुसर वेलबुट्टयांनी ते सजू लागले. 'ॐ' किंवा 'जयहिंद'नं सुरुवात करून 'एक वेळ खात्री करा' पर्यंत लेखन होऊ लागलं. 'भेसळ किंवा नकल शाबीत करणाऱ्याला शंभर रुपये रोख इनाम' अशी आव्हानंही झळकू लागली.

टोलनाक्याच्या कचेरीचं नाव तीन भाषांत लिहिलं आहे. चेअरमनसाहेब मोठे हुषार व धोरणी असा त्यांचा लौकिक, म्हणून प्रत्येक बोर्ड तीन भाषांत लिहिला जातो : हिंदी, उर्दू आणि इंग्रजी. लांबलांबचे मोठे पुढारी भाषणं करायला येतात, परदेशी लोक ताजमहाल पाहून झाला की आग्र्याहून पुढे पूर्वेला जाताना इथूनच जातात...त्यांच्या मनावर याचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाही भैय्या. आणि शिवाय प्रत्येक सीझनची वेळ असते. जत्रांच्या दिवसांत हलवायांच्या बोर्डांवर, जुलै-ऑगस्टमध्ये पुस्तक-स्टेशनरीवाल्यांच्या बोर्डांवर, सणासुदीच्या लग्नांच्या दिवसांत कापडवाल्यांच्या बोर्डांवर आणि साथीच्या दिवसांत वैद्य-हकीम-डॉक्टरांच्या साइनबोर्डांवर नवं रोगण पॉलिश झळकतं. 'शुद्ध देशी घी' वाल्यांचं आपलं बरं असतं. ते आतल्या भिंतीवर गेरूनं किंवा विटकरी रंगानं हाताच्या बोटानं मोठ्या अक्षरांत लिहून काम भागवतात. साइनबोर्डांची महती सांगताना वैद्यजी म्हणाले, "पोस्टरं लावल्याशिवाय सिनेमावाल्यांचंही चालत नाही. मोठ्या शहरांतून जाऊन बघा. अगदी घासलेट विकणाऱ्याच्या दुकानावरही साइनबोट मिळेल. अतिशय गरज आहे बाबा! मुलां-बाळांच्या नावाचेही साइनबोट आहेत. नाहीतर नाव ठेवण्याचा उपयोग तरी काय? साइनबोट लावूनच तर सुखदेव बाबू कम्पौण्डरचे डॉक्टर झाले आणि बॅग घेऊन रुबाबात जायला लागले."

जवळच बसलेल्या रामचरणने आणखी एक आश्चर्याची खबर दिली. कालच म्हणे सुखदेव डॉक्टरने एक घोडा विकत घेतला.

पत्र्याच्या खुर्चीवर प्राणायामाची साधना करत असल्यासारखं तोंड करून बसलेल्या पंडितनं विचारलं, "चालवणार कोण ?"

"हे सगळे खिसे कापण्याचे धंदे आहेत बाबा, दुसरं कांही नाही," वैद्यजींचं लक्ष एक्क्याकडं होतं. "रोग्याकडून भाडं वसूल करतील झालं. सईसाला बक्षिशी द्यायला लावतील मोठ्या शहरांतल्या डॉक्टरांगत. म्हणूनच तर या पवित्र धंद्याची बदनामी होते आहे. विचारा एकदा रोग्यावर इलाज करायचा आहे की रुबाब दाखवायचा आहे ? विलायती तऱ्हा दाखवून रोग्याचा प्राण हे आधीच कंठाशी आणून ठेवतात. आयुर्वेदी वैद्य नाडीपरीक्षेच्याही आधी फक्त चेहरा बघून रोगाची परीक्षा करतात. एक्का घोडा यांत काय रडणार ? थोडया दिवसांनी बघा याचा सईस कम्पौण्डर होईल..." असं म्हणून ते हसू लागले. मग म्हणाले, "कोण काय म्हणणार भाई ? डॉक्टरी आजकाल तमाशा बनून राहिलीय. वकील-मुखत्यारांची पोरं डॉक्टर व्हायला लागलीयत. रक्ताचं आणि संस्काराचं देणं ते खरं! त्यानं हाताला गुण येतो. डॉक्टराचा मुलगा डॉक्टर होतो. अरे, अर्धी विद्या तर लहानपणी भस्मं, चूर्णं, जडीबुट्टया कुटतानाच येते. तोळा, मासा, रत्ती यांचा असा अचूक अंदाज येऊन जातो की औषध चुकायची धास्तीच नको. औषधाचं सगळं जे काही आहे ते ते तयार करण्याच्या विधीत आहे...धन्वंतरी..." वैद्यजी पुढे काही म्हणणार होते. पण एका माणसाला दुकानाच्या दिशेनं येताना बघून गप्प झाले. दुकानातल्या इतर लोकांकडे अशा तऱ्हेने बघू लागले की जणू ते त्यांचे रोगीच आहेत.

तो माणूस दुकानाच्या पायऱ्या चढायच्या आतच वैद्यबुवांना अंदाज आला आणि त्यांचा तो उत्साह थंड झाला. पण देखावा म्हणून काही असतोच ना! कुणी सांगावं, उद्या हाच माणूस आजारी पडायचा, किंवा त्याच्या घरी कुणाला तरी काही तरी व्हायचं. यासाठी आपल्या पेशात कोणतीही कुचर दिसता नये. स्वतःला सावरत ते म्हणाले, "काय बाबा, कस काय ? बरं आहे ?" होकारार्थी उत्तर देता देता त्यानं काकवीचा एक बुधला वैद्यबुवांच्या समोर ठेवला. "ठाकूरसाहेबांनी हे ठेवायला सांगितलंय, बाजारातून परत येताना ते घेऊन जातील. एकदीडच्या सुमाराला."

"त्यावेळी दुकान बंद होईल!" या फुकटाच्या कामाला वैतागून वैद्यबुवा म्हणाले. "वैद्यहकीमांची दुकानं काय रात्रंदिवस उघडी राहतात होय ? ते काय व्यापारी आहेत ?" पण मघाच्याच आशेनं की काय ते लागलीच पुढं म्हणाले, "पण असू दे. ठेवून द्या. मी नसलो तर शेजारी ठेवून जाईन."

त्याची पाठ फिरताच वैद्यजी म्हणाले, "दारूबंदी करून काय झालं ? घरोघर हातभट्टया सुरू झाल्या आहेत. काकवी लोणकढ्या तुपाच्या भावानं विकायला लागलेत. आणि या डॉक्टरांचं तर काय विचारावं ? यांची दुकानं म्हणजे होळीचे अड्डे झालेत.

लायसन्स मिळतं ना औषधासाठी दारू वापरायचं? पण सर्रास जिंजरसारखं विकतात. कुणी काही करत नाही. इथं आम्हांला भांग-अफूची एखादी पुडी हवी असेल तर कोण त्रास पडतो! जामीन द्यावा लागतो जामीन."

"साहजिक आहे. जोखम आहे ना," पंडित म्हणाला.

"हो ना, आता जोखीम फक्त हकीम-वैद्यांनीच वाहायची आहे. सगळ्यांची नावं रजिस्टर झाली देखील. उगीच आलतूफालतू पंचकल्याणी वैद्य म्हणवून घेणारे होते त्या सगळ्यांची झाली हकालपट्टी. ते चूर्ण घोटणारे मोठे बसले होते वैद्य होऊन. सगळे साफ झाले. लखनऊला सरकारी परीक्षा वगैरे होऊन सगळं पक्कं झालं."

वैद्यबुवांच्या या हकिगतीत पंडितजींना काहीच रस वाटेना. ते कंटाळून उठले. वैद्यबुवा आत वळले आणि तिथं "औषधालय" चा बोर्ड रंगवत बसलेल्या चंदराला म्हणाले, "सफेदी फार जाड झाली आहे बाबा, थोडं तारपीन मिसळ" आणि अशोकारिष्ट असं लेबल असलेली बाटली स्वतःच घेऊन आले.

अशाच तऱ्हेने कोण जाणे वेगवेगळ्या औषधांची शरीरं धारण करणाऱ्या बाटल्यांतून कुठकुठल्या पदार्थांचे आत्मे भरले होते ते! समोरची एकुलती आलमारी मोठमोठ्या बाटल्यांनी भरून गेली होती. त्यांच्यावर निरनिराळ्या आसवांची-अरिष्टांची नावं होती. पण फक्त एकच रंग बाटल्यांची होती. त्यांच्या पाठीमागे जरुरीचं काही सामान आहे. समोर टेबलावर पांढऱ्या बाटल्या आहेत. त्यांत स्वादिष्ट चूर्ण, लवण-भास्कर वगैरे आहे. शिवाय इतर जे काही भरलं आहे ते एक वैद्यबुवाच जाणे!

तारपीन मिसळून चंदरनं पुढं लिहिणं चालू केलं: "प्रो. कविराज नित्यानंद तिवारी". त्याच्यावरची ओळ 'श्री धन्वंतरी औषधालय' स्वतः वैद्यबुवांनी लिहिली होती. सफेदीची अक्षरं जशी कापसाचे बोळे चिकटवल्यागत दिसत होती. वर थोडी जागा मोकळी पाहून ते म्हणाले, "बाबू, वर जयहिन्द लिही. आणि खाली जी थोडी जागा राहाते आहे ना तिथं एका बाजूला द्राक्षासवाची बाटली, दुसऱ्या बाजूला ...चं चित्र ...तसं मिडलपर्यंत रंगकाम मीही करत होतो पण इथं म्हणजे कसबीच हात पाहिजे."

चंदरला खरं म्हणजे कंटाळा आला होता. तो या भानगडीत उगीचच अडकला होता. त्याचं ड्रॉइंग चांगलं होतं. त्याचा हा परिणाम झालेला पाहून त्याचं मस्तक चकरलं होतं. वैतागून म्हणाला, "कोणातरी पेंटरकडून करून घ्यायचं नाही काम? त्याचं कसब मला कसं जमेल?" घाम पुसता पुसता चंदरनं ब्रश खाली ठेवला.

"अरे तो पाच रुपये मागत होता," ते म्हणाले, "समजलास? दोन ओळींचे पाच रुपये! आता आपल्या मेहनतीमुळं हा साइनबोर्ट दहाबारा आण्यांला पडला. हा रंग एक रोगी देऊन गेला. विजेच्या कंपनीचा पेंटर अजीर्णानं हैराण होता. दोनतीन वेळा

औषध दिलं. पैसे नाही घेतले. तेव्हा मग त्यानं दोनतीन रंग आणि थोडं वार्निश दिलं आणून. दोन पेट्या रंगवल्या, हा बोट रंगवला आणि एखाददुसरी खुर्ची रंगवून होईल. तू फक्त एवढं लिहून दे. लाल रंगाची शेड मी स्वतः देऊन टाकीन. काय? छान तिरंगा खुलून दिसेल! अं?" वैद्यबुवांनी विचारलं आणि स्वतःच पसंती देऊन टाकली.

उकाड्यामुळे चंदर कातावला होता. जसजशी दुपार होत होती तसतशी सडकेवर गरम धूळ-वारे वाढत होते. पण शेवटी चंदरला नाही म्हणवेना. हातपंख्याच्या काठीच्या टोकाने आपली पाठ खाजवत वैद्यबुवांनी पटवाऱ्यांच्या कीर्द-खतावण्या, रजिस्टरं काढून पसरायला आरंभ केला.

माध्यान्हीच्या झळा लागू नयेत म्हणून वैद्यबुवांनी दुकानाची एक फळी किलकिली ठेवून रजिस्टरवर खतावण्यांतल्या नकला करायला सुरुवात केली. काहीतरी विचारायचं म्हणून चंदरनं विचारलं, "वैद्यजी, हे काय करता?"

त्यांचा चेहरा थोडा उतरला. म्हणाले,

"नुसतंच रिकामं बसण्यापेक्षा उद्योग बरा नाही का? नव्या अकौंटंटला कामच येत नाही. बिचाऱ्याला रोज कानुगोसाहेबाकडून नाहीतर नायबसाहेबाकडून बोलणी खावी लागतात. काय करतील? झक मारून कुणाला तरी चार पैसे देऊन करून घेतो झालं. आता काय ते पूर्वीचे पटवारी राहिलेत? अरे झोपेतून उठवून विचारलं अर्ध्या रात्री तरी गावचे कायदे महसूल सांगायचे. माहीत आहे? बिचाऱ्यांच्या तोंडचा घास काढून घेतला. आता हे नवीन अकौंटंट आहेत. महिन्याचा सगळा पगार असाच कुणाकडून तरी कामं करून घेण्यात खर्च होतो त्यांचा. पोट तर त्यांनाही आहे. मग शेतकऱ्यांकडून घेतात तीन रुपये पाच रुपये. नाहीतर खातील काय? दोघंतिघं जण आपल्या ओळखीचे आहेत. त्यांच्याकडून कधी कधी असली छोटी-मोठी कामं मिळतात. नकला करायच्या, रजिस्टरं भरायची..."

बाहेर रस्ता निर्जन होत चालला होता. कचेरीतले बाबूलोक निघून गेले होते. समोर जकातकचेरीच्या वाळ्याच्या पडद्यांवर पाणी मारणं सुरू झालं होतं. गरम वारा वाहात होता. दूरच्या पिंपळाची सळसळ लूबरोबर गर्जना होऊन येत होती. इतक्यात एक जण दारातून आत डोकावला. पटवारीच्या कळवळ्यानं आणि एकंदरच केविलवाणी होत जाणारी वैद्यबुवांची वाणी एकदम थांबली. एकाच नजरेत त्यांनी त्या माणसाला पारखलं आणि ते सावरून बसले. ताबडतोब बोलणं फिरवून ते म्हणाले, "एक बोट मी आग्र्याहून बनवायला सांगितला आहे. तो येईतोपर्यंत यावर काम चालवू. इथं कुणा लेकाला वेळ आहे यात डोकं घालायला?..." आणि गडबडीत असल्यागत दाखवत त्यांनी त्या नवागताला प्रश्न केला, "हं बोला लवकर."

"मेडिकल सर्टिफिकीट पाहिजे. कोसमा स्टेशनावर हमाल आहे साहेब," रेल्वेचा निळा डगला घातलेल्या त्या माणसाने सांगितले.

त्याच्या गरजेचा धूर्तपणे अंदाज घेत वैद्यबुवांनी विचारलं, "कोणत्या तारखेपासून कोणत्या तारखेपर्यंत?"

"पंधरा दिवसांपूर्वी आलो होतो. आणखी सात दिवस राहायचंय."

कसलासा हिशेब करीत वैद्यबुवा म्हणाले, "हे बघ, रजिस्टर नंबर वगैरे घालून अगदी पक्कं सर्टिफिकीट मिळेल. चार रुपये पडतील..." बोलता बोलता वैद्यबुवांना चार रुपये स्वतःलाच जास्त वाटले म्हणून ते म्हणाले, "मागच्या पंधरा दिवसांची भानगड नसती तर दोन रुपयांत काम झालं असतं."

खलाशाची निराशा झाली, पण तिची गडद छाया वैद्यबुवांच्या घामेजलेल्या चेहऱ्यावर पडली. अत्यंत निरपेक्ष स्वरात तो म्हणाला, "सोबरनसिंगनं पाठवलं होतं मला." त्याच्या बोलण्यात असा काही आविर्भाव होता की जणू काम ह्याचं नसून सोबरनसिंगाचंच होतं. पण वैद्यबुवांच्या हातात नाडी आली. ते म्हणाले, "हे तर मी पहिल्यांदा ओळखलंच होतं. ओळखीपाळखीशिवाय सर्टिफिकीट मी देतच नाही. इज्जतीचा प्रश्न आहे ना! तुम्ही कुठं राहता काय करता, हे मला काय माहीत? आता विचार करा, शब्दावर विश्वास ठेवून दाखला द्यायचा, पंधरा दिवसां-अगोदरची तारीख घालून नावं रजिस्टर करायची, रोज लिहायचा, प्रत्येक तारखेला नाव लिहायचं तेव्हा कुठं काम होईल. समजलं? असं घरी बसून खायचं काम थोडंच आहे?" बोलता बोलता वैद्यबुवांनी मदतीच्या अपेक्षेने चंदरकडे बघितलं. त्यानं म्हटलं, "हो ना! आता यांना काय माहीत तुम्ही खरोखरच पंधरा दिवस आजारी होता की दरोडे घालत होता? सरकारी काम आहे..."

"पाच रुपयांशिवाय जगातला कोणताही डॉक्टर सर्टिफिकीट नाही द्यायचा बघा तुम्ही." बोलता बोलता नक्कल उतरण्याचं रजिस्टर समोर ओढून घेत वैद्यबुवा म्हणाले, "इथं कुणाला मरायला फुरसत आहे? ही बघा रोग्यांच्या नावांची रजिस्टरं... बघितलीत? आता रोग्यांकडं लक्ष द्यायचं, की सरकारला दाखवायसाठी रजिस्टरं भरत बसू? पण काय करणार? प्रत्येक रोग्याचं नाव, पत्ता, पगार, रोग, सगळं तपशीलवार लिहावं लागतं. यांतच तुमचं नाव लिहावं लागेल....आता सांगा, रोग्यांना तपासणं चांगलं की या असल्या सरकारी लफड्यात पडणं चांगलं?" बोलता बोलता रजिस्टर बंद करून ते उपकारकर्त्याचा भाव चेहऱ्यावर आणून बसले.

रेल्वेचा खलाशी एक मिनिटभर विचार करीत बसला. कान कोरण्याचं काम संपवून वैद्यबुवा रजिस्टरात डोकं खुपसून बसले होते. तिकडे एकदा बघून तो दुकानाच्या पायऱ्या उतरला. वैद्यबुवांना आपण नको इतकं ताणल्याची जाणीव झाली. पण काय

करणार ? तुटलंच ते ! काय करावं ते न समजून त्यांनी त्या जाणाऱ्याला हाक मारून म्हटलं, "अहो हे बघा, सोबरनसिंग ठाकूरना रामराम सांगा. त्यांच्या मुलबाळांची खुशाली वगैरे ?"

"सगळे खुशाल आहेत," थांबून तो म्हणाला.

त्याला ऐकवण्यासाठी वैद्यबुवा मोठ्याने चंदरला म्हणाले, "दहा-बारा गावं सोडून ठाकूरजी औषधासाठी इथं येतात. त्यांच्यासाठी आम्ही..." बोर्डावरचं शेवटचं अक्षर लिहीत चंदरनं विचारलं, "गेला ?"

"जातो कुठे ? येईल जरा हिंडून," वैद्यबुवांनी स्वतःलाच समजावत म्हटलं. "गावढ्या गावातले वकील आणि डॉक्टर एकच असतात. सोबरनसिंगनं जर माझं नाव सांगितलं असेल तर तो नक्की येईल. या गावढळांना समजूत जरा कमीच असते. जरा विचार करील, मग येईल."

"आणखी कुणाकडून तरी घेतलंन् तर ?" चंदरनं विचारलं. पण 'छे, छे !' वैद्यबुवांनी ती शक्यता झिडकारून टाकली. मग साइनबोर्डाची प्रशंसा करत म्हणाले, "वा ! वा ! चन्दरबाबू, झकास झाला बोर्ड. काम होऊन जाईल यानं. बघ आता. याच कामासाठी पाच रुपये द्यावे लागले असते. न् मग ते रोग्यांकडून वसूल करायचे. एका घोडा काय न् हे काय ? नाक समोरून पकडावं किंवा डावा हात कानामागून घेऊन द्राविडी प्राणायाम करावा. एकच ते. सय्यदअलीच्या हातचा बोर्ड रोग्यांना काही चांगलं करत नाही." बोलता बोलता त्यांना हसू आलं. स्वतःलाच स्वतःचं.

एवढ्यात आणखी एकजण आत आला. प्रथम वाटलं खलाशीच आला, पण हा पांडुरोगी होता. त्याला बघून वैद्यबुवांचा चेहरा प्रफुल्लित झाला. ते आत गेले. आतून एक ताईत आणत म्हणाले, "आता हा बांधून मग सांग." त्याच्या दंडात ताईत बांधून त्याने दिलेले पैसे खिशात टाकून ते गंभीर होऊन बसले. तो गेला तशी ते म्हणाले, "ही विद्यादेखील आमच्या वडिलांपाशी होती. त्यांच्या हातची पुस्तकं अजून पडलीत. कधी कधी नीटनेटकी लिहिण्याचं मनात आहे. अनुभवाचे बोल आहेत ना ! सगळा श्रद्धेचा प्रश्न आहे बाबा ! नाहीतर होमिओपाथी औषध म्हणजे काय आहे तसं पाहिलं तर ? एक चिमूट साखर. विश्वास असेल तर ते औषध."

जाता जाता चंदरनं विचारलं, "दवाखाना बंद व्हायची वेळ झाली. जेवायला जाणार नाही ?"

"तूं हो पुढं, मी आलोच दहा-पाच मिनिटांत" असं म्हणून वैद्यबुवांनी रजिस्टर पुढं ओढलं. दवाखान्याचा दरवाजा अर्धा किलकिला करून ते बसले. बाहेर उन्हाचा कहर झाला होता.

शेजारच्या बच्चनलालनं दुकान बंद करता करता विचारलं, "वैद्यबुवा, जेवायला नाही गेलात ?"

"काय करणार ? थोडं जरुरीचं काम आहे..." वैद्यबुवांनी जमिनीवर चटई अंथरली. कागद रजिस्टर टेबलावरून खाली घेतलं. पण उकाडा तरीही असह्यच...घाम थांबेच ना. थोडा वेळ पंख्यानं वारा घ्यायचे, थोडा वेळ काम करायचे. थोडा वेळ तसंच काम करण्याचा प्रयत्न केला. पण मग अगदी राहावेना. उठले आणि बाटल्यांवरची धूळ झटकून त्यांना ओळीत उभ्या केल्या. पण उन्हाळ्यातली दुपार ती...वेळ सरता सरत नव्हता. एकदा त्यांनी खिडकीतून बाहेर पाहिलं. एखादुसरा माणूस जात येत होता. त्यांची सोबतही त्यांना खूप झाली. आत आले. बोर्डाची तार ठीकठाक केली आणि त्याला बाहेर लटकावून दिलं. गळ्यात ताईत लटकावा तसा धन्वंतरी औषधालयाचा बोर्ड दुकानावर शोभत होता.

आणखी काही वेळ गेला. मग त्यांनी अगदी मनाची तयारी केली. एक लोटा पाणी पिऊन धोतर मांड्यांपर्यंत गुंडाळून घेऊन ते कामाला बसले. बाहेर चाहूल लागली. तेव्हा काळजीपूर्वक त्यांनी बघितलं.

"आज विश्रांतीसाठी नाही गेला वैद्यबुवा," घरी जाता जाता एका ओळखीच्या दुकानदाराने विचारले.

"निघालोच होतो....पण थोडं काम राहिलंय...विचार केला संपवूनच जावं." बोलत बोलत ते भिंतीला पाठ टेकून बसले. सदरा काढून त्यांनी एका बाजूला ठेवला. एकेरी छपराचं ते दुकान भट्टीसारखं तापलं होतं. वैद्यबुवांचे डोळे झोपेने जड झाले होते. एक डुलकी आली...काही वेळ गेला असावा. अगदीच राहावेना झालं तेव्हा मग त्यांनी रजिस्टरांची उशी करून डोक्याखाली घेतली आणि ते आडवे झाले. पण बेटी झोप...कधी यायची तर कधी जायची. कोण जाणे काय बिघडलं होतं ते!

बाहेर कोणी आलंसं वाटून ते डोळे उघडून बसले. जेवून खाऊन बच्चनलाल परत आला होता.

"अरे, आज गेला नाहीत तुम्ही ?" दुकान उघडताना त्यानं विचारलं.

वैद्यबुवांनी जोरजोरात हातपंखा हलवणं सुरू केलं. बच्चनलालने विचारलं,

"कुणाची वाट बघताहात वाटतं ?"

"अं ? हो, एक रोगी म्हणाला होता येईन म्हणून. एवढ्यात आला..." बच्चनलालला जाताना बघून त्यांनी वाक्य अर्धंच टाकलं आणि ते आपला घाम पुसू लागले.

प्रेतयात्रा

श्रीकान्त वर्मा

फक्त एक कॉट ठेवण्याएवढी जागा होती. खोलीतून बाहेर येत जमलेल्या लोकांना शिपायाने विचारले, "हिला कोणी वारसबिरस?"

त्याला कुणी उत्तर दिलं नाही. तेव्हा तो आपल्याशीच पुटपुटला, "शेवटी कांही व्यवस्था तर केली पाहिजे!"

हिंदु होती की मुसलमान!

आपल्या सायकलच्या सीटला पाठ टेकत एका मुलानं म्हटलं, "वेश्या होती."

"माहीत आहे," दटावल्यागत शिपाई म्हणाला.

"हवालदार, सेवावाल्यांना (अनाथांची अंत्यक्रिया करणारे) देऊन टाका हे काम," कॉन्स्टेबलच्या पुढं विड्यांचं बंडल करीत एकानं म्हटलं.

"कालपासून पडलंय. माहीत आहे! असाच आणखी वेळ गेला तर कुजायला लागेल झालं. हवालदार, याचा जल्दी निकाल लावा बुवा."

विडीचा धूर नाकातोंडावाटे बाहेर सोडत हवालदार म्हणाला, "हो, पण हिचं कुणी आहे नाही कळायला नको? पहिल्याप्रथम रिपोर्ट लिहायला हवा. नाहीतर कोतवालीत बोंब होईल माझ्या नावानं. पण काही माहीत तर हवं ना?" आणि विडीचे झुरक्यावर झुरके घेत तो चिंतामग्न झाला. काही लोक त्याच्याजवळ उभे होते आणि काही दूर घोळका करून होते. आपापसात काही बोलत.

आसपास छोटी-छोटी घरं, एकेरी खोल्या, आणि झोपड्या होत्या. रस्ता डांबरी नव्हता. पण तिच्यावर मुरूम पसरला होता. सगळा वेळ या मुरुमाची धूळ हवेत उडत राहायची आणि वस्ती शांत वाटायची.

दोनतीन वर्षे झाली. इमरती ही शेवटची 'तसली' बाई होती त्या वस्तीत राहणारी. हजार वेळा सांगून, तक्रार करूनही ती गेली नाही. आता वस्तीनंही एकप्रकारे तिला सामावून घेतलं होतं. माहीत होतं की तिच्याशी भांडण्यात काही अर्थ नाही. फार तर ते एवढंच करू शकले. आणि ते म्हणजे तिच्याशी बोलणंचालणं बंद करणं. अर्थात बोलाचालीचा प्रसंगही येत नसे. फक्त जेव्हा ती नटूनथटून पानाच्या दुकानाकडे जायची तेव्हाच काय ती वेळ यायची!

सकाळी आणि संध्याकाळपासून मध्यान्हरात्रीपर्यंत फिल्मी गाणी बडविणाऱ्या द सिंध

हिंदू हॉटेलमध्ये जेव्हा ती संध्याकाळी स्वतःसाठी मटणाचा शोरबा आणायला जायची तेव्हाही ती आपला वेळ फुकट घालवत नसे. बहुधा तिथं बसणारे सगळे कुचकामी फुकटे आहेत हे तिनं ओळखलं होतं आणि फुकट्यांविषयी तिला फार पूर्वीपासून तिटकारा होता. तिनं एका मुलीला चार पैसे देऊन रंगीत खडूनं आपल्या दारावर लिहून घेतलं होतं, "उधार मुहब्बत की कैंची है."

"काही म्हणा, इमरतीबाई सगळ्या जगापेक्षा वेगळीच रंडी होती," ती मेल्यावर पानवाला म्हणत होता, "जास्त बडबडत नसे ती."

तिच्यापाशी गिऱ्हाइकंही थोडी जात असत. शेवटी तर एखाद-दुसरा कुणी आला तर यायचा. नाहीतरी येणार कोण म्हणा! ती गात नव्हती की कंबर लचकवत नव्हती. नुसत्या शरीरासाठी का माणूस येतो? वेळेवेळेची गोष्ट आहे!

यावर लोक म्हणायचे की नाच नाही आणि गाणं नाही. असल्या फालतू गोष्टींसाठी न येता केवळ शरीरभोगासाठी इमरतीबाईकडे येत. मग पानवाला उत्तर द्यायचा की शरीरात तरी काही आकर्षण हवं? तेही तिच्यापाशी नव्हतं. इमरतीबाई साधीसुधी रंडी आहे.

काही वेळी पानाच्या दुकानावर बसून पान लावता लावता तो याच गोष्टी घोळून घोळून सांगत होता; आणि हे असं होणार हे आपल्याला माहीतच होतं असंही म्हणत होता. "मी तिला बजावलं होतं की, 'इमरतीबाई, औषधोपचार कर. अजूनही बरी होशील.' पण साली आयुष्यभर इतरांना रोग देत जगली. आता मेली तर खांदा द्यायला कुणी नाही. पण इमरतीबाई अगदी खरीखुरी रंडी होती. तिचं सगळं मला ठाऊक आहे." मग तिथं बसल्याबसल्या पानाला कात लावत हवालदाराला आवाज दिला.

"हवालदार, मुडदा लवकर हालवा. रोगानं मेलीय."

त्यावेळी हवालदार काचेच्या ग्लासातून फुंकर मारीत चहा पिण्यात गुंतला होता. पानवाल्याचं बोलणं ऐकून त्यानं काही उत्तर देण्यासाठी पानवाल्याच्या दिशेनं पाहिलं आणि तेव्हा त्याला म्युनिसिपालिटीची कचरा वाहून नेणारी रेड्याची गाडी येताना दिसली.

चहाचा शेवटचा घोट घशाखाली उतरवून हवालदारानं ग्लास हॉटेलच्या पोऱ्याच्या हाती दिला आणि कचरागाडीच्या हाकणाऱ्याला विचारलं, "काय रे, नाव काय तुझं?"

गाडीतून उतरत तो उत्तरला, "बंसीलाल."

"कुठं चाललायस?"

"ड्यूटीवर," त्याने निष्काळजीपणे उत्तर दिले. हवालदाराची त्याला कसल्याही तऱ्हेची भीती वाटली नाही. तिथं जर गर्दी दिसली नसती तर तो थांबलाही नसता. गाणं गुणगुणत निघून गेला असता. इमरतीबाई बाहेर येवो न येवो, इकडून जाताना तो एखादी गाण्याची ओळ गुणगुणायचाच.

"हे बघ, बंसीलाल," हवालदाराने गुरकावत म्हटलं, "तुझी ड्यूटी कॅन्सल कर. काय समजलं? मर्तिकघाटावर जायला हवं."

चाबकासारखा वापरत असलेला दांडा गाडीत ठेवत बंसीलालनं विचारलं, "कोण मेलंय?"

"इमरतीबाई," गर्दीतून कुणीतरी सांगितलं.

"काय?" त्याचा विश्वासच बसेना.

"मुडदा इथून उचल आणि मुडदेघाटावर नीट नेऊन पोचव; समजलं? मी जातो ठाण्यावर रिपोर्ट द्यायला." हवालदाराने त्याचा खांदा थोपटल्यागत केलं आणि मळक्या नोटबुकात काहीतरी लिहीत तो तिथून गेला.

बंसीलालने गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली होती. "जरा बघू तर खरं," असं स्वतःशी पुटपुटत तो आत गेला. अजूनपर्यंत तिथं जमलेल्या एवढ्या लोकांतून आत कुणीच गेलं नव्हतं. तेव्हां बंसीलालबरोबर आणखीही दोन-चार जणांनी चान्स मारला.

प्रेत खाटेवर ठेवले होते. त्याच्यावर कोणी चादरही झाकली नव्हती.

बंसी या कोठरीत प्रथमच आला होता. त्याच्या हृदयात हलकेच कुठंतरी कळ उठली.

इमरतीबाईला त्यानं पुष्कळ वेळा पाहिलं होतं आणि कैक वेळा त्याने ठरवलं होतं की एकदा ना एकदा तरी तिच्याकडे जायचं. मेल्यानंतरही तो गोरा गुलाबी देह जसा न् तसा दिसत होता.

पण तिथं तो कधी जाऊ शकला नाही. तेवढे पैसेच जमले नाहीत. त्याला माहीत होतं की इमरतीबाईकडे गिऱ्हाइकं कमी का येईनात, तिचा दर भारी होता. त्याहून ती खाली येणार नाही आणि नाहीतरी का यावंन् तिनं खाली? त्याला काय म्हणून तिनं पसंत करावं? त्याला स्वतःच्या रंगारूपाची चांगली जाणीव होती. आपण बुटके आणि रूपाने वेडेवाकडे आहोत म्हणून लोक आपल्याला हसतात, आपल्यावर दया दाखवतात हे तो समजून होता. या दोन भावनांशी सामना करावा लागला की तो स्वतःचा राग गिळत असे.

आपली ड्यूटी संपली की संध्याकाळी पांढरा स्वच्छ कुर्ता आणि सफेद तलम धोतर नेसून थिएटरपर्यंत चक्कर मारायला निघायचा आणि बासरीवर फिल्मी गाणी वाजवून पोरांना भोवती जमा करायचा. त्या बासरीमुळे त्याची स्वतःची दोस्त मंडळी आणि अड्डा जमला होता.

इमरतीचं तोंड वाकडं झालं होतं आणि ओठ थोडे उघडे पडले होते. छातीवरून पदर घसरला होता आणि मांड्याही उघड्या होत्या. तिची अशी अवस्था बघून त्याला फार वाईट वाटलं. 'वेळ करून उपयोगी नाही' असं स्वतःशी पुटपुटत तो पुढे झाला आणि त्याने तिच्या शरीरावर वस्त्र टाकलं.

खाट बाहेर काढायची काही जरूर नाही, त्यानं स्वतःलाच सांगितलं. मग प्रेताचे पाय धरत त्याने गर्दीला म्हटलं, "जरा हात लावा." एकाने डोक्याची बाजू आणि दुसऱ्याने पाठीला आधार दिला. प्रेत बाहेर आलं.

"जरा थांबा," त्याने म्हटलं, "गाडी धुवून घेतो." मुडदे वाहण्याचं काम त्याला नवीन नव्हतं, पण असल्या घाणेरड्या गाडीतून प्रेताला नेताना त्याला याअगोदर कधीच न जाणवलेलं काही आता स्पर्श करून गेलं.

रेड्याला दांडा टोकत तो नळापाशी घेऊन आला. नळ चालू केला आणि मन लावून त्याने गाडी धुवायला सुरुवात केली. ओंजळीओंजळीनं तो पाणी घालायचा आणि मळक्या कपड्याने ती बाहेरून-आतून पुसायचा. एकदा तो रेड्याच्या पाठीवर चढून बसला आणि तिथून त्याने आपली स्वच्छ गाडी न्याहाळली. मग आणखी चकचकीत करण्यासाठी त्याने गाडी पुन्हा थोडी आणखी धुवायला सुरुवात केली.

प्रेताजवळ दहा-बारा लोकांचा घोळका जमला होता. गाडी त्यांच्या तिथपर्यंत नेत तो म्हणाला, "जरा बाजूला व्हा. वाट द्या." मग धापा टाकत खाली उतरला. स्वतःला सावरत म्हणाला, "जरा हात लावा. मुर्दाला मदत करा."

काही लोक पुढं झाले आणि पुन्हा एकदा प्रेत उचललं. सांभाळून.

तो गाडीत चढला होता. आणि प्रेताला ठेवण्यासाठी जागा करत होता. पण तेवढी जागाच नव्हती. त्याला म्युनिसिपालिटीचा राग आला. एवढ्याशा गाडीत एखादं मूलही मावणार नाही.

'अशी नको, हां असं, या-या बाजूला...' आणखी काही लोक मदतीला आले आणि शव अर्धमुर्धं गाडीत ठेवलं. खांद्यावरचा करडा घेऊन त्याने प्रेतासाठी उशी केली. एवढं सगळं केल्यावर त्याला काहीसं समाधान वाटलं.

गाडीवर उभं राहिल्या राहिल्या त्याने सगळ्या जमावावर नजर टाकली आणि आपण कुणीतरी मोठे आहोत असा त्याला भास झाला. कोणी काही म्हणायच्या आत त्याने गाडी हाकलली आणि स्वतः निश्चितपणे बसला.

काही अंतर गेल्यावर त्याने मागे वळून पाहिलं. गर्दी पांगत होती. एक माणूस इमरतीबाईच्या घराला कडी लावीत होता.

त्याने गाडीचा वेग वाढवला आणि वळणापाशी येऊन थांबला. उतरून त्यानं पाहिलं. सगळं ठीक होतं. प्रेत तसंच अर्धवट झोपवल्यागत होतं. फक्त अंगावरचं वस्त्र अस्ताव्यस्त झालं होतं. अर्धनग्न झालं होतं. बंसीचे डोळे तिथं खिळून राहिले, मग त्याची त्यालाच लाज वाटली. त्याने शरीर व्यवस्थित वस्त्राने झाकले. मग पानाच्या दुकानावर गेला.

त्याच्या खिशात सात रुपये होते. पगारातून साठवलेले. बरेच दिवस मनात असलेल्या वस्तू त्यांतून तो घेणार होता. त्याने रुपये हातात घेतले आणि दुकानाकडे जाता जाता म्हणाला, "याची मोड द्या हो."

पानवाला त्याच्याकडे बघून हसला आणि म्हणाला, "एवढी मोड नाही बाबा." पण बंसीने ते कानाआड टाकले आणि तो म्हणाला, "जरा लवकर द्या. वेळ होतोय."

एका मळक्या कपड्यात सगळी मोड एकत्र करून पानवाला मोजू लागला. थैली हातात येताच त्याला हुरूप आला आणि चपळतेने तो गाडीत बसला.

गाडी हाकता हाकता त्यानं पाहिलं तर पानवाला आणि दोघंतिघं त्याला हसत होते. पानवाला काथ्यात रंगलेली दांडी हालवून त्याला ओंगळवाणे इशारे करत होता.

मनातल्या मनात त्यांना शिव्या मोजत त्याने रेड्याच्या पाठीवर दांडा मारला.

मोहोल्ल्याच्या बाहेर आल्यावर त्याला निश्चित वाटलं. ऊन्ह कडक व्हायला लागलं होतं आणि इतक्या श्रमानंतर त्याला घाम आला होता. लोकांची ये-जा वाढली होती. दुकानं उघडली होती.

मागं वळून त्यानं मुडद्याची हालहवाल पाहिली. सगळं ठीक होतं. फक्त डोक्याकडची ती उशी नीट केली.

ते नीटनेटकं करताना प्रेत थोडंसं हललं तेव्हा तो एकदम थरारला. इमरतीबाईचं जिवंत शरीर स्पर्शण्याच्या विचारानं त्याच्या अंगावर काटा आला आणि नाडीचे ठोके जलद पडायला लागले. पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसत त्याने मनाशी विचार केला, जरा चांगल्यापैकी साडी अंगावर असती तर बरं झालं असतं. तिला वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसून दरवाजात उभी असलेली त्याने कित्येक वेळा पाहिली होती. राणीसारखी शोभायची. कोणाची तरी वाट पाहात असल्यासारखी वाटायची. त्या गल्लीत पायी जाताना त्याचे हृदय जोरात धडधडायचे आणि तिच्या दरवाजावरून जाताना आणखी जोरात धडधडायचे. रानात असूनही तो कधी तिच्या नजरेला नजर भिडवू शकला नाही. लाजेनं मान खाली घालून पुढं सटकायचा. खूप लांब गेल्यावर मग वळून पाहायचा तेव्हाही ती तिथंच तशीच उभी असायची. राणी रूपमतीच! त्याचं तिकडनं जाणं आणि तिचं तसं उभं राहाणं यात त्यानं एक नातं निर्माण झालं होतं. 'एक ना एक दिवस मी तिच्याकडं जाईनच.'

जवळच ठेवलेली थैली त्याने चाचपली आणि मोठ्या प्रेमाने तीवर हात फिरवला. मग मूठभर नाणी काढून त्यानं इकडं तिकडं पाहिलं आणि हात वर करून त्यानं ती उधळून दिली. क्षणभर रस्त्यावर त्यांचा छनछनाट पसरला आणि लोक चमकले. लहान लहान मुलं आणि भिकारी यांचं टोळकं त्या दिशेनं आलं. त्यानं गाडी थांबवली आणि

वेचणाऱ्यांकडं तो बघत राहिला. सडकेवरचं प्रत्येक नाणं जेव्हा वेचलं गेलं तेव्हा त्याने आणखी मूठभर नाणी उधळली. भरून आलेल्या गळ्यानं ओरडला,

"रामनाम सत्त है..."

"सब की यही गत्त है," पैशांवर तुटून पडलेल्या त्या सगळ्यांनी यंत्रवत आवाज दिला.

आनंदात त्याने गाडी हाकलली. रेड्याच्या पाठीवर दणादण दहावीस दांडे मारले तशी गाडी जोरात धावू लागली आणि तिच्या पाठोपाठ गर्दी.

पुढच्याच वळणावर त्याने गाडी थांबवली आणि पुन्हा एकदा नारा दिला, "राम नाम सत्त है..."

"सब की यही गत्त है..."

हा वेळपर्यंत गाडीच्या मागेपुढे हीऽ थोरली गर्दी जमली होती. काही लोक गाडीला धरून चालत होते आणि गाडीला आपोआपच तिरडीचं स्वरूप आलं होतं.

त्याच्या जवळून चालणारा एक भिकारी त्या रामनामाच्या गदारोळात त्याला म्हणाला,

"शेठजी, बँड लावा, खरंच."

आतल्या आत बंसीला व्याकूळ वाटत होतं. त्याने डोळे मिटून घेतले होते. आपली सूचना पुढं दामटत भिकारी म्हणाला,

"मी घेऊन येऊ का बँड?"

"आण," असं म्हणून त्यानं आणखी एक मूठभर नाणी उधळली. पाण्यानं मडकं झुकावं तशी गर्दी लगेच त्या बाजूला झुकली.

एवढ्यात आणखी एक भिकारी पुष्कळशी फुलं न् माळा घेऊन आला होता. तो खाली उतरला. गाडी थांबवून ही सगळी फुलं न् माळा त्याने प्रेताला घातल्या.

"कोण? कोण रे?" फूटपाथवर उभं राहून कुणीतरी विचारत होतं.

"इमरतीबाई," माळ शवावर फेकता फेकता त्याने उत्तर केले.

"कोण बुवा ही इमरतीबाई?"

"रंडी होती," रागाने बघत तो म्हणाला.

"प्रसिद्ध रंडी."

एवढ्यात बँड ताशा आला होता.

"वाजवायला सांगू शेठ?"

"हं" असं म्हणून उडी मारून तो गाडीवर बसला. बँड वाजू लागला. त्यामुळे आकर्षित होऊन आणखी गर्दी वाढली. त्याने थैलीतून नाणी काढली व त्याने त्यांचा शिडकाव सुरू केला.

"राम नाम सत्त है..."

"सब की यही गत्त है..."

एवढी थोरली गर्दी पाहून तो मनातल्या मनात विचार करत होता की हिला कसं संभाळावं? त्याला खूप हर्ष झाला होता. त्याला एक विलक्षण इच्छा झाली की प्रेतयात्रेची दिशा बदलून इमरतीबाईच्या बिऱ्हाडाकडे न्यावी. पण त्याने गाडीची गती मात्र वाढवली. सगळं क्रियाकर्म करायला वेळ लागलाच असता. ऊन्ह प्रखर होत होतं. लवकरच सगळं संपणार या विचाराने तो थोडा विव्हळही झाला. असंच चालू राहावं.

त्याने मान वर करून पाहिलं. तरण्या म्हाताऱ्या गच्च्यांवर आल्या होत्या आणि गर्दी किंवा बँडपेक्षाही त्याला निरखत होत्या. सरळ नजरेनं त्यांच्याकडे बघत त्या काय बोलताहेत ते ऐकायचा तो प्रयत्न करू लागला.

बँडच्या कल्लोळात त्याला फक्त एवढंच ऐकता आलं, "अरे काही नाही, बंसी मेहतर आहे."

मेहतर शब्द ऐकताच त्याचं तोंड कडू झालं. त्याने रागारागाने, दारांत-खिडक्यांत जमलेल्या बायकांमुलांकडे बघितलं.

त्याला स्वतःला भंगी म्हटलेलं आवडत नसे. तो स्वतः इतर कुणाहीपेक्षा स्वच्छ राहात असे आणि आपल्या जमातीतल्या तरुण पोरांना सांगत असे की कुणी तुम्हांला भंगी म्हटलं तर मैला साफ करण्याचं सोडून द्या.

आपल्याला भंगी-मेहतर म्हटलेलं ऐकून तर त्याला तिडीक आली. जवळून चालणाऱ्या मिकाऱ्याला वस्सकन ओरडून तो म्हणाला, "बँड जरा जोरात वाजवायला सांग."

थैली चाचपताना त्याच्या लक्षात आलं की पैसे फार थोडे उरले आहेत आणि जपून खर्च केले पाहिजेत. पैसे फेकण्याऐवजी तो गाडीच्या आपल्या जागेवर उभा राहिला आणि म्हणू लागला, "राम नाम सत्त है..."

गावाबाहेर नदी होती. नदीपलिकडे मुरदाघाट. आता पूल दिसायला लागला होता.

त्याने थोडे पैसे हातात घेऊन खूप लांबवर भिरकावून दिले. त्यापाठीमागे विखुरणारी गर्दी तो मोठ्या समाधानाने न्याहाळत राहिला.

गाडी पुलापाशी येताक्षणी त्याने थांबवली. मिकाऱ्यापाशी थैली देत म्हणाला,

"घेऊन जा."

बँड गर्दी परतू लागली. तीनचार लोक आसपास उभे होते. त्यांतला एक म्हणत होता, "मी सांगतो हललं आहे."

"काय, काय हललं?" त्याने विचारले.

"तुझं प्रेत."

बाप रे! खरंच हललं की काय? प्रेत जिवंत झाल्याच्या कैक गोष्टी त्यानं ऐकल्या होत्या. कधी कधी चितेवरही मेलेली माणसं उठून बसतात म्हणे. त्यांचे प्राण परत येतात म्हणे. कसे ते आता कुणास ठाऊक. म्हणून डॉक्टरही म्हणतात जाळापुरायच्या आधी एकदा नीट तपासून मगच विल्हेवाट लावावी.

तो तिच्यावर वाकला. प्रेत हललं होतं यात शंकाच नव्हती. आनंद आणि अविश्वास यांनी त्याचा हात थरथर कापत होता. त्याने चादरीच्या आतल्या प्रेताचा हात काढून नाडीवर बोटं ठेवली. काहीतरी धाडधाड उडत होतं खरं. पण शरीर काल्यासारखं गार पडलं होतं. आणि नाकाजवळ हात नेऊन पाहिलं तर श्वास नव्हता. मग धडधडत काय होतं?

स्वतःच्या छातीवर हात ठेवून पाहतो तर हार्ट अॅटॅक यावा तसं त्याचं हृदय धडधडत होतं. त्याने फिरून गाडी चालू केली. पूल पार करू लागला. दोन्ही बाजूला पाणी पसरलं होतं. आणि किनाऱ्यावरचे वाळूचे छोटे मोठे ढीग उन्हात चमचमत होते.

गर्दी माघारी गेल्यावर तो अगदी एकटा होता. आसपास शुक होतं आणि फक्त त्याच्या गाडीचा आवाज येत होता.

पूल ओलांडून तो उतारावरून खाली आला आणि स्मशानशांतता त्याच्या कानात वाजू लागली.

किनाऱ्यावरच एक प्रेत जळत होतं. त्याची दुर्गंधी त्याच्या नाकात घुसली.

गाडी अगदी मुडदेघाटाच्या चौकीदाराच्या घराजवळ नेऊन त्याने थांबवली.

आपलं रजिस्टर उघडत त्याने चौकशी केली, "कोण आलं आहे? जाळायचं?"

"पुरायचं."

"नाव?"

"इमरतीबाई."

"वय?"

"बत्तीस," न अडखळता त्यानं सांगितलं.

"नवऱ्याचं नाव?" नजर वर उचलून चौकीदारानं विचारलं.

तो घुटमळला. कोणी ऐकत तर नाही, याची खात्री करून घेण्यासाठीच की काय इकडं तिकडं पाहिलं. मग म्हणाला,

"बंसीलाल वाल्मिकी," आणि हात पुढं करून त्याने सही केली.

बाहेर येऊन संभाळून त्याने प्रेत खाली उतरलं. वस्त्राने संपूर्ण झाकलं आणि फावडं घेऊन खड्डा खणायला लागला.

कुंपणाची ही बाजू आणि ती बाजू

ज्ञानरंजन

आमच्या शेजारी आता मुखर्जी राहात नाहीत. त्यांची बदली झाली आहे. नवीन शेजारी आणि आम्ही, आमचा काही संबंधच नाही. म्हणजे तेच उत्सुक नाहीत. ते आल्या दिवसापासून त्यांच्याबद्दल समजून घेण्यासाठी आमच्याइथं उत्कंठा आहे. मला असं तटस्थ परकेपणानं राहाताच येत नाही. प्रवासातही मी सहप्रवाशाशी ओळख करून घेतल्यावाचून राहात नाही. कदाचित हा आपला माझा स्वभावच असेल. आमच्या घरातलं प्रत्येकजण शेजाऱ्याबद्दलच्या उत्सुकतेनं खदखदत आहे. गृहस्थ लोक आहोत ना! मुलंबाळं-लेकीसुनांनी भरलेलं घर. शेजार कसा आहे, काय आहे, सगळं माहीत असलेलं बरं. म्हणून चौकश्या करायला आम्ही नेहमीच तयार असतो. न्याहाळत असतो. शेजारी चाललेल्या हालचालींवरून अनुमान बांधू पाहतो; मी माझ्या शेजाऱ्याला सहकुटुंब सहपरिवार घरी बोलवायचं म्हणतो. म्हणजे साहजिकच त्यांच्या इथं आम्हां सगळ्यांना जाता येईलच. पण त्यांना माझी ही भावना समजत नाही की काय कोण जाणे! वाटतं की ते काही कोणी सामान्य लोक नाहीत. बहुतेक वेळा ते लोक व्हरांड्याबाहेरच्या अंगणात खुर्च्या टाकून बसलेले असतात. त्या खुर्च्याही तिथंच पडलेल्या असतात. रात्रंदिवस. भलतेच बेपर्वा लोक बुवा! पण तरी त्यांच्या खुर्च्या चोरीला जात नाहीत.

आमच्या बिल्डिंगच्या एका बाजूला सरकारी ऑफिसं आहेत आणि उंचच उंच विटांची भिंत आहे. पाठीमागे दोनमजली फ्लॅट्सची मागची बाजू आणि समोर मुख्य सडक. तेव्हा आम्हांला दुसरा शेजार नाहीच म्हणा ना! मोठ्या शहरांतून शेजाऱ्यांशी काहीही संबंध न ठेवता आपल्याआपल्यातच राहण्याची एक चमत्कारिक प्रवृत्ती दिसून येते. मला वाटतं आमचे शेजारी त्याच तऱ्हेचे असावेत. आमचं हे शहर आणि विशेषत: ही आळी अगदी शांत आहे. लोकांना कोणत्याही तऱ्हेची घाई नसते आणि चांभारचौकश्या करायची एकंदर हौसच. त्याचं काही वाटतही नाही. अशा साळढाळ कारभारात आमच्या शेजाऱ्याचं हे निर्लिप्त वागणं कसंसं वाटतं.

मी बाहेर येतो. ते लोक सकाळचा चहा बाहेर खुर्चीवर बसून घेत असतात. नवराबायकोशिवाय एक मुलगीही आहे. ती बहुधा त्यांची मुलगी असावी. नेहमी हीं तिघंच दृष्टीस पडतात. चौथं कुणी नाही. तशी काही मुलगी सुरेख नाही, पण

स्मार्ट आहे. थोडासा मेकप केला तर सुंदर दिसेल. जेव्हा जेव्हा मी पाहतो तेव्हा तेव्हा मोठमोठ्यानं हसत असते. तिचे आईवडीलही हसत असतात. नेहमीच खूष असलेले लोक दिसतात. आश्चर्य आहे. सारखं हसत राहण्याइतके सुखी आहेत हे ! जीवनाची यथार्थ आणि कठोर बाजू यांच्या खिसगणतीतच नाही की काय ! मी नकळत आमचं घर आणि शेजारी यांची तुलना करू लागतो.

आत्ताच त्यांच्या मोठमोठ्यानं हसण्याच्या आवाजानं दचकून भानावर आलो. माझं सगळं लक्ष गुलाबांच्या वाफ्यांकडं होतं. हातातलं माझं खुरपं तिथंच थांबलं. त्यांचं हसणं तसंच चालू होतं. मी पाहिलं. मुलगी खुर्चीवरून उठून उभी राहिली होती. हातातला कप हिंदकळेल म्हणून आईच्या हातात दिला होता. पोट धरून खाली वाकून ती हसते आहे. काहीतरी विनोद असेल. मुलीला हसता हसता आपला दुपट्टा घसरल्याचंही भान नाही. हसण्यानं तिची कोवळी छातीची उभारी वरखाली होते आहे. फार झालं. खरं म्हणजे तिच्या आईनंच तिला या असल्या अमर्याद हसण्याकरता रागावलं पाहिजे. तिला काहीच कसं वाटत नाही कोण जाणे ! माझ्याशिवाय बहुधा कुणाचंच लक्ष नसावं.

दरदिवशी माझा नाइलाज होतो आहे. या नव्या शेजाऱ्याबद्दल एक चमत्कारिक ओढ माझ्या मनात उत्पन्न होते आहे. मीच कशाला, पप्पी देखील बघावं तेव्हा शेजारी मुलीच्या कुर्त्याच्या कपड्याची तारीफ करत असते. स्वयंपाकघरातून जेव्हा-तेव्हा वहिनीही एकदा तिकडे 'नजर टाकते'. आणि आमची आजी तर काय ! शेजाऱ्यांकडे केव्हा शिंगाडे घेतले आणि कधी दुध्याभोपळा घेतला आणि कधी चूल पेटली इथपर्यंत तिला ठाऊक असतं. इतकं असूनही ते लोक तिळमात्र आमच्याबद्दल उत्सुकता दाखवत नाहीत.

ती मुलगी आणि तिचे आईबाप आमच्याकडे ढुंकूनही बघत नाहीत. या दुर्लक्षा-साठी त्यांना फार प्रयास पडत होते असंही नाही. बोलीभाषण तर अशक्यच आहे. आपल्या आसपास कोणी माणसं राहतात याची त्यांना कल्पनाही नसावी बहुधा. कदाचित् त्यांना आम्ही त्यांच्यापेक्षा कमी प्रतीचे वाटत असू. कदाचित् आमच्याशी जवळीक केली तर आपल्या घरातलं वातावरण बिघडेल असं वाटत असेल. कदाचित्... यावलं खरं काय ते देव जाणे ! पण घरात एवढी तरुण मुलगी असून आणि शेजारी तिच्याचएवढा तरुण मुलगा असलेला बघून तिच्या आईबापांच्या डोळ्यांत काही मला 'ते' भय दिसलं नाही—जे माझे मित्र घरी आले की माझ्या आईवडिलांना पोरीबद्दल वाटे.

त्यांच्या घरी कधीही रेडियोचा आवाज ऐकू येत नाही. आमच्या घरी मोठमोठ्याने रेडियो वाजत असतो. त्यांच्या घरासमोर नुसती जमीन आहे. एकही झुडूप नाही.

आमच्या घरासमोर लॉन आहे. एका बाजूला भाजीचा मळा आहे आणि गुलाब-मोगऱ्यांचे वाफे. खरंच, ती मुलगी माझ्या बहिणीशी आणि वहिनीशी गट्टी का नाही करत? तिचे आईवडील माझ्या आईवडिलांशी मिळूनमिसळून का नाही राहात? आमच्या इथल्या कपबशा त्यांच्याहूनही सुंदर आहेत. खरं म्हणजे त्यांनी आमच्याशी येणंजाणं ठेवलं पाहिजे. कुंपणाच्या आमच्या बाजूला चिंचेचं भलं मोठं झाड आहे. भलेमोठे चिंचेचे आकडे त्यावर लटकताहेत. मुलींना चिंच म्हटली म्हणजे त्या बेहोष होतात. पण ही शेजारीण मुलगी मोठी चमत्कारिक आहे. एवढ्या लगडलेल्या चिंचा बघूनही तिला काहीच वाटत नाही. तिनं जर चिंचा पाडल्या असत्या तर...तर मला तरी आनंद झाला असता!

मी वाट बघतो...

आमच्या शेजाऱ्यांना अशी कोणतीही अडचण पडत नाही की ज्यासाठी आमची मदत घ्यावी. आमच्या आणि आमच्यासारख्यांच्या घरात ज्या छोटयामोठया अडचणी येतात त्या बहुधा यांना नसाव्यात. आश्चर्यच आहे. तिघांपैकी एकहीजण कधी काळजीत असल्याचं दिसलं नाही. मुलीच्या वडिलांच्या कपाळावर क्वचित् एखादी आठी पडली तर पडली. आई कदाचित् धुसफुसत असेलही पण इथून तरी कधी काही दिसलं नाही. एखादेवेळी मुलीला स्वतःला मनातल्या मनात काही काळजी-कथा असतील किंवा नसतील. कसं कळणार?

रात्री बराच वेळ त्यांच्या मधल्या खोलीची बत्ती जळत असते. मुखर्जींच्या घरातली सगळीजणं तिथंच झोपतात. असं वाटतं तिथंही ती तिघं एकत्र गप्पा मारत बसत असतील. कधीही न संपणाऱ्या त्यांच्याकडं कहाण्या आहेत की काय कोण जाणे! आपोआपच मी एक निःश्वास सोडतो. आमच्या घरी हवामान, डास, झुरळं, मुलांचे जन्म, नातेवाईक, लग्नं, सुनांची वागणी, महागाई आणि वर्तमान परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या भव्य-दिव्य पुरुषांचा काथ्याकूट चाललेला असतो.

त्यांच्या-आमच्यांत एक नाममात्र कुंपण आहे. एक फूट उंच मातीचा बांध, त्यावर थोडी जंगली झुडुपं आणि निवडुंगं. इथल्या झुडुपांना हरहमेश वाळवी लागलेली असते. त्यांची पानं मात्र गर्द हिरव्या रंगाची असतात. मध्ये मध्ये काही ठिकाणी बांध ढासळला आहे. तिथून येण्याजाण्याचे रस्ते बनले आहेत. भाजीवाला, झाडूवली, पेपरवाला ही मंडळी इथूनच ये-जा करतात. पोस्टमन आणि दूधवाला यांचा तर हा राजमार्ग आहे. कुत्र्यामांजरांची ये-जा, गाई-म्हशी यांचं चरणं हे सगळं सहन करून कुंपण तसंच उभं आहे. काही दिवसांपूर्वी मुखर्जींची शैला माझ्याकडं पुस्तक मागण्यासाठी याच रस्त्याने ये-जा करायची. इतकं सोईवार कुंपण आहे हे की

सायकलवरून न उतरता आम्ही इकडून तिकडे जात होतो. सुरुवातीला जात होतो. आता आमच्या शेजाऱ्यानं आपल्या वागणुकीनं कुंपणाला न ओलांडण्याजोगं भक्कम बनवून टाकलं आहे.

त्यांना आल्याला तीन महिने झाले...

अभ्यासासाठी आणि लिहिण्यावाचण्यासाठी मी माझं डेस्क नेहमी बाहेर घेतो. बाहेर वारं फार छान आहे. जसं उन्हाळ्यात थंड बर्फाचं पाणी वाटतं तसं. पण बाहेर अभ्यासात मन लागत नाही. डोळे कुंपणापलीकडे जातात. मन शेजाऱ्यांच्या इथं घुटमळायला लागतं. तरुण आणि अविवाहित मुलगी. आनंदी आणि निष्काळजी आईवडील. मी त्यांच्या घरीं जन्मलो असतो तर काय छान झालं असतं! माझी मनोराज्यं चालू होतात.

कधी कधी ही शेजारीण मुलगी एकटीच बसलेली असते. कधी काही काम करत तर कधी रिकामी. फिरत फिरत त्यांच्या तिथल्या भिंतीपाशी जायची. कोपरं टेकून बघत न्याहाळायची. परत यायची. आमच्या या आळीत इतर ठिकाणचे मवाली मुलगेही खूप येतात. तसे आमच्या आळीत काही कमी नाहीत. पण निदान तिला ते कळल्याचं समजत नाही. तिचे छोटे आणि सुबक भाहेत. आमच्याकडे काय, वहिनी तर पूजेची फुलं आणायची असली तरी पप्पीला सोबत घेतल्यावाचून जात नाहीत. त्यांना घरीही भीती वाटते आणि बाहेरही. त्यांना तशी वागण्याची ओळच आहे. पप्पीवरही सक्त नजर असते. एकदा शेजारी आपल्या बायकोच्या खांद्यावर हात ठेवून गप्पा करू लागला तेव्हा काहीतरी सबब काढून पप्पीला आत जायला लावलं. त्या एका दृश्यानं आमच्या घरात खळबळ माजली. किती निर्लज्ज लोक आहेत हे! हळूहळू आमच्या घरचे लोक शेजाऱ्यांना भयंकर स्वरूपाची माणसं मानू लागले.

दिवस जातच असतात. आमच्या इथे आता घोळून घोळून चवीने शेजाऱ्यांची निंदा करणं चालू झालं. जगातल्या सगळ्या दुर्गुणांची खाण म्हणजे आमचा शेजारी असं ठरून गेलं. आमच्या इथल्या प्रत्येक जणाची नजर हजार वेळा कुंपणापलिकडे भिरभिरून येत असते. रोजच्या दिनचर्येतला तो एक अत्यावश्यक भाग होऊन गेलेला आहे. एरव्हीच्या चिंता-काळज्या खरं म्हणजे काही कमी नाहीत. पण त्यात ही एक आणखी भर पडली आहे. पण आमच्या चिंतेचं आमच्या शेजाऱ्याला काहीच सोयर-सुतक नव्हतंसं दिसलं. तिकडचा एकही कृपाकटाक्ष इकडं येत नव्हता.

जवळ कुठंतरी सिग्नल न मिळाल्यामुळं उभं असलेलं एंजिन कर्कश शिट्या मारत आहे. त्याचा आवाज आम्हांला नवा आहे. आता काही वेळ आम्ही सगळे त्या एंजिनबद्दल आणि आवाजाबद्दल चर्चा करू.

आज दुपारपासून आमचे शेजारी घरात नाही आहेत. त्यांच्याकडे एकदोन पाहुणे आले आहेत. तशी काही घाईगर्दी दिसत नाही. नेहमीचीच निश्चिती. मी उठून आत गेलो. वहिनी केस वाळवताहेत. उगीचच त्यांनी शेजारच्या मुलीवरून माझी मस्करी केली. मनातल्या मनात हसत मी बाहेर गेलो. त्याच वेळी ती मुलगी आईबरोबर बरंचसं सामान घेऊन आली होती. वडील बहुधा मागं राहिले असावेत.

संध्याकाळी आणि दुसऱ्या दिवशी सकाळीही बरेच लोक त्यांच्याकडे जात-येत होते. त्यांच्या घरात काही सणवार असावंसं वाटत होतं. पण आमच्याकडे दूधवाल्यानं जेव्हा सांगितलं की काल संध्याकाळी त्यांच्या मुलीचं लग्न झालं तेव्हा मला मोठा बॉम्बगोळाच पडला. कोणी तरी आर्मी ऑफिसर आहे. आर्यसमाजामध्ये लग्न झालं. वहिनीने खोट्या दुःखी मुद्रेनं माझ्याकडं बघितलं. मला हसू आलं. खूप जोरानं. आम्ही किती पोकळ लोक आहोत अशा विचारानं.

मधून मधून त्यांच्या घरी लोक येतच असतात. ते थोडा वेळ आत जातात, मग बाहेर येतात. बरेच जण गंभीर आणि पोक्त लोक आहेत. क्वचित काही मुलं गडबड करीत किंचाळत इकडं तिकडं धावतात. बाकी म्हणावी तशी गडबड-धांदल दिसत नाही. सगळं काही सुरळित झाल्यासारखं. कसं आणि काय होतं ते मात्र कळत नाही हे खरं. आमच्याकडे हा दिवस अत्यंत अस्वस्थसा गेला. बऱ्याच वेळाने ती मुलगी बाहेर आली. बहुधा साडी नेसायची पहिलीच वेळ असावी तिची. हातात नारळ घेऊन साडी आवरत संभाळत ती व्हरांड्यात आली. ती छान दिसते आहे पण तिचे सुबक अवयव साडीत अदृश्य झाले आहेत. पुढचं दृश्य डोळ्यात साठवत ती चालली आहे. ती पतीला खेटून चालली आहे. नववधूची अतिलज्जा किंवा घूँघट यांचं कुठं नाव नव्हतं. तिचा नवरा माझ्या एका दोस्तासारखा दिसत होता. रडण्याविडण्याचा आवाज नाही, काही नाही. तिच्या आईनं लेकीच्या दोन्ही गालांची खूप चुंबनं घेतली. आणि पिता वात्सल्यानं तिच्या डोक्यावरून हात फिरवतो आहे. आता मात्र मुलीच्या डोळ्यांतलं पाण्यानं चिंब झालेलं भविष्याचं सुखद स्वप्न मला इथूनही दिसू शकतं.

कुंपणाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत खारी धावतायत. आमच्या आईला मुलगी रडली नाही म्हणून आश्चर्य वाटतं आहे. आणि ती ते मला बोलून दाखवते आहे. तिच्या मते शिकलेल्या-सवरलेल्या मुलींना आईबापांबद्दल खरं प्रेमच नसतं. आजकाल सगळेच असे असतात म्हणा! ज्यांनी पोटाला चिमटा घेऊन वाढवलं, मोठं केलं... त्यांच्या डोळ्याला दोन थेंब पाणी सुद्धा येऊ नये म्हणजे काय!

मला यात काहीच रुची नाही. मी बघतो आहे की आईला उन्हात उभं राहायला बरं वाटतं आहे, कारण जिकडं उन्ह सरकतं आहे तिथं आई जाते आहे. एवढ्यात

आमचे वडील म्हणतात की पूर्वीच्या नवऱ्या गावाच्या हद्दीपर्यंत रडत जात असत. ज्यांना रडू येत नसेल त्यांना मार देऊन रडवत असत. कारण न रडता माहेर सोडणाऱ्या मुलीचं सासरचं आयुष्य सुखी होत नाही. वडिलांना पूर्वीचं काही राहिलं नाही. म्हणून फार दुःख होतं. आता माणसाचं मन म्हणजे यंत्र झालं आहे. असलं काही बोलताना आमच्या वडिलांचा आवाज चढत जातो आणि कलियुगाचं भयानक रूप त्यांच्या डोळ्यांत प्रतिबिंबित होत असतं.

आमच्या घरावरच्या आकाशावर ढगांचे छोटे छोटे पुंजके तरळताहेत. मुलीला पोचवण्यासाठी तिचे आईवडील आणि नातेवाईक फाटकापाशी उभे आहेत. मुलाकडचे 'हेरॉल्ड' घेऊन आले आहेत. ती हेरॉल्ड म्हणजे रंगीत खोलीच वाटते आहे. ती खोली हळूहळू हलू लागली; नाहीशी झाली.

सगळ्यांत अधिक आश्चर्य आजीला वाटतं आहे. ती आपली बडबडते आहे. तिला हे लग्न कळलंच नाही. असलं काय ते ? विजेची रोषणाई नाही, ताशे-वाजंत्री नाहीत, जेवणावळ नाही. भलतेच बाई कंजूष लोक ! आणि अशा वेळीही शेजाऱ्यांना आमंत्रण नाही का ? राम राम !

ते लोक मुलीची पाठवणी करून परतले आहेत. आपल्याकरता खुर्च्या ओढून बसले आहेत. मुलगी गेल्यामुळे तिची आई थोडी चूपचाप आणि उदास वाटते आहे. तिला उल्हास वाटावा म्हणून काही लोक चेष्टामस्करी करायचा प्रयत्न करताहेत. माझा मित्र राघू पैज मारून सांगतो आहे : मुलगी साधीसुधी नाही, बारा गावचं पाणी प्याली असली पाहिजे. काहीतरी खूप जिव्हाळ्याचं नाहीसं व्हावं तसा उदासपणा मला आलेला आहे. मोठा चमत्कारिक अनुभव ! मागे मागे राहण्याचं रिकामेपण, की राघूच्या बेजबाबदार अर्वाच्य बडबडण्यानं आलेलं रिकामं उदासपण—काही सांगता येत नाही. तिची चालचलणूक चांगली नसल्याचं बोलणं एक प्रकारचं हीन समाधान देऊन जातं खरं कदाचित् मीही घरातल्यांप्रमाणेच शेजाऱ्याचा मत्सर करीत असेन. कोण जाणे !

संध्याकाळ गहिरी होत जाते. रात्र आलीच. कुंपणापलिकडेच टेबलाच्या आसपास बसलेले लोक इकडे तिकडे पांगले. नेहमीप्रमाणे शेजाऱ्याच्या मधल्या खोलीतला दिवा प्रकाशला. दरवाजानं जमिनीवर पडलेल्या कंगोऱ्यांवर मळक्या डागांसारखा उजेड सांडला. त्यांची रात्र नेहमीप्रमाणे शांत आहे. एका व्यक्तीचं नसणं त्यांना कसं वाटतं आहे कोण जाणे ! आमच्या घरात त्यांची निंदा जोरात चालू आहे.

सुख

काशीनाथ सिंह

भोलाबाबू कामावरून आल्याला एक आठवडा झाला असेल. तेवढ्यात एक महत्त्वपूर्ण घटना घडून आली.

ते आपल्या खोलीत जरा आडवे होऊन वर्तमानपत्र वाचत होते. संध्याकाळच्या सूर्याची एक किरणरेखा खिडकीतून आली आणि त्यांच्या टकलावर विसावली. लहान बाळाचा मऊ, गरम, गुबगुबीत पंजा असावा तसा भास भोलाबाबूंना झाला. ते आडव्याचे उठून बसले. बघितलं, तर सूर्य डोंगराच्या आड नाहीसा झाला होता आणि तो रेंगाळणारा किरण मात्र त्यांच्या टकलावर जस्सा न् तस्सा होता.

ते उठले. समोरच्या भिंतीवर त्यांनी हात ठेवला. काही वेळापूर्वी सांध्य लालिमा इथंही होता. हाताला गरम वाटलं. तोच हात त्यांनी गालावर फिरवला.

त्यांना वाईट वाटलं. ते तडकाफडकी बाहेर निघाले.

बाहेरचं हिरवंगार गवत लालबुंद आहे, अंगणाच्या भिंती लाल आहेत.... घाई-घाईने ते अंगणाच्या सीमेपर्यंत गेले. मग थांबले. मावळणारा सूर्य इथून दिसत होता. डोंगरशिखरांच्या वर, दगांच्या जवळपास. ताड आणि बाभळींच्यामध्ये. त्यांनी स्वतःकडं नजर वळवली. त्यांचा सफेत सदरा गुलाबी झाला होता. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित पसरलं. खरंच, या जगात काय काय सुरेख गोष्टी आहेत!

अंगणाबाहेर दूरवर त्यांनी नजर फेकली. तिथं हरिजनवस्तीच्या झोपड्या होत्या. संध्या-छायेत त्या लांबलांब झाल्यासारख्या भासत होत्या.

देवळाजवळ एक गाय शेपूट हलवत उभी होती. तिच्याकडे भोलाबाबूंनी निरखून बघितलं. तिचा रंग शुभ्रच राहिला होता की तीही गुलाबी झाली होती? काही नक्की कळलं नाही. वा, वा! काय गंमत आहे! पुन्हा एकदा ते गालातल्या गालात हसले.

एकाएकी भोलाबाबूंचं लक्ष सूर्याकडं गेलं. तो लालभडक गोळा कधी लहान होत होता तर कधी मोठा होत होता. थरकापत होता.

"बिट्टीची आई," त्यांनी जोरात हाक मारली.

आतून कुणी आलं नाही आणि ओढी आली नाही. पुन्हा एकदा त्यांनी बिट्टीच्या आईच्या नावाने शंख केला.

"काय झालं?" पदराला हात पुसत ती आली.

"इकडं ये अगोदर."

बिचारी लवकर लवकर जाऊन नवऱ्याशेजारी उभी राहिली.

सूर्याकडून नजर न चळवता ते म्हणाले, "समोर बघ."

ती रस्त्यावर निरखू लागली.

"अग, रस्त्यावर नाही, तिकडं ताडाच्या झाडांपलिकडं..."

बिचारी घाबरली आणि दाखवल्या दिशेनं पाहू लागली. मग उत्साहित मुद्रेनं तिनं भोलाबाबूंकडं पाहिलं.

"किती सुंदर!" भावनेनं भोलाबाबूंचा आवाज भिजून गेला होता.

"तर! अतिशय सुंदर!" बिट्टीच्या आईनं आपला सूर मिसळला.

उजव्या बाजूला वळत भोलाबाबूंनी पृच्छा केली, "काय सुंदर? आं?"

"विटा लादून चाल्लेली खेचरांची रांग आणि त्यांमागून चालणारी माणसं."

भोलाबाबू जोरात हसले. "बायकांचीच जात! खेचरं आणि गाढवं याशिवाय काय दिसणार तुम्हांला?"

"मग काय बघायला सांगताय?"

"काही नाही. जा. भाताचं पाणी वेळून टाक आणि कणीक मळ. जा."

"अं? असं काय? मलाही दाखवा ना ते काय ते?" तिनं जरा हट्ट केला.

'काय दाखवू कपाळ? इतका माझा आरडाओरडा काय खेचरांची रांग दाखवायसाठी होता?"

"मग सांगा ना काय आहे ते?"

"तिकडं ताडांच्या झाडांपलिकडं अंधुक डोंगर दिसतायत?"

"हो."

"लालभडक सूर्य आहे?"

"हो."

"त्याच्यावर अगदी हलकेसे ढग आहेत?"

"हो आहेत की."

"होय ना. मग ते नीट लक्ष देऊन बघ."

"हात्तिच्या, हेच का दाखवत होतात? तुम्ही आजच बघताय. माझा जन्म गेला हे बघता बघता."

"अस्सं? जन्मभर हे बघत आलीस?"

"तर काय?"

"फार छान केलंस. आता जा तू चूल फुंक जा."

काही न समजून ती तिथंच उभी राहिली.

भोलाबाबू किंचाळले, "जा म्हणतो ना!"

बिचारी घाबरून आत चालती झाली.

भोलाबाबू बघत होते. सूर्य, ढग, ढगांवर फैलावणारे रंग, रंगांची वेडीवाकडी रेषा, धूसर पहाड आणि त्यांच्या शिखरांवर अस्पष्ट होत जाणारा तो गोल चेंडू...जन्मभर ते तारहपिसात राहिले. त्यांच्या हाताखालून प्रत्येक गाव, आळी, पेठ गेली होती. एक नाही सुटलं. पण हा असा मावळणारा सूर्य अजूनपावेतो कुठं होता? ही झिमझिम संध्या इतके दिवस कुठं होती? आज दिसणारं हे सगळं कुठं होतं?

पाठीमागं मुलाचा स्वर ऐकून ते वळले. "नीलू!"

उड्या मारत नीलू आला.

"कुठं आहेत बाकीचे?"

"खेळतायत."

"कुठं?"

"ते काय, मागच्या मैदानात."

"जा, सगळ्यांना लौकर बोलावून आण."

तो पळत पळत गेला.

भोलाबाबू सूर्याला न्याहाळत होते. कधी या बाजूने, कधी त्या बाजूने, वाकून नाना प्रकारे. खूष होऊन लहान मुलासारख्या त्यांनी टाळ्या वाजवल्या. एका बाजूला मेघांची काळी किनार असलेली सूर्याची बाजू खाली जाते आहेसं त्यांना वाटलं. त्याची किरणंही मैदानात किंवा घरा-झोपड्यांवर न राहता वर आकाशाच्या बाजूलाच फैलावतायत. अनेक रंगांत विखरून.

"नीलू!" त्यांनी ओरडून हाक मारली.

कोणी आलं नाही.

"सगळेजण कुठं टळले कोण जाणे!"

"कोण रे तो जातो आहे?" भोलाबाबूंनी समोरून जाणाऱ्या अंधुक आकृतीला विचारलं.

तो होता एक उंट. त्यावर घाणेरडे फाटके कपडे घालून एक माणूस बसला होता. विडी ओढत.

"अरे ए, मी तुलाच हाक मारतोय."

त्याने मान वळवली.

"जरा समोर ताडांच्या झाडांमध्ये काय आहे ते तरी बघ," भोलाबाबूंनी सांगितले.

उंटवाला तिकडं बघत बघत पुढे गेला.

"साला!"—हे भोलाबाबूंशिवाय दुसरं कोण असणार?

सूर्य मावळला. भोलाबाबूही घरात आले. आरामखुर्चीवर गुपचूप बसून राहिले. त्यांचं मन उदास झालं.

चहा आला. समोरच्या टेबलावर ठेवल्याचा आवाज येताच त्यांनी डोळे उघडले. समोर बिट्टीची आई उभी होती.

"जरा धोती आणि छडी दे बघू!"

"का? बाहेर जाता आहात?"

ते काहीच बोलले नाहीत.

धोती आणि छडी आली. धोतर बदलून छडी घेऊन ते निघाले. आजची गोष्ट अशीतशी थोडीच होती की सोडून द्यावी? त्यांनी ठरवलं : सगळ्यांना सांगायचं. पण अगोदर माधवकडं जायचं. माधव गावचा मुख्य. त्याला सगळं समजतंही. मग त्याला घेऊन इतर ठिकाणी जायचं.

भोलाबाबू वळणापाशी आले तेवढ्यात समोर बियाण्याचं गुदाम असलेलं त्यांच्या लक्षात आलं. जिल्हेदारसाहेबही आले होते. इतर बरेचजण होते. ते आत गेले.

"या, या तारबाबू," सौजन्यपूर्वक कलेक्टरसाहेबांनी स्वागत केलं.

भोलाबाबूंनी एक खुर्ची ओढली आणि ते स्थानापन्न झाले. त्यांनी आसपास पाहिलं. त्यांच्या वृद्ध डोळ्यांना बरेच चेहरे नवे वाटले. ते आल्यामुळं थोडं विघ्न आल्यागत झालं होतं.

"हं, काय? काही त्रास वगैरे नाही ना?"

"त्रास कसला म्हणा! आपलं रोजचं आहेच चाललेलं!" भोलाबाबू म्हणाले.

मग इतर गोष्टी चालू झाल्या. जिल्हेदारसाहेब म्हणाले की यावेळी कालव्यात पुष्कळच पाणी आहे. मासळी खूप दिसते आहे.

"तुम्हांला मासळीचा शौक असेल तर एक काम प्रथम करा," एकाने सल्ला देत म्हटलं.

"काय?"

"अगदी तोंडाशीच रात्री जाळं लावून ठेवा."

"बरोबर. रात्रीच मासे चढतात."

भोलाबाबूंना आपला विषय काढायला ही योग्य संधी वाटली. ते म्हणाले, "संध्याकाळीच जाळं का नाही लावू?"

"हं तसंही चालेल," जिल्हेदार म्हणाले.

यामुळे उत्तेजन मिळून की काय भोलाबाबू पुढं म्हणाले, "आणि संध्याकाळी म्हणजे अगदी सूर्य मावळण्याच्या बेताला आला असताना..."

"हॅः! संध्याकाळ वगैरे कुछ नही. मासळी उतरण्याची वेळ म्हणजे मध्यरात्र आणि पहाट." पहिला म्हणाला.

"बरोबर. बहुतेक पहाटच."

भोलाबाबू पुन्हा एकदा खुर्चीत टेकून बसले. चांगली गोष्ट निघत होती! पण काय! नाहीतरी एवढ्या सगळ्या लोकांत साहेबांना ही गोष्ट कशी काय सांगायची? त्यासाठी ते एकटेच भेटायला हवेत. ते तसेच बसून राहिले. पण तसेच इतरहीजण बसून राहिले.

शेवटी त्यांच्याने राहावेना. त्यांनी हाक मारली, "साहेब!"

जिल्हेदारसाहेबांनी त्यांच्याकडे पाहिलं.

"तुमच्याशी थोडं बोलायचं होतं."

"माझ्याशी?" ते गंभीर झाले.

भोलाबाबू उठले. त्याबरोबर साहेबही उठून आले.

भोलाबाबू त्यांना माल-गुदामाच्या मधोमध एकांतात घेऊन गेले.

"साहेब, तुम्ही समजदार आहात. तुमच्यापासून काय चोरून ठेवायचं आहे?"

"अरे अरे, तारबाबू, काय झालं काय?"

भोलाबाबू क्षणभर थांबले. मग म्हणाले, "तुम्ही संध्याकाळी फिरायला जाता?"

"हो."

"रात्री घरी येता?"

"हो."

"मग आज आपण संध्याकाळी सूर्य पाहिलाच असेल."

"हो, पाहिला होता."

भोलाबाबू त्यांच्या तोंडाकडे थोडा वेळ बघत बसले. ते तसेच गप्प बसलेले पाहून मग भोलाबाबूच पुढे म्हणाले, "आजचा सूर्य इतका लालभडक...इतका अतीव सुंदर होता की काय सांगू? सगळी भूमी लालेलाल झाली होती. तुम्ही पाहिलंच ना हे?"

"हात्त्याच्या, हे रोजचंच आहे. मोसमच तसा आहे ना!" साहेब बेपर्वाईनं म्हणाले.

भोलाबाबूंना धक्का बसला. "छे छे, साहेब, रोज असं कसं होईल?"

"ते जाऊ दे," साहेब कंटाळून म्हणाले, "काय बोलणार होतात ते सांगा."

भोलाबाबू गप्प झाले. मान खाली घालून ते चालायला लागले. साहेब हैराण झाले. "काय झालं? सांगा ना?"

पण भोलाबाबू नुसतंच म्हणाले, "जाऊ दे, साहेब," आणि बाहेर पडले. बाजाराच्या रस्त्याने चालू लागले.

बाजार तसा आता मोकळा आहे. रस्त्यावर भरपूर उजेड आहे. लोकंही आहेत. ओळखीची, अनोळखी. पण भोलाबाबू नाकासमोर चालले आहेत. सगळ्यांना सांगावं सांगावं वाटणारं गुपित – संध्याकाळचा सूर्य – त्यांनी कुणालाही सांगितलं नाही. त्यांना फार वाईट वाटत होतं. अशासाठी की जिल्हेदारसाहेबांकडं ते उगीचच बोलले होते. त्यांना लोक मारे बुद्धिमान समजत होते. लोकच का, भोलाबाबूही समजत होते. पण आज ते ढोंग बाहेर पडलं होतं. आज जर भोलाबाबूंनी सूर्य पाहिला नसता तर गोष्ट वेगळी होती. पण तो त्यांनी पाहिला होता आणि त्याची त्यांना अपूर्वाई वाटली होती.

पण तरीही या बाबतीत भोलाबाबूंनी वेगळ्याच दिशेने विचार करायला सुरुवात केली. ही गोष्ट सगळ्यांनाच समजण्याजोगी नाही. यामुळे त्यांचं मन शांत होण्याऐवजी अधिकच दुखू लागलं.

पण मग हळू हळू त्यांचं त्यांनाच उमजू लागलं. जिल्हेदारसाहेब खूप शिकलेले आहेत खरं. पण शिक्षण आणि समंजसपणा दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. शिवाय अशा गोष्टींसाठी अनुभवाची जरूर आहे. आणि अनुभवासाठी तुमचं वयही मोठं लागतं अखेर.

भोलाबाबू माधवच्या गल्लीत वळत होते. एवढ्यात त्यांनी बघितलं की दुसऱ्या टोकाहून हातात बादली घेतलेला माधव चालला होता. गल्लीत थोडा काळोख होता. त्यांनी हाक मारली, "माधव."

तो म्हणाला, "बाबूजी, मी सोहन तो."

"अरे सोहन होय ? बरं, तरी हरकत नाही. इकडं ये बघू."

"मुख्त्यारसाहेब दुपारीच बाहेर गेलेत." सोहननं खुलासा केला.

"कुठं गेलेत ?"

"कोणत्याशा गावी काही कामकाज बघायला गेलेत."

"दुपारपासून गेलेत म्हणतोस ? मग त्यांनी मावळता सूर्य बवितला असणं कसं शक्य आहे ?" भोलाबाबूंच्या मनात आलं. मग त्यांनी सोहनच्या वय आणि अनुभवावरून बारीक नजर फिरविली.

"का रे सोहन, तूं संध्याकाळी काय करतोस ?"

"मी ? गुरं चरून येतात त्यांना बघतो. आंबोण करतो. गायी-गुरं दाव्यांना बांधतो, दूध काढतो आणि..."

"सूर्य बघतोस की नाही ?"

"सूर्य ?" आश्चर्यानं सोहननं विचारलं.

"तू आज सूर्य बघितला होतास ?"

"कोण, सूर्या तेली ?"

"नाही चांभार. महामूर्ख कुठचा !" भोलाबाबू भडकले.

सोहन हसू लागला. म्हणाला, "बाबूजी, मी आपला गावढळ माणूस. मला कसं कळणार तुम्ही कुणाबद्दल विचारता ते ?"

"गाढव ! मी आकाशातल्या सूर्याबद्दल बोलतोय."

"तोऽ ? बघितला होता."

"तुला काही खास दिसलं का ?"

"म्हणजे काय ?" करुण वाणीनं सोहननं विचारलं.

"म्हणजे — म्हणजे थोडासा गोल गोल, लालेलाल..." भोलाबाबूंनी मदतीच्या भावनेनं सांगितलं.

"मग ?"

"मग तुझं डोस्कं. आणखी म्हशी पाळ."

ते तिथून निघाले. त्यांची सगळी आशा नष्ट झाली. काय लोक तरी ! काय झालंय तरी काय आजकाल त्यांना ! साधी एवढीशी गोष्ट समजत नाही ?

त्यांनी फाटक उघडलं. घरात जाऊन त्यांनी छडी ठेवून दिली. आणि ते अंथरुणावर जाऊन पडले. सारखं त्यांच्या मनात येत होतं जग काय बदलून गेलंय. असं होऊन उपयोगी नाही. त्यांनी विचार केला : उद्या जेव्हा संध्याकाळ होईल तेव्हा सगळ्या लोकांना बोलवायचं. त्यांना तो अनुपम सूर्य दाखवायचा, आणि सांगायचं की, बेट्यांनो, जगात चूल, योजना, ऑफिस, उंट आणि दूध एवढंच फक्त नाही. सूर्यही आहे. पर्वतशिखरांच्या वर, ताडांच्या मधोमध असणारा. मग क्षणभरात तो डोंगराआड जातो. आणि मावळण्यापूर्वी एक छोटा मऊ गरम किरण तुमच्या टकलावर सोडतो.

ते झटक्यात उठून बसले. टकलावर हात फिरवून त्यांनी पाहिलं. किरण विसावलेली जागाही आता थंड झाली होती. त्यांना रास्त भय वाटायला लागलं. समजा, अगदी हे सर्व दाखवलं तरी किती लोकांना समजेल ?

कुणीतरी आल्याची चाहूल लागली. म्हणून भोलाबाबूंनी पाहिलं. टेबलावर जेवणाचं ताट मांडलं होतं. कॉटच्या कडेला ओठंगून बिट्टीची आई उभी होती. त्यांनी डोळे उघडताच तिने विचारलं,

"संध्याकाळी कुठं गेला होता ?"

"कुठं नाही," अन्यमनस्कपणे त्यांनी उत्तर दिलं.

"तुम्हांला बरं नाही का ?"

ते काहीच बोलले नाहीत. बायकोने पायांना हात लावून पाहिला, आणि म्हणाली,

"तापबीप नाही."

एवढ्यात बिट्टी, नीलू आणि मंडळी आली. त्यांची आई म्हणाली,

"चला जेवायला."

भोलाबाबू म्हणाले, "तुम्ही जेवून घ्या. आज मला जेवायचं नाही."

"का ?" बिट्टीची आई म्हणाली.

उदास झालेले भोलाबाबू काही बोलले नाहीत. मग कमालीच्या संयत स्वरात म्हणाले, "म्हणायला माझी अशी ही बायको आहे, मुलं आहेत, घर जमीन सगळं आहे, पण खरं पाहिलं तर कुणी कुणाचं नाही."

बिट्टीच्या आईच्या डोळ्यांत पाणी आलं.

"असं कां म्हणता तुम्ही ?"

"माझं अंतर्यामीचं दुःख जर कुणाला समजत नाही तर बायको कसली आणि मुलं कसली ?"

बिट्टीची आई हळू हळू हुंदके देऊ लागली.

"माझं कुण्णी नाही," भोलाबाबूंचा गळा भरून आला.

"नाही, नाही. असं काय बोलता हो ? काय झालंय तुम्हांला ?" आता बिट्टीची आई रडू लागली. तिचं बघून मुलंही रडू लागली.

"अरे, यात रडायचं काय कारण आहे ? जा तुम्ही सगळेजण. जेवा, खा. मी मात्र जेवणार नाही," असं म्हणून भोलाबाबू दुसऱ्या कुशीवर वळले.

बिट्टीची आई व मुलं आता मोकळेपणे रडू लागली. भोलाबाबू देखील उशीत तोंड खुपसून स्फुंदू लागले. मग कोपर टेकून अर्धवट उठून बसत ते म्हणाले,

"अग, अग, हे काय हे ? अं ? कशासाठी रडते आहेस ?"

तिचा सूर अधिकच चढला. ते बघतच राहिले आणि मग एकाएकी तेही रडू लागले.

आता त्या कल्लोळात सगळ्यांत दुःखी आणि उंच रोदनस्वर भोलाबाबूंचा होता.

Printed at Raj Bandhu Industrial Co., C-61 Mayapuri, New Delhi 110 064